९५३८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३२
REFBK-0005709

# नरम गरम

चुरचुरीत लेखांचा संग्रह

लेखक

राजरत्न वासुदेव विनायक जोशी,

बी. ए., एल्एल् बी., वकील, बडोदे.

REFBK-0005709

प्रथमावृत्ति

१-४-१९३८

किंमत १॥ रुपया

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५ सदाशिव पेठ, पुणें २.

[ पुनर्मुद्रणादि सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन. ]

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण, पुणें २.

माझे

सन्मित्र व सहव्यासंगी

प्रो. चिंतामण विनायक जोशी,


एम्. ए.,

यांस

अर्पण

# कथाक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | डोळ्यांतलं कुसळ ! | १ |
| २ | पेन्शनरांचा पांजरपोळ | ७ |
| ३ | घरबसल्या प्रवास | २९ |
| ४ | कुंकू | ३९ |
| ५ | त्यांना काय दिसलें ? | ५० |
| ६ | पहिलें विधुर-संमेलन | ७० |
| ७ | अखेरचा न्यायनिर्णय | ९६ |
| ८ | हीरक महोत्सव | १०७ |
| ९ | आजचा पुणेंकर | १३१ |
| १० | मयतांबरोबरचा तहनामा | १४५ |
| ११ | चहाचा त्याग | १५८ |




— राजरत्न वा. वि. जोशी, बडोदे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
सं. नि. नं. ८०१
१५५७५

# डोळ्यांतलं कुसळ ! १

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. . .....

" डोळ्यांत पाहा ना कायसं गेलं आहे तें ! "

डोळ्याला नुकतीच घडी मोडलेला परटीचा रुमाल लावीत, सुरंगा पुंडलिकाच्या खोलींत शिरली. केवड्याच्या अत्तराच्या घमघमाटानें, तिला वेदनांचा विसर पडला नव्हता. नवीन काढलेल्या जरीकांठी लुगड्याच्या कांठापदरावरून हात फिरवीत, खोलींतल्या मोठ्या आरशांत कौतुकानें पाहत असतांहि, तिचा खुपणारा डावा डोळा तिनें नाइलाजानें घट्ट मिटून धरला होता, आणि दंडावर उभी राहिलेली परीटघडी ब्लाऊजची खांद्यावरची जरीकांठपट्टी, दाबून गोल चापून बसवीत असतांना सुद्धां तिचा एक डोळा मिटलेलाच होता. फार काय, पण फुगेदार केसांवरून पांच बोटांच्या दात्यांनीं विंचरल्यासारखें करीत व कपाळावर जास्त लागलेली पावडर पुशीत, ती आरशांत पाहत उभी होती, तेव्हां सुद्धां तिनें तो डोळा जेमतेम किलकिला करून मिटला होता आणि हसऱ्या ओठांनीं व गालावरच्या खळग्यांनीं खरोखरच्या प्राणांतिक वेदनांनीं चालविलेल्या थट्टेनें चिडून जाऊन तिनें रडक्या आवाजांत दुःखोद्गारहि काढले. " आई ग ! काय करावं. काय मेलं डोळ्यांत गेलं आहे, कुणास ठाऊक ! चैन पडूं देत नाहीं." पुंडलिकानें ते शब्द ऐकले तर नाहींत ना म्हणून तिनें त्याच्याकडे अगदीं दुखरा डोळा किलकिला करून पाहिलें, कारण त्याच डोळ्याच्या बाजूला पुंडलीक होता.

पुंडलीक वाचण्या-लिहिण्यांतच गर्क होता. सुरंगा आल्याचें त्याला समजलें नव्हतें असें थोडेंच होतें ! पण काय असेल तें असो, तो जास्तच निकरानें पुस्तकांत डोकें खुपसून बसला होता. एरव्हीं सुरंगेचे काकुळतीचे शब्द ऐकून त्याच्या काळजाचें पाणीपाणी झालें असतें. सुरंगेच्या क्लेशानें तो भांबावूनहि गेला असेल, कोणास ठाऊक !

" पुंडलीक ! पाहा ना यांत काय गेलं आहे ? कायसं डोळ्यांत खुपतं आहे, केस, का कुसळ, का खडा, कायसं सारखं खुपतं आहे ! कुणी तरी फुंकर मारायला हवी आहे."

पुंडलिकानें आपली भयभीत मुद्रा वर केली. तसें पाहिलें तर पुंडलिकाचे स्वतःचे डोळे शाबूत होते सर्व अवयव शाबूत होते. दुसरी कोणतीहि व्याधि त्याला झालेली नव्हती आणि त्याला व्याकुळ होण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण तो आज कावराबावरा आणि व्याकुळ झाला होता खास.

त्यानें 'बघूं' म्हणण्याच्या अगोदरच सुरंगा त्याच्या खुर्चीच्या हातावर वांकून उभी राहिली. तिनें आपला दुखरा डोळा पुंडलिकाच्या अगदीं तोंडाजवळ नेला. तोंडाला व डोळ्याच्या आसपास लावलेली पावडर न पुसेल अशा बेतानें, तिनें डोळ्यावरचा हातरुमाल हलकेच बाजूस सरकवला. अत्तरांचा भपकारा पावडरीच्या दरवळण्यांत भर घालीत होता. क्लोरोफॉर्मच्या आकर्षक कैफानें पुंडलिकाचें डोकें सुन्न होऊं लागलें. त्याची मति गुंग आणि गाफील होऊं लागली. त्या मिटलेल्या दुखऱ्या डोळ्यांत पुंडलिकाला काय दिसणार होतें !

" बघा ना " असें सुरंगा म्हणाली. तरी दुखरा डोळा आपोआप उघडण्याची वाटच तो पाहत राहिला आणि तसा आपोआप उघडला असता तर सुरंगेनें त्यांतलें कुसळ नसतें का काढलें ! पुंडलीक भीतीमें गांगरून गेला होता. सुरंगेचें अर्धे मुर्धे शरीर त्याच्या अंगावर रेललें होतें, त्या भारानें तो कासावीस झाला होता. पुढें टेबल, दुसरीकडे भिंत, मागें खुर्चीची पाठ; त्याला इकडे तिकडे हलण्यास, कीं मागें सरकण्यास जागा नव्हती.

" हातांनीं उघडून बघाल तेव्हां ! डोळा उघडत नाहीं केव्हांचा. "

सुरंगेच्या या वाक्यानें पुंडलिकाला दुसरें उत्तरच शिल्लक ठेवलें नव्हतें. त्यानें स्वतःच्या उजव्या हाताचा अंगठा आणि अंगठ्याजवळचें बोट अशीं भीतभीत सुरंगेच्या डोळ्याच्या पोटावर टेकली. भीतभीत अशाकरितां, कीं दुखऱ्या डोळ्याला जास्त दुखापत तर नाहीं ना होणार! वरून लालसर सुद्धां न झालेल्या डोळ्याच्या आंत काय दुखणें दिसेल! अन् त्यांतून काय निघेल अशी भीति त्याला वाटत असेल, न जाणो! त्याची ती अनाठायीं भीति सुरंगेच्या लक्षांत आली. तिनें आपल्या हातांनीं पुंडलिकाचे दोन्ही हात उचलले आणि दोन अंगठे डोळ्यांच्या पोटांवर घट्ट दाबून म्हटलें,

" आतां जोरानें उघडा."

पुंडलिकानें आपली सर्व शक्ति व धैर्य एकवटून पुष्कळ जोरानें डोळा ताणला. त्याचे हात लटलट कांपतच होते.

" इतकं भ्यायला नको आहे कांहीं! डोळ्याला ठणका नाहीं लागला कांहीं? जरा जोरानें उघडून पाहा."

सुरंगेनें आपल्या शरीराचा भार त्याच्यावर अधिकच टाकला, तोंड जास्तच पुढें खुपसलें. त्याच्या हनुवटीला, एकीकडून तिच्या गुळगुळीत अणकुचीदार नाकाचा शेंडा व दुसरीकडून गुबगुबीत ऊबदार गालाचा पायथा चिटकले. पुंडलीक दचकला, शहारे देऊं लागला—त्याचे हात लटलटा कांपूं लागले. दुखण्याचीच त्याला भीति वाटत असेल?

" इश्श, काय भितां आहांत?"

तेजस्वी पुंडलीकाला हा सुरंगेनें केलेला धैर्याबद्दलचा उपहास मर्मभेदक वाटला. आत्मसंयमनाची आपली आजपर्यंतची प्रौढी पार ढासळली, ती मुग्ध सुरंगेनें ओळखली आणि त्या प्रमादाबद्दल तिनें आपणांस मुद्दाम खिजविलें असें त्यास वाटूं लागलें. तो ओशाळा दिसूं लागला.

" छे! मला तर बुवा कांहीं डोळ्यांत दिसत नाहीं!"

पुंडलीक अर्भकाच्या निर्विकार शोधक नजरेनें सुरंगेच्या डोळ्यांत पाहत होता. त्यानें स्वतःचे डोळे थोडेसे चोळले आणि पुन्हां तो टक लावून पाहूं लागला. हरवलेल्या मुलाला शोधणाऱ्या मातेच्या भेसूर, चिंतातुर दृष्टीनें डोळ्यांतलें कुसळ तो शोधीत होता.

" छे ! मला तर कांहीं दिसत नाहीं."

सुरंगेची दृष्टि पुंडलिकाच्या डोळ्यांवर मुकादमाप्रमाणें पहारा ठेवून खिळून राहिली होती. भुयारांत उतरतांना कचरणाऱ्या मजुरास हुकूम सोडावा अशा झोकांत ती म्हणाली–

" असें डोळ्याच्या खुऱ्यांत काय पाहतां ! बुबळाच्या मध्यें, बाहुलीच्या तोंडावर कांहीं तरी आहे. मला चांगलं दिसतं आहे तें ! डोळा माझा खुपतो, आणखी तुम्ही कां उगीच भीतीनें लटलट कांपतां ? "

सुरंगा वेदनांनीं व्याकुळ झाली होती, काकुळतीला आली होती, घामाघूम झाली होती, सुस्कारे टाकीत होती, देहभान विसरली होती. देहाचा तोलहि क्लेशामुळें तिला संभाळतां येत नव्हता. तिचें निर्जीव झालेलें जड शरीर पुंडलिकाच्या अंगावर कोसळून पडलें होतें. पुंडलीक अधिकच घाबरला. 'नीट सावरून बसा' असें तो कोणत्या तोंडानें सांगणार ? त्यानें तिच्या डोळ्यांतलें कुसळ जर अजून काढलें नव्हतें तर ती तरी भानावर कशी येणार ! तथापि सुरंगा मोठी प्रसंगावधानी आणि सोशिक !

" थांबा, मी नीट बसतें हं." असें म्हणून ती टेबलखुर्चीच्या आडसांधींत घुसली. टेबलावर ती कशी बशी बसली. खुर्चीच्या दोन्ही हातांवर हातांचा भार टाकून पुंडलिकाच्या अंगावर रेलून पुढें मान करून बसली, येवढ्यासाठींच, कीं पुंडलिकास कुसळ काढण्यास अवघड पडूं नये, त्याची भीति थोडी कमी व्हावी आणि त्यानें एकदम दुखणें बरें करावें. पुंडलिकाला नाहीं-होय म्हणण्याला अगर खुर्ची ओढून मागें सरकण्याला तिनें फुरसत दिली नाहीं.

" हं, आतां निवांतपणें पाहा ! "

पुंडलीक कर्तव्याच्या अडणीपासून रतिमात्र न ढळतां, त्या रतिरूप सुरंगेच्या डोळ्यांत एकसारखा पाहत होता. दुर्बिणींतून चंद्रावरचे डाग अगर मंगळावरील पृथ्वी पाहणाऱ्या ज्योतिष्याच्या निश्चल, निर्विकार पण आतुर दृष्टीनें तो सारखा डोळ्याच्या बुबुळाच्या कांचेंत पाहत होता, पण व्यर्थ !

बा, पुंडलिका ! तुझी कींव करावी तेवढी थोडीच ! त्या लोलुप नेत्रांच्या सूर्यकांताकडे, तूं असा वर्षानुवर्षें भोळ्या मनानें, निर्विकार नजरेनें टक लावून बसलास, तरी त्यांतून निघणाऱ्या असंख्य किरणांनीं तुझी पोरदृष्टि

दिपून जाणार नाहीं. तुझ्या मनाच्या चिमकुल्या बोंडल्यांत बारीकशी सुद्धां विकाराची लाट उत्पन्न होणार नाहीं. तिच्या दुखण्याच्या वेदना तुझ्या मनाला चाटून जाणार नाहींत. आतां तुला काय म्हणावें ! तिच्या डोळ्यांत कुसळ सलत नव्हतें; पुंडलिका, तूंच रे सलत होतास ! पण हें तुला उमजणार केव्हां ! आणि तिच्या डोळयांत जें काय सलत होतें तें का जर तुला सांपडलें, तर बा पुंडलिका, तुझा घात झाला म्हणूनच समज. परोपकार करायला जाशील, आणि 'हैक म्हणतां ब्रह्महत्या' असा प्रकार नाहीं झाला म्हणजे मिळवलेंस !

सुरंगेचे जुलमी डोळे पुंडलिकाच्या सहनशीलतेचा ठाव घेत होते, त्याच्या संयमनाचा अंत पाहत होते, त्याच्या पोरकट तटस्थपणाचा उपहास करीत होते. खरें दुखणें त्याला समजावें या खनपटीलाच बसलें होतें; आणि सुरंगा तरी काय करील ? तिच्या डोळ्यांतलें दुखणें-खुपणें अजून राहिलें नव्हतें, तर तिला चैन तरी कसें पडणार ! आणि परत आपल्या खोलींत तरी ती कशी जाणार ! आज किती दिवसांचें तिचें खुपणें ती सोशिक म्हणूनच तिनें सहन केलें होतें. वडील मंडळी बाहेर गेल्यामुळें आज तिला तें दाखविण्याची तरी संधि मिळाली होती. पुंडलिकाला सलणें, खुपणें, दुखणें, समजत नव्हतें आणि तें दिसल्याशिवाय तो तें काढणार तरी कसा ! आणि सुरंगेचें खुपणें थांबणार कसें ?

तिचे दोन्ही डोळे त्याला सारखेच तेजस्वी, सारखेच दिपविणारे, सारखेच प्रफुल्लित, सारखेच ओढणारे, सारखेंच लोलुप आणि सारखेच घायाळ करणारे वाटले. तो आलटून-पालटून चांगल्या व दुखऱ्या डोळ्याकडे पाहूं लागला. त्याच्या मनावरचें लज्जेचें लुकण पत्रेपत्रे सुटून खरूं लागलें. आज आठ महिने शेजारधर्मामुळें सुरंगेशीं तो बोलत असे, तिनें सांगितलेलें काम तो आनंदानें करीत असे व ती काम केव्हां सांगेल याची आतुरतेनें वाट पाहत असे. पण तिच्या डोळ्याशीं डोळा लावण्याचेंच काय; पण तिच्या चेहऱ्या-कडेहि पाहण्याचें त्याला धैर्य झालें नव्हतें. अगदींच फार धीर करून त्यानें तिला पाठमोरी जातांना एकदां न्याहळून पाहिली होती. पण 'अब्रह्मण्यम्' म्हणून त्यानें कान पिरगाळून घेतला होता. हातापायाचे गुलाबी तळवे, आणि ओच्यापदराचे चापूनचोपून बसविलेले काठ पाहण्यापर्यंतच त्याच्या अंतिम

धैर्याची मजल पोंचली होती. आणि तेवढ्यावरच तो स्वतः धन्य मानून घेत होता. त्याला त्या फुलाच्या गेंदाप्रमाणें रसरसलेल्या टवटवीत चेहऱ्यानें व त्यावर मोहकतेचें तेज ढाळणाऱ्या डोळ्यांनीं स्तिमित केलें असल्यास नवल नाहीं. तिच्या डोळ्यांत पुंडलिकाच्या संकोचाचा खडा, लाजाळूपणाचें सल, खुपत होतें. पुंडलिकानें तें शल्य स्वतःच्या मनांतून आणि सुरंगेच्या दुखऱ्या डोळ्यांतून काढून टाकलें.

जुलमी डोळेच ते! तशांत त्यांत खुपत होतें कांहींसेंसें!

समोरच्या खोलींतील ग्रामोफोन इकडे 'भोळीं खुळीं गवसलीं धनिक वणिक बाळें' ही ओळ घोळून घोळून म्हणत होता.

o o o

पुंडलिकाच्या वडिलांनीं त्यांच्या लग्नाला संमति देऊन पुंडलिकाचा 'अपराध' पोटांत घातला. हा घोर 'अपराध' झाला असें उभयतां पितापुत्र समजत होतें. ते म्हणाले मदना, धिक्कार असो तुझ्या अमोघ पंचबाणांना!

पुंडलिकाचे वडील देवापुढें डोकें ठेवीत मुलाला म्हणाले, "पुंडलिका, एकदां झालं तें झालं! पण हें बघ पुन्हा असं नको करीत जाऊं बरं!"

पुंडलीक अपराध्याच्या ओशाळगतीनें म्हणाला,

"पुन्हा मी असं कध्धीं कध्धींसुद्धां करणार नाहीं!"

नशीब सुरंगेचें!!!

# पेन्शनरांचा पांजरपोळ : : २

" अबाराव, अहो अबाराव, जरा आम्हांला घेऊन जाल कीं नाहीं बरोबर ? " रावबहादुर भगणे, डोक्यापेक्षां उंच सोटा जमिनीवर चार दोन वेळां आपटीत म्हणाले.

अबासाहेब मटंगे कांहीं न ऐकतां व मागें वळून न पाहतां तसेच पुढें जात होते. पेन्शनरांची ही टोळी पुण्याच्या लॉ कॉलेजच्या टेकडीकडे मोर्चा फिरवून निघाली होती.

" अबाराव, अहो अबाराव ! छेः ! स्वारीला आज एकदम ऐकूं येईनासं झालं. तेव्हां रावबहादुर ! ते तुम्हांला सोडून अगोदर जाणार हो जाणार खास ! " बाळासाहेब उद्गारले.

" बरं होईल जरा पुढें गेले तर ! अहो, रावबहादुरांच्यासाठीं बैठकी वगैरे घालून ठेवतील, हारतुऱ्यांची व्यवस्था करून ठेवतील " तात्यासाहेब उद्गारले.

" अहो, पण अबासाहेब अन् रावबहादुर हे एकाच ठिकाणीं जाणार असतील तर ! पण मला तें कठीणच दिसतं. मामलेदार, अन् तो दुसरीकडे कुठें जाणार ? यमलोकांत त्यांच्यासाठीं उकळत्या तेलाची कढई रिकामी पडून असेल ! " बाळासाहेब म्हणाले.

" अन् रावबहादुरांना तरी दुसरीकडे कुठें जायचं आहे ? डॉक्टरसाहेबांनीं

लाखोंजणांना स्वर्ग दाखविला असेल, पण त्यांना स्वतःला मात्र स्वर्ग दिसणं दुरापास्तच ! ” तात्यासाहेबांनीं उत्तर केलें. दोघेही रावबहादुर भणग्यांकडे कुत्सित दृष्टीनें पाहूं लागले.

“ नाहीं— कंत्राटदारांकडून लांच खाऊन सरकारी इमारतींचीं कामें कच्चीं ठेवणाऱ्या इंजिनियर्ससाठीं स्वर्गातलं सिंहासन राखून ठेवलं असेल ? ” रावबहादुर चिडून म्हणाले.

अबासाहेब मटंगे टेकडीच्या पायथ्याशीं विश्रांति घेण्यासाठीं टेकले. पाठोपाठ मंडळी येऊन पोंहोचली. रावबहादुर भणगे हसत हसत म्हणाले, “ काय अबाराव, तुम्ही आमच्यापुढें जाणार असं आम्हांला सगळ्यांना वाटलं होतं ! पण तुम्ही येवढ्यांतच थकलांत, तर पुढें कसे जाणार ? ”

तात्या.—अहो, थकले म्हणूनच लवकर पुढें जाणार !

बाळासाहेब—पुढें गेले तर काय वाईट आहे ? अहो, ओळखीचा माणूस अगोदर गेला तर आपली उतरण्याची सोय करून ठेवील.

मटंगे—होय. मी तुमच्या इथचा गडीच असेन ! रावबहादुर तुम्हांला हें आतां चांगलं दिसतं का; खुश्शाल मला तुम्ही आपले अबाराव म्हणून हाका मारतां ! यापेक्षां मटंग्या म्हणून का नाहीं हाका मारीत ? ”

अबासाहेब रागानें लटलट कांपत होते. ते रागानें इतके बेफाम, अस्वस्थ झाले होते, कीं तीन वाक्यें पुरीं करीतोंपर्यंत ते तीन वेळां उठून उभे राहिले आणि पुनः खालीं बसले. भाषण संपल्यावर तब्बल दहा मिनिटें त्यांच्या हातांचे पंजे थरथर कांपत होते.

रावबहादुर एकदम दचकले. तोल संभाळून म्हणाले, “ असें रागावूं नका मामलेदारसाहेब ! अहो, काल मराठीकरण मंडळानें ठराव केला आहे, कीं सगळीकडे मराठी शब्द वापरायचे. साहेबाऐवजीं राव लावावयाचें ! म्हणून आम्हीं तुम्हांला नवीन नियमाच्या आधारावर अबाराव म्हटलं. तात्यासाहेबां-ऐवजीं तात्याराव म्हणतातच ना ! कालचा ज्ञानप्रकाश पाहा ना ! तात्याराव केळकर, काकाराव लिमये, नानाराव, भाऊराव, मिय्याराव, खांराव अशी यादी तुम्हांला दिसेल; आहांत कुठें ! अहो, या जगांत राह्यचं आहे तोंपर्यंत अप्-टु-डेट असावं माणसांनीं ! ”

" सावरकरांच्या पंक्तीला मला बसवून माझं पेन्शन बंद करायचं असेल मनांतून ! म्हणे तात्याराव त्यांना लोक म्हणतात. मी विचारतों, काय हो, येवढे हे कट्टर भाषाभिमानी, तर ही बॅरिस्टरीची उपाधि कशाला हवी पाठीमागें ? " भणगे त्वेषानें बोलत होते.

" अहो, कारण उघड आहे. बॅरिस्टराला संकृतांत शब्द नाहीं. वकील म्हटलं तर तो फारसी शब्द. बॅरिस्टरीचा धंदा करीत नसतांना ती उपाधि लावण्याचें कारण नव्हतें. पण म्हणतात ना, कीं वांझेलाच पोरें कडेखांद्यावर नाचविण्याची हौस असते म्हणून !" तात्यासाहेबांनीं उत्तर दिलें. आपण भयंकर विनोद केला या अभिमानानें ते सभोंवार पाहूं लागले, 'हशा आणि टाळ्यां'च्या अभावीं त्यांचा विरस झाला. एखाद्या दैनिकाच्या वार्ताहराला च्हाच्या घोटावारी लाळघोट्या बनवून बरोबर भटकवत ठेवला असता, तर ही येवढी जबरदस्त कोटी खास वायां गेली नसती अशी हुरहुर त्यांच्या-मनाला लागली.

बाळासाहेबः—बरं, जाऊं द्या ! काय रावबहादुर तुम्ही येतां ना वर ? अबासाहेब सुद्धां रोज येतात वरपर्यंत ?

रा. ब. भणगेः—मला कुठं सिनेमा-नटी टेहळायच्या आहेत !

बाळासाहेबः—म्हणजे ? म्हणजे काय ?

रा. ब. भणगेः—अबासाहेबांना कुणीसं सांगितलं आहे, कीं प्रभात कंपनींत काम करणाऱ्या नटी लॉ कॉलेजच्या टेकडीवरून दिसतात. अन् तेव्हांपासून ते जिवाचा आटापिटा करून नित्य नियमानं वर जातात.

तात्यासाहेबः—पण त्यांना दोन हातांवरचं दिसत नाहीं; तर मैल पाऊणमैलावरच्या नटी यांना दिसणार कशा ?

रा. ब. भणगेः—निदान त्या तरी यांच्याकडे पाहतील, यांचा देह उद्धरून जाईल! काय करतील विधूर आहेत ! तुम्हांला माहिती नाहीं, आबासाहेबांनीं आपली कारकीर्द अनेक प्रकारांनीं गाजविली होती.

तात्यासाहेबः—पण शेवटीं ज्याचा पैसा त्याच्या पायीं खर्च झाला. सडाचं काढून सडाला लावलं, झालं ! कोळशाचा व्यापार, हात मधल्यामधें काळे व्हायचे.

मटंगे:—कमिशन बसलं होतं, मुंबईहून ब्रॅनसन बॅरिस्टर पंधराशें रुपये रोजानं दोन महिने नेला होता, तरी पण माझ्या घरांतल्या एका कोपऱ्यांतला मी केर झाडला केर! काय समजलांत!! माझ्यावर आपलं कमिशन बसलं, त्यांत मी निर्दोषी ठरलों म्हणून बरं झालं. नाहीं तर लोकापवाद कायमचा माझ्या अब्रूवर उठला असता. तरी हे रावबहादुर खुशाल बोलत आहेतच ना! माझा एक बभ्रा झाला. पण धारवाडला तुम्ही होतात अन् एका लिंगायत व्यापाऱ्याच्या सुनेच्या खुनाचा खटला चालला होता. पोस्टमार्टेम्-मधें इतके आपल्या घरांत गेले आहेत. अबासाहेबांनीं हातांतील सोटा आणि छत्री खालीं जमिनीवर ठेवली आणि दोन्ही हातांचीं मिळून दहा बोटें दाखविलीं.

तात्यासाहेब:—सर्व मंडळींत मीच काय तो कोरडा राहिलों म्हणायचा!

बाळासाहेब:—शाळामास्तर तुम्ही बोलून चालून! प्रोफेसर झालांत म्हणून काय झालं? जात एकच! तुमची तत्त्वनिष्ठा आड येते ना?

रा. ब. भणगे:—कसली आली आहे तत्त्वनिष्ठा! स्वार्थत्याग करणारीं प्रोफेसरें पाहवींत, तर दरेक मुलागणिक राजविलासी बंगले डेक्कन जिमखान्या-वर उठवतात. पैसे खाणं हें हिमतीचं काम आणि पचविणं हें अक्कलेचं काम आहे मोठं!

तात्यासाहेब:—वकिलाच्या अक्कलेचं ना? बरं, आपल्याला वरपर्यंत जायचं का इथूनच परत फिरायचं? लक्षांत आहे ना, आज नानासाहेबांचा ब्याहत्तरावा वाढदिवस आहे? त्यांचं अभिनंदन करायला गेलं पाहिजे.

मटंगे:—अभिनंदन तें काय करायचं! वाढदिवस साजरे करण्याची नवीन प्रथा काढूं नका बुवा!

रा. ब. भणगे:—कां नको?

बाळासाहेब:—अबाराव, नाहीं, चुकलों—अबासाहेब, आपलाहि दिवस साजरा करा.

रा. ब. भणगे:—अहो नीट बोला—वाढदिवस म्हणा! नाहीं तर दिवस-पाणी करण्याची वेळ येईल! चला, आपण निवृत्तिधामाकडेच जाऊं. अन् जातां जातां रावसाहेब विचाऱ्यांनाहि घेऊन जाऊं. दोन पावलांवर तर त्यांचं

घर आहे. नानासाहेबांच्याकडून आज आपल्या संस्थेला कायमचा मोठा लाभ होणार आहे, म्हणून अभिनंदन! काय समजलांत अबासाहेब?

पेन्शनर चतुष्टय परत फिरले. बाळासाहेब हे रिटायर्ड इंजिनियर होते, हें त्यांच्या शॉर्ट खाकी हंटिंग कोट, पांढरी विजार, फेल्ट हॅट, फुल बूट यावरून सहज समजण्यासारखें होतें. रा. ब. मणगे ऊबदार गरम शॉर्ट कोट, नेकटाय, पांढरा रुमाल, अशा थाटांत होते; आणि सिव्हिल सर्जन असतांना चुकून गड्यानें त्यांच्या त्या काळ्या कोटाच्या खिशांत स्टेथास्कोप जो ठेवला होता त्याच्या गिलीट उडून गेलेल्या पितळेच्या पिवळ्या तंगड्या उजव्या बाजूच्या खिशांतून बाहेर डोकावत होत्या, आणि रा. ब. मणग्यांच्या शेजारून चालणाऱ्यावर लाथा झाडीत होत्या. अबासाहेब मटंगे हे रिटायर्ड मामलेदार. त्यांच्या अंगांत सर्जचा लांब कोट, खाकी विजार, बिन पायमोजाचे जपानी बूट, डोक्यावर मूळचा किरमिजी रंगाचा रेशमी, पण आतां वाटेल त्या रंगांत आणि सुतराऊंत जाऊन पडणारा विरलेला जरीचा रुमाल असा त्यांचा रुबाब होता. सर्वांच्या हातांत एकेक काठी व अबासाहेब मटंग्यांच्या हातांत छत्रीहि होती. ऊन्ह-पाऊस या दोन्ही आपत्तींना तोंड देण्याची त्यांनीं बारा महिने अष्टौप्रहर जय्यत तयारी ठेवलेली असे. ह्या चौघांचेहि कपडे पुष्कळ जुने, मधून मधून रंग उडून वा फाटून गेलेले, त्यांच्या वाळून गेलेल्या शरीरांभोंवतीं डेऱ्या-राहुट्यांप्रमाणें घेर टाकून लोंबत होते. जुन्या बाजारांत गिऱ्हाइकांना दाखविण्यासाठीं खुंट्यांवरून जुने कपडे टांगून ठेवावेत, तसेच ते ह्या चालत्याबोलत्या कृश शरीरयष्ट्यांभोंवतीं दिसत होते. बाळासाहेबांची विजार अर्ध्या ढोंगरांवर जेमतेम टेकत होती, तर प्रो. तात्यासाहेबांनीं काळसर तांबूस रंगाच्या मळकट धोतराचा घट्ट काचा मारला होता. ते तिघेजण मोठ्या रस्त्याला येऊन मिळाले. त्यांचा आपापसांत हास्यविनोद चालला होता.

एक तरुण व एक तरुणी त्यांच्या अंगावरून गेलीं. त्या सर्वांनीं त्यांच्याकडे माना वळून पाहिलें.

तात्यासाहेबः—पेन्शनर मारुतीला पावन चाललेलं दिसतं आहे.

बाळासाहेबः—पावन कसलं? अहो, हें साधन आहे साधन! साधली

शिकार, हिंडवील फिरवील झालं. नवराबायको असतीं तर तीं अशीं बरोबर कधींच फिरायला निघालीं नसतीं. बरोबर हिंडायला बाहेरचंच माणूस लागतं. हे असे भक्त येऊं लागल्यापासून मारुतिरायाहि चळला. आपली जागा सोडून तोहि दूर जाऊन पडला आहे म्हणे !

रा. ब. भणगे:—ऐकतों खरं, कीं कुणी मारुति जागेवरून हलवून दुसरीकडे टाकला.

बाळासाहेब:—हें काम नवीन नेमलेल्या फडणिसांचं असेल. फायर्नन्स मेंबरांनीं युक्ति काढली म्हणतात कीं, त्यामुळें पेन्शनर पांचपन्नास खपले तर तेवढीच सरकारची बचत !

अबासाहेब मटंगे:—तुमचं कांहीं तरीच ! मारुति हलविला म्हणून पेन्शनर थोडेच खपायचे आहेत ?

बाळासाहेब:—तुम्हांला माहीत नाहीं ? हा मारुति स्थापल्यापासून दरेक पेन्शनर त्याला रोज पांच प्रदक्षिणा घालून येण्याचा नियम करूं लागला. परवांच आंकडे मीं गोळा केले. पेन्शनरांचें आयुष्य शेंकडा एकूणतीस पॉइंट ब्याहत्तरानें वाढलें आहे.

तात्यासाहेब:—मीं निराळंच ऐकलं ! अदलबदलींत कुणी तरुणीनें मारुतीच पत्करला, कडोसरीला लावलान् काय !

रा. ब. भणगे:—बरा पण पुनः सांपडला ! बायकांच्या कडोसरीला एकदां पुरुष लागला म्हणजे तिथून तो सुटण्याची मारामार ! मुंगळ्याला तोडला तरी गुळाची ढेप सोडीत नाहीं; त्यांतला तो प्रकार !

तात्यासाहेब:—त्याचं असं झालं म्हणतात, कीं उभयतांनीं मारुतीला साक्ष ठेवून आणा-शपथा घेण्यास सुरुवात केली. पण तरुणीच एकदम थांबून म्हणाली, 'प्रिया, मला तुमच्यांत आणि मारुतींत फारच साम्य दिसतं.' त्यानें विचारलें 'रात्रीच्या बाबतींत ना ?' ती म्हणाली, 'मी रूपाबद्दल विचार करीत होतें.' तो म्हणाला, 'पण मारुति तर दगडाचा आहे.' ती म्हणाली,'तेंच तुम्हां दोघांत साम्य आहे म्हणून मी मोठ्या बुचकळ्यांत पडलें आहें. ब्रह्मचारी राहाचं असेल त्यांनीं मारुतीचीच सेवा केली पाहिजे अन् मी मारुतीचीच सेवा करीन.' तरुण त्या प्रातिस्पर्धी मारुतीवर धांवून गेला, तरुणीची थोडी-

फार मदत घेऊन, स्वतःचें डोकें त्याच्यापुढें आपटून त्यानें बलिदान केलें. तरुणीला वाटलें, मारुतीवर हकनाक खुनाचा आरोप येईल. आपल्याला साक्षींत जावं लागेल. तिनं त्याला कडोसरीला लावला अन् ती चालूं लागली. इतक्यांत तिला तिचा खरा प्रियकर भेटला, तेव्हां कडोसरीचा मारुति तिनें दिला फेकून अन् काय! कडोसरीला चिकटला होता तरी बायकांनीं फेंकूनच दिल्यावर काय करतो बिचारा!

बाळासाहेब :—वा! तात्यासाहेब माझ्यापेक्षां तुम्हांला पांच पावसाळे जास्त गेलेले; पण तुमची बुद्धि खूप तरतरीत, तरुण आहे बुवा!

रा. ब. भणगे:—अहो, जन्मांत पहिल्यानेंच तिचा त्यांनीं आज उपयोग केला. तरतरीत नसायला काय झालं?

मटंगे:—अहो, तोन् ती यांत तुमचा जीव घोटाळूं द्या!

बाळासाहेब:—कॉलेजांत राहून त्यांची भलतीच उपासमार झाली आहे, नाहीं तर आमच्या रावसाहेबांचं बघा. आतां आपले ते येणारीं जाणारीं माणसं निरखून पाहतात, पण तीं जुन्या ओळखीचीं निघतात कीं काय तें जाणण्यासाठीं येवढंच!

रा. ब. भणगे:—अहो, यांच्या भीतीनं म्हाताऱ्या बायांनीं तुळशीबागेंत काकडआरतीलासुद्धां जाण्याचं टाकलं. पोरीसोरी तर रस्त्यांत केर टाकायला-सुद्धां डोकावत नाहींत.

आबासाहेब मटंगे:—बोला, बोला! तोंडाला येईल तें बकत असा.

ते या वेळीं लकडीपुलाजवळ आले होते. 'सक्काळ, कॉंग्रेसचा निर्णय, प्रधानांचे राजीनामे' असा आक्रोश करीत वर्तमानपत्रें घेऊन छोकरे उभे होते. अबासाहेबांनीं जवळ जाऊन सकाळ हातांत घेण्याची तयारी दाखवताच त्यांतला पोऱ्या वसकन ओरडला "बाबा, दोन पैसे काढा मग हात लावा" सर्व पेन्शनरांचे चेहरे खर्कन् उतरले. ते पुढें जाऊं लागले. दोन पोरें आपापसांत त्यांना ऐकूं जाईल येवढ्या मोठ्यानें बोलत होतीं. 'हीं पेन्शनरं मोफत वाचनालयांत जाऊन तडफडत्याल. हराम कधीं कुणी खिशांतला पैसा काढून पत्र घेतलं असेल तर!' 'पण काय रे, ही टोळी इकडे कुठें वळली रे?' 'अरे, तो नाहीं का पेन्शनरांचा पांजरपोळ! त्या शेणखाऊ म्हसोबा जवळ;

तिकडे माळका चालली असेल. अरे, तिथं सकाळचं कुणाचं तरी पुराण असतं. खिरापतीच्या लालचीनं हीं म्हातारडीं जमतात झालं. फुकट पेपर वाचायला मिळतो.'

निवृत्तिधाम नांवाची पेन्शनरांसाठीं नवीनच स्थापन झालेली संस्था एका टोलेजंग वाड्यांत वसविली होती. वाडा जुना पेशवाईच्या काळांतला, इंग्रजांच्या चालू काळात कोंदट होऊन घुशी-उंदरांच्या हवालीं झाला होता. नानासाहेब हे पुण्यास फ. स. ज. असतांना त्यांनीं मोठ्या हिमतीनें कोर्टाच्या लिलांवांत स्वतःसाठीं थोडक्यांत पाडून विकत घेतला होता; पण त्यानंतर दोन महिन्यांतच नानासाहेबांचें कुटुंब निवर्तलें. त्याहिपेक्षां नंतर अवघ्या तीन महिन्यांतच दुसरा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर कोसळला, आणखीन् तो म्हणजे पेन्शनींत निघण्याचा. कुणी त्या वाड्याबद्दल अशी अफवा उठविलेली होती—लोक म्हणतात कीं, कोर्ट लिलांवाच्या वेळीं रावसाहेब, नानासाहेब यांनींच किंमत उतरण्यासाठीं बातमी पसरविली होती—कीं, घरांत ब्रह्मसमंध असून तो संसार कांहीं नांदूं देत नाहीं. नानासाहेब नुकतेच मुलाशीं भांडून त्यांत राहण्यास आले होते, इतरांची सोबत मिळावी म्हणून पुण्यांतील बऱ्याच पुढाऱ्यांच्या मदतीनें त्यांनीं निवृत्तिधाम म्हणून पेन्शनरांचें गृह स्थापन केलें. त्याबरोबर बरेच पेन्शनर त्या संस्थेंत येऊन मिळाले. त्यांच्या निवासानें पूर्वींच ब्रह्मसमंधाविषयींची कंडी पुनः जोरांत सुरू झाली. नवीन दाखल झालेले तीन पेन्शनर लागोपाठ आठ आठ दिवसांच्या अंतरानें निजधामास जाऊन पोंहोचले. ही बातमी जिकडे तिकडे फैलावली, त्याचा परिणाम असा झाला कीं, राहण्यासाठीं येणाऱ्या पेन्शनरांची संख्या कमी होण्याऐवजीं उलट एकदम भराभर वाढूं लागली. बरेच तरुण लोक आपापल्या पेन्शनर अगर म्हाताऱ्या नातेवाइकांना मुद्दाम आणून पोंचवूं लागले आणि त्या निवृत्तिधामाची एकसारखी संख्या टिकून ठेवण्याचें सर्व श्रेय गांवांतील तरुण मंडळींच्या उत्साहास द्यावें लागेल.

निवृत्तिधाम म्हणजे निराधार अगर संतापी पेन्शनरांचें अनाथ पंगू-गृहच बनलें. अगोदरच निवृत्तिधामाची इमारत जुन्या बांधणीची, आणि त्यांत एकजात सर्व पुराणपुरुष गोळा होत, त्या वेळीं असें वाटे कीं, मोडक्या

तोंडच्या माणसांचा हा जुना बाजारच बसला आहे कीं काय? धामांत निराधारच नव्हत तर घरीं बायकामुलांना त्रास देणारे अगर त्यांच्या शिस्तीस कंटाळलेले पेन्शनर राहत असत. त्यांची राहण्याजेवणाचीहि व्यवस्था त्यांत केलेली होती. बाकीचे उपरी भेट देणारे, येऊन पडून राहणारे, यांचीहि संख्या कांहीं कमी नसे. निवृत्तिधामाची अशी फुशारकी असे कीं, पुण्यांत सुधारणेला बोकाळूं दिल्याचें सर्व श्रेय त्या संस्थेस द्यावें लागेल. खरोखरीचे म्हातारेच नव्हत तर तरुण पण वृद्ध मनोवृत्तीचे, बुरसलेल्या मतांचे, 'गोमय' जातीचे तरुणहि त्यांना येऊन मिळूं लागल्यापासून पेन्शनरांच्या अभिमानास भलताच ऊत आला. स्थानिक चळवळींच्याच काय पण जागतिक विचार-क्रांतीच्या उलाढालींचीं खलबतें तेथें होऊं लागलीं. सर्व शरीरांतलें ताजें रक्त जसें गळवाच्या गांठींत एकवटून ठणका उत्पन्न करितें, तद्वत शहरांतील टिकाऊ, तजेलदार सनातनी गंभीर आचारविचार निवृत्तिधामांत एकत्र जुळून ठणकूं लागून, त्यांच्या त्रिकालाबाधित निर्णयाचें सांडपाणी शहरांत गल्लोगल्लीं, घरोघरीं खेळूं लागले. मलेरिया डासांचीं अंडींच काय, पण प्लेगचे मेलेले सडके उंदीर त्या सुगंधामुळें नाहींसे झाले. शहराचें बौद्धिक आरोग्य एकदम सुधारलें, ब्रेनटॉनिकवाल्या भटांचा पार धंदा बसला, तहकुबीच्या सूचनांनीं बेजार झालेली नगरपालिका ड्रेनेजच्या तक्रारी नाहींशा झाल्याचें समाधान चुकचुकूं लागली. मांसाहारी हॉटेलें, सिनेमा, सलूनें यांचे मालक हवालदिल झाले आणि पुरांत उडी टाकून आत्महत्या करणें हें एकच राहिलेलें शेवटचें धैर्याचें काम करण्यासाठीं पावसाळ्याकडे डोळे लावून बसले.

त्या शहरांत म्हाताऱ्या-कोताऱ्यांचें येवढें प्रस्थ माजलें कीं, मध्यम वयाचे संभावित स्त्री-पुरुष रस्त्यानें हिंडेनासे झाले; सभा-सम्मेलनांत फिरकेनासे झाले. कुठेंहि जा, केव्हांहि जा, आपला पेन्शनर हा दत्त म्हणून उभाच! कोणतेहि लहान-मोठे सार्वजनिक अथवा खासगी कार्यक्रम असूं द्यात, ह्या पेन्शनरानें नियंत्याची जागा पटकावलीच म्हणून समजा. मरणाच्या दारांत डोकावणारे, जिवंत जगाला व लोकोपवादाला कशाला भीक घालतील? पोषाखाच्या बाबतींत 'न भूतो न भविष्यति' अशी क्रांति या पेन्शनरांनीं उडवून दिली. टांगेवाले आणि प्रतिष्ठित अंमलदार, मवाली आणि संभावित नागरिक यांच्यांतील पोषाखाबाबतींत पुरता भेदाभेद नाहींसा करण्याचा मान पेन्शनराला आहे.

अश्लील वर्तमानपत्रें, लावण्यांचीं पुस्तकें, कामशास्त्रावरील सचित्र विचित्र ग्रंथ, अस्सल आसनें यांचे विक्रेते पैचाहि खप होईना म्हणून हात चोळत बसले; तर एका काळचा त्यांचा ग्राहक तृषार्त श्रोतृवर्ग बोधामृताचे घुटके मिळवण्यासाठीं टोळ्या करून पेन्शनरांच्या माळकेमागून चालूं लागला.

निवृत्तिधामाच्या खालच्या मजल्यांत रस्त्याकडच्या दालनांत पांचसहा निरनिराळ्या आकारांच्या आणि प्रकारांच्या खाटा टाकलेल्या होत्या. एका कोपऱ्यांत त्या दिवशीं नानासाहेब व दादासाहेब समोरासमोरच्या खाटांवर बसलेले होते. नानासाहेब पेशन्सचा डाव बसल्या जागीं खेळत होते. दादासाहेब आरशीचा एक पाय पुड्याच्या दोऱ्यानें बांधून ती डोळ्याला बसविण्याच्या खटपटींत होते. इतक्यांत टाळी वाजवून नानासाहेब 'जमला' म्हणून मोठ्यानें ओरडले. दादासाहेबांनीं त्याकडे लक्ष दिलें नाहीं, नानासाहेब मोठ्यानें ओरडून म्हणाले, "जमला डाव?"

दादासाहेब—काय? (मोठ्यानें ओरडून म्हणाले)

नाना—डाव जमला.

दादा—आपण आपल्याला फसवायचें! मग डाव न जमायला काय झालं?

नाना—म्हणजे मी खोटें खेळतों, अप्रामाणिकपणानं खेळतों असंच ना?

दादा—मला तें कांहीं समजत नाहीं.

नाना—मग टोंचून बोलायचं बरं समजतं? मीं फर्स्ट क्लास सबजज्जाचं आणि कांहीं दिवस ॲसिस्टंट जज्जाचं काम केलेलं आहे, समजलांत. कलेक्टरच्या हेडक्लार्कपेक्षां फर्स्टक्लास सबजज्ज हा खास जास्त प्रामाणिक असतो!

दादा—अहो, तुम्ही येवढ्या मोठ्यामोठ्यानें कशाला ओरडून बोलतां? तुमच्यासारखं मला कमी नाहीं ऐकूं येत!

नाना—कोणाला कमी ऐकूं येतं? उठल्यापासून कुजकंपाद्रं बोलण्याचं आतां तरी टाकून द्या! म्हणे मी अप्रामाणिक!

दादा—येवढा दोन चौकी वाडा दोन हजारांत घशांत उतरला तो प्रामाणिकपणानेंच असेल?

नाना—काय? काय? ऐकलं नाहीं मीं. काय म्हणालांत?

दादा.—का ! ऐकू येत ना चांगलं ? मग मीं म्हटलं आजच्या पेपरमधें काय कमीजास्त बातमी आहे ?

नाना.—पेपर दुपारीं कोण वाचतो ! मी तर पेपर रात्रींच वाचतों. तुमच्या-सारख्यांनीं दिवसाच्या उजेडांतच वाचावा.

दादा.—कोण कुजकंपाद्रं बोलत आहे ? मला कमी दिसतं त्याच्याबद्दल मला टोंचीत असा ! तरी बरं, स्वतःला कमी ऐकूं येतं आहे म्हणून ! बरं बुवा, आम्ही आपले दिवसाच्या उजेडांतच वाचूं शकतों. ( मधल्या टेबला-वरचें वर्तमानपत्र घेऊन चाळतात. नानासाहेब दुसरा पेशन्सचा डाव लावतात. ) वा ! नानासाहेब, अहो नानासाहेब ! आमच्या सूनबाईंचा मावसभाऊ व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा पास झाला.

नाना.—अस्सें !

दादा.—का ! तेवढ्यांत सुद्धां हेवा वाटतो ना ! दुःखाचे कढ येतात ना !

नाना.—मला कशाला हेवा वाटेल! अहो, माझा मुलगा जर ट्रेनिंग कॉलेजचा प्रिन्सिपल आहे तर या पाद्र्याफुसक्या परीक्षेचं मला काय हो ! आणखीन् तुम्ही तरी कसला आनंद मानतां ? कोणाचा कोण ! सुनेचा मावस-भाऊ म्हणे ! बरं, कोणाला वाटेल सून तरी सख्खी असेल. तीहि मानलेल्या मुलाची बायको.

दादा.—माहिती आहे ! मुलगा म्हणे प्रिन्सिपल आहे ! पण गांवांतल्या गांवांत असून ढुंकून पाहत सुद्धां नाहीं म्हणून बरं ! माझं स्वतःचं कुणी नात्याचं नाहीं. माझ्या मानलेल्या मुलाच्या बायकोच्या भावाची परीक्षा पास झाली, मला आनंद कां नाहीं वाटणार ? तेवढं सुद्धां रावसाहेब तुमच्या पोटांत दुखलं आं ? खरं म्हणजे तुम्हीं माझं अभिनंदन करायला पाहिजे होतं ?

नाना.—आणि तुम्हांला नको होतं का माझं अभिनंदन करायला ! बाकी तुमच्या लक्षांत गोष्टी राहतील तर ना ?

दादा.—अभिनंदन ? आणखीन् तें कशाबद्दल बुवा ? मुलांनीं काल विचार-पूस केली वाटतं ? त्यांच्याकडचा काल गडी आला होता ?

नाना.—आज मला बहात्तर पुरीं झालीं, त्र्याहत्तरावं सुरू झालं ?

दादा.—बरं मग ? तुमच्या त्या बाई पाहिजे तर अभिनंदन करतील !

पेन्शनीचे पैसे ती घेणार, आणखीन् आम्हीं कशाबद्दल बुवा अभिनंदन करायचं ? काय त्या पैशाला जाळायचं आहे का ! घर पोराबाळांनीं नात-वंडापतवंडांनीं भरलेलं, पण नशिबीं पाहिजे सुख लावून घेण्याचं ? स्वतःच्या पोराबाळांना तांबडा पैसा देत असाल तर शपथ! लोकांचीं घरं भरा खुशाल !

नाना.—निदान माझ्या घरांत तुम्ही राहताहांत, तेवढ्यापुरते तरी तुम्ही माझे ओशाळे आहांत.

दादा.—ते का म्हणून ! निवृत्तिधामाकडून चांगलं लिहून भाडं घेतां आहांत या भुताटकी वाड्याचं न् त्यांतल्या अंधारकोठड्यांचं ! मी फुकट नाहीं कांहीं राहात ? आमच्या भाड्यांतून स्वतःचं तर पोट बाहेर काढता ? लोक निवृत्तिधामाला काय म्हणतात माहीत आहे का ? रावसाहेबांची खानावळ म्हणून म्हणतात !

नाना.—तुम्ही माझ्या खाजगी बाबतींत चर्चा करीत जाऊं नका ! मी वाटेल तें करीन ! तुम्हांला त्याची पंचाईत ?

दादा.—आम्ही होऊन कुठं पंचायती करायला जातों ! काल तुमच्या मुलांनीं त्यांच्याच चौकशीसाठीं गड्याला पाठविलं होतं, म्हणून तर आम्हांला माहिती ? तुम्ही त्या बाईच्याकडे जातां येतां कीं नाहीं, ती इकडे येते कीं नाहीं हें तो मलाच विचारीत होता, म्हणून तरी मला माहिती.

नाना.—तुमचं कर्तव्य होतं माझ्या अशा ह्या गोष्टींवर पांघरूण घाला-यचं ? तुम्ही माझे लहानपणापासूनचे स्नेही. तुम्हांला माहिती आहेत या सर्व गोष्टी. तुम्हीं माझा बचाव करण्याचं टाकून उलट टवाळीच करतां ! तुमच्या गोष्टी मी कधीं कोणाजवळ बोललों आहे का ?

दादा.—माझ्या काय गोष्टी ?

नाना.—धडधडीत घरीं आलेल्या मेहुणीचा तो नंतर झालेला मुलगा. त्याला तुम्ही संभाळलांत. त्याला बाळगलेला मुलगा म्हणून म्हणतां ! कोणाला गोष्टी सांगाव्या—!

दादा.—छेः ! कांहीं तरीच बोलतांहां झालं !

नाना.—अहो, कुणापासून ह्या गोष्टी लपवून ठेवतां ! त्यापूर्वीं ती स्वयंपाकाला माझ्या इथेंच होती ना ?

दादा.—त्या बिचारीचा सत्यनाश तर तुम्हींच केलात! धन्य असो तुमची! मला वाटलं होतं बायको वारल्यापासून केवळ नाइलाजामुळं तुम्हांला हा फंद लागला! अरेरे! तिचा तुम्हीं सपशेल नाश केलात!

नाना.—मीं काय बुवा तिच्या जन्माचं मातेरं केलं? तिच्या मुलाचं मीं चांगलं केलं पण तें तुम्ही विसरतात?

दादा.—तुम्हीं काय चांगलं केलंत? त्याचा तो आपल्या गुणांनीं, कर्तबगारीनं बेलिफाचा शिरस्तेदार झाला.

नाना.—अहो, पण असं काय विसरतां! त्याची तुम्हीच नाहीं का माझ्याकडे शिफारस घेऊन आला होता, अन् मींच नाहीं का त्याला माझा शिरस्तेदार म्हणून घेतला. तुम्हांला काय वाटलं, कीं तुमच्या शिफारशीमुळं मीं केलं? अंतःस्थ कारण त्याचं हें असं होतं.

दादा.—नानासाहेब! बस्, मी आज हें धाम सोडून दुसरीकडे जाणार! तुम्ही फार भयंकर मनुष्य आहांत, तुमच्या वाड्यांत क्षणभरहि माझ्याच्यानं राहवत नाहीं.

दादासाहेब जागेवरून उठले. त्यांच्या डोक्याच्या व गळ्याच्या शिरा संतापानें फुगल्या, रागानें त्यांच्या सर्वांगाला कंप सुटला, त्यांचे डोळे अश्रूंनीं डबडबले, आणि ते नाक वर ओढूं लागले.

इतक्यांत दरवाजांत फरफटत असलेल्या जोड्याचे आवाज ऐकूं आले. दादासाहेबांनीं घसा खाकरून साफ केला, धोतराच्या ओच्यानें डोळे टिपले. दारांतून डोकावून ते म्हणाले :"या रावबहादुर! आम्ही तुमचीच काल आठवण करीत होतों?"

रा. ब. भणगे—कां बुवा?

दादा.—तसं नव्हे! पुष्कळ दिवसांत भेटला नाहींत, म्हणून म्हटलं—

बाळा.—(पुढें होऊन) कीं रवाना झाले कीं काय?

मटंगे—अहो, पण निदान वार्ता-बातमी तरी छापून आली असती ना ज्ञानप्रकाशांत! कसे झाले तरी रावबहादुर आहेत ते!

तात्या.—अन् त्याचा नातू ज्ञानप्रकाश छापखान्यांत कंपॉझिटर आहे ना!

भणगे—(रागानें) अबासाहेब, तुम्हांला दुसऱ्याची थट्टा करायला हवी, स्वतःची थट्टा कोणी केली म्हणजे एकदम रागावता. मी या थट्टेनें

रागावलों आहें असं नका समजूं. पण आज आपण नानासाहेबांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचं अभिनंदन करायला आलों, अशा वेळीं थोडा गंभीरपणा नको का ठेवायला? या-रावसाहेब, असे या ईझीचेअरवर बसा.

रावसाहेब विचारे समोर शून्य दृष्टीनें पाहत, चाचपडत चाचपडत चालले होते. एका बाजूनें बाळासाहेबांनीं व दुसऱ्या बाजूनें तात्यासाहेबांनीं त्यांस ढकलीत ढकलीत नेऊन खुर्चीवर बसविलें.

रा. ब. भणगे— ( मोठ्यानें ) नानासाहेब, रावसाहेब विचाऱ्यांना मी आज मुद्दाम घेऊन आलों आहे. तुमचा आज ब्याहत्तरावा वाढदिवस! तेव्हां तुमचं अभिनंदन करायला घेऊन आलों. ( जास्त मोठ्यानें ओरडून ) रावसाहेब, नानासाहेबांना आज ब्याहत्तरावं वर्ष लागलं.

रा. सा. विचारे— ( अगदीं हळू आवाजांत ) बरं मग?

मटंगे—( तारस्वरांत ) त्यांचा वाढदिवस साजरा करायचं! त्यांचं अभिनंदन करायचं ना!

विचारे—उंहूं:! ब्याहत्तरावंच वर्ष ना! त्यांत काय अभिनंदन करण्यासारखं आहे! गेल्या महिन्यांत मला ब्यायशीवं वर्ष लागलं. माझ्यापेक्षां ते नऊ वर्षांनीं लहान आहेत. त्यांचं कसलं अभिनंदन करायचं?

भणगे—( हलक्या आवाजांत ) रावसाहेबांपेक्षांहि नानासाहेबांना येवढ्यापोरवयांत जास्त बहिरेपणा प्राप्त झाला या विक्रमाबद्दल त्यांचं अभिनंदन करायचं. ( मोठ्यानें ) तुमच्याखेरीज आम्हां मंडळींत नानासाहेबच मोठे आहेत म्हणून.

विचारे—त्यांत काय! तुम्ही जगलांत तर त्यांच्यायेवढे सहज व्हाल, मात्र ऐंशीच्या पुढें जाऊं म्हणाल तर गोष्ट राहूं द्या? मी पैज मारीन. शंभर रुपयांची पैज! तुम्ही ऐंशी वर्षं जगून दाखवावं.

तात्या.—अहो, कोणाला दाखवावं? मला ऐंशी वर्षांला तेवीस बाकी आहेत आणि मी पैज जिंकेन; पण रावसाहेब ती पाहण्यासाठीं आपल्याला एकशें पांच वर्षं जगावं लागेल तें!

विचारे—कांहीं हरकत नाहीं, माझी त्याला ना नाहीं. अहो, मी मुलांना सांगतों, माणसाचं दीर्घायुष्य हाच त्याचा पराक्रम.

बाळासाहेब—विचारे हें आडनांव कशावरून पडलं रावसाहेब ? तुम्ही स्वतः कमावलेलं दिसतं हें ? म्हणून विचारतों.

विचारे—पोर आहेस ! वय काय म्हणालास ? साठ ना ?

बाळासाहेब—सत्तावन ! गेल्या वर्षींच मी पेन्शनींत निघालों.

विचारे—अगदींच तूं अर्भक आहेस, माझ्यापेक्षां पंचवीस वर्षांनीं लहान आहेस, माझा दोन नंबरचा मुलगाच त्रेसष्ट वर्षांचा आहे.

भणगे—रावसाहेबांना जास्त वयाचा भलताच अभिमान आहे बुवा ! काय त्यांत येवढी फुशारकी मारण्यासारखं आहे कोणास ठाऊक !

मटंगे—नानासाहेबांचं आपण अभिनंदन करतों तें तरी नुसत्या त्यांच्या वयाकडे पाहूनच ना ?

दादा.—निवृत्तिधामाला त्यांनीं हें घर बक्षीस देण्याचं ठरवलं आहे, त्याबद्दल पाहिजे तर त्यांचे आभार माना ! मी त्यांचा अगदीं बाळपणापासूनचा स्नेही. त्यांची माहिती मला खडान्‌खडा म्हणून म्हणतों, त्यांच्यांत अभिनंदन करण्यासारखं कांहींच नाहीं. निषेध करण्यासारखंच पुष्कळ आहे.

नाना.—काय ? काय ? दादासाहेब काय सांगताहेत ?

तात्या.—तुम्ही हा वाडा निवृत्तिधामाला देण्याचं ठरविलं आहेत म्हणे ?

नाना.—पण हें पहा, मला मुलांना विचारलं पाहिजे. आमचे मोठे चिरंजीव आमच्यावर सध्यां फार गरम झाले आहेत.

मटंगे—तुम्ही पेन्शनचे पैसे त्यांच्या हातीं लागूं देत नाहीं म्हणून रागावले असतील !

तात्या.—( हाड् ! ) मुलांचं सगळं भांडण सावत्र आईबद्दल आहे, पण या गृहस्थाला स्पष्ट कसं सांगावं.

दादा.—( हलक्यानें ) आणखीन् आपण अशांचं अभिनंदन करणार ?

नानासाहेब—पेन्शनवर माझा हक्क आहे. त्याचं मी वाटेल तें करीन ! पण ह्या वाड्याचं त्याला विचारलं पाहिजे. आणखीन् एकदोघां इसमांना, माणसांना विचारलं पाहिजे.

भणगे—( हळू ) म्हटलं नाहीं तुम्हांला, कीं त्या बाईला त्यांनीं हा वाडा लिहून देण्याचं कबूल केलं आहे ?

दादा.—म्हणूनच म्हणतों, कीं ही अभिनंदनाची भानगड नको! नानासाहेबांचीं कुलंगडीं ऐकाल तेवढीं थोडींच आहेत!

बाळा.—कुणाच्या खासगी चारित्र्याची चर्चा न केलेली बरी! दिव्याखालीं अंधेर हा असायचाच !

विचारे—तुमच्या निवृत्तिधामाचा अध्यक्ष काय वयाचा आहे? ब्यायशी वर्षांचा माणूस दुसरा कुणी आपल्यां गांवांत तरी नाहीं ? बघा बुवा !

बाळासाहेब—रावसाहेब, ह्या कोपऱ्यावरच्या चांभाराचं काय वय असेल! चौऱ्याण्णव वर्षांचं आहे! आपल्या शहरांत त्याचंच वय सगळ्यांत जास्त आहे.

विचारे—निव्वळ खोटं! साफ खोटं! सा-सा-सा—रावसाहेब विचारे रागानें लटलट कांपूं लागले. सा—सा—सा करतां करतां त्यांना जी झीट आली, त्यासरशीं त्यांनीं खुर्चीच्या पाठीवर मान टाकली. त्यांच्या तोंडाला फेस आला. बाकीची मंडळी घाबरली. नानासाहेबांनीं पाण्याचा तांब्या त्यांच्या डोक्याजवळ नेला, पण हात कापूं लागल्यानें तो त्यांच्या हातून सुटला तो नेमका विचाऱ्यांच्या डोक्यावर ताडकन् आपटून खालीं पडला. त्यानें सर्व कापड भिजून चिंब झालें. दादासाहेब तो आवाज ऐकून जागेवर उभे राहिले, त्या धांदलींत त्यांच्या डोळ्याच्या चष्म्याचा एक बाजूचा पुढ्याचा दोरा तुटून तो खालीं पडला. दादासाहेब तसेंच चांचपडत पुढें झाले व रावबहादुर मणग्यांच्या टकल्या डोक्याला हळूवार हातांनीं चोंबाळीत, कुरवाळीत बसले. रावबहादुरांच्या हातांत व कानांत बाळासाहेबांनीं स्टेथास्कोपच्या तंगड्या खुपसल्या होत्या, आणि बाळासाहेबांनीं रावसाहेब विचाऱ्यांच्या डोक्यावर जखमेच्या जागीं स्टेथास्कोपचें ध्वनिकेंद्र येवढ्या जोरानें दाबलें कीं, विचारे विव्हळूं लागले. "रावबहादुर, छातींत नाहीं तर नाहीं; पण ब्रह्मांडीं सुद्धां प्राण राह्यला नाहीं ना! काळीज बंद पडलं तरी टाळूंत चोवीस तास प्राण असतो म्हणतात! बघा, डोळ्यांत धुगधुगी असली तर!" नानासाहेब म्हणाले.

"तात्यासाहेब, असं करा!" अबासाहेब मटंगे म्हणाले, "चांगल्या एखाद्या डॉक्टराला घेऊन तरी या! नाहीं तर दोन हेलकऱ्यांना लवकर घेऊन या! यांना जिवंत अगर मेलेले असले तरी एकदां त्यांना त्यांच्या

घरीं पोंचवा! अहो, उगीच पंचनामा करण्याची वेळ आली म्हणजे जा कुठें वेणा द्यायला! त्यांतून त्यांच्या कपाळावर नानाहेबांनीं तांब्या मारला."

तात्यासाहेब हे रिटायर्ड सिव्हिल सर्जन. रावबहादुर भणग्यांच्या शांत चेहऱ्याकडे पाहूं लागले, केव्हांचे तरी ते डोळे मिटून स्टेथास्कोपचें ध्वनि-क्षेपन ऐकत नव्हे–ऐकण्यासाठीं कान लावून उभे होते. तात्यासाहेबांनीं त्यांना हलवून विचारलें, "मंडळी म्हणतात, चांगल्या डॉक्टरला आणा!"

रावबहादुर भणगे संतापानें लाल झाले. स्टेथास्कोप त्यांनीं कोपऱ्यांत फेकून दिला, आणि संतापासंतापानें बोलूं लागले. "मी एके काळीं सिव्हिल सर्जन होतों, अजूनहि माझ्यापेक्षां चांगला डॉक्टर कोण आहे? माझंच चुकलं! व्हिजिट फी घेतल्याशिवाय प्राण गेला तरी केस तपासायची नाहीं ही माझी प्रतिज्ञा मीं आज मोडली, माझ्या तपासण्याची किंमत वाटेनाशी झाली. धारवाडच्या सरकारी दवाखान्यांत माझी नेमणूक झाली, त्या वेळीं हॉस्पिटल-मधें रोग्यांची तुफान गर्दी असे. दवाखान्यांत बाहेरून औषध घेणारे आणि आंत पडून राहणारे रोगी यांची नुसती खेंचाखेंच असायची. दोन जादा डॉक्टरांची मागणी खात्यानें केली होती; पण मीं सर्व कामाचा फडशा केला. एक महिन्यांत आंत पडून राहणाऱ्या रोग्यांच्या खाटा रिकाम्या पडल्या आणि अवघ्या सहा महिन्यांच्या आंत बाहेरचे रोगी येणारें बंद झाल्यानें हॉस्पि-टल बंद करून अनाठायीं खर्चाची बचत करण्यासाठीं हॉस्पिटल बंद कर-ण्याचे प्रपोझल् मीं केलें. उगीच नाहीं मला रावबहादुर केलें?"

बाळासाहेब—पण आज विचाऱ्यांच्या या अवस्थेचें श्रेय आपल्याला मिळत नाहीं. नानासाहेबांना—नव्हे नानासाहेबांच्या जड तांब्याला सर्व श्रेय जाणार?

रा. ब. भणगे—रावसाहेबांचा प्राण गेला तो माझ्या स्टेथास्कोपखालीं गेला. त्यांच्या काळजांतून प्राण जातांना त्यानें मारलेली किंकाळी मला चांगली ऐकूं आली. काळीज थांबलें तें कायमचेंच. त्याचे ठोके मुळीं केव्हांच ऐकूं आले नाहींत. पाहिजे तर बोलावा दुसऱ्या कुणा तरी डॉक्टराला, बिचाऱ्याला दोन रुपये तरी मिळतील! मला त्यांत आनंदच आहे. फी द्याल, अन् तो येऊन सांगेल काय कीं, यांचा प्राण गेला आहे, तेव्हांच तुमची खात्री होईल. यांच्या या प्रेताला आतां इथें ठेवण्यांत काय अर्थ आहे?

या वेळीं सकाळीं नवाचे ठोके घड्याळांत पडले. निवृत्तिधामांत काम करणारे दोन गडी, एक आचारी आणि एक ब्राह्मण, असे चार नोकर येऊन दाखल झाले. त्यांना पाहतांच बाळासाहेब त्यांना म्हणाले,

" अरे, इकडे या रे ! रावसाहेब वारले आहेत, त्यांना उचलून त्यांच्या घरीं घेऊन जा !"

" हट् ! मुडदेफरासाचं काम कोण करतो ! " आचारी म्हणाला.

" म्हणून तर रात्रीं नवाला जे जातों ते सकाळीं नवाला येतों आम्ही ! या बारा तासांतच रोगी दगावतो. " ब्राह्मण उद्गारला.

बिचारे गडी ! त्यांना समयसूचकता आणि उत्तर देण्याचें धाडस नसल्यानें निमूटपणें त्यांना रावसाहेब बिचाऱ्यांचें प्रेत उचलावें लागलें.

दारापर्यंत त्यांना उचलून नेलें असेल तोंच रावसाहेब बिचारे हातपाय हालवूं लागले आणि दरवाजाच्या चौकटींत नेतांच ' सोडा मला, मी पायानें जातों,' असें ते स्वतः होऊन म्हणाले. चालणाऱ्याला कडेवर घेण्याची हौस जन्मदात्या आईलाहि नसते. गड्यांनीं पडत्या फळाची आज्ञा घेऊन बिचाऱ्यांना उभे राहूं दिलें. तात्यासाहेब लगेच पुढें होऊन त्यांचा हात धरून त्यांना घरीं पोंचविण्यासाठीं निघून गेले.

रिटायर्ड सिव्हिल सर्जन रावबहादुर भणगे वरमले व रागानें म्हणाले,

" प्रेत पुष्कळ वेळ तसंच घरांत राहूं दिलं म्हणजे असं कांहीं तरी विपरीत होतं बघा ! त्या वेळीं बिचाऱ्यांना स्मशानांत न्यावयाला पाहिजे होतं."

बाळासाहेब—" शाबास ! कमाल केलीत कीं !"

मटंगे—उगीच का रावबहादुरी मिळाली ती ?

रा. ब. भणगे:—( मोठ्यानें ) नानासाहेब ! तुमचें अभिनंदन करतों ऱ्याहत्तराव्या वाढदिवसाबद्दल. अन् हा खाऊचा पुडा आणला आहे तुमच्यासाठीं ?

मटंगे—आणि आमच्यासाठीं ?

बाळासाहेब—आम्हांला काय देणार ?

रावबहादुर भणग्यांनीं त्यांच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. ते नाना-

साहेबांशींच बोलत होते, व बोलतांना त्यांनीं डोक्यावर रुमाल चढविला, हातांत सोटा घेतला.

भणगे—( मोठ्यानें ) अन् वाडा निवृत्तिधामाला द्यायचा आहे त्याचा दस्तैवज करून टाका लवकर ! त्याचा काय नेम ! रावसाहेब विचाऱ्यां-सारखं व्हायचं ! मी उद्यां निवांतीनं भेटेन.

मटंगे—रावबहादुर, थांबा ना ! आम्ही तुमच्याबरोबर येतों !

बाळासाहेब—रावबहादुर, मला तिकडेच यायचं आहे.

रावबहादुर कांहींच उत्तर न देतां पाय आपटीत निघून गेले.

नानासाहेब—रावबहादुर, रागावूनसे गेले ? मी आज सर्वांना चहापाणी देणार होतों ! कुणी कांहीं त्यांना बोललं ?

बाळासाहेब—( मोठ्यानें ) रावसाहेब विचाऱ्यांवरच ते रागावले आहेत ! त्यांनीं ते मेल्याचं नक्की केलं, असं असतांना विश्वासघात करून रावसाहेब जिवंत झाले; ह्यामुळेंच ते रागावले आहेत. नानासाहेब, चहापाणी होईपर्यंत आम्ही बाकीचे लोक थांबतों. नाहीं तरी उद्यां ते आपणाला निवांतीनं-एकटे येऊन भेटणार आहेत. तेव्हां त्यांना चहा द्या.

नानासाहेब— श्रीपती, अरे श्रीपती, (श्रीपती येऊन उभा राहतो ) हं– किती ? मी, बाळासाहेब, अबासाहेब, तात्यासाहेब, दादासाहेब आणि मी ( बोटें मोजून ). अरे, सहा कप चांगला चहा आण. शिरा करून आण. ( श्रीपती जातो. ) बरं, मी काय म्हणत होतों बरं ? हं आठवलं ! रावबहादुर म्हणतात, आपण या निवृत्तिधामांत अग्निहोत्र स्थापूं, आणखीन् संस्कृति-संरक्षक व्याख्यानमाला सुरू करूं. पण मी म्हणतों, परगांवची, नाहीं शहरांतलीसुद्धां तरुण मंडळी बिघडत आहेत. त्यांच्यावर देखरेख ठेवण्या-साठीं आपण एक मंडळ काढावं, एक वसतिगृह काढावं. मी हा वाडासुद्धां कमी भाड्यानं देईन. नाहीं तरी बाकीचा सगळा वाडा रिकामाच पडला आहे ना !

दादासाहेब—( हळू )या बळदाचं भाडं चालू करण्यासाठीं सगळी धडपड आहे !

नानासाहेबांनीं त्यांचें बोलणें ऐकलें नाहीं. रावबहादुर भणग्यांनीं

आणून दिलेला खाऊचा पुडा त्यांनीं सोडला आणि दादासाहेबांशिवाय इतरांच्या पुढें करून म्हटलें, " घ्या ! चहा येई तोंवर ! "

बाळासाहेब—वाः ! चॉकलेट आहे वाटतं ? अन् दादासाहेबांना द्या कीं ?

दादासाहेब—माझे दांत दुखतात. नको मला ? (हळू) पण, बाळासाहेब पाहून ठेवा तुम्हीच. परभारें खाऊचा पुडा मिळाला, पण घ्या म्हणून कोरडा आग्रहसुद्धां करवला नाहीं ! आणि हा चिक्कू मारवाडी म्हणे निवृत्तिधामाला वाडा बक्षिस देणार !

नानासाहेब— अहो ! त्यांना सोसत नाहीं. हजार व्याधींचं माहेरघर आहे त्यांचं शरीर ! मी त्यांच्यापेक्षां तीन वर्षांनीं मोठा, पण तब्येत कशी खणखणीत !

नानासाहेबांनीं चॉकलेटच्या वड्यांचें वेष्टन सोडून तोंडांत टाकल्या आणि जोरजोरानें ते चावूं लागले. त्यांच्या चावण्याच्या झटापटींत दातांची चिकटून बसलेली कवळी जी उडाली ती खालीं फरशीवर पडून फुटली. त्यांचा चेहरा एकदम काळाठिक्कर पडला.

मटंगे— ( हळू आवाजांत ) गर्वाचं घर नेहमीं खालीं !

बाळा— नव्हे गर्वाचें दांत नेहमीं पडतात, असें म्हणा.

इतक्यांत आंतल्या दालनांतून चहाफराळाचें सामान घेऊन श्रीपती आचारी व दरवाजांतून नानासाहेबांचे थोरले चिरंजीव मेहेरबान प्रिन्सिपल भिंगारे-साहेब, बरोबर कोर्टाचा एक बेलीफ, आणि नानासाहेबांचा नातू शशिकांत ( वय ३० ) अशी मंडळी आली.

" तुम्ही असं करा " प्रिन्सिपलसाहेब बेलिफाला उद्देशून म्हणाले कीं, " तें दाव्याचं समन्स आमच्या वडिलांच्या नांवचं आहे तें मला द्या. ते अतिवृद्ध झाले आहेत, त्यांचं डोकं फिरलं आहे, त्यांचा मी पालक आहें, म्हणून मी त्यांच्या नांवाची सही करून देतों."

" कोन ! माधं पाथनपोशान हा कत्तो ! बोयाया याज नाहीं वातत !" नानासाहेबांचें दातांच्या अभावीं बोबडें बोलणें कुणालाच उमजलें नाहीं. ते मुलाच्या अंगावर धावून आले. " तई बय ! मया पेफन मियतं है. कायटा

म्हनतो माधं डोकं फिरलं म्हणून " नीट बोलतां न आल्यानें ते जास्तच चिडले.

" डोकं फिरण्याचं आतां काय शिल्लक राहिलं आहे ?" प्रिन्सिपलसाहेब इतरांना उद्देशून म्हणाले. " हें दाव्याचं प्रकरण वाचलंत म्हणजे समजेल ! ठेवलेल्या बाईला म्हाताऱ्यानं वाडा लिहून देण्याचं कबूल केलं कीं ! माझं पदरचं मी नाहीं सांगत. हा असा-तिनें हा दावाच आणला आहे. पेन्शनची रक्कम आजवर तिला दिली त्याबद्दल आम्ही कांहीं सुद्धां बोललों नाहीं. तुम्हीच सांगा, वडिलांचं डोकं फिरलं आहे का नाहीं ? "

बाळा.-- त्या बाईचा हा दावा सपशेल खोटा आहे. अहो, तसं असतं तर त्यांनीं आमच्या या निवृत्तिधाम संस्थेस वाडा बक्षिस लिहून देण्याचं कसं कबूल केलं असतं !

प्रिन्सिपल—म्हणजे तुम्हांलाहि अशाच थापा देत आहेत. शंकाच नको. डोकं फिरलंच !

शशिकांत—डॅडी ! इटस् ऑल डॅम लाय. ह्याचं काय ऐकतां ! काय हो, आम्ही आज सकाळीं बहीणभाऊ फिरायला चाललों होतों, आमची भलभलती टवाळी करणारे आपणच नाहीं का ? तुम्ही माझ्या आजोबां-बरोबरीचे म्हणून गय करतों ह्या वेळीं ! पण पुन्हा असा प्रकार करण्याचं धाडस करूं नका !

मटंगे--( लटलट कांपत ) बाळासाहेब ! ऐकलंत ? तरी मी तुम्हांला म्हणत होतों, कीं दिवसान् दिवस वयपरत्वें असल्या गोष्टी बोलणं आपल्या-ला शोभत नाहीं ! प्रोफेसर तात्यासाहेबांनीं प्रथम सुरुवात केली.

प्रोफेसर तात्यासाहेबांनीं दरवाजांतून आंत डोकावून पाहिलें, व जमलेली गर्दी अन् प्रकार पाहून त्यांनीं पोबारा केला.

बेलीफ— मग प्रिन्सिपलसाहेब, आपण घेतलं तरी चालेल समन्स. त्यांत तसं लिहावं मात्र. बेलिफानें समन्सचा पिवळा कागद प्रिन्सिपलसाहेबांच्या हवालीं केला. ते त्याच्यावर शेरा लिहूं लागले.

शशिकांत—( बाकीच्या पेन्शनरांना उद्देशून ) आणखीन् तुम्ही सुद्धां आत्तांच्या आत्तां ह्या घरांतून बाहेर चला. इथं तुम्ही संस्कृतिसंवर्धक मंडळ स्थापन करणार आहांत, तरुणांच्या कुटाळक्या करण्याचा अड्डा ठोकणार

आहांत, असं मीं काल ऐकलं; आणखीन् तेव्हांच निश्चय केला होता, कीं चोवीस तासांत जर निवृत्तिधाम संस्थेस निजधामास पाठविलं नाहीं तर नांवाचा शशिकांत भिंगारे नाहीं. ह्या पेन्शनरांच्या पांजरपोळावरून मला गाढवाचा नांगर फिरवावयाचा होताच नाहीं तरी! फार म्हातारडीं माजलीं आहेत!

" शशि, तूं बरा नेमका या कामाला सांपडलास." प्रिन्सिपलसाहेब सही करतांना अजाणपणें पुटपुटले.

बाळासाहेब, आबासाहेब मटंगे, व पाठोपाठ दादासाहेब कांहीं न बोलतां पोशाख चढवून बाहेर पडले. दादासाहेबांनीं हातांत चहाचें घेऊन उभ्या राहिलेल्या श्रीपती आचाऱ्यास हळूंच कानांत सांगितलें, " श्रीपती, माझं सामान आवरून ठेव. मी माझ्या नातवाला पाठवितोंच."

नानासाहेबांना कांहींच अर्थ समजेना? ते ओरडून म्हणाले, " बाबासाहेब, अबासाहेब, अहो अबासाहेब, तुम्ही यायां काय भितां? तो काय कयनाय आपलं? चया हिया घ्या तय खया."

त्यांनीं मागें वळूनहि पाहिलें नाहीं. दूर गेल्यावर दादासाहेब, अबासाहेबांना म्हणाले,

" म्हातारा मोठा भयंकर आह? सांगेन एखादे वेळेस."

० ० ०

कळलें कीं त्याच दिवशीं दुपारीं नानासाहेब यांची एरवड्याच्या वेड्याच्या इस्पितळांत रवानगी करून प्रिन्सिपल भिंगारेसाहेब यांनीं आपल्या वडिलांचा ब्याहत्तरावा वाढदिवसाचा संध्याकाळचा कार्यक्रम साजरा केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ क्र. ५०
सं. नि.
ता. ५५५३

# घरबसल्या प्रवास : : ३

केल्यानें देशाटन, पंडितमैत्री, सभेंत संचार।
शास्त्रग्रंथ-विलोकन मनुजा चातुर्य येतसें फार॥

ही आर्या शाळेंत शिकण्याच्या अगोदरपासूनच मला भटकण्याची जन्मजातच खोड होती. तशांत माझ्या लहानपणाचा पाहिला मित्र डेअरीवाले पंडित ह्यांचा मुलगा जनु पंडित; आणि सभास्थानीं प्रत्यक्ष सभा चाललेली असतांना देखील इकडून तिकडे संचार करण्याच्या माझ्या सवयीमुळें मला पुढें पुढें सभेंत येण्यासच मज्जाव होऊं लागला. अटन, पंडित-मैत्री, सभेंत-संचार ही त्रयी पदरांत पडूनहि माझें चातुर्य इतरांच्या गळीं उतरेना. माझी चूक माझ्या लक्षांत आली. मी नुसता गांवभर भटकत राहिलों. चातुर्य यावयाला देशपरदेश भटकावें लागतें.

मला जात्याच लांबलांबचे प्रवास करण्याची हौस; आणि तीहि बिलकूल प्रवास न केल्यामुळेंच. मानवांनाहि स्वर्गसुखाची हौस असतेच ना; आणि तें सुख न पाहतां, न अनुभवितां, त्यांची हौस अनावर वाढत असतेच ना! तशीच माझी देशाटणाची, पर्यटणाची, खुष्की, दर्यावर्दी, आकाशमार्गी, देशपरदेश पायांखालीं घालण्याची हौस होती. स्वर्गसुखाच्या कल्पना पुराणपोथ्यांतून ऐकून त्यांवर बहोष होऊन जाणाऱ्या वेदांत्याप्रमाणें मीं प्रवासां-

चीं पुस्तकें अगदीं भिटक्या मारमारीत वाचलीं. प्रिन्सिपाल भाट्यांचीं देशपरदेशचीं प्रवासाचीं वर्णनें, फडक्यांचीं हिमालयाच्या प्रवासांचीं टांचणें, हीं तर अगदीं मुखोद्गत केलीं. जेवणापूर्वी कढण भुरकल्यानें क्षुधा शांत होण्याऐवजीं भूक अधिकच कडक लागते. प्रवासवर्णनें वाचून देशाटणाची माझी हौस सफल होण्याऐवजीं माझ्या मनाला विकल करूं लागली. तीं प्रवासांचीं पुस्तकें खात्रीनें रेल्वे कंपन्या, मोटार-मालक, आगबोटीचे धनी ह्यांनीं प्रवासी वाढविण्यासाठीं लेखकांकडून लिहवून घेतलीं असलीं पाहिजेत ह्याची आतां मला शंका उरली नव्हती.

गरिबीच्या वाळवंटांत माझ्या अनंत हौसी करपून गेल्या होत्या मात्र प्रवासाच्या हौसेचे अंकुर ह्या वाचनानें बरेंच मूळ धरून टिकून होते. कपड्यालत्त्याची हौस बाजूस सारून अंगावर मी लत्तारें चिनधोक वापरीत होतों. पण माझ्या पहिल्या द्रव्यसंचयाचा कणन् कण प्रवासखर्चांत कारणीं लावण्याचा मीं निश्चय केला. सुमारें पांचसहा रुपये मांडवल जवळ सांचतांच मीं एका छोट्या पण मौल्यवान प्रवासाचा बेत आणि तोहि पुण्याहून महाबळेश्वरला जाण्याचा बेत ठरविला. माझ्याबरोबर सामानसुमान, पोषाख, मी काय काय घेतला हा थट्टेचा विषय होईल म्हणून नमूद करीत नाहीं. कै. चिमणरावांपेक्षां मी कांहीं कमी गरीब अगर कमी हौशी नव्हतों. पण त्या भोळ्या चिमणरावाची, त्यानें मागून आणलेल्या पोशाखाची, झालेली टिंगल वांचून माझ्या तयारीबद्दल मी कांहींच लिहिणार नाहीं. तसेंच पाहिलें तर, प्रिन्सिपल भाटे ह्यांचीं पुस्तकें अपुरींच होत. कपडेलत्ते आणि इतर सरसामान हीं उसनवारीनें हजार ठिकाणांहून पैदा करावीं लागतात ह्या बाबतींत त्यांचीं पुस्तकें मार्गदर्शक होत नाहींत, हा एक त्यांतील मोठाच दोष होय. मीं तयारी करून महाबळेश्वरला सकाळच्या मोटारीनें कूच केलें. जाण्याचे तीन आणि येण्याचे तीन असे सहा रुपये भाडें पडणार होतें. पण रिटर्न तिकीट मला साडेचार रुपयांत मिळालें. घराबाहेर पाऊल टाकतांच दीड रुपयाची बचत झाली हा शुभशकुनच होता. आणि त्यापैकीं आठ आणे तर मी केवळ चैनींत उडविण्याचें ठरविलें. वाटेंत शिरवळच्या हॉटेलांतच चार आणे खलास केले आणि दुसरे चार आणे पांचगणीतील हॉटेलांना उदार आश्रय देण्यांत खर्च केले. आम्ही निघालो त्या दिवशीं उन्हाळ्याचे दिवस असतांहि

मधूनमधून पाऊस पडत होता. मोटारीचे पडदे बंद करून घेतले असल्यामुळें घाटांतील शोभेकडे मला पाठ फिरवूनच बसावें लागलें. पण मी आतां सृष्टि-सौंदर्याच्या उद्यानांतच जाऊन मोकाट भटकणार होतों, तेव्हां मला प्रवासांतील कोंडमारीचें फारसें वाईट वाटलें नाहीं. महाबळेश्वराच्या मोटारस्टँडवर उतरलों. एका खांद्यावर सामुग्रीची थैली लटकत होती; दुसऱ्या बगलेंत डोंगर चढण्यास आणि वाघाची शिकार करण्यास उपयोगी पडावा म्हणून मला भक्कम सोटा, आणि पाठीवर भली मोठी वळकटी घेऊन मीं ऐटीनें हॉटेलांचा तपास केला. जातांयेतांचें भाडें दिल्यामुळेंच माझ्याजवळ एक रुपया दोन आणे शिल्लक राहिले होते. राहण्याजेवण्याची सोय रोजीं चार रुपये दिल्यास होणार होती. एक वेळच्या जेवणाचा दर बारा आणे, चहाचा दोन आणे. अशी माहिती मिळतांच माझी पांचांवर धारण बसली. महाबळेश्वर-च्या गोड अन्नापाण्याचा स्वाद घेण्यासाठीं घरांतून मी उपाशीच निघालों होतों. आणि तेथील लोहमिश्रित पाण्यामुळें मला भूकहि सपाटून लागली होती. आतां माझ्या लक्षांत आलें कीं, घरांतून निघतांना एक बारीकशी चूक मीं केली आणि ती म्हणजे थोडेसे अधिक पैसे बरोबर न घेतां महाबळेश्वरला येण्याची. पण ही चूक तरी अजाणपणें थोडीच झाली होती ? आणखी पैसे जमल्या-वरच प्रवासाला निघावयाचें तर कदाचित् चारदोन वर्षे मला वायां घाल-वावीं लागतील हें मी जाणून नव्हतों थोडाच ! म्हणून असलेल्या पुंजीवर मी हिय्या करून निघालों. जेवणास फांटा देऊन उभ्या उभ्या महाबळेश्वर पाहून यावें असा बेत केला तर कळलें कीं, पायीं हिंडून एका दिवसांत महाबळेश्वर पाहणें होणें शक्य नाहीं. टांगेवाल्यास विचारतां त्यानें एका स्वारीचे तीन रुपये सांगितलें., माझ्या प्रवासाचें कंबरडे तेथेंच मोडलें. मी प्रथम खाणावळींत जाऊन जेवलों, तेव्हां अवघे सहाच आणे शिल्लक राहिले. संध्याकाळच्या चहाला दोन आणे आणि सिगारेट पेटीला तीन आणे असा त्याचा हिशेब लागलेला होता. सामानाची बॅग, निजण्यासाठीं घेतलेली गादीची वळकटी आणि जड ब्लँकेटें हें सर्व ओझें घेऊन मला फिरणें शक्य नव्हतें. दुपारीं अडीचला परत मोटारी निघणार होत्या आणि स्टँडवरच अर्धापाऊण तास बसुन जी काय मला महाबळेश्वरची हवा खातां आली तेवढ्यावरच मला संतुष्ट राहावें लागलें.

अडीचच्या मोटारीनें मी तेथून निघालों तो संध्याकाळीं जेवणाला घरीं परत आलों. पहिलाच माझा प्रवास सपशेल अपेशी ठरल्यामुळें मी खिन्नच होतों आणि मोटारच्या क्लीनरनें माझ्या वर्मावरच नेमका घाव घातला. " काय पाव्हणे, तुम्ही आला तसे परत चाललांत ? "

" त्यांत काय आहे ? एका जरूरीच्या कामाकरितां आलों होतों; आणि त्यासाठीं परत चाललोंय्. पुढल्या आठवड्यांत पुन्हा येईन तो चांगला पंधरा दिवस राहीन. आणि ह्या पावसानें सीझनची एकदम नासाडी केली आहे. चांगली हवा व्हावयाला आठ दिवस तरी पाहिजेत " असें म्हणून मीं वेळ मारून नेली खरी, पण घरीं आल्यावर आईला काय उत्तर द्यावें ह्या फिकिरींत मी होतों; आणि शेवटीं झालेंहि तसेंच. चार दिवस गाजावाजा होऊन मी आज सकाळीं निघतों काय, आणि त्याच पावलीं परत येतों काय, ह्याबद्दल आईला आणि आमच्या वाड्यांतील बिऱ्हाडकरांना विलक्षण अचंबा वाटूं लागला. जो तो मला विचारूं लागला.

" लवकर न येऊं तर काय करूं ? महाबळेश्वरला या पावसानें इन्फ्ल्युएंझा आणि कॉलरा ह्यांची साथ अशी धूमधडाका सुरू झाली आहे कीं, सारखी मोटारी भरभरून प्रेतें उतरताहेत ! " असें उत्तर देऊन मी कशीबशी वेळ मारून नेली.

" आई-आई ! आणि आतां चिमी आणि चिमीचा नवरा कोठें असतील ? " शेजारच्या कृष्णाबाईनीं किंचाळी ठोकली आणि त्या लगबगीनें तेथून निघून गेल्या.

" बरं केलंस बाळ, तूं आपला आलास. नाहीं तर माझा जीव टांगणीला लागला असता." आईनें उद्‌गार काढले.

प्रवास करण्याच्या हौसेला पहिल्या रपेटीसच ठोकर लागून मी सपशेल धुळीस मिळालों खरा; तथापि अतृप्त वासनांना बारा हत्तींचें बळ असतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आतांपर्यंत माझी मोठ्यांतली मोठी चूक अशी झाली होती ती प्रवास कसा करावा आणि कोणकोणतीं स्थळें पाहावींत अशा भौगोलिक ग्रंथांचेंच मीं अध्ययन केलें होतें. त्यापायीं पुस्तकांचीं पानेंच काय पण हिंदुस्थानचा नकाशा निळ्या-जांभळ्या रेघांनीं मी चितारून ठेवला होता. या सर्व रेघांकडे आतां पाहाण्याचाहि मला धीर होईना. माझ्या

हातावर धनरेषेचा ठणठणाट तेव्हां, नकाशावरच्या त्या काळ्या-तांबड्या रेघांनीं ती उणीव थोडीच भरून येणार होती? याच सुमारास एक पैसा वाचनालयांतून मीं सर्वोत्कृष्ट ठरलेली अशी आधुनिक कादंबरी आणली आणि पहिल्या पानांतच कथेंतला नायक पुण्या-मुंबईहून चार दोन सेकंदांत आणि विमानाच्या मदतीवांचून एकदम ब्रह्म-देशांत जाऊन उतरला. त्याची ती शीघ्रगति, अप्रतिहत प्रवास पाहून मी तर थक्कच झालों आणि एकदम निश्चय केला कीं, कादंबरींतील नायकाबरोबर अगदीं पायाशीं पाय टाकून प्रवास करावयाचा. हा निश्चय मीं केला मात्र आणि मला किती तरी दूरदूरचे देश, विमान-वेगाच्या दसपट झडपीनें, पाहावयास मिळूं लागले. माझा नायक गरीब असतांना सुद्धां त्याला पैशाच्या अडचणीं-मुळें प्रवासाचा बेत कधींच सोडून द्यावा लागला नव्हता. नायिका खल-पुरुषाबरोबर पळून गेली आणि तीहि कलकत्ता मेलनें, हें त्याला पुण्याला कळण्याचा अवकाश, कीं दहा मिनिटांच्या अवधींत त्याच्यासाठीं पुण्याहून थेट कलकत्त्याची दुसरी गाडी सुटेल आणि तो त्या दोघांना आगगाडीच्या पाणी पिण्याच्या पहिल्याच विसांव्यावर गांठील; खलपुरुषाला ठार करील; नायिकेला संसारसुखांतून उठवील. माझाहि त्याच्याबरोबर प्रवास होऊं लागल्यापासून मीहि तितकाच बेफाम होऊन गेलों. माझ्या नायकाला कधीं झोंप घ्यावी लागली नाहीं; झोंप न घेतां तीसतीस तास सारखा प्रवास करून उतरतांच तो वाट पाहणाऱ्या नायिकेला बरोबर घेऊन डोंगर-चढणीस सुरुवात करी. त्याला जेवणाखाणाकरितां, चहापानाकरितां कुठें खोळंबून किंवा अडकून पडावें लागलें नाहीं, अगर त्यांच्या अभावीं तो कधीं थकलाहि नाहीं. त्याचे कपडेलत्ते कधीं मळत नाहींत आणि त्याला ते कधीं बदलावेहि लागत नाहींत. प्रवासाला जाण्यासाठीं त्याला उपरी अमलदारांकडून रजा घ्यावी लागत नाहीं आणि रजा न मिळाल्यामुळें प्रवासहि त्याला कधीं रद्द करावा लागला नाहीं. पैसा, काळ, वेळ, पोटासाठीं परावलंबित्व, तहान, भूक, विश्रांति, ह्या यच्चयावत् प्राणिमात्राचें भरडून पीठ काढणाऱ्या नित्याच्या सर्व गोष्टी; पण त्याच्या वाऱ्यालाहि त्या उभ्या राहत नसत. वाऱ्यावर राहणारे ऋषि कांहीं सत्य युगांतच निर्माण होत नव्हते. अगदीं कलियुगांतहि खऱ्या वास्तववादी

कादंबऱ्यांतून अगदीं लहान-थोर सर्व पात्रें वायुभक्षण करून लहानाचीं मोठीं आणि मोठ्यांचीं खोकीं झाल्याचें दिसून येईल. बरें माझ्या नायकाची अशी चंगळ उडून जावयाची कीं, त्याला पाहतांच अनोळखी माणसानेंदेखील चहा घेतां का म्हणून त्याला विचारावें, सिगारेट पुढें करावी, असा त्याचा तो थाट! माझ्या महाबळेश्वरच्या प्रवासांत मला कुणी चहा दिला असता तर दोन आणे वांचले असते. मला कोणी सिगारेट देण्याऐवजीं क्लीनर आणि ड्रायव्हर यांनीं संगनमत करून माझी तीन आण्यांची गोल्ड फ्लेक केव्हांच फस्त करून टाकली होती, त्याची रुखरुख अजून माझ्या मनांत कायम आहे. त्या तीन आण्यांच्या पैशांत मी बारा दिवसांत बारा कादंबऱ्या वाचून सबंध हिंदुस्थानच काय पण अखिल पृथ्वी पालथी घातली असती. आमचा नायक जिथें जाईल तिथें नंदनवनच फुलावयाचें. डासांच्या कोट्यवधि अंड्यांची जोपासना करणाऱ्या कोट्याधीश मुळा-मुठा नदीचा भिकार प्रवाह, पण त्याच नदीच्या कांठीं नायक-नायिकेला घेऊन आला मात्र, लगेच तिथें विस्तृत पात्र झालें. त्यांत रोजचे कामधंदे टाकून खुशाल विहार करणारीं असंख्य जोडपीं जलक्रीडा करूं लागलीं. मानस सरोवरावरचे झाडून सर्व हंस तेथें येऊन दाखल झाले, आणि मानस सरोवरांतील कमलतंतूंचा फन्ना उडविण्याचा मक्ता पुरा करण्यासाठीं भोंवतालच्या वड-पिंपळावर उगीच कावकाव करीत असलेल्या कावळ्यांना सामोपचाराच्या गोष्टी सांगून बरलीस पाठविले. नायक भर दुपारीं घरांतून उन्हाळ्याच्या दिवसांत निघाला होता. नायिकेच्या घरची मंडळी नुकतीच जेवणींखाणीं करून आडवी झाली होती, वामकुक्षीच्या पुरी आहारीं जाऊन गाफील बनली होती. अशा त्या दिवसा-ढवळ्या क्षणिक सामसुमीच्या क्षणीं डोळा चुकवून, नायिका त्याच्याबरोबर बाहेर पडली आणि ती थेट आड रस्त्याला म्हणून नदीला येऊन पोंहोचली होती. पण नक्षत्र, तारे एकदम तो चमत्कार पाहतांच चकित् झालीं. दिवसा रात्र आणि रात्रीं दिवस पाहून भांबावून गेलेलें सूर्यबिंब पूर्वेकडून आणि चंद्रबिंब पश्चिमेकडून नदीच्या पात्रांतून गटंगळ्या खात मध्येंच वर डोकीं काढून त्यांच्याकडे चोरून पाहूं लागलीं. म्हशी धुण्यास आलेले गवळी, कपडे धुण्यास आलेले परीट, ह्यांनीं नायक-नायिकेला एकान्त मिळवून देण्यासाठीं

एकदम आपल्या जनावरांसह तेथून पोबारा केला. भर वस्तींत नायकाबरोबर नायिका ज्या ज्या वेळीं वावरते त्या त्या वेळीं सर्व निर्जन होऊन त्या उभयतांचे बेफाम चाळे नदी-घाटांवरच काय, पण बाजार-कट्ट्यावरहि निर्धास्त होऊं शकतात. नायक ज्या ज्या वाटेनें जाईल त्या त्या वाटेनें हिंडणाऱ्याच काय पण दुतर्फा घरांतून डोकावणाऱ्या स्त्रिया एकजात सुंदर आणि तरुण असावयाच्या. त्यांतील बहुतेकांच्या तो ओळखीचा असावयाचा आणि त्यांतील कित्येकींस तो हवाहवासा वाटावयाचा. तोहि बेधडकपणें वाटेल त्या स्त्रीजवळ (अर्थात् ती सुंदर श्रीमंत असणारच) बोलूं शकतो. फार काय पण, अनोळखी स्त्रीस नुसत्या खुणेनें तो वाटेल त्या आड-वाटेला घेऊन जाऊं शकतो. तिची चुटकीसरशी लग्नास कबुली मिळवितो. नाहीं तर क्षणांत चकवून तिला जन्मभर टांचा घांसावयास लावतो. हा त्याचा पराक्रम कोणा धाडसी मनुष्याच्या मनांत आकांक्षा उत्पन्न करूं शकणार नाहीं? मी तोंपर्यंत अविवाहितच होतों, आणि नायकाच्या या पराक्रमावर माझें लक्ष दिवसेंदिवस जास्त खिळूं लागलें. आशुक्माशुक प्रकरणीं मला फारच चातुर्य आलें होतें, आणि तेंहि नायकाच्या संगतीनेंच. यासाठीं माझ्या प्रेम-गीतांतील पहिली विलापिका—उत्कंठिता (जें काय आतुर काम्याला म्हणाल तें) माझ्या नायकावरच मीं रचावयाची ठरविली होती.

माझे कादंबरी-वाचनाचे दिवस बेफाम आनंदांत जाऊं लागले. इतकेंच काय पण रात्रीहि बेभान स्वप्नस्थितींत जाऊं लागल्या. तरी माझ्या प्रवासाच्या बडबडीमुळें अरसिक आई मला झोंपेंतून जागें करी, ऐन सुखाचा विरस करी. दिवसाहि मी वाचण्याच्या भरांत स्वतःशींच मोठमोठ्यानें हसत असें, हातवारे, आविर्भाव करीत असें, यावर आईचें बारीक लक्ष होतें; आणि तिनें तर माझें डोकें फिरलें असल्याचेंच मनाशीं ठरविलें होतें. पण बिचारी करते काय? माझें अजून लग्न व्हावयाचें होतें. म्हणून ती माझ्या वेडावर आपल्याकडून एकसारखी पांघरूण घालीत होती. पण माझे शेजारीपाजारी तितके दयाळु थोडेच होते? वेडाचा बभ्रा झाला आणि मला कुणी मुलगीच देईनासें झालें, तरी त्यांना तें पाहिजेच होतें. महाबळेश्वरीं कॉलरा, इन्फ्लु-एन्झा एकदम हाहाःकार उडवीत असल्याची मीं पूर्वी उगीच मारलेली थाप वेडाचा स्पष्ट पुरावा म्हणून चर्चिली जाऊं लागली. माझ्या आईचा चेहरा

काळजीनें फटफटीत पडला. तिनें माझ्यावर सक्त पहाराच ठेवला होता. घरमालकानें तिला माझी काळजी घेण्यास बजाविलें होतें, नाहीं तर जागा सोडून जाण्याची नोटीस दिली होती. घरमालकास मी घराला आग लावीन याचीच एकच्या एक काळजी लागून राहिली होती. माझी ' तब्येत सुधारली तर असलीं दहा घरें मी बाळावरून ओवाळून टाकीन ' ( अर्थात् लोकांचींच घरें आम्हांला ओवाळणीच्या निरांजनावर मांडावीं लागणार होतीं. ) असे मातोश्रींचे उद्गार मालकाला जास्तच कासावीस करीत.

हा सर्व प्रकार इतका गुपचुप चालला होता कीं, त्याची मला गंधवार्ताहि नव्हती. मी रोज ऐटीनें, आज काय सीलोनला जाऊन आलों, आज काश्मीरला गेलों, आज ईजिप्तला गेलों, असें ऐटीनें सांगे. इतर बिऱ्हाडकरू मला ' प्रवासी-वेडा का वेड्याचा प्रवास ' असा कूट प्रश्न टाकीत. मी तो हसून स्वीकारीत होतों. एक दिवस असाच मी रात्रीं पुस्तक घेऊन वाचीत पडलों होतों, डोक्याशीं डिट्‌मारचा भडक्या दिवा ढणढण तेवत होता, तशीच मला झोंप लागली. आई धांवत आली, तिनें दिवा बारीक केला. माझ्या छातीवर पडलेलें अर्धें उघडलेलें पुस्तक उचललें आणि ती तशीच बाहेर आली. नंतर कळलें कीं, तिनें तें पुस्तक आणि त्याचें उघडलेलें पान तस्सेंच्या तस्सें समोरच्या बिऱ्हाडांतल्या मास्तरीणबाईच्याकडे तडक नेलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहाच्या वेळीं मातोश्रींनींच एकदम आज्ञा केली. त्या म्हणाल्या, " बाळ, आतां तुझं मी लग्न यंदा उरकून घेणार बरं का. आतां मी मुळींच तुझं होय नाहीं कांहीं ऐकणार नाहीं."

" तें काय म्हणून ? माझ्या हातून तशी कांहीं वेडीवांकडी गोष्ट घडल्याचं तुझ्या ऐकिवांत आलें का ? " मी सात्त्विक संतापानें लाल झालों, हातांतली भरलेली बशी तशीच जमिनीवर आदळली.

" तसं नव्हे. पण आतां तुला लग्नाशिवाय ठेवणं बरोबर नाहीं. उगीच तूंच बघ, तूं काय काय पुस्तकं वाचीत असतोस अन् काय काय चाळे करीत असतोस ? "

" आई हें तूं काय कुभांड माझ्यावर रचतेस ! माझे पाठीराखे बाबा नाहींत म्हणून तूं माझ्यावर नाहीं नाहीं ते आरोप घेणार कीं काय ?" रडव्या आवाजांत मी बोललों.

" कुभांड मी कशाला घेऊं ? रात्रीं पुस्तक वाचतां वाचतां तूं निजलास, मीं दिवा मालविला, तूं झोंपेंत कांहीं तरी बरळत होतास. समोरच्या मास्तरीण-बाई आहेत ना —"

" बरं मग ? त्यांचं काय ? त्या काय म्हणत होत्या ? माझ्याबद्दल कांहीं ? "

" ऐकून घे. उगीच डोक्यांत राख घालूं नकोस. त्यांना मीं तें पुस्तक नेऊन दाखविलें. त्या म्हणाल्या कीं, अगदीं चटोरांतली चटोर कादंबरी ही आहे. आणखी त्यांचें म्हणणें अगदीं खरं होतं. तूं वाचीत होतास तींच पानं त्यांनीं वाचून दाखविलीं. माझ्याच्यानें तर तें ऐकवेनाच. इथून तिथून बायका-पुरुषांचा पाचकळपणा भरला होता. नाहीं, मी म्हणतें यांना हें पांचटपणें लिहवतं तरी कसें, अन् आढळतात तरी कुठें ? मीं रात्रभर जागून हाच निश्चय ठरविला, कीं तुझं लग्न यंदा करायचंच ! तुला मी मुळीं सांगणारच नव्हतें. पण त्याच मास्तरीणबाई म्हणाल्या कीं, मुलाला आपली मुलगी दाखवून, सांगून-सवरून लग्न करावें. मागाहून भानगड नको.

मला आईनें मुद्देमालानिशीं पकडलें होतें, मला आतां बचावच शिल्लक राहिला नव्हता.

मंगलाष्टकें संपतांच, वाद्यांचा एकदम कडकडाट झाला, आंतरपाट बाजूस सारतांच लटलट कांपऱ्या हातांनीं मी कशीबशी माळ आमच्या धर्मपत्नीच्या गळ्यांत घातली. माझी धुंदी एकदम उडाली. एकादी नायिका मिळेल ह्या माझ्या न्याय्य आंकाक्षेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. दूरदूरचे प्रवास आतां मला पारखे झाले, नायकाचे सर्व ऐषआराम, ऐश्वर्य माझ्यापासून दूर पळून गेलें. सुंदर, श्रीमंत तरुणींच्या सहवासांस मीं अंतरलों. ही सत्यकथेची कुऱ्हाडच आशेच्या आकाशांतून माझ्या डोक्यांत पडली. शंभर टक्के वास्तववादी गणल्या जाणाऱ्या कलाकृतीच मी तेवढ्या वाचीत असें, पण समोर दिसणाऱ्या सहधर्मचारिणीबरोबर संसारयात्रा कंठावयाची आहे, या विचारानें माझ्या मनांत जी त्या दिवशीं धडकी भरली ती वज्रलेप. देशाटनाचा नाद जर मीं केला नसता, तर खात्रीनें माझ्यावर हा प्रसंग गुदरला नसता. माझ्या वेडांत माझ्यावर केलेल्या कविमित्राचें विडम्बन काव्य मला नेहमीं आठवतें, मनास अस्वस्थ करतें.

केल्यानें देशाटन पंडित-मैत्रि सभेंत संचार ।
शास्त्रग्रंथ विलोकन मनुजा मूर्खत्व येतसे फार ॥१॥

घरबसल्या मीं नायकाबरोबर प्रवास केला, त्याची फलश्रुति काय झाली? तर मला कायमचें घराला डांबून राहावें लागलें, आणि ज्या पोटापाण्याच्या जिकीरीला मी नायकाच्या संगतीच्या जोरावर दूर लोटीत होतों, ती प्रपंचाची, जीवनकलहाची, नित्य अडचणींच्या जिकीरींत मी पुरा गाडला गेलों. मी नायकाच्या नादीं लागल्यामुळें मला लग्न करणें भाग पडलें, माझे पंख कापले गेल्यानें मी घरकोंबडा झालों.

कुंकू : : ४

## ( १ ) पूर्वरंग

अनुच्चारित अनुस्वार आणि कुंकू हीं चालू काळांत सारखींच दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलीं आहेत. उच्चाराशीं जेवढा अनुच्चारित अनुस्वारांचा जिव्हाळ्याचा संबंध तेवढाच कुंकवाचा सौभाग्याशीं संबंध ठरवून, ज्या ईर्षेनें आजचा बंडखोर लेखक अनुस्वाराच्या पाठीमागें हात धुऊन लागलेला दिसतो, तितक्याच त्वेषानें १९३६ ची तरुणी कुंकवाची हकालपट्टी करण्याच्या खनपटीस बसलेली दिसते. नाकांत बोलणाऱ्या कोंकणी लोकांची पहिली-वहिली संगत करून, नंतर घाटमाथा चढणाऱ्या मराठी भाषेंतील अनुच्चारित अनुस्वार मराठीचे पूर्वचरित्रद्योतक अवशेष होत. तद्वतच शोभेसाठीं तोंडास रंग फासण्याच्या आपल्या रानटी ( रानांत राहणारे ) पूर्वजांच्या हौसेचे धार्मिक अवशेष म्हणजे स्त्रियांचें कुंकू आणि पुरुषांचें गंध होत. उत्क्रांतीच्या डोंगरावर चढतांना पुरुषांनीं गंधाची संबळी ओझ्याच्या सबबीवर पायथ्या-शींच ठेवून दिली आहे. स्त्रियांचें कुंकू मात्र क्षीण होत चाललें असलें तरी अजून टिकून आहे. याचें कारण मुलेंबाळें, वडीलधारीं माणसें यांच्या परि-वारासह प्रवास करणाऱ्या आमच्या भगिनीवर्गास दम टाकीत आणि हळूहळू चढण चढावी लागते हेंच होय. पुरुष मात्र भगिनीवर्गापासून हाताच्या अंतरावरून हाकेच्या व हाकेच्या अंतरावरून दृष्टीच्या अंतरावर भराभर उड्या मारीत हा डोंगर वेंगीत आहेत.

धार्मिक बाबतींत तर्क( ट )ास जों जों जास्त वाव मिळूं लागला तों तों कार्यकारणभावाचे साखळदंड तटातट तुटूं लागले. त्यासरशी कित्येक ज्या जिव्हाळ्याच्या धार्मिक गोष्टी निवारशी ठरून उकिरड्यावर फेंकल्या जात आहेत, त्यांत पुरुषाचें गंध, ब्राह्मणाचें जानवें आणि हिंदु स्त्रियांचें कुंकू आणि मंगळसूत्र यांचे नाशवंत सदरांत एका पाठोपाठ असे नंबर लागून राहिलेले आहेत. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं या क्षय लागलेल्या कुंकुम-तिलकाचा पुरस्कार कोणी न केल्यास अवहेलनेनें तो नष्ट होईल अशी भीति वाटते. म्हणून आज त्याबद्दल दोन शब्द लिहिण्याचें ठरविलें आहे.

गळ्यांतलें मणिमंगळसूत्र आणि भालप्रदेशीचें कुंकू हीं दोन सारखींच सौभाग्यलक्षणें समजलीं जातात. पण मंगळसूत्राचा आणि सौभाग्याचा जेवढा समव्यातीचा संबंध दिसतो तेवढा कुंकवाचा आढळत नाहीं. कुमारिकेला मंगळसूत्र घालतां येत नाहीं, पण कुंकू हें लावावेंच लागतें, निदानपक्षीं लावण्यास मुभा आहे. तेव्हां कुंकू ही एक शोभेचीच बाबत ठरते. तर मग विधवेस विद्रूप करण्यासाठींच तर तिला कुंकू लावण्याची सक्तमनाई केलेली नसेल ना! लग्नाबरोबर कुंकू येत नाहीं तर लग्न मोडल्याबरोबर ( अर्थात् इतरत्र मृत्यूनें व बडोद्यांत आतां लग्नविच्छेदाच्या सोट्यानें ) तें कां जावें? सयुक्तिक उत्तर सांपडणार नाहीं. सुवासिनीचें आयुष्य हेंच इतिसर्वस्व कल्पून कुमारिकेला हें शुभचिन्ह लावण्यांत आलें अशी पंडिती पळवाट निघूं शकेल. पण हेंच समर्थन विवाहसंस्थेवर बहिष्कार टाकून 'आम्ही अबला होऊं सबला' अशीं राष्ट्रगीतें म्हणत बाहेर पडणाऱ्या आजच्या कुमारिकांनीं ऐकलें, तर या शोभेच्या चिन्हावरच परदेशी जिनसांप्रमाणेंच निरोधन करण्याकडे त्या ताबडतोब वळतील. शिवाय सर्व चेहऱ्याभर गुलाबी आणि ओठांवर लाल रंगाचा डूब देण्याची मोकळीक असतां बारिकशा टिकलीची ती काय किंमत! एकंदरींत लग्नाबरोबर कुंकवाची सांगड घालण्यांत अर्थ नाहीं. घटस्फोट ज्या ज्ञातींतून रूढ आहे अशांपैकीं बऱ्याच ज्ञातींत घटस्फोटानंतरहि ती स्त्री कुंकू लावतांना दिसते. कारण हेंच असावें कीं, लग्नापूर्वीं ती कुमारिका म्हणून कुंकू लावीत होती, लग्नानंतरहि लावीत होती, तेव्हां लग्नगांठ सुटल्यावर ती पुनः विवाहयोग्य नवरीमुलगी झाली. तेव्हां कुमारिकेचें लेणें ती लावूं शकते. अर्थात् नवरीमुलगी ही संज्ञा नवरामुलगा या संज्ञे-

प्रमाणें केवळ अवस्थादर्शक असून स्थितिदर्शक अगर वयोमानदर्शक नाहीं. तेव्हां अशी अवस्था झालेल्या ऐंशी वर्षांच्या विवाहेच्छु असंख्यवरांस (बिजवर, तिजवर या श्रेणीची शेवटची पायरी) सुद्धां आपण नवरामुलगा असें संबोधितों. लग्नाची वाट पाहत राहिलेल्या जख्खड म्हातारीलाहि ज्या अधिकारानें कुमारी म्हणून आपण संबोधितों त्याच अर्थानें पुनर्विवाहेच्छु घटस्फोटितेस नवरीमुलगी, लग्नाची मुलगी, असें संबोधण्यास कोणती हरकत आहे ? घटस्फोटितेस जर कुंकू लावितां येतें, तर गतधवेस कुंकू लावण्यास कां आडकाठी असावी ? एका दाखल्यांत नवरा पत्नीला सोडून परलोकीं गेला, दुसऱ्यांत पत्नीला सोडून कायमचा दुसरीकडे गेला; पण दोहोंतहि पतिपत्नीसंबंधाची इतिश्री ही सारखीच आहे, पुनर्विवाहाची मोकळीक सारखीच आहे. तेव्हां फक्त कुंकवाच्या बाबतींत असा पंक्तिप्रपंच कां ? विशेषतः कुंकू हें एक शोभेचें लेणें आहे असें मानल्यावर (आणि तें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं) ती एक ऐच्छिक बाब म्हणून समजली जावी व जिच्यातिच्या आवडीप्रमाणें प्रत्येकीला तें लावण्याची अगर न लावण्याची मुभा असावी हें उघड आहे.

कुंकू हें अवश्य धर्मविधीचें लक्षण नसून एक शोभेचें चिन्ह आहे, याचें प्रत्यंतर दुसऱ्याहि कित्येक गोष्टींवरून हांण्यासारखें आहे. कित्येक हिंदुजातींत सुवासिनींनीं कुंकू फक्त कार्यप्रसंगींच लावण्याचा प्रघात असतो, इतर वेळीं कुंकू लावण्याची सक्ति नसते. गुजराथी लोकांत सुवासिनी कार्यप्रसंगींच कुंकू लावतात; इतकेंच नव्हे तर पुरुषहि बायकांच्यासारखाच तांबड्या गंधाचा अगर कित्येक वेळीं शुद्ध पिंजरेचा टिळा लावतात, आणि गंध व कुंकू यांस 'चांदलो' हा एकच शब्द योजतात. शिवाय शोभेची जर कल्पना कुंकू लावण्यांत नसती तर वाटोळें, लांबुडकें, चंद्रकोरी, मळवट असे त्याचे प्रकार झाले असते कां ? ब्राह्मणाच्या जानव्याचे वा वैष्णवाच्या मुद्रेचे असले विविध प्रकार कोठें आढळतात ? कुंकवाच्या चांदव्यास खालच्या बाजूला हळदीची झालर लावण्याची जी जुनी रूढि असे, अगर पिवळ्या देंठावर डोकावणारा कुंकवाचा लाल गेंद दाखविण्यासाठीं गोंदल्याची हिरवी कुंडी कायमची लटकावून ठेवण्याची जी जुनी परंपरा असे, त्यावरून तर कुंकू हें शोभेचेंच चिन्ह आहे ही कल्पना दृढ होते. गोंदलेल्या पृष्ठभागांतून वर निघतांना कोंवळ्या किरणांनीं क्षितिज पिवळें

करून भालप्रदेशाच्या आकाशांत उदय पावणारा हा भालेंदु कुंकुमतिलक अशी कविकल्पना ज्ञानेश्वरीसमकालीन कवींना सुचली नसेल असें थोडेंच आहे ! या शोभेच्या जिनसेचें प्रत्यक्ष लावणारीनें जर कोडकौतुक पुरविलें, तर स्त्री-जातीचे बिनपगारी स्तुतिपाठक कवि हे तिच्या या आवडीच्या विषयाची तारीफ करण्याची सुसंधि थोडीच वायां जाऊं देणार आहेत !

कुंकवाच्या आकारानें निरनिराळे भाव व्यक्त करतां येतात हें मात्र खरें. सबंध कपाळभर लावलेला मळवट क्रौर्य अगर अनन्यभक्तिपरायणता व्यक्त करतो, असें म्हणावें तर आकारानें त्याच्या खालोखाल असणारें आठ फर्लांगांवरून स्पष्ट दिसणारें देशस्थी कुंकू भोळसरपणा व आडदांडपणा दाखवितेंच कीं नाहीं ! वाटोळें कुंकू सात्त्विकता व प्रौढता दाखवील तर थोडेंसें पसरट कुंकू सरपटत वावरणारा नटवेपणा व परिपक्व विलासी तारुण्य जाहीर करील; कुंकवाची चंद्रकोर तर तरुण सुवासिनीच्या अंगांतील कुर्रेबाज नखऱ्याची वांकलेली लवलवणारी कमानच होय. चंद्रकोर कुंकू लावण्याची कल्पना कशी निघाली असावी हें गूढ आहे. रुमालाच्या गठ्यांचा फन्ना उडविणाऱ्या वाळवीवरून, स्त्री जातीच्या पराक्रमाची कल्पना बांधणारा ब्रह्मचारी इतिहास-संशोधक, कदाचित् असेंहि म्हणेल कीं, अकबराच्या काळीं हिंदु–मुसलमानांची एकी घडवून आणण्याकरितां ज्या चौदा अटी हिंदूंना खास कबूल कराव्या लागल्या त्यांत चंद्राचें इस्लामी स्वरूप जी चंद्रकोर त्या आकाराचें कुंकू हिंदु स्त्रियांनीं लावावें असें एक कलम होतें. कोणत्याहि चांगल्या जिनसाची विटंबना करावयाची असेल तर एखाद्या इतिहास-संशोधकाच्या हवालीं करावी. त्याच्या उलट अगदीं टाकाऊ वस्तूचें सौंदर्य–वैभव ऐकण्यापुरती फुरसत आणि धीर असेल तर कवीला पाचारण करावें. अशी अलीकडे परीक्षणाचीं गमकें होऊन बसलीं आहेत. तेव्हां थोडी कविकल्पना काय लढवितां येते ती तर आपण पाहूं ! आल्हाद-कारक म्हणून शोभादायी कुंकवाला चंद्राची उपमा देणें अपरिहार्य होतें. चंद्राप्रमाणें चंद्रकोर आल्हाददायक तर खरीच; पण ती उत्कंठा उत्पन्न करते हें एक विशेष आहे. पौर्णिमेचा पूर्णचंद्र हृदयाच्या चिमुकल्या सागराला आनंदाची भरती आणून त्याला वरून सांडावयाला लावील खरा; पण त्याच हृदयांत खंजिराच्या तीक्ष्ण धारेनें न कळत घुसून आपल्या दोन्ही शिंगांनीं

त्यांतील उत्कंठतेचे धागे खेंचून पृष्ठभागावर काढावयाचे आणि त्या धाग्या दोऱ्यांच्या हेलकाव्यांवर पुनः त्यावर त्यास तरंगत ठेवण्याचें कार्य चंद्रकोरच करूं शकेल. आपणांकडे पाहणाऱ्यांस—अर्थात् पुरुषांस—नुसता आल्हाद देण्यावर संतुष्ट न राहतां त्यांस उत्कंठेच्या तंतूंनीं मुस्क्या बांधून आपणांकडे खेंचून घेण्याच्या उद्देशानेंच स्त्रियांनीं ही कुंकवाची चंद्रकोर लावण्याचें काढलें नसेल ना! चंद्रकोर कुंकू कुमारिकेला लावतां येत नाहीं आणि पोक्त बायका लावीत नाहींत, हें तरी कशाचें द्योतक आहे! आमच्या भगिनी थोड्या काव्यपराङ्मुख तर खऱ्याच, नाहीं तर मुखचंद्रावर चंद्रकोर लावून सवतीचा संसार त्यांनीं आपल्या हातांनीं मांडून दिला नसता. शंकरानें चंद्रकोर डोक्यावर धारण केली, आणि धर्मपत्नीला सवतीमत्सरानें ओशाळें केलें म्हणून पार्वतीनेंहि चंद्रकोर कुंकू लावून त्यांनां जशास तसें उत्तर तर दिलें नसेल ना! शंकरास वठणीवर आणावयाचेंच होतें, तर पार्वतीनें शनीच्या अगर मंगळाच्या आकाराचें कुंकू लाविलें असतें तर चंद्रकोरच काय, पण डोक्यावर चढलेल्या गंगेसहि शंकरानें आपल्या झोंपडींतून घालवून दिलें असतें. पूर्णचंद्राच्या अमृतकिरणांनींहि संतुष्ट न होणारा चिरचिरा शंकेखोर कवि त्यावर हरिणवावाची शिकार चाललेली पाहण्यांतच मनाचा विरंगुळा करितो, तशा एखाद्या अरसिक पढतमूर्ख पतीला नादीं लावण्यासाठीं ही तरुणी चंद्रकोर लावीत नसेल कशावरून! चंद्रकोरींतली चटक गेली, नखऱ्याची कमान पडली म्हणजे त्याच कुंकवाची लांब आडव्या रेषेच्या आकारांत दामटी वळते. हें महालक्ष्मी थाटाचें कुंकू म्हणजे उद्धट रसिकाच्या डोळ्यांत खुपसण्यासाठीं तापविलेली सोन्याची सळईच. इतर सर्व प्रकारांत दिसणारें मार्दव व मोहकता यांत नसतेच, पण क्रौर्य आणि करारीपणा यांमुळेंच तें अष्टभुजा रुधिरप्रिय देवीस आवडलेलें दिसतें. असो.

तरुण पिढीच्या गोंजारण्यानें कुंकू मात्र झपाट्यानें रोडावत चाललें आहे. आकाराचा मोठेपणा खेडवळ समजण्यांत येऊं लागल्यापासून स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रिया आणि आजच्या शिकणाऱ्या मुली (उद्यांच्या विदुषी) या कुंकवाची किती बारीक टिकली लावितां येते या बाबतींत एकीमेकींशीं स्पर्धा करीत असाव्यात असें दिसतें. इरेस टाकलेल्या अशा या क्षयी कुंकवाचें समूळ उच्चाटन व्हावयास कितीसा वेळ लागणार! ब्लाऊझचे गळे जों जों खालीं

उतरूं लागले तों तों मंगळसूत्रें लांबू लागलीं आणि ऐच्छिक होऊं लागलीं. तद्वतच केशरचनेच्या निरनिराळ्या प्रकाराच्या वाढत्या संसारामुळें भाल-प्रदेशाचें जसजसें आक्रमण होऊं लागलें, तसतसें कुंकुमतिलकास अंग चोरून राहावें लागलें व सहनशीलतेची सीमा होऊन त्यानें या संकोचांतून पळून जाण्याचा शेवटचा मार्ग तर नसेल ना आतां पत्करला! युरोपियन स्त्रियांच्यांत वावरण्याची हांव धरणाऱ्या आपल्यांतील विदुषींना, अगदीं पुरुषांना गंधाचें जसें वावडें वाटतें, तसें कुंकवाचें वावडें वाटूं लागलें. जुनाट खुळेपणाच्या या शिक्कामोर्तबावर अर्थात् त्यांनीं बहिष्कार घालणें जरूर होतें. त्यांच्या सहवासानें पुरुषांच्या दृष्टीला ओका चेहरा, बुचे हात व भुंडा गळा जास्त मोहक वाटूं लागला, तेव्हां कुंकू, बांगडया, मणिमंगळसूत्र या त्रयीची सुवासिनीच्या सौभाग्यालंकाराच्या यादींतून झपाट्यानें उचलबांगडी होत असल्यास नवल नाहीं. यच्चयावत् पूर्वपरंपरेला तिलांजलि देण्याच्या उद्देशानें वडील मंडळींच्या आशेचा पाहिल्याच फटकाऱ्यानें जोहार करून दीनदीन करीत बाहेर पडलेली युवति तर या सौभाग्य लक्षणांना विलायती माला-प्रमाणें त्याज्य समजते. या नव्या उठलेल्या सोसाट्याच्या वावटळींत सांपडलेल्या कुंकवाचे पाय पुनः कधीं जमिनीस लागतीलच असें तरी कोणी म्हणावें?

कुंकू हें एक शोभेचें लेणें खरें; परंतु त्याचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारांत फार होतो यांत शंका नाहीं. इंग्रज सरकारनें सती जाण्याची चाल बंद केली खरी पण काय झालें? दुथडी वाहत जाणाऱ्या या सतीच्या लोंढ्याला धरण बांधून त्यानें कोणत्याहि देशांत न आढळून येणारा हा विधवा-संचय अफाट वाढविला व त्या धरणांतून बाहेर पडणारे पाट भाग्यशाली स्त्री–पुरुषांच्या कुटुंबांच्या निरनिराळ्या वाफ्यांतून वाहून सुखाचीं पिकें करपवून टाकूं लागले. केशवपनाच्या चालीनें हा अभागी वर्ग सुखी जनांच्या समुदायांतून खडयासारखा निवडून काढतां येत असे व केशवपनाची चाल आज क्रूर म्हणून नाहींशी होत असतां या दुर्दैवी प्राण्यांना टिपून काढण्याचें एकच गमक हातीं राहिलें आहे, आणि तें म्हणजे कुंकवाचा अभाव. हिंदुस्थानांत सोन्याचा धूर निघत होता तेव्हां सुवासिनींचे अलंकार असे ठराविक असत कीं, त्यापासून सुवासिनी कोण व विधवा कोण हें सहज

ओळखतां येत होतें. पुढून पाहिलें तर नथ दिसेल, बाजूनें पाहिलें तर बुगडी दिसेल आणि पाठीमागून पाहिलें तर मूद-अग्रफूल दिसेल असें टॉवरच्या घड्याळाप्रमाणें चौफेर ठळक दिसणारे सुवासिनीचे अलंकार असत. अलंकारांची संख्या दारिद्र्यानें कुटुंबवत्सल सुवासिनीपासून जेवढी झपाट्यानें लुबाडली तितकीच कमावत्या आनंदी विधवांच्या दागदागिन्यांची वाढविली; आणि आज तर पुष्कळ दागदागिने घातलेली बाई ही कमावती विधवाच असली पाहिजे असें बिनधडक ठोकून द्यावें असा साधा नियम होऊन बसला आहे. अलंकारांची जी गोष्ट तीच वस्त्रप्रावरणाची. म्हणून अलंकारावरून अगर कपड्यालत्त्यावरून ही सुवासिनी आणि ही विधवा अशी विचक्षणा करतां यावयाची नाहीं. राहतांपैकीं राहिलें कुंकवाचें एकटें लक्षण आणि त्याचीहि उचलबांगडी झाली तर समाजांत केवढा अनर्थ माजेल आणि केवढा घोंटाळा उत्पन्न होईल याची कोणी कल्पना केली आहे का?

स्त्रियांच्या अफाट समुदायांतून सुवासिनी, कुमारिका आणि विधवा यांची निवड लांबून जर करतां आली नाहीं तर दृष्टिक्षेपासरशीं प्रणयाची संवेदना उत्पन्न करणाऱ्या प्रीतिविवाहाच्या मोसमांत काय काय अनर्थ होतील बरें? समाधान आणि प्रतिष्ठा यांनीं आनंदित दिसणाऱ्या कमावत्या विधवा, झुरणाऱ्या घोड कुमारिकापेक्षां जास्त आकर्षक दिसतात त्यामुळें तमाम विवाहेच्छु तरुणांनीं विधवांचाच पाठलाग करणें साहजिक आहे. सुवासिनींना अधीर परपुरुषांचा उपसर्ग पोंहोचूं नये म्हणून तरी कुंकवाचें सुदर्शन चक्र त्यांच्या भालप्रदेशीं सारखें तळपत राहणें जरूर आहे. आजहि सुवासिनींकडे जेवढ्या अरुचीनें आणि पराङ्मुखतेनें अगदीं चटोरांतला चटोर पुरुष पाहतो तितक्याच निलाजऱ्या हावरेपणानें अगदीं संभावितांतला संभावित पुरुषहि विधवांच्याकडे निर्धास्तपणें पाहतो. विधवांनीं कुंकू लावावें असें म्हणणारा जो एक पक्ष आहे तोहि याच सुरक्षितपणाच्या मुद्द्यावरच कुंकवाची आवश्यकता प्रस्थापित करतो. नुसत्या उदासीन, खंगलेल्या, दुःखी मुखचर्येवरून सुवासिनी अगर विधवा असा भेद समजून येईल असें म्हटलें तर घटस्फोटाच्या अभावीं दुःखी जीवन कंठणाऱ्या दुर्दैवी सुवासिनी आणि लग्नाबद्दल संपूर्ण निराश झालेल्या घोड कुमारिका या जितक्या दीन दिसतील तितकी प्रत्यक्ष विधवा ही दिसत नाहीं. उलट संसार-फांसांतून मुक्त झालेली कमावती

विधवा सर्व स्त्रियांच्यांत अत्यंत आनंदी अशी दिसेल. कुंकवाच्या अभावामुळें ठायींठायीं दिसणाऱ्या या सामाजिक अन्यायाच्या पाट्या विचारवंत माणसाच्या हृदयास दयेचा पीळ पाडतात आणि त्यास विधवापुनर्विवाहास संमति देणारांच्या गटांत ओढून आणितात. आठ वर्षांपासून ऐंशी वर्षांपर्यंतच्या सर्व अवस्थांच्या स्त्रियांना दुर्दैवासाठीं एकसारखीच सांसारिक हद्दपारीची कडक शिक्षा ठोठावणाऱ्या आमच्या निःपक्षपाती सनातनी धर्माचीं हीं फटफटीत कपाळें विजय-निशाणें नाहींत असें कोण म्हणेल! कुंकवाची हकालपट्टी ही एक मोठ्यांतली मोठी धर्मग्लानि होय आणि सनातनी लोकांनीं त्याला विरोध करावा अगर परमेश्वरानें जन्म घ्यावा असा धांवा करावा अशी बिकट वेळ येऊन ठेपली आहे. कुंकवाचें सौभाग्यालंकारांतून उच्चाटन झालें तर 'कुंकवाच्या आधारा' साठीं 'म्हाताऱ्या नवऱ्याचें' संगोपन कोणतीच तरुण स्त्री करणार नाहीं. तेव्हां सर्व म्हाताऱ्या बिजवरांनीं या कुंकमतिलकाला प्राण समजून जपलें पाहिजे. आजचा तरुण तो उद्यांचाच नव्हे तर आत्तां सुद्धां म्हातारा हें जाणून तरुणांनींहि कुंकवाच्या उच्चाटनास गर्जून विरोध केला पाहिजे.

० ० ०

## ( २ ) आख्यान

पाहिजे तर प्रणयाचा म्हणा, पण विकाराचा पावसाळी लोंढा ओसरून गेल्यावर, दारिद्र्याच्या रखरखीत उन्हानें तापलेल्या स्वभाववैचित्र्याच्या वाळवंटांत, धोंडू आणि प्रेमला, हीं एकमेकांकडे क्रूरपणें पाहणाऱ्या व दूर अंतरावर दबा धरून समोरासमोर बसलेल्या कांठांवरच्या दोन भेसुर खडकांप्रमाणें वाटूं लागलीं. अलीकडे तर त्यांचीं भांडणें निकरावर येऊं लागलीं. धोंडूच्या हट्टी व खुनशी स्वभावाची प्रेमलेच्या हेकेखोर वाचाळ स्वभावाशीं गांठ पडली होती. त्यांचीं भांडणें आतां कोणत्या थरावर जातील याबद्दल शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मनांत भलतेच विकल्प येऊं लागले होते. आणखी एके दिवशीं खरोखर भयंकर प्रसंग गुदरलाहि. काय कारणावरून भांडण सुरू झालें कोणास ठाऊक! पण अन्नपाणी न घेतां हीं दोघें सतत बहात्तर तास एकसारखीं दोन बोकयांप्रमाणें भांडत होतीं. धोंडू

वैतागून म्हणाला, " XXची सारखी कटकट चालली आहे. मी आतां संन्यास घेतों" असें म्हणून त्यानें आपलें जानवें ताडदिशीं तोडून टाकलें व डोक्यावरची शेंडी तो कचकचा उपटूं लागला कीं, शेवटीं होणाऱ्या वेदनांनीं तो किंचाळून रडूं लागला. अशा धमकावण्यानें प्रेमला थोडीच डगमगणार होती !

" हं उपटा ! जानवं तोडून टाकलंतच ना ! उपटा शेंडी आणखी व्हा संन्यासी. मी येऊं का मदतीला ? संन्यास घेतला म्हणून मी थोडीच सुटणार आहें ! चांगली अशी स्वस्थ बसून राहीन आणखी भीक मागून आणलेली भिक्षा मी खाऊन पडून राहीन."

" संन्यास घेतल्यावर तूं मला मेलीस आणखी मी तुला मेलों ! समजलीस."

" संन्यास घेण्यापर्यंत तरी वाट कशाला पाहतां ! मी डरायची नाहीं ! आतां मी ही अश्शी जातें आणि खुशाल विधवा म्हणून राहीन. सुइणीचें काम करीन. पाहतेंच मी किती दिवस हा बोकेसंन्यासीपणा चालतो आहे तो!"

" काय, तूं विधवेप्रमाणें राहणार ?" धोंडूचा आवाज बदलला, दृष्टि भेसुर दिसूं लागली व प्रेमलेच्या वाक्प्रहारानें चिरलेलें हृदय दाबून धरण्यासाठीं त्यानें उजव्या हातानें सदऱ्यासकट छातीचा भाग एकत्र गोळा केला.

" म्हणतात ना ! मुळमुळीत सौभाग्यापेक्षां धगधगीत वैधव्य बरं ! येऊन जाऊन हें कुंकू आणि मणिमंगळसूत्रच काय तें आपल्या उभयतांचं आतां कायम राह्यलं आहे ना ! त्याची काय येवढी भीति बाळगायची !"

" मी जिवंत असतांना कुंकू तूं पुसून टाकशील आं !" धोंडूचा चेहरा भीतीनें पांढरा पडला.

" मी जिवंत असतांना शेंडी-जानवं तोडलंत, तेव्हां माझ्या भावनांची कुठें कोणी पर्वा केली होती ? मी हें असं कुंकू पुसून टाकतें." असें म्हणून प्रेमलेनें कुंकू पुसून टाकलें आणि मंगळसूत्राला तोडण्यासाठीं तिनें हात घातला तों धोंडू धाडकन् जमिनीवर पडला. तें पाहून प्रेमलेला क्षणिक विजय मिळविल्याचें स्फुरण चढलें. ती म्हणाली, " पाह्यलं, बायकांच्या कुंकवांत

किती तेज असतं! नाहीं तर इकडे जानवं तोडलं; शेंडी ओरबडून डोंचकं रक्तबंबाळ केलं पण मला कांहीं झालं का! मला सगळीं सोंगं समजताहेत! घेरी आल्याचं सोंग नेहमींचंच असतं! उठा, नीट बसा. नाहीं तर पडानात कां बिचारे! आज मी समोर आहें म्हणून! उद्यां गोसावडे होऊन वणवण करितांना कुठं पडलांत तर कोण उठविणार आहे! माझी मेलीची माया कुठं राहती आहे! हं उठा!" प्रेमला जवळ गेली. धोंडूस तिनें उठविण्याचा प्रयत्न केला, पण धोंडू लाकडासारखा होऊन पडला होता तो कांहीं केल्या उठेना. त्याच्या अंगास घाम सुटलेला पाहून आणि त्याचे हात-पाय गार झालेले पाहून प्रेमला भेदरून गेली. तिनें "धांवा हो कुणी तरी" असा शेजाऱ्यापाजाऱ्यांचा धावा केला. भोंवतालचीं माणसें धावून आलीं. त्यांनीं डॉक्टराची धांवाधांव केली. त्यांपैकीं कित्येक प्रेमलेच्या पांढऱ्या कपाळाकडे पाहून पुढच्याच तयारीस लागले. जवळ पडलेल्या शेंडीच्या बटा पाहून एक म्हातारी म्हणाली, "चांडाळणी आतां कां रडतेस? या शेंडीच्या बटा तूंच त्याच्या उपटल्यास ना? भोग आतां फळं! अशें भांडणं भांडलींत, त्याचा परिणाम असाच व्हायचा!" डॉक्टरानें इंजेक्शन दिलें तेव्हां औषधापेक्षां सुई भोसकण्यानेंच धोंडू "आयाई" असें विव्हळत शुद्धीवर आला. डॉक्टरांनीं सामोपचारानें "काय झालं" म्हणून विचारलं. त्यावर धोंडू खोल आवाजांत म्हणाला, "कुंकू पुसलं, हूं!" त्यावर डॉक्टर म्हणाले, "त्यांचं कुंकू पुष्कळ बळकट आहे; तुम्ही उगीच घाबरतां काय!" "हुंः! अरे देवा. तर जगण्यापेक्षां मी मेलेलाच बरा. डॉक्टर मला एक इंजेक्शन आणखीन् द्या. मघाशीं टोंचतांनाच माझा जीव अगदीं ब्रह्मांडीं गेला होता. त्याला सुईनें आणखीन् एकदां भोसका म्हणजे तो लोचट या अभागी देहांतून लवकर पाय तरी काढील!"

प्रेमलेबद्दल धोंडूस वाटणारें प्रेम त्यानें बोलून दाखविलें असें मानून, भोंवतालच्या मंडळींनीं प्रणययुद्धांत शरपंजरीं पडलेल्या धोंडूचें कौतुक केलें. त्यांच्यांपैकीं सुवासिनींनीं तर 'पाह्यलंत! असं प्रेम दुसरे पुरुष आपल्या बायकांवर करितात' असें व्यक्त करणारी दृष्टि आपापल्या पतिराजांच्याकडे टाकून मानेला थोडासा सांकेतिक झटका देऊन डावी नाकपुडी किंचित् उडविली. प्रेमला खडबडून जागी झाल्यासारखी होऊन म्हणाली, "हं, हें काय! कुंकू

वाढवलं वाटतं !" असें म्हणून ती लगबगीनें आंत गेली आणि कुंकू लावून परत आली. धोंडूनें मृत्यूच्या तयारीनें किलकिले मिटून घेतलेले डोळे उघडले व तो तटकन् उठून बसला. "डॉक्टरसाहेब माफ करा ! माझं दुखणं बरं झालं. मला आतां हुशारी वाटत आहे."

त्या दिवसापासून धोंडू-प्रेमलेचें सूत झालें अशांतला भाग नाहीं. पण त्यांच्या वाढत्या कुटुंब-कलहांत पुन्हा कुंकवास दुखावण्याचें मात्र कोणास धैर्य होईना. कुंकवामुळें आपण पत्नीच्या अनान्वित हालअपेष्टातहि टिकून आहोंत असें मानणारा भाबडा धोंडू आणि धोंडूच्या कमाईवर चरितार्थासाठीं अवलंबून असलेली प्रेमला या दोघांना कुंकू हा एकच शेवटचा जिव्हाळ्याचा पवित्र विषय वाटूं लागला, कीं ज्यास स्पर्श करणें म्हणजे विद्युत्संचयास स्पर्श करण्यासारखें घातक होतें.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थूल प्रत
सं. नि. नं. ६०१
ता.

# त्यांना काय दिसलें ? : : ५

## ( १ ) दृश्य पहिलें

परमेश्वरानें ब्रह्मदेवाकरवीं सहज क्रीडेनें जीवसृष्टीची उत्पत्ति केली खरी, परन्तु जीवजंतूंच्या बुजबुजाटानें तो थोड्याच वेळांत अगदीं रंजीस आला. त्यांचें आकलन करणें जितकें जरूर तितकेंच तें जिकिरीचें त्यास वाटूं लागलें. मनुष्येतर प्राण्यांचा प्रश्न लवकर सुटला. त्यांची आणि बुद्धीची रूढ असलेली फारकत चिरस्थायी करून त्यांचे व्यापार नैसर्गिक प्रवृत्तीच्या हवालीं करून दिले, व आजतागायत त्यांचे व्यापार बिनतक्रार चालले आहेत. पंगु मनुष्यास स्वसंरक्षणाचें साधन म्हणून परमेश्वरानें बुद्धीचें बोचकें त्याच्या डोक्यावर दिलें खरें; पण या देणगीनें मनुष्यप्राणी जास्त कल्पक बनला आणि हाडामांसांत भिनलेल्या गुणांबरोबर अवगुणांचाहि विकास करण्याच्या युक्त्या शोधून काढूं लागला. या युक्त्याप्रयुक्त्यांनीं जीवसृष्टि निर्माण करण्याच्या त्याच्या उदात्त हेतूला हरताळ फासला गेला, हें पाहून परमेश्वरास मोठी चिंता वाटूं लागली. जसजसे दिवस गत झाले तसतशी त्याची काळजी वाढूं लागली व त्यास झोंप येईनाशी झाली. लक्ष्मीनें या बावरलेल्या देवाची परोपरीनें समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. तेव्हां तिनें प्रसिद्ध नारद यांना बोलावून आणिलें.

नारद येतांच मामुली कुशल प्रश्नांनंतर तिनें त्यांना विचारलें, " काय हो !

१००९

माझ्यापेक्षां त्रैलोक्यांत कोणी रूपवती स्त्री आहे का? आणखी ती इकडच्या दृष्टीस पडली आहे का हो!" तिचा तो काकुळतीचा प्रश्न ऐकून नारदानें तसला कांहीं फारसा प्रकार नाहीं असें आश्वासन दिलें. नारदाचा आशय जाणून लक्ष्मीस समाधान वाटलें. ती म्हणाली, "तर मग यांचं वेड बरं करण्यासाठीं जरा कडक उपाय योजण्यास हरकत नाहीं. नाहीं तर म्हटलं, जर का दुसऱ्या एखादीचं वेड लागलं असलं तर त्या माउलीची मनधरणी करून इकडची चांगली निर्भत्सना कर म्हणून तिला सांगायचं? करायचं काय? आतां या वयांत हें शोभतं तरी का?"

लक्ष्मीचें पतीवरचें प्रेम आणि स्वसुखाविषयींचें औदासीन्य पाहून नारद खूष झाले. ते म्हणाले, "अहो काकू, तुम्ही आपल्या पाय चेपीत अहोरात्र बसल्या आहांत. तुमच्या डोळ्यांसमोरच्या बाजूस या अजगराच्या देहाची भिंत, तेव्हां आजूबाजूस अगर पाठीमागें काय चाललं आहे त्याची तुम्हाला काय माहिती? हे काका मात्र तुमच्याकडे पाहण्याचं टाळून भोंवतालीं पाहूं लागले आहेत; आणि म्हणूनच ते आतांशा कावरेबावरे झाले आहेत."

लक्ष्मीनें विचारलें, "सभोंवार तर हा समुद्र आहे. तेव्हां तिथं काय दिसणार आहे?"

नारदांना लक्ष्मीच्या भोळेपणाबद्दल हसूं आलें व ते म्हणाले, "काकू, तुम्ही खरंच फार भोळ्या आहांत. अहो, समुद्र होता त्याला किती वर्षे झालीं. समुद्र आटून तेथें जमीन झाली आणि जमिनींतून डोंगर उगवला. त्या डोंगरावर सध्यां आपण आहोंत. हा अजगर पाण्यांत तरंगत नसून या खडकाला विळखा मारून बसला आहे. या पर्वतावरून भूलोकचीं शहरें वगैरे दिसत आहेत. तुम्ही जरा आपल्या भोंवतालीं बघा म्हणजे काकांच्या दुखण्याचें कारण समजेल!"

लक्ष्मीनें सभोंवार पाहिलें. स्वप्नांतून जागी झाल्याप्रमाणें एकदम ती दचकून बोलली, "खरंच कीं! मेल्यांनो! काय चमत्कार आहे बघा कीं! मी आपली मेली वेड्यासारखी पाय चेपीत बसल्यें; पण नारदमुनि, तुम्हीच सांगा; यांनीं तरी नको होतं का हो मला जागं करायला! हीच ती पुरुषांची रीत! मला सांगितलं असतं तर काय कनवटीला बट्टा लागला

असता ! बरं, कांहीं खर्चाची बाब असती तर वेळीं बायकांना नाहीं सांगितलं तर गोष्ट निराळी ! म्हणतात ना तशांतली गत !”

लक्ष्मीनें उसना हुंदका देऊन दुःखाचा अभिनय केला. नारदांना समाधान वाटलें.

“ काकू, या भूलोकच्या वाऱ्याची नुसती झुळूक लागली तर तुम्हाला हे विचार सुचले. अहो, आतां जरा चारचौघींत वावरा म्हणजे समजेल देवांना कसं वागवायचं तें ! काकू, यांना असंच इथं पडूं द्या. चला, तुम्हाला घेऊन मी मृत्युलोक जरा दाखवून आणतों. मलाहि पुष्कळ दिवसांत कोणी बोलावलं नाहीं. अहो, काय सांगूं ! हीं वर्तमानपत्रं निघाल्यापासून आपआपसांत भांडणं लावून देण्यासाठीं मला आतांशा लोक बोलवीनासे झाले आहेत.”

“ खरंच का ? ” लक्ष्मीनें आश्चर्यानें विचारलें, “ पण यांना मीं एकटं सोडलं आणखी ते जर कुठं निघून गेले तर कुठं जाऊं मी शोधायला ? काय सांगूं नारदमुनी, यांनीं माझी राळ करण्याचं मनावर घेतल्यापासून नोकरचाकरांनींहि माझं पाणी अजमावलं आहे. तो भेला धटिंगण गरुड आतांशा माझं वारं सुद्धां घेत नाहीं.”

“ अहो, मोटारी आणि विमानं निघाल्यापासून त्याला विचारतो आहे कोण ? तोच स्वतः वारं खात पडला आहे. काका येथून कोठेंहि जायचे नाहींत. दैत्यांना मारण्याचं शौर्य आणि ती चलाखी आतां कांहीं उरली नाहीं. असे सुखांत पडून पडून ते निर्बल झाले आहेत. त्यांना दोन पावलंहि टाकतां येणार नाहींत.”

“ खरंच नाहीं तरी ! ” लक्ष्मी म्हणाली, “ आतांशा इकडचा पाय तिकडे वळवायचा तर मला सांगतात. मी जेव्हां सरकवावा तेव्हां. पुरुषासारखे पुरुष, आणखी इतका दुबळेपणा खरंच शोभत नाहीं.”

“ आणखी जरी कुठं गेले तरी शोधून काढायला काय वेळ ! यांचं चित्र छापून हजारपांचशेंचं बक्षीस अगर एखादी पदवी देण्याचं जाहीर केलं कीं, पाताळांतून त्यांना, नाहीं तर त्यांच्यासारख्या कोणाला तरी, निदान त्यांच्या नांवाच्या कोणास तरी, खेंचून आणतील. चला आपण उभ्याउभ्या जाऊन येऊं.”

असें म्हणून दोघेंहि जाण्याच्या तयारीस लागलीं. लक्ष्मीनें पैठणीचा ओंचा-पदर सावरला; कासोट्याची पट्टी काढली; मूद, अग्रफुलें, खोपा सावरला; बुगड्याचे वेल नीट बसवून कानांतील काप-बाळ्यांवरून हात फिरवला; नाकांतील नथेचा आंकडा घट्ट केला; डोक्यांतील नाग, राखडी, पिंपळपान नीट केलें व बिंदी, चंद्रसूर्य घट्ट आवळून बांधलें. डोळ्यांत आणि फाटलेल्या भांगांत काजळ भरलें व चंद्रकोर ढळढळीत कुंकू लावून त्याच्या-खालीं हळदीची रेषा व त्याखालीं—गोंदलेल्याच्या खालीं बुक्क्याची रेघ ओढली. गळ्यांत ठुशा, टिका, सरी, पुतळ्यांची माळ, चंद्रहार, लफ्फा घातला व हातांत गोठ, तोडे, जवे, वाकी व बाजूबंद बांधले. कमरेला मेखला घालून पायांतील सांखळ्यातोरड्यांच्या खिळी घट्ट बसविल्या व मासोळ्याजोडवींहि मागें सरकवून घट्ट बसविलीं. अंगावर काळा बुट्टयाचा, भाकरीसारखे जाड जरीचे कांठ-पदर असलेला शेला घेतला. नारदानेंहि पितांबर झाडून कनवटीस सुपाऱ्या लावून तो करकचून नेसला. खरवतीकांठी कफनीवरून रुद्राक्षांची, पांचेची व तुळशीची माळ आणि जानवें बाहेर काढलें, केसांवरून पाण्याचा हात फिरवून शेंडीला इंगुदी तेलाचा लेप लावला व पीळ भरून तिला ताठ उभे केलें. विण्याच्या तारा वगैरे लावल्या व नवारीच्या पट्टयानें तो गळ्यांत लटकाविला. खडावा, चिपळ्या सरसावून ते निघाले. लक्ष्मी तोड्या-पैंजणांच्या नादावर व नारद चिपळ्या-विण्याच्या ठेक्यावर असे उभयतां आपापल्या डौलांत चालू लागले.

* * *

## ( २ ) दृश्य दुसरें

“ नारदा, आपण वाट चुकलों वाटतं. पुरे बाबा तुझं चालणं! माझ्या पायाला फोड आले. बघेनास, हें समोर स्वर्गांतलं उपवन दिसतं आहे.” नारदहि बुचकळ्यांत पडल्यांसारखे झाले. जरा पुढें होऊन त्यांनीं वीणा छेडून “ राधाधर मधुमिलिंद ” हें भगवंताचें आवडतें पद म्हणण्यास सुरुवात केली, तोंच ‘चले जाव इधर भिकारीओंको मज्जाव है’ असा दरडावणीचा शब्द कानीं पडला.

“ काकू, ही सुंदर बाग अन् ह्या नखरेबाज स्त्रियांचा जमाव पाहून मलाहि भुरळ पडली कीं, स्वर्गांत तर आपण नाहीं ना आलों; पण आपण मृत्युलोकांतच

आहोंत. स्वर्गांत माझा आवाज कानीं पडतांच 'यावं मुनिमहाराज, यावं नारदमुनि, म्हणून देव-अप्सरांचा माझ्याभोंवतीं गराडा पडावयाचा, पण मला हुसकावून देण्यासाठीं तो बघा समोरून एक माणूस येत आहे. चला, आपण पुढचा रस्ता धरूं."

"नारदमुनि, मृत्युलोकांत खरंच का अशीं सुंदर उपवनं, अशा सुंदर स्त्रिया आहेत?"

नारदांनीं उत्तर केलें, "हो, असं दिसतं खरं. पुढच्या जन्मीं असं स्वर्गीय सुख मिळावं म्हणून शरीरास व्रतवैकल्यानं पीडा देणारे ऋषि आतां निघत नाहींत. अहो, याच जन्मीं याच देहाला असलं सुख मिळाल्यावर यज्ञयागादिकांची काय मातब्बरी आहे हो!"

रस्त्यानें जातां जातां ते गांवांत शिरले. तोंच त्यांच्या पाठीमागें मुलांचा घोळका लागला व 'अरे, कडकलक्ष्मी, कडकलक्ष्मी' असा घोष होऊं लागला. "काय हो मुनि," लक्ष्मीनें विचारलें "तुम्ही म्हणालांत, मृत्युलोकांत लोक नास्तिक झाले आहेत, आपल्याला मानीत नाहींत. आणखी हीं मुलंबाळंसुद्धां माझी स्तुति करीत आहेत तीं?"

"कां? कडकलक्ष्मी आपणांला म्हणतात म्हणून? अहो, हीं मुलं आपला उपहास करीत आहेत! आपणांला दगड मारीत आहेत. आग्याई (पाठीवर हात चोळीत चोळीत) अरे, तंबोरा फुटेल बाळांनो! डोक्यांत आतां जखम पडली असती ना? अहो, कडकलक्ष्मी म्हणजे भिकाऱ्यांची एक जात आहे." पुढें जातात तों दत्तात्रेयाचें देऊळ लागलें व आंत गेल्यानें तरी आपल्या जातीचा देव भेटेल, चारदोन गोष्टी होतील म्हणून उभयतांहि आंत गेलीं. दत्तात्रेयाभोंवतीं बायकापुरुषांचा गराडा पडलेला पाहून व भोंवतालच्या बागेंत स्त्रीपुरुषांचा जमाव पाहून लक्ष्मीस समाधान वाटलें. नारदानें प्रदक्षिणेच्या मिषानें जवळ जाऊन म्हटलें "हं हंः आम्ही सहज आलों आहोंत!"

"आज गुरुवार आहे, वेळ नाहीं." असा त्रोटक जबाब दत्तांनीं दिला. नारद हिरमुसले होऊन बाहेर कट्टयावर येऊन बसले. "काय हो नारद, हे स्त्री-पुरुष प्रदक्षिणा घालताहेत, पण त्यांचं लक्ष देवाकडे नसून एकमेकांकडे आहे. तो पाहिलात का? त्या मुलीशीं खुश्शाल हितगुज करीत आहे. या ब्रह्मस्वरूप तपस्व्याच्या डोळ्यांदेखत, नारदा, हा काय प्रकार रे?"

" काकू, हें दत्तमंदिर प्रख्यात आहे. मुलांमुलींचीं लग्नं येथें जमतात व त्या पलीकडच्या बागेंत लग्नं होतात. आईबापांनीं लग्न करण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. लग्ननिश्चयाची शपथ घेण्यासाठीं कोणा तरी देवाला साक्षीदार ठेवलं पाहिजे ना? तेव्हां मागाहून दत्ताची स्थापना येथें या बागेंत करण्यांत आली." लक्ष्मी या उत्तरानें सर्दच होऊन गेली. पुढें पंढरीनाथाचें मंदिर लागलें. तेव्हां स्वतःच्या घरांत जाण्याच्या आविर्भावानें दोघेंहि आंत गेलीं. सभामंडपांतून आंत जाण्याचा प्रयत्न करतांच पुजाऱ्यानें नारदास " हं! गाभाऱ्यांत बायका व पुजारी यांनाच जाण्यास मोकळीक आहे. या बाईंना पाहिजे तर येऊं द्या." असें बोलून अडविलें. नाइलाजानें लक्ष्मी आंत गेली आणि देवांना म्हणाली, " मी आल्यें आहे म्हटलं!" त्याबरोबर देव म्हणाले, " दूर व्हा, दुसऱ्या बायकांना दर्शन घेऊं द्या. आतां मला सत्य-नारायणाचें आमंत्रण आहे, फुरसत नाहीं."

लक्ष्मी हिरमुसली होऊन, देवीकडे वळली व म्हणाली, " पाहिलंत ना! कसं वागणं तें?"

" तुम्हीच बघा म्हणजे झालं. मी देवी न होतां मानव-स्त्री झाल्यें असतें तर विहिरीतळ्यांत जिवाचं एव्हांना बरंवाईट केलं असतं. पण हें अमरत्व माझा सूड उगवीत आहे ना! तुम्ही पाहिलंत ना! अस्सं धुसफूस चोवीस तास चाललं आहे. मला म्हणायचं असतं, तूं आपली अजून गांवढळ राहिली आहेस. पण मला आतां या वयांत का अंबाडा, उलटे केस, न् तीं पोलकीं न् पातळ, ब्लाऊझ नि बॉडी अन् गोल नेसणीं साधणार आहेत? तरीसुद्धां मी पुजाऱ्यांच्या स्वप्नांत जाऊन नवीन पोषाखाचा दृष्टान्त दिला. तेव्हां कांहीं तरी भ्रष्टाकार झाला असें समजून त्यानें आमच्यावर गोमुत्राचा, पंचगव्याचा सतत महिनाभर अभिषेक धरिला, ऊद-कापराची धुरी सारखी ठेवली; तेव्हां मरतों का जगतों अशी आमची स्थिति झाली. इकडे डोक्यांत राख घातली आणि हातांतलें सुदर्शन चक्र जें सोडलें तें समोरच्या घिसाड्याच्या भट्टींत जाऊन पडलें. चुकून एका गाडीच्या चाकाला धांवेच्या ऐवजीं त्यानें तें ठोकल्यापासून इकडे हातांत शस्त्रच राहिलें नाहीं. एका अर्थानं बरं झालं म्हणा! आतांशा हातांत सांपडेल तें फेंकण्याची संवय लागली होती. त्यामुळं सुदर्शनाच्या आणि माझ्या वरच्यावर भेटी होत." रखुमाईस कळवळून आलें.

" असं ना बाई ? " लक्ष्मीनें तिला धीर दिला.

" तुमची मजा आहे. अष्टौप्रहर पतीची कृपा; बरं, नाहीं नाहीं ते नाद लावायला कुणी फिरकायचंसुद्धां नाहीं ! "

" बाई, घरोघरीं मातीच्याच चुली बरं ! आतांशा असं तऱ्हेवाईक वागणं चाललं आहे, कीं दैत्यांशीं असलेलं पूर्वीचं वैर आमच्या सध्यांच्या पतिपत्नी-प्रेमापुढें कांहींच नाहीं. आहे तें सगळं ठीक आहे झालं ! "

लक्ष्मीनें आपल्या स्थितीचा केलेला खुलासा ऐकून रखुमाईस समदुःखिताचं समाधान वाटलें. ती म्हणाली " तेंच ना ? बरं, आमचा पुजारी तरी असा आहे, कीं एक नंबरचा कर्मठ ! दिवसांतून चार वेळां मुंडी करतो आणखी तीन वेळां डोचकं तळ्यांत बुचकळतो. माझी पैठणी, जरीची चोळी, वेणी, खोपा, दागदागिने मी लग्न करून आलें तसेच्या तसे रोज चढवितो. रोजचं माझं सुन्मुख तो करतो. एकदां आमचे कपडे व दागिने चोरीस गेले, मला आनंद झाला. पण नशीब, कीं उंदरानींच तुपातेलाच्या वासानं ते, नेले होते. तेथून ते झडतींत सांपडले. मला नव्याची का हौस आहे ! पण बायकांचं जिणं पुरुषांवरच ना ! त्यांना रुचेल तेंच केलं पाहिजे. दर्शनाला आतां एकेक बायका, पोरीसोरी येतील. त्या आल्या म्हणजे इकडे स्वारी अगदीं दंग होऊन जाते. कोणी मुलगा मागते, कोणी मुलगी मागते तर कोणी नवरा मागते. इकडे कुणाला कधीं नाहीं म्हणायचं नाहीं असं व्रत उचललं आहे. नाहीं-होय म्हणायचं, रकझक करायची तें सगळं माझ्यापाशीं. जन्मांतरीचीं पातकं या जन्मीं फेडतें झालं. काय काय तरी बायकांचे पोषाख ! चिरगुटं आपलीं नांवाला ! बाकी सगळा देह उघडा असतो. झिरझिरीत तरी किती तें नेसणं ! मात्र इकडे अगदीं टक लावून पाह्यचं असतं. डोळ्याचं पातं लववण्याचंहि भान राहात नाहीं. मी पहिल्यांदा तुमच्यासार-खीच पाय चेपीत इकडच्या तोंडाकडे दृष्टि लावून बसें; पण यांचं बघणं दुसरी-कडेच ! तेव्हांपासून ही अशी जवळ उभी राहून साळकाया माळकाया कोणकोण येतात हें न्याहाळीत असतें. मी अगदीं डोळे फाडफाडून पाहात असतें, पण मजकडे पाहतील तेव्हां ना ! नाहीं हो बाई, पूर्वीचा काळ आतां राहिला नाहीं. जरा इकडे तिकडे दृष्टि जाऊं लागली; तर चारदोन श्रुतिस्मृतीचे श्लोक, रामरक्षा, भैरवाष्टक ऐकवलं म्हणजे पुनः निमूटपणें गृहसंसार चालवीत.

आतां पुरुषांना संभाळायचं तर छचोरांतली छचोर जी बाई असेल तिच्यापेक्षांहि नटवेगिरी घरटी बायकोनं केली तरच धडगत ! असा काळ आला आहे."

" खरंच का ? " लक्ष्मीनें आश्चर्यानें विचारलें, " पण वयाकडे तरी कांहीं पाहावं ! "

" कांहीं नाहीं ! " पुरुषांचं म्हणजे नवीन नवीन गोष्टी दिसूं लागल्या, कीं हेंहि तरुण होत जातात. आपल्या बायकांची जशी कांहीं अमुक एक यत्ता असते, तसं थोडंच पुरुषांचं असतं? अलीकडच्या रीतीहि, बाई, एकेक विलक्षणच ! पुरुष म्हणजे बायकांपुढं अगदीं हुजऱ्याप्रमाणं धांवत असतात. इथं दर्शनाला येतात ना ! तर कोणाला वाटेल कीं, बरोबर बाईंनीं गडी आणला आहे. मुलें कडेखांद्यावर घेईल, छत्री डोक्यावर धरील, जोडेसुद्धां संभाळीत उभा राहील. असे तर नवरे या युगांत झाले आहेत ! इकडेहि अशी एखादी नवीन फटाकडी मिळाली पाहिजे. जेव्हां ती इकडे मरेमरेतों राबवील तेव्हां माझी आठवण होईल. तसा योग आला तर इकडची स्वारी तिची सेवाचाकरी करण्याससुद्धां मागेंपुढें पाहायची नाहीं ! " इतक्यांत सभामंडपांत एकटा उभा राहून कंटाळलेल्या नारदानें हाका मारतांच लक्ष्मी भानावर येऊन निरोप घेऊन निघाली.

० ० ०

## ( ३ ) दृश्य तिसरें

जातां जातां चलच्चित्रपटगृह लागलें. वरती राम-रावणयुद्धाच्या चित्र-पटाची जाहिरात लाविली होती. तेव्हां नारदानें त्याची माहिती काढून लक्ष्मीस हकीकत सांगितली. " नारदा, राम-रावणाच्या युद्धाच्या वेळीं मला हट्टानं घरीं ठेवून विमानांतून फुलं उधळायला इकडून एकट्यानं जाणं झालं होतं. मला तो देखावा पाहायचा आहे. फारच सुंदर होता म्हणे ! " नारद 'बरें' म्हणून तिकीट विकत घेण्यासाठीं गेले व त्यांनीं दोन तिकिटें विकत आणलीं व तीं दोघेंहि उच्चस्थानीं जाऊन बसलीं. प्रथम एक चोराची गोष्ट पाहतांच नारद दचकून म्हणाले, " झालं, चोऱ्या कशा कराव्यात, दरोडे कसे घालावेत याचे असे धडे मिळाल्यावर वाल्या कोळ्याप्रमाणं डोंगरांत जाऊन, दऱ्याखोऱ्यांत लपून राहून, चौर्यकुशलता संपादन करण्याची यातायात कोण घेईल ? अरे ! हें काय ? सर्वांसमक्ष धिटाईनें परस्त्रीचें चुंबन ! हा आहे तरी

काय प्रकार ! अरे, काय ही बायकांची पुरुषांशीं लगट. अगदीं हातघाईवर येतात कीं हो ! असें रोज पाहण्यास मिळाल्यावर वडील मंडळींच्या पाळतीवर राहून, अगर गुरूच्या आड चोरून कामशास्त्रावरचा ग्रंथ वाचून, आमच्या वेळीं कांहीं अशा गोष्टींचं ज्ञान झालं तर व्हायचं ! या चित्रपटानं तर आडपडद्याच्या सर्व गोष्टी अगदीं मुलाबाळांच्या आटोक्यांत आणून सोडल्या आहेत." असें नारद म्हणत आहेत तोंच लक्ष्मी चटकन उठून उभी राहिली. "नारदा, कोणी तरी दैत्यानं माझ्या मानेवर हात ठेवला आहे बघा कीं !" नारद, 'कोण आहे रे ?' म्हणून ओरडले त्यासरशीं दगा झाल्याचें जाणून दिवे लावले गेले. पाहतात तों पाठीमागें कोणी नव्हतें. मात्र लक्ष्मीच्या गळ्यांतली कोल्हापुरी ठुशी नाहींशी झालेली आढळली. गोंडे तसेंच खालीं पडले होते. "वा ! नुसत्या चोऱ्या कशा कराव्या एवढेंच दाखवीत नसून येथें त्या कशा कराव्यात त्याचे धडेहि देतात एकंदरींत !" "चल, पुरें झालं; आणखी कांहीं जिन्नस गेली तर घरीं गेल्यावर मी तिकडे काय जाब देऊं ?" असें म्हणून लक्ष्मी दागिन्यांच्या भीतीनें अर्ध्या खेळांतूनच उठली व तीं दोघें निघून गेलीं.

वाटेनें जातां जातां त्यांना रंगमंदिर लागलें. तेथें येतांच नाटकास जाणाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी पाहून लक्ष्मीनें "हें काय आहे ?" म्हणून विचारलें. तेव्हां नारदानें "येथें एक उत्कृष्ट नाटक आतां होणार आहे; तिकडे मंडळी जात आहेत" असें सांगितलें. "नारदा, मीं लग्न झाल्यापासून नाटक पाहिलंच नाहीं. चल, आपण उभ्या उभ्या जाऊन येऊं." नारदानें तिकिटांचा बंदोबस्त करून तीं उभयतांहि आंत जाऊन बसलीं व खेळास सुरुवात झाली. खेळ चालू असतांनाच लक्ष्मी म्हणाली, "अरे, हें पाहिलंस का ? हे पुरुष नाटक पाह्यला आले आहेत, कीं काय पाहायला आले आहेत ? सुरुवातीपासून मी पाहातें आहे. नाटक तिकडे चाललं आहे आणखी हे पुरुष पाठीमागं बायकांच्याकडे माना वळवून वळवून सारखे पाहात आहेत." नारद यावर उत्तर काय देणार ? त्याचें तरी लक्ष नाटकाकडे कुठें होतें ? "नारदा, ही काय काय एकेक बोलणीं हे नट एकमेकांस उद्देशून बोलत आहेत ? नवराबायकोचीं कुठं असलीं पाल्हाळिक भाषणं होतात का ? हीं अशा प्रकारचीं बोलणीं पुरुष ऐकतात, आणि तशींच घरीं

असावींत असं पुरुषांना वाटतं. आम्हीं इतकीं वर्षे लग्न झाल्यापासून काढलीं, पण असलीं बोलणीं आम्हीं ऐकलीं देखील नाहींत. काय हा पानचटपणा ! अन् पोरीसोरींनीं हेंच शिकायचं ना ?"

यावर नारद म्हणाले, "काकू, पूर्वीं भद्र व भरत नाटकें करीत तीं निराळींच. नाटक हें संसाराचं चित्र असण्याऐवजीं संसार हें कलियुगांत नाटकाचं चित्र होऊं लागलें आहे. सभोंवार बघा, बायकांचे पोषाख हे ! हे मिशाबोडू पुरुष बघा; काय त्यांचे केस, काय वागण्याची पद्धत ! हें सगळं नाटकवाले यांना शिकवितात. आजकालचा धर्मशास्त्रवेत्ता एखादा अप्रसिद्ध मनु नसून नामांकित असा एखादा नाटककार असेल आणि एखादा नाटक्याच समाजाचीं सूत्रें फिरवितांना दिसेल. पूर्वींच्या बायका थाटमाट, नटणं, मुरडणं अप्सरांच्याकडून शिकत; पण आज चित्रपटचांदण्यांनीं ती अप्सरांची जागा पटकावली आहे. घरटी बायका नटीनाटक्यांचंच अनुकरण करितात, व घरटी बायकांनीं टाकलेल्या चालीरीती आज वारांगना गिरवीत आहेत. असं कांहीं विपरीत आहे झालं !"

नाटक संपून मंडळी बाहेर पडली. रस्त्यानें एका माणसाच्या पाठीमागें बराच पुरुषमंडळींचा घोळका चाललेला पाहून "तो कोण आहे ?" असें लक्ष्मीनें विचारलें.

"तो एक स्त्रियांची भूमिका घेणारा पुरुषनट आहे."

"मग त्याच्या कां पाठीमागें लागतात हे पुरुष ?" "काकू, काय सांगावं, कलियुगांत हीच पुरुषांना चटक लागली आहे. पुरुषांनीं पुरुषांकडे बायको म्हणून पाहायचं, त्यांच्या चित्रांची हृदयदेवी म्हणून आराधना करायची, ह्यालाच आजकाल सद्‌भिरुचि समजतात. वैषयिक व्यापार दुबळ्या शरीराकडून होईनासे झाले व सर्व कल्पनांचेच खेळ होऊन राहिले. तेव्हां असली विपरीत अदलाबदल चालवून घेण्यास हरकत येत नाहीं." असें म्हणून तीं रस्त्यानें डाव्या बाजूस वळून जाऊं लागलीं तों त्यांना मंडळी जमलेलें असें एक गृह दिसलें. लक्ष्मीनें "हें काय ?" म्हणून विचारलें. त्यावर नारदानें उत्तर केलें, "हें सोमरसपानगृह आहे. या निरनिराळ्या कुंभांतून सोमरस भरून ठेवलेला आहे व येथें येऊन स्त्री-पुरुष यथेच्छ पान करीत आहेत." लक्ष्मी म्हणाली, "नारदा तूं दमला आहेस; जा थोडा सोमरस घेऊन ये.

नाहीं कां म्हणतोस? अरे, देव-ब्राह्मणसुद्धां पितात बरं." नारदानें उत्तर केलें "काकू, सोमरसपान कलियुगांत व्यसन समजतात. कारण त्याला द्रव्य द्यावं लागतं. द्रव्यामुळं पिणाराला दारिद्र्य येतं, म्हणून त्याला वाईट समजतात. पूर्वीं सोमरसाला कुणी पैसेहि मागितले नाहींत आणि यथेच्छ पिणाऱ्याला कुणी नांवेंहि ठेवलीं नाहींत." "खरंच का! द्रव्य पडतं? मग नको रे बाबा, मग तें वाईट रे वाईट–तोंडालासुद्धां त्याचा विटाळ करून घेऊं नकोस!"

* * *

## (४) दृश्य चवथें

लक्ष्मी व नारद यांनीं त्या शहरांतून संचार सुरू केला. तथापि त्यांच्या विलक्षण भासणाऱ्या पोषाखामुळें त्यांच्याशीं दरेकजण तिऱ्हाईतपणें वागे; इतकेंच नव्हे तर त्यांची कुचेष्टा होऊन कित्येक खास ठिकाणीं त्यांचा शिरकावहि होत नसे. या मृत्युलोकच्या रखरखीत हवेंत त्यांचे उंची कपडे आणि दागदागिने त्यांना तर यापूर्वींच असह्य झालेले होते; तरी पण ठुशी चोरीस गेल्यापासून त्यांचें संरक्षण कसें करतां येईल या फिकिरींत तीं राहूं लागलीं. कल्पक अशा नारदानें वेषांतराची युक्ति सांगतांच लक्ष्मीनें ती पसंत केली. "नारदा, ही तुझी युक्ति फार नामी आहे. मला घरांतून निघाल्याला बराच वेळ झाला. नेम नाहीं, शोधीत शोधीत यायचे. आणखी या माझ्या पोषाखामुळं इकडे मला चारचौघांमधून हुडकून काढण्यासहि वेळ लागायचा नाहीं. तें सगळं राहूं दे, पण हें पाहिलंस का माझ्या पायाला केवढाले फोड आले आहेत ते? मेले रस्ते तरी किती तापलेले!" नारदानें, नुकतेच खरेदी केलेले चपलांचे दोन जोड पुढें टाकले. त्यांतल्या लक्ष्मीच्या पायास येत असलेल्या चपला लक्ष्मीनें घातल्या व राहिलेला जोड नारदानें स्वतःसाठीं ठेविला. वेषांतर सुरू झालें, व मानापमानांतल्या भामिनीपेक्षांहि आनंदानें लक्ष्मीनें वेषांतर केलें. झाडून मंगळसूत्रासुद्धां तिनें दागदागिने टाकून दिले, कानांत कुडीं व हातांत बांगड्याच ठेवून दिल्या. एक झिरझिरीत पांढरें पातळ, पांढरा ब्लाऊज असा पोषाख केला. केसांची वेणी पाठीवर सोडून मधें एक झाडाची डिक्षी खोंवली. नारदानें खादीचा कफनीवजा शर्ट घातला, खादीची टोपी व नेसण्यास खादीचा एक धडपा असा पोषाख त्यानें केला.

या केवळ बाह्यात्कारी पोषाखाच्या फेरबदलीमुळें त्यांच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडून खरोखर ते जमिनीवरून वावरत असतांना अस्मानांत संचार केल्याप्रमाणें त्यांना भास होऊं लागला. लक्ष्मीच्या स्वरूपाकडे आतांपर्यंत कोणी ढुंकूनहि पाहीना, त्यामुळें ती स्त्रीस्वभावानुसार मनांत कष्टी होती, पण तो सर्व प्रकार एकदम बदलला. रस्त्यांत वावरणारे रावापासून रंकापर्यंतचे, बालापासून ते स्थविरापर्यंतचे झाडून सर्व पुरुष तिजकडे न्याहाळून पाहूं लागले. इतकेंच नव्हे तर बसल्या जागेवरून केवळ डोळ्यांकरवीं तिचा पाठलाग करणाऱ्यांनीं स्वतःच्या माना मुरगळून घेऊन तिजवरून देहाची कुर्बान केली. प्रथम प्रथम लक्ष्मीस सर्व सुंदर स्त्रियांना सौंदर्याच्या सामन्यांत नामोहरम केल्याबद्दलचा अभिमान वाटूं लागला व आपल्या सौंदर्याची तारीफ करणाऱ्यांच्या प्रचंड समुदायाकडे पाहून तिला आनंद वाटूं लागला. तरी पण सौंदर्याची तारीफ करून न राहतां तिच्या मागोमाग पाठलाग करून तिच्याशीं सलगी वाढवण्याचीच बहुतेकांची तयारी पाहतांच नारदानें लक्ष्मीस इशारा दिला व लक्ष्मीसहि त्यांच्या उदात्त हेतूबद्दल त्यानंतर शंका राहिली नाहीं. स्त्रीवर्ग आतांपर्यंत तिजकडे, विशेषतः तिच्या सौंदर्याकडे, व अमोल अशा दागदागिन्यांकडे अगदीं आशाळभूतपणानें पाहत होता तो यानंतर तिच्या रूपाकडे पाहून नाकें मुरडूं लागला व पोषाखाकडे पाहून मत्सरानें बोटें मोडूं लागला. नारदास एकाएकी प्रतिष्ठा प्राप्त झाली आणि लक्ष्मी नेहमीं त्याच्याबरोबर असल्यानें मोठमोठाले लोकहि नारदाची मैत्री संपादण्याकरितां लाळ घोटूं लागले. आतांपर्यंत लोकांत मिसळून त्यांचें चरित्र पाहण्याची संधि मिळाली नव्हती म्हणून नारदानें त्या लोकांना झिडकारून टाकलें नाहीं. लक्ष्मीचें नारदाशीं चुलतीपुतण्याचें नातें आहे असें समजतां त्यांच्याशीं–विशेषतः लक्ष्मीशीं–मैत्री जोडूं पाहणाऱ्या लोकांची, संख्या अतोनात वाढली; तेव्हां या पुरुषांच्या चक्रव्यूहांत सांपडूं नये म्हणून लक्ष्मीनें होतां होईल तों स्त्रीसमाजांत वागावें, असें ठरलें. तदनंतर खरोखरच त्यांचें पाठपुरविणें थोडेंबहुत कमी झालें. स्त्रीसमूहांत आपल्या लग्नाच्या बायकोस पाहून त्यांपैकीं बरेचजण, ‘धर्मे च अर्थे च कामे च ’ ह्या शपथेची आठवण होऊन म्हणा अगर पतित्यागाच्या भीतीनें म्हणा, पण बिचकून आल्यापावलीं परत फिरत. फळप करून राहण्यानेंच

व्यक्तिमात्राचें संरक्षण होतें हें उत्क्रांतीचें तत्त्व लक्ष्मीस त्या वेळीं पटूं लागलें.

* * *

## ( ५ ) दृश्य पांचवें

लक्ष्मी देवदर्शनास जाऊं लागली. तिला पाहतांच तेच विठोबा उल्हसित होऊन बोलूं लागले. त्यांनीं "केव्हां आलां, किती दिवस राहणार, येत जा अशाच रोज" असे निरनिराळे कुशल प्रश्न विचारले व रखुमाबाईस रागानें ते म्हणाले, "कोणतीं माणसं येतात तिकडे लक्ष ठेवीत जा. यांना कांहीं प्रसाद, नारळ देशील कीं नाहीं?" रखुमाबाई रागानें लाल झाल्या! "आतां तेवढंच राहिलं आहे! इकडे येणाऱ्या साळूताई, बाळूताई यांच्यापुढं बटकीप्रमाणं वागायचंच राहिलं आहे!" या एका वाक्यावरूनच उभयतांमधील कच खाणाऱ्या ऋणानुबंधाबद्दल तर्क करून लक्ष्मी लगबगीनें परत फिरली. सभामंडपांत पुराण चाललें होतें. बायकांच्या नवीन नवीन पोषाखाबद्दलचें खरमरीत प्रवचन ऐकून लक्ष्मीस बरें वाटलें. पुरुषांनाहि असें कांहीं सांगतात कीं काय म्हणून लक्ष्मी जरा टेकली. तों पुरुषांच्याकरितां रासक्रीडाख्यान लाविलें होतेंच. त्यांत पुरुषाला अनेक प्रेमसंबंध चालू ठेवण्यास अनुकूल असे निसर्गानें कोणकोणते शरीरभेद निर्माण केलेले आहेत याचें विवेचन करून श्रीकृष्णाच्या अलौकिक पराक्रमाचा, बुद्धिमत्तेचा व पारमार्थिक ज्ञानाचा उगम त्याच्या अप्रतिहत प्रणयसंबंधांत कसा झाला, याचें पुराणिकबुवांनीं केलेलें हृदयंगम वर्णन ऐकून लक्ष्मी तर चकितच झाली. पुराण सांगतांना लक्ष्मीकडेच पुराणिकानें सारखी टक लाविलेली होती. पुराण संपतांच लक्ष्मी त्यांना नमस्कार करून जाणार तों पुराणिकबुवा तिला म्हणाले, "बाई, तुम्ही परगांवच्या दिसतां. अहो, तुमच्यासारख्या ऐकायला आल्या तर कांहीं सांगावसं वाटतं! नाहीं तर ही म्हातारड्यांची दावणच्या दावण रोज लागते. काय अर्थ आहे? अहो, मी तरी कुठं नवीन चालीच्या विरुद्ध आहे! पण या मुक्तिफौजेपुढं काय सांगायचं! येत जा बरं रोज." पुराणिकाचें भाषण ऐकून लक्ष्मी कांहींहि न बोलतां निघून गेली. ती नारदाजवळ झालेली हकीगत सांगून म्हणाली, "कुठं व्यासमुनि; पूर्वींचं त्यांचें कांहींहि असो; परंतु पुराणिकाचा धंदा करूं लागल्यापासून

त्यांनीं मन किती ताब्यांत ठेविलं होतं! नाहीं तर हें व्यासस्वरूप !" सदर पुराणिकाचा बभ्रा असल्याचा रिपोर्ट नारदास यापूर्वीच मिळाला होता. नारद एका सामाजिक चळवळीच्या सभेंत गेला होता, तेव्हां तेथील अनुभवहि तो सांगूं लागला. "कथेकरीपुराणिकांनाच काय हसावयाचें. हे नवीन विचाराचे लोक घ्या ना ? बायकांच्यासाठीं म्हणून व्याख्यानाला येतात. व्याख्यानं बाजूलाच राहतं; आणि यांचे आधुकमाधुक संबंध उघडाउघड चालू असतात. बायकापुरुषांनीं एकत्र मिळून मिसळून वागण्याचा उपदेश करितात, पण म्हाताऱ्या स्त्रीपुरुषांना कोणी वालीच भेटत नाहीं, म्हणून ते खट्टू होऊन वेगळेच उभे राहतात. तरुणांची मजा आहे झालं ? काय सांगावं काकू, बालविधवांची केवढी अफाट संख्या आज तेथें पाहिली ?"

"म्हणजे !" लक्ष्मीनें विचारलें "जन्मोजन्मीं त्यांनीं तसेच दिवस कंठावयाचे, आणखी पुरुषांनीं असंख्य लग्नें करावयाचीं असाच न्याय येथें दिसतो ?" नारद गहिंवरून म्हणाला, "काकू, काय सांगावं ! आपल्या काळांत 'नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च' असा नियम होता. आतां तो विसरला गेला, इतकेंच नव्हे तर बालविधवांनीं आजन्म ब्रह्मचारी राहून आत्मजन-सेवा करण्यांत आयुष्य घालवावें असें बहुतेक लोक प्रतिपादन करितात."

"मग ठीकच आहे, जगांत भ्रष्टाकार माजला तर काय नवल आहे ?"

* * *

## ( ६ ) दृश्य सहावें

नारद आणि लक्ष्मी फिरतां फिरतां गांवच्या टोंकास आलीं व आजूबाजूची वस्ती पाहून लक्ष्मीनें नारदास विचारलें, "नारदा, आपण यमपुरींत आलों कां रे ? बघ ना ही भोंवतालची गलिच्छ वस्ती ! मुलं बाळं, बायकापुरुष, अन्नावांचून प्रेतांप्रमाणं दिसत आहेत. कपडेहि अंगभर नाहींत. चल बाबा, या नरकांतून बाहेर केव्हां पडूं असं झालं आहे ! मेल्यांनीं मागल्या जन्मीं पापं केलीं त्याचीं फळं भोगताहेत !"

"काकू, जन्मोजन्मीचीं पातकें हे भोगीत नसून केवळ जन्मामुळेंच हाल-अपेष्टांत दिवस काढीत आहेत !"

लक्ष्मीस याचा उलगडा होईना. तिनें " नारदा, हें रे कसं ? कांहीं न्याय-धर्म या भूलोकावर आहे कीं नाहीं ? " असें विचारलें.

नारदानें उत्तर केलें, " काकू, न्यायधर्म मूठभर पांढरपेशांच्याकरितां आहे. त्यांनीं या लोकांची पायमल्ली करावी, फार काय पण यांची सावलीसुद्धां घेऊं नये हा येथला धर्म आहे. यांना समाजापासून वेगळें ठेवलें असून त्यांच्या सावलीचा विटाळहि इतर जातींना खपत नाहीं. यांचा अपराध म्हणजे यांनीं या जातींत जन्म घेतला."

लक्ष्मीला त्या लोकांची हलाखी पाहून व त्यांच्या छळाचें कारण समजून त्यांच्याबद्दल कळवळा आला. " नारदा, पण हा प्रकार तर मीं ऐकला-देखील नाहीं. रामायण, भारतादि पुराणं ऐकलीं पण त्यांत असं कांहीं नाहीं आणखी येथेंच कसं हें आलं ? "

या विचारलेल्या प्रश्नास नारदानें उत्तर केलें, " देवी, 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' असें श्रीकृष्ण परमात्मा एकदां कधीं म्हणाले होते, त्याचा आधार घेऊन यांची ही हलाखीची स्थिति अजरामर करून टाकण्याचा इतर जातींनीं निश्चय केलेला आहे. आतांच तुम्हांला दाखवितों. हा पाहा मनुष्य, दिवसभर काम करतो. ही त्याची बायको, हीहि पण दिवसभर खपते. उभयतां सुखांत नांदत आहेत. हीं मुलंबाळं बघा कशी नीट वागत आहेत. पण दारिद्र्यानं गांजून गेलेलीं आहेत. त्यामुळं मन कष्टी असलं तरी तीं स्वसंतुष्ट आहेत. हा पाहा पलीकडे भजनाचा मेळा जमला आहे. ह्या लोकांना नीट पाहून घ्या. चला, आपण दुसऱ्या भागांत जाऊं." असें म्हणून दोघेंहि परत फिरलीं. वाटेंत त्यांना एक मारामारीचा प्रसंग दिसला. त्याबरोबर लक्ष्मी भीतीनें म्हणाली, " नारदा तिकडचें स्मरण कर; अरे हे दैत्यच दिसत आहेत. ते आपापसांत भांडत आहेत. आईई, काय रे हीं अभद्र बोलणीं बोलताहेत एकमेकाला ! अरे, अरे ! मायबहिणींची काय ही विटंबना ! " नारदानें लक्ष्मीस एका ठिकाणीं उभें केलें व आपण पुढें जाऊन तो शोध घेऊन आला. " देवी, हे दैत्य असावेत असें मलाहि वाटलें होतें; पण तसें नाहीं. हे दोघेहि मानवच आहेत. त्यांतली एक जात ब्राह्मणांची दिसते. हे आपआपसांत निवडणुकीसाठीं तोंडी लढत आहेत त्यांचें भांडण तूर्त मिटलं आहे. चला आपण थोडें पुढें जाऊं. याच घरांत

जाऊं. बघा आतां काय काय देखावा दिसतो तो ! हे झिंगून निपचीत पडलेले मालक, ह्या फाटकीं लुगडीं नेसलेल्या गृहलक्ष्मी, हीं अकाळविकाळ रडणारीं त्यांचीं मुलें. घर धुंडाळलंत तरी पैसा आणि देवाची मूर्ति दोन्ही सांपडावयाचीं नाहींत. हा सभोंवार उकीरडा पडला आहे तो त्यांचा संसार आणि संपत्ति !" तेथला तो किळसवाणा प्रकार पाहून लक्ष्मी म्हणूं लागली, "नारदा, यापुढें ती मघाची यमपुरी पुरवली ! अरे हे दैत्य, जातीचे तरी कोण आहेत ?" नारदानें उत्तर केलें, "ब्राह्मण आहेत, सनातन धर्मरक्षक आहेत हे." "मग मघाशीं पाहिलेले लोक बरे !" लक्ष्मी म्हणाली.

* * * *

## ( ७ ) दृश्य सातवें

नारद-लक्ष्मी रस्त्यानें फिरत असतां त्यांना एक क्लब लागला. तेथें स्त्री–पुरुष मिळून निरनिराळे खेळ खेळत असतात, अशी माहिती नारदास लागली, तेव्हां तीं दोघेंहि आंत गेलीं. आंत पाहतात तों स्त्रीपुरुषांच्या जोड्या हातांत हात घालून गप्पा मारीत इकडे तिकडे फिरत आहेत. तेव्हां प्रथम त्यांना वाटलें कीं, हीं नवराबायकांचीं जोडपीं फिरत आहेत. पण तीं आंत जाऊन एकीकडे उभीं राहिलीं, तों बाहेरून येणारी नवराबायकोची जोडी फुटून निरनिराळ्या जोड्या तात्पुरत्या बनविण्याचा सारखा चाललेला सपाटा पाहून, लक्ष्मीनें नारदास याचा अर्थ काय म्हणून विचारलें. पण तो तरी काय सांगणार ? दोघेंहि स्वस्थ जागच्या-जागीं उभीं राहिलीं. तेव्हां लक्ष्मीस घेऊन जाण्याकरितां, कांहीं तरुण पुरुष व नारदास घेऊन जाण्याकरितां, वयातीत स्त्रिया त्यांच्याभोंवतीं जमल्या. नारदाच्या मनांत कोणाबरोबर तरी दोन घटका फेरफटका करून यावा असें आलें. परंतु लक्ष्मी दुसऱ्याबरोबर जाण्यास कबूल होईना. म्हणून नाइलाजानें तीं दोघें मिळून इकडे तिकडे फिरूं लागलीं. "काय रे नारदा, स्वर्गांत देव अप्सरांशीं क्रीडा करितात असं मी ऐकलं आहे. पुष्कळ वेळां तें असेंच असेल नाहीं रे ?" लक्ष्मीनें विचारलें. नारदानें कांहींच उत्तर न देतां, ऐकलें न ऐकल्यासारखेंच केलें. जरा पुढें जातात, तों "नारदा, तें बघ समोरच्या बाजूस कोण बसलं आहे ? होय तेच ते. अगदीं मुळीं शंका नको, माझं

नशीब फुटलं. देवा, मला आंधळी कां केली नाहींस! हरहर! कर्म माझं! काय पण त्या सटवीशीं गप्पागोष्टी चालल्या आहेत!" नारदहि तो देखावा पाहून चपापला. "छेः हो काकू, ते नसावेत." "छेः रे, अगदीं या मंगळ-सूत्राशपथ, तेच! शंकाच नको! हरहर उगीच मीं दागिने उतरले! आतां मंगळसूत्र उपयोगीं पडलं असतं! तेंच ते. मुळीं शंका नाहीं. चलेनास. जवळ जाऊन पाहूं." असें म्हणून उभयतांहि तिकडे चालूं लागलीं.

"नारदा, अरे नारदा, माझ्याच्यानीं आतां पुढचा प्रकार नाहीं पाहवत! तो पाहिलस, त्या सटवीभोंवतीं डावा हात आहे. उजव्या हातांतल्या पेल्यांतून तिला सोमरस पाजणं चाललं आहे. आईई—" अशी एक बारीक किंकाळी लक्ष्मीच्या तोंडांतून निघाली व ती बेशुद्ध होऊन धाडकन जमिनीवर पडली. त्याबरोबर त्या समाजांतील भोंवतालचे लोक धांवत आले. कोणी वारा घालीत होता, कोणी तोंडावर पाणी मारीत होता. असें चार दोन मिनिटें होत आहे, तों थोडीशी शुद्धीवर आल्यासारखी होऊन लक्ष्मी बोलूं लागली, "देवा, असा माझा गळा कापायचा होता, तर मला समुद्रांत हो कां ढकलून दिलं नाहीं? मला शेषाकडून गिळून टाकली असती अगर गरुडाकडून फाडून खावविली असती, तर मीं आनंदांत तरी मेलें असतें. पण मला न कळवितां, दुसऱ्या बायकांशीं, मी जिवंत असतांना, आपण असा प्रकार चालवितां! देवा, लोण्याची झाली तरी ती सवत, हें नाहीं का तुम्हाला समजत? लग्नाच्या वेळीं अग्नि-ब्राह्मणांच्या देखत घेतलेल्या शपथा इतक्यांतच विसरलांत! नारदा, मी तर मरणार, पण—" असें म्हणून लक्ष्मी तडफडूं लागली. लक्ष्मीस मांडी देऊन वारा घालणाऱ्या इसमाची चर्या खरकन् उतरली व तो काळाठिक्कर पडला. इतर लोकांच्याहि तें नजरेंत आलेंच. "आणखी पाणी मारा, येईल शुद्धीवर" असें नारद ओरडूं लागला. "अरे, वेड्या, अंतर्यामीं सवतीमत्सराचा वडवानळ पेटला आहे! सगळा समुद्र ओतलास तरी काय होणार आहे? मेल्यांनो, माणसाची कांहीं तरी कींव? मी तर जात्येंच, पण या पतिव्रतेचा इकडे शाप लागेल कीं, खरव किडे पडून मृत्यु येईल." बसलेला गृहस्थ एकदम मेल्यापेक्षां मेला होऊन दया मागण्याकरितां, तिच्या कानाशीं कांहीं तरी पुटपुटला. "तें कांहीं नाहीं, मला वचन पाहिजे, अगदीं त्या सटवीची शपथ घेऊन

सांगा." असें लक्ष्मी म्हणाली व त्यांनीं 'होय' म्हणतांच लक्ष्मी चांगली उठून बसली व भोंवतालची गर्दी ओसरतांच तो गृहस्थ म्हणाला, "बाई-साहेब माफ करा, कोपरापासून हात जोडतों." तुम्ही जा एकदांच्या येथून. "मी बरोबर घेतल्याखेरीज थोडीच जाणार आहें?" असें लक्ष्मीनें उत्तर दिलें व नारदास उद्देशून म्हणाली, "नारदा पाहिलंस ना, पावलो-पावलीं किती खोटेपणा आहे तो!"

"नारदा, हें बघ, माझ्या अब्रूची राखरांगोळी करण्याची इच्छा तुम्ही धरूं नका. मला या क्लबांत अध्यक्ष म्हणून बहुमान देतात. बाईमाणूस पडलें सवरलें आणि पुरुषांनीं त्यांच्या शुश्रूषेकरितां धांवून गेलं नाहीं, तर इतर लोक आपल्याला रानटी समजतील, म्हणून मी धांवून आलों. घरीं ही मरून पडती तर मी ढुंकूनहि पाहिलं नसतं. तेव्हां बऱ्या बोलानें इनें आतां घरीं जावं. जन्म माझ्याशीं काढावयाचा आहे. मोठमोठ्या दैत्यांना मारून टाकलं, इला किती वेळ लागणार आहे! समजलांत?" लक्ष्मीचा क्रोधहि अनिवार झाला व ती मोठमोठ्यानें बोलून देवाची निर्भर्त्सना करूं लागली व तें ऐकून पुनः लोक जमूं लागले. शंख-चक्र-गदाधारी विष्णूलाहि मोठा घुस्सा आला आणि त्यानें लक्ष्मीवर चाल करून, तिच्या नरडीचा घोंट घेण्या-साठीं तिला उताणी पाडली. भोंवतालच्या लोकांनीं त्याला ओढून बाजूस काढलें व जो तो लक्ष्मीचा कैवार घेऊन विष्णूची निर्भर्त्सना करूं लागला. तेथील गड्यांच्याकडून त्याला धक्के मारून बाहेर काढण्यांत आलें. त्याबरोबर लक्ष्मी व नारदहि त्यांच्या पाठोपाठ गेले. "जाऊं नका, इथें खुशाल रहा, आम्ही तुम्हाला कांहीं कमी पडूं देणार नाहीं. फुलांत ठेवूं. अहो, जन्माची झाली म्हणून काय झालें! सडलेली मांडी कापूनच टाकली पाहिजे" असें बोलून भोंवतालचे लोक परोपरीनें लक्ष्मीला विनंति करीत होते. "नको ग बाई, आणखी तिसरी एकादी भेटेल." असें लक्ष्मी म्हणाली व नारदहि म्हणाला, "तुम्ही काळजी करूं नका, मी आहेंच बरोबर!"

* * * *

## (८) दृश्य शेवटचें

देव बेफाम झाले, कोणास ऐकेनात. बाहेर गरुड उभा होताच. नारद म्हणाले, "गरुडा, पाहतोस काय! तुझें अतुल सामर्थ्य कुठें गेलें? यांना

घरीं घेऊन जायचं आहे हं, आटप." नारदाची आज्ञा मान्य करून त्यांनीं आपल्या मालकाला चोंचीनें धरून पाठीवर टाकलें. लक्ष्मी पायांकडे बसून तिनें पाय दाबून धरले, गरुडानें उड्डाण केलें. विष्णु धडपड करीत होतेच; पण एकदोन ओकाऱ्या झाल्या आणि थंड हवा लागतांच ते निपचित पडले. शेष पडला होता तेथें आल्यावर त्यांना सर्वांनीं खालीं उतरून घेतलें व लक्ष्मीनें शेषास आज्ञा केली, "शेषा, आज इकडचं लक्षण कांहीं बरोबर नाहीं. तेव्हां तूं यांच्या हातापायांस विळखे घालून बांधून ठेव. हातपाय जर सुटले तर मी मेलेंच म्हणून समज." शेषानें घर-धनिणीचा हुकूम पाळला. नारद परत जाण्यास निघाले, तों त्यांना चिपळ्या-वीण्यांची आठवण झाली. लक्ष्मीलाहि दागदागिन्यांची आठवण झाली. ते परत आणण्यासाठीं नारद गेले व परत आल्यावर लक्ष्मीस म्हणाले, "काकू, दागदागिने व माझ्या चिपळ्या-तंबोरा त्या माणसानें विकले. दागिने नाटक कंपनीनें घेतले. तंबोरा-चिपळ्या कथेकऱ्यानें घेतल्या. नाटकवाल्यांनीं कांहीं दिवस दागिने वापरले, पण त्यांनाहि त्याचा उपयोग होईना म्हणून त्यांनीं ते विकून खाल्ले. तो कथेकरी निःसंतान मयत झाला. वारसांचा कांहीं तपास लागत नाहीं." लक्ष्मी दुःखानें विव्हल झाली व आक्रोश करूं लागली. "तो भावड्या किर्लोस्कर असेल! नंबर एकचा नाटक्या तो! नारदा हें काय झालें? मृत्युलोकांत संचार केला, पुरुषांना परत आणिलं, पण त्यांच्याहिपेक्षां बहुमोल असा खजिना गेला! आतां मी काय करूं रे? हरिश्चंद्राप्रमाणें इकडे विकलं तरीसुद्धां आतां कोणी तेवढं मोल देणार नाहीं." नारदासहि वीण्या-चिपळ्यांबद्दल गहिंवरून आलें व तोहि हुंदके देऊं लागला. इतक्यांत देव जागे झाले व म्हणाले, "हं, ऐकलं का, मला न विचारतां तूं वाटेल तिकडे हिंडून आलीस, एकदां गय केली आहे. पुनः असं चालून देणार नाहीं. मी आपला मृत्युलोकांत सहज गेलों तों तूं सांपडलीस." दागिन्यांची अफरातफर विष्णूच्या नजरेस येऊं नये म्हणून लक्ष्मीनें नमतें घेतलें व ती म्हणाली, "पण इकडे मृत्यु-लोकांत कशाला जायचं असतं? तो प्रांत आपल्या जाण्याच्या लायकीचासुद्धां नाहीं." नारदानें लक्ष्मीस दुजोरा दिला. देव म्हणाले, "अरे, धर्मास आलेली ग्लानि घालविण्यासाठीं मला पृथ्वीतलावर कधीं कधीं जावें लागतें."

" पुरे, पुरे," लक्ष्मीनें नाक उडवून हरजबाबी उत्तर केलें, " हें कांहीं तरी निमित्त आहे. पृथ्वीवरील लोक घेतील आपापले धर्म संभाळून! कांहीं इकडे जायला नको आहे!! आणखी आज पाहिलं तर कोणालाहि आपण नको आहोंत. त्यांच्या त्यांच्यांत कांहीं लोकांना पुढारी ठरवून त्यांच्याच भजनीं लोक लागले आहेत. त्यांच्या पूजेपुढें इकडे कोण विचारतो आहे! त्यांच्या नांवांचीं मंदिरें ठिकठिकाणीं बांधलीं जात आहेत. चहाच्या दुकानापासून ते थेट शहरापर्यंत त्यांचींच नांवें जेथें तेथें दिलीं जातात! कोणाची जयंती तर कोणाची मयंती, कोणाची पुण्यतिथि तर कोणाचें श्राद्ध, तर कोणाचे सुवर्ण-महोत्सव असे वर्षाचे तीनशें साठ दिवस सारखें कांहीं ना कांहीं चाललेलं असतं. इकडचे सणवार, उत्सव कोणी करीत नाहीं. एकादशा गेल्या आणि राष्ट्रीय सप्ताहाचीं उपोषणें सुरू झालीं. त्यांना धर्माची चाड नाहीं तर इकडे तरी काय कोणी डोक्यावर एवढं ओझं दिलं आहे? घरच्या माणसाचे हाल करून आपण कष्ट सोसून करायचं काय तर म्हणे धर्मास ग्लानि आली आहे!" देवानाहि लक्ष्मीचें म्हणणें पटलें, झालेला प्रकार आठवला व त्यांनींहि पड खाल्ली. पण वरपांगीं त्यांनीं नारदाचा सल्ला विचारला; त्यावर नारदमुनि म्हणाले, " देवा, देवी सांगत आहेत ती गोष्ट अक्षरशः खरी आहे. आपण कांहीं काल स्वस्थ पडून राहावं. मृत्युलोकांत आतां अवतार घेण्याला अनुकूल परिस्थिति नाहीं. लोक कष्टी आहेत, ते स्वतःच्या दुबळ्या मनोवृत्तीमुळें आहेत. शिवाय तुम्हीं अशी लोकांची काळजी वाहून काकूंना दुःखी करून टाकलें व स्वतःचा संसार कष्टमय केलांत!" देवांनीं हें भाषण शांतपणें ऐकून घेतलें. " हं, अवतार घेण्याच्या मिषानें मी नव्यानव्या ठिकाणीं वावरत असें, तेंहि बंद झालं म्हणायचं? हिनें मात्र नवीन चाल केव्हांच उचलली! बरं चला, नारदा ही जर प्रथमच अशी जरा नवीन वळणानें वागली असती तर इतका प्रकार कशास होता? नारदा, तूं आतां परत जा आणि हें बघ, आम्ही आतां उभयतांही वृद्ध झालों आहोंत, एकमेकांस कंटाळलों आहोंत, तेव्हां आमच्यांत भांडणें सुरू झालीं म्हणजे तीं आतां विकोपास जातील. तेव्हां पुन्हा कृपा करून हिला कांहीं सांगत जाऊं नकोस."

देवाचें मन शांत झालें; लक्ष्मीस आनंद झाला. नारद मात्र देवाच्या भाषणानें दुःखी झाला. लक्ष्मीची सहानुभूति मिळेल म्हणून त्याला आशा होती पण लक्ष्मीनेंहि नारदासच शेवटीं दोष दिला.

# पहिलें विधुर संमेलन : : ६

## ( १ ) कल्पनेचा उगम

एका व्यक्तीवर कोसळलेलें संकट कित्येक वेळीं बहुजनसमाजावर ओढ-वणारी आपत्ति वाटूं लागते. आणि हाच प्रकार अंतुकाकांच्यावर पत्नी-निधनाचा जो प्रसंग गुदरला होता त्याचा झाला. तसें पाहिलें तर, दे. भ. धर्मवीर अंतुकाकांचें आज कित्येक वर्षें खितपत पडलेलें कुटुंब, त्यांच्या अवहेलनेला शिव्याशाप देत, कोणाहि डॉक्टरवैद्यांच्या मदतीवांचून, परलोकांत जाऊन पोंहोचलें, ही एक त्यांच्या दैनंदिनींत खासगी नोंद ठेवण्यापुरती बाब. स्वतःच्या मनाच्या नसलेल्या दुबळेपणाचें आणि माहीत नसलेल्या भावनेचें इतरांच्यासमोर प्रदर्शन मांडून त्यांची वरकरणी सहानुभूति मिळविण्याचें त्यांनीं ठरविलेंच, तर फार झालें तर दोन मोजके अश्रु आणि त्यांच्या मागोमाग समाधानाचा सुस्कारा सोडतां येण्याजोगा प्रसंग. पण त्यांच्या त्या वैयक्तिक प्रसंगाच्या वावटळीनें आमचा गांव गदगदां हालूं लागला. स्वतःच्या सुखांत, खाण्यापिण्यांत, ऐषारामांत काडीइतकेंहि कमी पडत नसतांहि, दे. भ. अंतुकाकांची अहर्निश चळवळ व उलाढाल चाललेली असावयाची. महाराष्ट्रांत, मोठ्या महाराष्ट्रांत आणि अखिल भारतवर्षांत कोणत्याहि कानाकोपऱ्यांतून कोणत्याहि पक्षाच्या कितीहि क्षुल्लक विचाराची केवढीहि बारीक लाट उठेना, ती आमच्या गांवच्या जवाहरहॉल ( व्हिक्टोरिया,

सप्तम एडवर्ड, सर जॉर्ज क्लार्क, ना. गोखले, लो. टिळक, सिमकॉक् कलेक्टर, महात्मा गांधी, ना. हॉटसन् अशीं बदलतीं नांवें पत्करून आमची स्मारकाची हौस बिनखर्चानें भागविणारें सभागृह सध्यां जवाहरहॉल म्हणून ओळखलं जात असे ) अशा त्या जवाहर हॉलमध्यें येऊन आदळावयाची आणि सभा, भाषणें, ठराव, समारोप, आभारप्रदर्शन यांची खणानारळाची ओटी घेऊन आमच्या गांवांतून पहिल्यांदा बाहेर पडावयाची. हा सर्व खटाटोप त्या प्रौढ-प्रतापी अंतुकाकांचाच ! असा कोणताहि नरम–गरम अगर शिळा सडका वाद नव्हता कीं जो आमच्या गांवांत बुद्धिभेदाचें कायमचें बीं पेरून गेला नसेल, एकीच्या चिन्ध्या चिन्ध्या फाडून गेला नसेल. आमचें गांव गैरसोयीनें, दारिद्र्यानें, खेड्यांत मोडणारें, तरी रोगराई आणि वितंडवाद यांत पहिल्या प्रतीच्या शहराशीं टक्कर देणारें. मुंबईला बंदरानें जी आढ्यता मिळवून दिली तीच प्रतिष्ठा दे. भ. अंतुकाकांनीं आमच्या चिमुकल्या गांवाला मिळवून दिली, आणि प्रांतीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वादांची जंगी पेठ आणून वसविली. दे. भ. अंतुकाका म्हणजे आमच्या गांवापुरते प्रतिशालिवाहन शककर्ते, आधुनिक कालाचे युगकर्ते (प्रत्येक साहित्यिकाच्या जननमरणासरशीं प्रत्यहीं बदलणारें साहित्ययुग नव्हे बरं का ! ) आणि अज्ञात, मेसूर भविष्यकाळाच्या उरावर थयथय नाचून त्याला वांकविणारे संस्मरणीय असे इतिहास बनवणारे वीर ! त्यांची उलाढाल म्हणजे ताप न चढतां अगर भरतां आमच्या गांवची फणफण उडणारी नाडी ! त्यांच्या कारवाया म्हणजे आमच्या गांवचा जिवंतपणा आणि जिवंत राहण्याच्या युक्त्या ! त्यांचा वाग्विलास म्हणजे आमच्या गांवाचें खुलें आणि सांठलेलें ड्रेनेज ! त्यांचा अनाचार म्हणजे आमच्या गांवांतील शिष्टाचार. देशभक्त अंतुकाका, थोडक्यांत म्हणजे, आमचे डिक्टेटर होते. 'अंतुकाका बोले दळ हाले' एवढेंच काय पण अंतुकाका बोलले कां नाहींत म्हणूनहि दळ हालत असे. येवढा प्रचंड माणूस, त्यावर पत्नीनिधनाची येवढी भयंकर आपत्ति कोसळली ( खात्री पटण्यासाठीं अजविलाप वाचा नाहीं तर फाडून तरी टाका ) ती इतरांना भोंवणार नव्हती असें थोडेंच होतें ! फार काय, पण या संकटाची झळ आम्हाला सोसावी लागली तरी, अंतुकाकांसाठीं बेहेत्तर आम्ही ती सोसूं, अशा निर्वाणीच्या पवित्र्यांत आम्ही वाट पाहत उभे होतों. आम्हीं गांवांत, दरेक मोहल्यांत, दुःखप्रदर्शक सभा भरविल्या,

कडक हरताळ पाडले, गृह्यसंस्कारांत मृत्यूची नोंद स्वखर्चानें देऊन उत्कृष्ट सान्त्वनपर पत्रास बक्षीस जाहीर करून दुखवट्यांच्या पत्रांचा, विलापित गीतांचा त्यांच्यावर संततधार पाऊस पाडला. तेरावा होईतोंवर त्यांच्या-भोंवतीं आळीपाळीनें पहारा ठेवला, महिनाभर जाऊन येऊन त्यांना सोबत केली. आम्हांस वाटलें आम्ही गांवकरी दे. भ. अंतुकाकांच्या ऋणांतून पुरे-पूर मुक्त झालों, सार्वजनिक आपत्तींतून एकदांचे सहीसलामत सुटलों. पण इतकी सेवा करूनहि अंतुकाकांचा राग जाईना. त्यांच्या दुःखाबद्दल सांगायचें राहिलेंच. विचारी अंतुकाकांनीं बायको मरण्यापूर्वीपासूनच आपलें दुःख गिळून टाकलें होतें. दुःखापैकीं आतां एक कणहि औषधाला शिल्लक राहिला नव्हता. त्यांचा तो राग जाणून आपल्या हातून सांत्वनक्रियेचें तंत्रमंत्र तर कांहीं चुकलें नाहीं ना, अशा आत्मपरीक्षणानें मीं शोध चालविला असतां, त्यांनीं होऊनच एक नाजुक तक्रार माझ्यापुढें आणून मांडली. समाचाराला येणाऱ्यांपैकीं एकानेंहि त्यांच्या तिसऱ्या लग्नाबद्दल गोष्ट काढली नव्हती, खटपट करीन असें आश्वासन दिलें नव्हतें, हीच ती त्यांची तक्रार होय.

अंतुकाकासारख्या उतार वयाच्या आणि उपद्व्यापी पुरुषाच्या डोक्यांत तिसऱ्या लग्नाचे विचार घोळूं लागावेत, हें आम्हांला सुचिन्ह वाटेना ! त्यांचे ते दुष्ट विचार सुटावेत याबद्दलच वडीलपणें मीं प्रयास चालविले. त्यांच्या अंगीं पूर्ण वैराग्य बाणावें म्हणून मी त्यांच्या घरांतले समाजस्वास्थ्याचे झाडून सारे अंक पळविले. नवीन येणाऱ्या मासिक साप्ताहिकांना कात्री लावून अश्लील जाहिराती व मनोविश्लेषणात्मक लेख यांच्यापासून अलिप्त राहिलेलें निरशनाचें लिखाणच त्यांच्या हातीं पडेल अशी व्यवस्था चालविली. त्यांच्या टेबलावर पुरुषार्थाचे नवे-जुने अंक पसरून ठेवले, तर निजण्याच्या त्यांच्या खोलींत आणि पलंगाच्या उशापायथ्याशीं कल्याण मासिकाचे खास अंका-सुद्धां सर्व अंक मांडून ठेवले. घरांतलीं नग्न वा अर्धनग्न अशीं बायकांचीं चित्रें काढून टाकून, त्यांच्याऐवजीं, नदीकांठीं शिष्यांना घेऊन संसाराची उत्तर-क्रिया चालवीत बसलेल्या आद्य शंकराचार्यांची, मातेसुद्धां सर्व स्त्रीजातीवर कुऱ्हाड चालवून कृतकृत्य होऊन डोंगरावर बसलेल्या एकलकोंड्या कष्टी परशुरामाची, व पाहणारांच्या अंगावर शहारे येईतोंवर छाती फाडीत उभ्या राहिलेल्या आद्यब्रह्मचारी हनुमानाची, अशा तसबिरी लावल्या. त्यांच्या

घरच्या रस्त्याकडील खिडक्या कायमच्या बंद केल्या. नेहमींच्या बसण्याच्या आरामखुर्चीचें तोंड वळवून रस्त्याकडे तिची पाठ करून ठेवली. चित्रशाळेचीं नीतिबोधामृताचीं वचनें जिकडे तिकडे घरभर डकवून टाकलीं, आणि मनाच्या श्लोकांचा अखंड घोष इतक्या जोरानें होऊं लागला कीं, त्यांच्या घराच्या किलच्या व भिंती करकर वाजूं लागल्या. या सर्व जालीम उपायांचा परिणाम चांगला होणार याचें प्रत्यंतर म्हणजे, अंतुकाकांच्या उजव्या हातच्या शेजाऱ्यानें संन्यास घेतला, डाव्या हातच्या शेजाऱ्यानें अफू खाऊन जीव दिला आणि समोरचा घरवाला घरांतून जो नाहींसा झाला तो अजून सांपडत नाहीं. पण माझ्या या कडेकोट बंदोबस्ताच्या पायांत अंतुकाका गुप्त कारस्थानाचे सुरंग खोदीतच होते. पुराणश्रवणाच्या निमित्तानें त्यांनीं एक व्युत्पन्न शास्त्री ठेवून अमरुशतक, शृंगारशतक, वात्सायनाचें कामसूत्र इत्यादि प्रमाणग्रंथ वाचण्याचा सपाटा चालविला, आणि समाजस्वास्थ्याची उणीव त्यांनीं हॅवलॉक एलीस, मेरी स्टोप्स, फ्राइड, रसेल यांच्या पुस्तकांनीं भरून काढली. हनुमान–शंकराचार्य–परशुराम यांच्या तसबिरींवर सूड घेण्यासाठीं त्यांनीं नग्नपंथाचीं सचित्र पुस्तकें, अस्सल आसनें, दिव्याच्या प्रकाशाआड आंतील चित्रें दाखविणारे पारदर्शक फ्रेंच पत्ते, हीं करमणुकीचीं साधनें गोळा केलीं. मनाच्या श्लोकांवर मात करण्याकरितां पठ्ठे बापूराव यांच्या लावण्या, (प्रसिद्ध व अप्रसिद्ध) त्यांनीं मागविल्या; पण त्याहि निरस वाटूं लागल्या म्हणून शेवटीं सर्व आधुनिक कवींचे काव्यसंग्रह आणवून, त्यांतील स्फुट-गीतें ते सारखे गुणगुणूं लागले. माझा बाहेरून चाललेला कोंडमारा आणि त्यांचा अंतरीचा उतास जाणारा उमाळा, यांची लटकी लढाई फार वेळ टिकली नाहीं. त्यांच्या दुर्दमनीय वृत्तीचा गांवांत हांहां म्हणतां गवगवा झाला आणि मला शेवटीं नाइलाजानें पराभव कबूल करावा लागला.

पुनर्लग्नाच्या त्यांच्या नीच निश्चयानें बदनामीचा, उपहासाचा व तिरस्काराचा जो विषवायु आमच्या गांवच्या कोनाकोपऱ्यांत पसरून ठेवला होता, त्यामुळें त्यांच्याबद्दल क्वचित् वाटणाऱ्या सहानुभूतीस लपूनसुद्धां जिवंत राहणें अशक्य झालें. तशांत बेहोष अंतुकाकांच्या बेताल वागणुकीनें गैरसमजाच्या उकिरड्यांत खोट्या कंड्यांच्या टोपल्यांच्या टोपल्या येऊन साचूं पडूं लागल्या. त्यांनीं मध्यस्थास दोन पैसे देण्याचें कबूल केलें. त्याचा विपर्यास

आतां असा झाला कीं, बायका पळवून विकण्याची पेढी अंतुकाकांनीं काबुली लोकांना हाताशीं धरून चालविली आहे. त्यांची फाजील आतुरता आणि भडभड्या मूर्खपणा त्यांना चांगलाच नडला. दर दिवसागणिक त्यांचें वय एका वर्षानें कमी होऊं लागलें, तर संपत्ति एका हजारानें वाढूं लागली. पैशाचा आजवर थांग लागूं न देणाऱ्या आणि थकलेल्या बाकीबद्दल सर्व संस्था, स्नेहीसोबती, वाणीउदमी या सर्वांना कायमचे कोकलत ठेवणाऱ्या या चिक्कू मारवाड्यानें तीस हजार रोकड, शिवाय दागदागिने, शिवाय विमा, वगैरेंचा आपल्या अफाट संपत्तीचा तपशील टवाळखोरांच्या चव्हाट्यावर भोळ्या भावानें मांडला, पण नकली मालाच्या तुच्छतेनें त्यांची अधिकच टिंगल होऊं लागली. त्यांच्या बोलण्यांत वयोमान जसजसें कमी होऊं लागलें, तसतसें तें लोकवार्तेत झपाझप वाढूं लागलें. अंतुकाकांच्या गणितानें त्यांचें वय निम्या-वर म्हणजे पंचविशीवर आणून ठेवलें, तर लोकमताच्या निर्णयानें तें नव्वदाच्या वेशीवर नेऊन टांगलें. त्यांच्या संपत्तीचा क्षणोक्षणीं वाढणारा आंकडा दामदुपटीच्या चौखूर दौडीनें फुगत जाणाऱ्या त्यांच्या कर्जाचा कुल-आंकडा ठरला. अंतुकाकांच्या हें लक्षांत येणें शक्य नव्हतें. ते लग्नाच्या आतुरतेनें अगदीं कासावीस झाले होते, आणि येणाऱ्या जाणाऱ्याजवळ ते आपलें हृदय मोकळें करून बोलत तेव्हां त्यांना तारतम्यभाव राहणें दुरापास्तच होतें. बरें, बातम्या काढून कुचेष्टा करावयास मिळेल म्हणून अलीकडे टवाळखोरांची त्यांच्याकडे रहदारी सुरू झाली होती हेंहि त्यांच्या ध्यानांत येईना. त्यांनीं दुःखाचे सुस्कारे टाकावेत; तर त्याचा अर्थ असा होई कीं, त्यांना आतां दम्याची धाप लागते. पहिल्या कुटुंबाबद्दल प्रेमातिशयाचे अगर प्रशंसेचे उद्गार काढावेत, तर ऐकणारे म्हणत, 'तर मग यानं दुसऱ्या लग्नाच्या भानगडींत कशाला पडावं ?' असेंहि कुणी म्हणत कीं, पहिलीचें ज्याला विस्मरण पडत नाहीं, तो दुसरीवर प्रेम तरी कसें करणार ? मृतपत्नीबद्दल जिकिरीचे शब्द उच्चारावेत तर ऐकणारांनीं म्हणावें, मेलेलीला-सुद्धां जो चांगली म्हणत नाहीं, तो दुसरीस सुख कितपत देणार ! लग्न करण्याची जरूरी आम्हांस पटविण्यासाठीं त्यांनीं गेलीं दहा वर्षें काम करणारी मोलकरीण आणि पंधरा वर्षें स्वयंपाक करणारी बाई या दोघींवर चोरीचा आणि नासधूस केल्याचा आरोप ठेवून काढून टाकलें; स्वतःची अडचण, गैरसोय आणि केविलवाणी स्थिति विनाकारण करून घेतली.

पण गांवांत बातमी पसरली कीं, म्हाताऱ्या-कोताऱ्यांनाहि अंतुकाकांच्या येथें कामास राहण्याची आतां सोय राहिली नव्हती; आणि याच त्यांच्या गवगव्यांत भर पडेल असें दुसरें एक पाप त्यांच्या हातून घडलें खरें.

तसेंच पाहिलें तर, अंतुकाका आज दहा वर्षें स्कूल-कमिटीचे चेअरमन होते. मुलींच्या शाळेची तपासणी करण्यासाठीं मधूनमधून ते जातहि खरे. पण आतांशा, त्यांच्या मुलींच्या शाळेंत वरचेवर येरझारा चाललेल्या असतात, अशी भूमका गांवांत उठली. मुख्य ट्रेन्ड मास्तरीणबाई कुमारी हरणाबाई (तूर्त खोल पाण्यांत न शिरतां त्यांचें सरकार-दप्तरीं जें नांव लागलें होतें तेंच घेऊं) यांची शाळेंत जाण्यायेण्याची वाट अंतुकाकांच्या घरावरून होती. धिक्कार असो, त्यांच्या त्या रोजच्या जाण्यायेण्याला, अंतुकाकांच्या त्या न्याहाळून रोज पाहण्याला आणि बेफाम वासनेला! थेंब थेंब पडणारें पाणी कातळांतून पाट खणीत जातें, तर हरणाबाईच्या झकपक जाण्यायेण्यानें अंतुकाकांच्या कलेजाचे तुकडे तुकडे झाले नसल्यास नवल. याच सुमारास मामलेदार कचेरींतील एका पट्टेवाल्याची बदली होऊन, नवीन एक पट्टेवाला हणमंतराव काळे या नांवाचा आला होता. तो अंतुकाकांच्या आळीलाच राहात असे. त्याची आणि हरणाबाईची पहिल्या दिवशींच कांहीं बोलाचाली झाली होती. हरणाबाईनीं अंतुकाकांच्या घरावरून जाण्याचें बंद केलें. याहि गोष्टीचा कार्यकारणसंबंध आम्हीं त्यांच्या लोचटपणाशीं नेऊन चिकटविला. खरें कारण उजेडांत येऊन, अंतुकाकांची बदनामी नाहींशी होईल तो सुदिन! एवढें मात्र खरें कीं, बाईचें येणें-जाणें बंद होतांच, त्यापासून धडा घेण्याच्याऐवजीं अंतुकाका अधिकच अधीर झाले. एक दिवस शाळेची तपासणी करण्यासाठीं ते शाळा सुटण्याच्या वेळीं गेले. त्यांना पाहतांच हरणाबाईनीं परगांवीं जाण्याच्या निमित्तानें दोन महिन्यांची रजा मागितली. अंतुकाकांनीं पुढें पाहूं म्हणून म्हटलें. शाळा सुटली आणि हरणाबाई घरीं जाण्यास निघाल्या, तेव्हां अंतुकाकांनीं एका कागदाच्या चिठोऱ्यावर कांहींसें लिहिलें व तें हरणाबाईच्या जवळ दिलें आणि ते निघून गेले. बाईनीं रजेचा अर्ज, त्यासोबत तें अंतुकाकांचें पत्र अशीं दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रवाना केलीं. परिणाम असा झाला कीं, बाईची बदली दुसऱ्या गांवीं झाली आणि अंतुकाकांची चेअरमनच्या जागेवरून हकालपट्टी झाली. हरणाबाईना अंतुकाकांनीं

अगदीं संभावित शब्दांत लग्नाची प्रामाणिक मागणी घातली होती. हा त्यांचा सुरुवातीपासून लग्नाचा हट्ट पाहून कुमारी हरणाबाईंना चीड येणें साहजिकच होतें. सनातनी वातावरणांत आणि धोपट परंपरेंत वाढलेल्या धर्मवीर (पंचवटी विद्यापीठ) अंतुकाकांच्या हातून आधुनिक प्रेमशास्त्रांतील एका मूलभूत सिद्धान्ताचें अक्षम्य उल्लंघन झालें होतें, कीं ज्याबद्दल हरणाबाई-सारख्या विदुषीनें त्यांची गय करणें शक्य नव्हतें. लग्नाची याचना ही अगदीं शेवटीं आणि पदर पसरून, ओक्साबोक्शीं रडून, धाय मोकलणाऱ्या कुमारिकेनें करावयाची असते आणि पुरुषानें विश्वामित्र बनून कानांवर हात ठेवून निघून जायचें असतें. हाच तो आधुनिक अचूक सिद्धान्त. या प्रसंगाची विस्मयकारक उकल हळुवार हातांनीं (कंकणांच्या अभावीं आम्हांला जसें साधेल तशा हातांनीं) करवून आम्ही या सविस्तर हकिकतीची सुदीर्घ विस्मयकारक अखेरी साधणार आहोंत. पण तोंवर तरी अंतुकाकांच्या अब्रूच्या चिंधड्या ह्या होत राहणारच, राहिल्याहि खऱ्या.

अंतुकाकांच्या हातून गफलत झाली कीं, हरणाबाईंच्या हातून चूक झाली, याचा निर्णय दोनशें वर्षांनीं जन्माला येणारा बुद्धिमान त्रिकालज्ञ इतिहासकार अगर कधींच न जन्माला येणारा त्यांचा चरित्रकार, हाच तुम्हांआम्हां समकाली-नांच्यापेक्षां जास्त अधिकारवाणीनें देऊं शकेल, इतरांना पटवूं शकेल; पण येवढें मात्र खरें कीं, त्यांच्या व्यवहारशून्य वागणुकीच्या या शेवटच्या काडीनें अगोदरच मेटाकुटीस आलेला त्यांच्या अब्रूचा उंट लोकनिंदेच्या डोहांत सपशेल बुडून गेला. या ठळक गाफिलपणाशिवाय त्यांच्या हातून कोणताहि प्रमाद घडलेला नव्हता. तरी त्यांच्याबद्दल गांवांत भयंकर खळबळ उडून गेली. त्यांच्या घरावरूनचा रस्ता बायकांनीं एकदम वर्ज्य केला. त्यांना रस्त्यानें जातांना पाहतांच घरांचे पुढचे दरवाजे बंद करून पोरीसोरी धूम ठोकून माजघरांत लपून बसूं लागल्या व त्या मुलींचे जाणते भाऊ मुठी वळून अंतुकाकांना पाठीमागून वेडावून दाखवीत. घरोघर अंतुकाकांच्या अर्धवटपणाशिवाय दुसरा चेष्टेचा विषय राहिला नव्हता. अगदीं तान्ह्या मुलीपासून तों म्हाताऱ्या भिकारणीपर्यंतच्या सर्व अनाथ स्त्रियांशीं घरोघर अंतुकाकांचीं चेष्टेंतलीं लग्नें लागूं लागलीं. मुलींच्या रुसण्यांनीं आणि वडिलांच्या शिसारींनीं त्या लग्नांचे काडीमोड तडकाफडकी होऊं लागले; आणि 'इश्श, भारीच

मेला चळला आहे !' अशा शेलक्या शब्दांनीं गृहलक्ष्मींकडून त्यांची संभावना होऊं लागली. ते देवळांत जात, तर म्हाताऱ्याकोताऱ्या बायकासुद्धां सभामंडपाच्या खांबाआड लपून उभ्या रहात. सर्व विवाहित पुरुष हातांत लाठ्या घेऊन फिरूं लागले. घरांतून बाहेर पडतांना घरांस बाहेरून कुलुपें लावून जाऊं लागले.

या धामधुमीची गंधवार्ताहि अंतुकाकांच्या गांवीं नव्हती. ते आपल्या क्षणभंगुर विधुरावस्थेच्या आठवणी आणि आख्यायिका लिहून काढीत होते. तेवढ्यासाठीं त्यांनीं डोक्याला आठ्या घालून, डोळे ताणून, ओठ पसरून, आकाशाकडे पहात असलेला विधुरावस्थेंतील म्हणून एक फोटोहि मुद्दाम काढून घेतला होता. त्यांनीं घरांत जिकडे तिकडे 'गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते' ( सुवासिनीशिवायचें घर– निबिड अरण्यच तें ) अशा वचनाच्या पाट्या लाविल्या. त्याचा परिणाम असा झाला कीं, शहरचे कंटाळलेले भटके जंगलसफरीच्या थारेपालटासाठीं अंतुकाकांच्या उदास घरांत धुडगूस घालूं लागले. अंतुकाकांवर ओढवणाऱ्या आपत्ति, त्यांच्यासंबंधानें फैलावणाऱ्या कंड्या पाहून मी हवालदिल झालों. अंतुकाकांना समजुतीच्या गोष्टी सांगाव्यात म्हणून म्हणालों–

" अंतोबा ! वैयक्तिक दुःखांचा नेहमीं आपण व्यापक दृष्टीनें विचार करायला नको का ? व्यष्टी आणि समष्टी यांचे परस्पर संबंध साधणें हीच नीति, धर्मशास्त्र–" ( कुठलेंसें छापलेलें वाक्य मी पाठ म्हणत होतों. )

" अगदीं बरोबर बोललास." हातांतील नुकतीच पेटविलेली सिगारेट ( अलीकडे विड्याऐवजीं सिगारेटची तैनात सुरू होती ) मनोनिग्रहानें आणि कार्याच्या तडफीनें फेकून देऊन, ते जागेवरून उठले, आणि नेपोलियनच्या पवित्र्यांत उभे राहून, पुढें म्हणाले, " तूं म्हणालास तें अगदीं खरं. एकंदर विधुरांचा, त्यांच्या गतआयुष्याचा, हलाखीचा आणि भविष्यकालीन नैराश्याचा साकल्यानें विचार होऊन, एक आंतरराष्ट्रीय विधायक घटना घडविण्यासाठीं मीं आपल्या गांवीं तूर्त आपल्या देशांतील विधुरांचेंच संमेलन भरविण्याचें ठरविलें आहे.

अंतुकाकांच्या उद्गारांची वीज माझ्या डोक्यावर पडतांच, माझी कंबर खचली. कपाळाला हात लावून मी मटकन् खालीं बसलों, तक्क्यावर कपाळ टेकून हुशहुश करीत जीव पाखडीत पडलों. हें पाहून तें पुढें म्हणाले–

" अरे, तूं एवढा घाबरलास कशाला ? स्पेशल कॉंग्रेस ज्यानें आपल्या जिल्ह्यांत भरविली, त्या या अंतुकाकाला विधुरांचें संमेलन भरविणें काय मोठें कठीण आहे ? "

माझी भीति केवळ संकोचामुळें मला त्यांच्यापुढें मांडतां येईना. पण मनांत आलें कीं, एकटे ओळखीचे, सालस, समजुतदार, संभावित, निशा-पाणी न करणारे, विधुर अंतुकाका, त्यांनीं जर गांवांत एवढा अनर्थ माजविला आहे, तर–खरोखर संमेलनाच्या निमित्तानें महाराष्ट्रांतील विधुरांची टोळधाड जर येथें जमली, तर आम्हां गांवकऱ्यांची धडगत कशी लागणार ? मीं अगदीं रडक्या आवाजांत, केविलवाण्या मुद्रेनें, खरेखुरे अश्रु डोळ्यांत आणून, तो भयंकर विचार रहित करण्याविषयीं अनेक अवांतर कारणें देऊन, त्यांची काकुळती चालविली; पण व्यर्थ. माझें म्हणणें ऐकण्याच्या आड त्यांचें व्यसन आलें. सभासंमेलनें भरविणें हेंच अंतुकाकांचें खरें जबरदस्त व्यसन. सध्यां अनंत प्रकारचीं व्यसनें आम्हीं गांवकऱ्यांनीं त्यांच्या अंगीं चिकटविलीं होतीं, ती गोष्ट निराळी ! सुधाकराचें दारूचें व्यसन स्वर्गातील अमृतामुळें सुटलें असेल, तुकारामाचें भजनाचें व्यसन विमान आल्यानें सुटलें असेल, फार काय पण बेकारांच्या प्रेतांच्या राशी पाहून पांढर-पेशा लोकांचें इंग्रजी शिकण्याचेंहि व्यसन कालांतरानें सुटेल पण अंतुकाकांचें सभासंमेलन-व्यसन सुटणें शक्य नव्हतें. मी त्यांच्याशीं हुजत घालीत होतों इतक्यांत, पत्रविक्याच्या आरोळीनें आमचा वाद एकदम थांबविला— 'सकाळ–विधुरांचें संमेलन, चिटणीस, देशभक्त, धर्मवीर अंतुकाका.'

आकाशवाणीच ती ! मला तर आकाशाची कुऱ्हाडच डोक्यांत पडलीशी वाटली. मी गप्प झालों. ते सकाळ वाचण्यांत गुंतले, असें पाहून पराजयानें म्लान झालेलें आणि भावी संकटांनीं काळवंडलेलें तोंड, रस्त्यानें लपवीत कसा तरी मी घरीं पोंचलों.

## ( २ ) साधनांची जुळवाजुळव

अंतुकाकांनीं संमेलन भरविण्याच्या कल्पनेची मुहूर्तमेढ स्वतःच्या डोक्यांत रोवल्यापासून त्यांचें कर्तबगारी मन जुळवाजुळव करण्याच्या नादीं लागलें. आमच्या गांवच्या इंग्रजी शाळेंतला नाना तालीम मास्तर हाहि विधुरच होता. पहिला गळ अंतुकाकांनीं चुकून या चुकार विधुराभोंवतीं व्यर्थ टाकला. खुद्द नाना तालीम मास्तराच्या तक्रारी वाजवी आणि त्याच्या शंका न उकलणाऱ्या होत्या, आणि अंतुकाकांना शेवटीं त्याच्यापुढें हात टेकावे लागले. आईबापांनीं आपलें लग्न केलेंच कशाला ! आपण मूर्खासारखे लग्नाला तयार झालोंच कसें आणि लग्नानंतर आपल्याला दहा मुलें झालींच कां ! आणि बायकोसकट दहाहि मुलें मेलींच कां ? या प्रश्नांच्या सरबत्तीनें तो इतरांशींच काय पण स्वतःशीं आजमितीसहि हुज्जत घालीत असतो. ज्याचें खरोखर लग्नच व्हावयास नको होतें, तशांत ज्याची दहा मुलें आणि भार्या अशा अकराजणांचा संहार ज्यानें डोळ्यांनीं पाहिला त्या नाना तालीम मास्तराला विधुरावस्थेचें दुःख त्यानें उपभोगलेल्या संसारसुखाच्या पुढें कांहींच नव्हतें. निष्काळजी, सुखाची विधुरावस्था टाकून देऊन पुनः तो संसारसुखाच्या आगींत उडी घेईल हें शक्य नव्हतें. अंतुकाकांनीं त्याला दुसऱ्या लग्नाचें मधाचें बोट लावून पाहिलें. पगारांत दोन रुपये बढती मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. पुढील वेताचें दूध खाण्यासाठीं स्वतःची भाकड झालेली एक म्हातारी म्हैस तावडतोब देण्याची लालूच दाखविली, परंतु तो आपला नन्नाचा हेका कांहीं घेतल्या सोडीना. शेवटीं मंडपांत बंदोबस्त राखण्यासाठीं पैद्या-सुदाम्यांची तुकडी घेऊन येण्याच्या लालचीनें नाना तालीम मास्तरानें संमेलनांत सामील होण्याचें कबूल केलें. मात्र अंतुकाकांच्या जाळ्यांत यानंतर भराभर इतर विधुर सांपडले. साखळचंद मारवाड्याची सहावी बायको नुकतीच देशावर बाळंतपणांत वारल्याचें वर्तमान आलें होतें. शेठजींचीं वरचेवर होणारीं लग्नें व वाढणारा व रोडावणारा संसार यांबद्दल देशांतून येणाऱ्या पत्रावरूनच आम्हांला समजत असत. मारवाडी शेठजी अगदीं ओले विधुर होते. त्यांच्या तीन शेंड्या अजून सुतकाच्या आंघोळीनें भिजलेल्या तशाच होत्या, आणि बायकोसाठीं दहा हजारांची भरलेली रक्कम बुडाल्याचेंच त्यांना विशेष दुःख होऊन त्यांचे

डोळे अश्रूंनीं ओलेचिंब होत होते. विधुरावस्थेच्या वैतागाऐवजीं दिवाळें निघालेल्या सट्टेबाजाच्या धक्क्यानें ते खंगले होते. त्यांनीं पहिल्याच बैठकीला 'सीधीसीधी' बात केली. लग्नाला दहापंधरा हजार भरायचे, त्याऐवजीं दोनचारशें संमेलनाला भरून 'कन्या' जर मिळत असली तर आनंदानें आपण रक्कम देऊं, असें त्यांनीं आश्वासन देऊन टाकलें. त्याच बैठकीला अंतुकाका त्याला जळवेप्रमाणें असे चिकटले कीं, त्यांनीं एक हजार रुपये देण्याचें व स्वागताध्यक्षपद घेण्याचें कबूल केलें. सावळचंद मारवाडी आमच्या प्रांतांत 'सध्धर आसामी' तेव्हां ते स्वागताध्यक्ष म्हणून येऊन मिळाल्यापासून संमेलनाची आर्थिक बाजू चांगलीच सांवरली गेली. निदान शेठजींच्या इभ्रतीवर वाटेल तेवढी उधारी अंतुकाकांना आणतां आली आणि पै-पैसाहि जवळ नसतांना संमेलनाच्या सामानसुमानाची अगदीं लयलूट करतां आली. याशिवाय गांवांत दोन पेन्शनर विधुर ' म्हातारपणीं सेवाचाकरी करायला कुणी माणूस नाहीं हो ! ' असे दुःखोद्गार काढीत कष्टी आयुष्याचें माप कसें तरी भरीत राहिले होते. मनांतून ते दुसऱ्या लग्नाला तयार होते, पण अंतुकाकांचा आणि त्या दोघां वृद्ध विधुरांचा—अण्णासाहेब व दादासाहेब यांचा दृष्टिकोन अगदीं निराळा होता. अंतुकाकांची संसाराची हौस अजून बाकी होती, तर त्या वृद्ध विधुरांची आतां फक्त सेवाचाकरीबद्दलचीच काळजी शिल्लक राहिली होती. समानशीलतेच्या कोंडींत आणि विधुरावस्थेच्या भकास संकटांत सांपडलेले विधुर पटापट अंतुकाकांना येऊन मिळूं लागले. आणि हांहां म्हणतां स्वागतमंडळांत येवढी भरती झाली कीं, संख्येच्या नियंत्रणासाठीं प्रतिनिधींची संख्या एकदम मर्यादित करावी लागली. मुंबई, कलकत्ता यांसारख्या मोठाल्या शहरांना एक एक स्वतंत्र प्रतिनिधि व इलाख्याला एकेक असे मोजके प्रतिनिधि वाटून द्यावे लागले.

हें प्रतिनिधींच्या संख्येवरचें नियंत्रण एका कारणाकरितां योग्य ठरलें. परगांवांहून आलेले विधुर प्रतिनिधि अंतुकाकांनीं योजून ठेवलेल्या ठरावास संमत होतील अशी खात्री नव्हती. आणि सभेंत बखेडा घालणारे बहुतेक लुडबुडे, साक्षात् अनुभवापासून अलिप्तच असतात हें पाहून, केवळ पीडितांनाच बोलण्याचा, मत देण्याचा, पुढील धोरण ठरविण्याचा अधिकार असावा हें अंतुकाकांचें म्हणणें सर्वांना पटलें. आमच्या गांवांतील विधुर आणि विधवाच

काय, पण संसारी सुखी लोकहि अशा निर्णयावर येऊन ठेपले होते कीं, अंतुकाकांचें कसेंहि करून आतां लग्न व्हावें. तेव्हां पुनर्लग्नाचा ठराव संमेलनांत एकमतानें पसार होणें दुरापास्त नव्हतें.

आमच्या विधुर-संमेलनाचीं प्रसिद्धिपत्रकें जाहीर होऊं लागतांच बुद्धिमान् महाराष्ट्राच्या सुपीक आणि निष्ठुर डोक्यांतून विधायक सूचनांचा नुसता पाऊस पडूं लागला. समाजसेवा, राष्ट्रसेवा, धर्मसेवा, विधुरांनीं करावी असें कोणी म्हणे, तर कोणी विधुरांनीं विनामूल्य म्युनिसिपालिटींतील हलक्यांतल्या हलक्या साफसुफीच्या नोकरीपासून ते संसारी मनुष्याच्या येथें भाजी आणून देणें, त्यांचीं मुलें संभाळणें-शिकवणें या कामापर्यंत अष्टौप्रहर राबावें असें म्हणत. विधुरांच्या पुढें एवढें विस्तृत कार्यक्षेत्र पसरलेलें पाहून, त्यांना स्फुरण चढण्याऐवजीं, पुनर्लग्नाच्या एकच्या एक हितावह मार्गापासून जाणून-बुजून कपटानें त्यांना दूरवर नेणाऱ्या या विधायक योजनांनीं स्वागतमंडळाचें धाबें दणाणलें. संमेलनाचे निरनिराळे विभाग करून त्या त्या विभागाध्यक्षांकडे ह्या योजना सोंपविण्यांत आल्या तरच त्यांची शास्त्रीय रीतीनें सरसहा चांगली कत्तल करतां येईल एवढी एकच आशा होती. या हेतूनें संमेलनाचे निरनिराळे विभाग योजण्यांत आले—(१) पुनर्लग्न (२) पुनर्विवाह (३) सेवाचाकरी (४) जाच-संरक्षक (५) स्वयंपाक (६) विरंगुळा (७) विनोदावितंड (८) सूडपारिपत्य, असे आठ विभाग ठरविले व त्या त्या विभागांच्या कार्यमर्यादा ठरविणारें आणि त्या त्या विषयांवर निबंध मागविणारें जें पत्रक प्रसिद्ध झालें, त्यांतला जरूरीपुरताच उतारा देतों.

(१) **पुनर्लग्न**–विधुरांनींच पुनः लग्नें–[ विधवांशीं पुनर्विवाह नव्हे–] करावींत कीं नाहीं; लग्नें जमवून, जुळवून आणण्याचे उपाय; त्याला प्रोत्साहन व आर्थिक मदत मिळेल अशी सार्वजनिक द्रव्यनिधींतून योजना; लग्नाच्या भरीस न पडतां संसार थाटण्याची इष्टानिष्टता; त्यास उत्तेजन देण्याची शक्यता; अशा चरित्राचें लोकापवादापासून संरक्षण करण्याचे उपाय.

(२) **पुनर्विवाह**–विधवांशीं विधुरांनीं लग्नें लावण्याची इष्टानिष्टता;

कुमारिकांच्या लग्नसंभवावर, घोडकुमारिकांच्या निर्वाणीच्या हक्कावर, त्यामुळें येणारी गदा; विधवांचे नशिबीचे वैधव्ययोग आणि त्यामुळें धोक्यांत येणारें विधुरांचें आयुष्य; विधवांच्या संख्येचा ऱ्हास व त्यामुळें नर्स, मास्तरणी, स्वयंपाकिणी यांची उडणारी टंचाई व ओढवणारी राष्ट्रीय आपत्ति.

**( ३ ) सेवाचाकरी**—नियमित वेळीं सेवाचाकरी, शुश्रूषा, औषधपाण्याची, हातपाय चेपण्याची, तस्त-तांब्या ठेवण्याची सर्व व्यवस्था परिचारिकांच्याकडून विनामूल्य मिळण्याची योजना; ती पुरी पाडण्याची म्युनिसिपालिटीची जबाबदारी.

**( ४ ) जाच-संरक्षक**–घरांत सुनांकडून, शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून, विधुरांवर येणारे खोटे आळ; कुटुंबांत त्यांना सोसावा लागणारा जाच; शिष्ट स्त्रीपुरुषमिश्र समारंभांतून त्यांना वगळण्यांत आल्यानें त्यांच्या मनास होणारें मरणप्राय दुःख; यांपासून संरक्षण कसें करतां येईल; इतरांनीं विधुरांशीं निभावून घेण्याची चालढकलीची वागणूक कोणती ठेवावी याबद्दल कायदे घडविण्याची आवश्यकता आणि ते सरकारनें ताबडतोब अंमलांत आणण्याची इष्टता.

**( ५ ) स्वयंपाक**—दोन्ही वेळचा; शिवाय दोन वेळीं चहा व फराळाचें आपोआप व्हावें अशी योजना; अगर शेजाऱ्यावर तें काम करण्याची सक्ती करणारे कायदे; खाणावळींत विधुरांच्यासाठीं संसारी वातावरण निर्माण होईल अशी जेवणाखाण्याची व हौशी स्त्रियांच्या खास देखरेखीखालीं चालणारी योजना.

**( ६ ) विरंगुळा**—आपापसांत न भांडतां वृद्ध विधुरांचा आनंदानें काळ जाईल अशी योजना; त्यांचे विरहविलाप, देहकष्ट ऐकून घेण्यासाठीं बहिरे, मुके गोळा करून नियमित वेळीं त्यांच्या हवालीं करण्याची योजना; देवळें व शाळा-कॉलेजें यांच्या आसपास सकाळ-संध्याकाळ बसण्यासाठीं मोऱ्याच्या जागा; तेथें पानपट्टी, तंबाखू, विड्या, चहाचिवडा यांची योग्य तरतूद होण्याबद्दलची योजना.

**( ७ ) विनोदवितंड**—थट्टामस्करी अगर विकोपाला जाणारीं पतिपत्नींतील भांडणें यांची शिल्लक राहिलेली खुमखुमी जिरविण्याकरितां जरूर ती योजना; पत्रपांडित्याचा त्या कामीं कितपत उपयोग करतां येईल; विनोदवितंडासाठीं

केलेल्या कोणत्याहि अश्लील भाषणाचा, शिवराळ भांडणाचा, पावित्र्यविडंबनाचा, मराठ्यांना मागमूस न लागेल अशी योजना; कायद्याचें त्याला संरक्षण मिळविण्यासाठीं शक्यता, इष्टता.

(८) **सूड, पारिपत्य**—विधुरावस्थेला कारणीभूत असणाऱ्या मृतपत्नीचें श्राद्धपक्ष, उत्तरक्रिया करावी कीं नाहीं; तिचें छायाचित्र चित्रमयजगत्मधून छापणें योग्य, कीं जाळून टाकणें योग्य; तिच्या दुर्गुणांचीं दुसऱ्याजवळ गाऱ्हाणीं सांगण्याचे शिष्टनीतीची इष्टता; मुलगे, सुना यांना आपल्या पश्चात् कपर्दिकहि न जाऊं देतां त्यांना हळहळत कसें ठेवतां येईल, शेजाऱ्यांना पिढ्यान्‌पिढ्या जाचक होतील अशा कोणत्या गोष्टी करतां येतील; संमिश्र समारंभाचा ऐनवेळीं विरस कसा करतां येईल; बायकांना बरोबर हिंडण्याफिरण्यास नेण्याच्या संतापजनक चालीस आळा कसा घालतां येईल; विधुरांना मुली न देणाऱ्या आईबापांवर अगर त्यांच्याशीं लग्न करण्यास तयार न होणाऱ्या वृद्ध कुमारिकांवर सूड कसा उगवतां येईल; याबद्दलच्या विधायक सूचना.

**टीपः**—विधुरांनीं केलेल्या सूचनांचाच विचार करण्यांत येईल.

## ( ३ ) इतरांची तारांबळ

संमेलनाची अशी घनचक्कर धांदल आमच्या गांवांत माजून राहिली होती, कीं धामधुमीच्या, जाळपोळीच्या, बंडाळीच्या ऐतिहासिक काळांतच आम्ही आहोंत कीं काय अशी धास्ती वाटे. मांडवासाठीं आमचीं जाजमें,चादरी, पासोड्या; झालरीसाठीं जुनीं पागोटीं; खांबाला गुंडाळण्यासाठीं निकामी होऊन धूळखात पडलेले कद, मुकटे; बैठकीसाठीं सतरंज्या-गालीचे; स्टेजसाठीं आमच्या काटांचे सांपळे व फळ्या; उभ्याआडव्या खांबांसाठीं आमच्या छपरांचे मजबूत बसविलेले वासे व आच्छादनासाठीं घरावरचे खास उपटून काढलेले पत्रे यांची जमवाजमव इतक्या सामुदायिक हुल्लडीनें स्वयंसेवकांनीं चालविली होती, कीं भीति आणि आश्चर्य यांचीं ओठांस बसलेलीं कुलुपें काढून आमच्या जिभा कांहीं बोलण्याचा प्रयत्न करणार, त्याच्या अगोदर आम्हांला न विचारतां सर्व जिनसा मांडवावर चढून जाऊन बसल्या. आमचा गांव अक्षरशः उघडा पडला. विधुरांचे उघडे पडलेले संसार थाटावयाला इतरांचीं

घरेंदारें उघडीं पडावींत हा स्वार्थत्याग, अगोदरच रंजीस आलेल्या आम्हां संसारी स्त्री-पुरुषांना जुलुमी आणि भारी स्वरूपाचा वाटत होता. पण केवळ आमच्या चांगुलपणामुळेंच आम्हीं तो सहन केला. इतकेंच नव्हे तर भावी संकटपरंपरेकडे स्वसंरक्षणाच्या आशेनें केंविलवाण्या नजरा लावून बसलों.

संमेलनाच्या अगोदर दोन, संमेलनाचे तीन व आवराआटोपीचे नंतरचे दोन, असे सात दिवस म्हणजे एक आठवडाभर आमच्या गांवांत जाहीर सुट्टी पाडण्याचा आम्हीं ठराव केला. गांवांत हरताळ तर इतका कडक पडला कीं, मुलींच्या शाळा, देवळें, दवाखाने, पाणोठे, पिठाच्या गिरण्या या बंद ठेवण्यांत आल्या, त्यामुळें गांवांत बायकोमाणूस अगदीं औषधालाहि दिसेना. मुलींच्या शाळेला आणि दवाखान्यांना सुट्टी देण्याचें दुसरेंहि कारण झालें. शाळेंतल्या कुमारिका-मास्तरणींनीं आणि दवाखान्यांतल्या विधवा-परिचारिकांनीं हा सबंध आठवडा सिक-रजा मागितली होती आणि नवीन पातळें, पावडरी, चपला, आकडे, साबण, सुवासिक तेलें यांची धुमाकूळ खरेदी चालविली होती.

गांवांतील तरुण पुरुष हातांत लाठया घेऊन फिरूं लागले. लहान मुलगे धुणीं वाळत घालण्याच्या काठया हातांत घेऊन पुढच्या दरवाजांत बसून 'येऊं दे तर थेरड्याला—ठार करून टाकीन ! ताई उगीच भिते,' असे वेडावल्याच्या आवाजांत वीरश्रीचे उद्गार काढूं लागले; तर पोरीसोरींनीं स्वैरसंचार व शेपटावेणी टाकून हातांत व गळ्यांत बांगडया पोतीची लयलूट करून टाकली व हसणें-खिदळणें सोडून माजघरांतल्या माजघरांत नुसत्या खुणाखाणांवर दिवस काढीत त्या राहिल्या. वडीलधाऱ्या मंडळींनीं आपल्या अविवाहित कन्यांना पोस्टांतून येणाऱ्या पत्रांवर स्वतःची सेन्सॉर-शिप बसविली. प्रौढ कुमारिकांनीं उत्तराचे मसुदे कुणीं लिहून तर कुणी मनांत जुळवून ठेवले होते. 'थेरड्या आतां तिरडीशीं लग्न लावण्याची वेळ येऊन ठेपली तुझी. अशा वेळीं तुला नातीप्रमाणें शोभणाऱ्या माझ्याशीं लग्न करण्याची बेशरम कल्पना तुझ्या जुन्या फुटक्या डोक्याच्या मडक्यांत शिरली तरी कशी ! आयाय् ! प्रमिलेचें राज्य जर अजरामर होतें तर कुमारिकेला विधुरानें मागणी घालणें हा गुन्हा ठरवून त्याला स्टोव्हवर जिवंत जाळण्याची शिक्षा ठोठावली असती', वगैरे वगैरे शेलक्या शब्दांचे

झाले जमवून धीट व प्रामाणिक विधुरांच्या कपाळावर मारण्यासाठीं किती तरी कुमारिका सूडाच्या आनंदानें हसत उभ्या होत्या ! पालकांनीं शिवीगाळ, जीव घेण्याची धमकी, गुन्हा करण्याच्या उद्देशानें गृहप्रवेश, चोरी वगैरेंचे फौजदारी फिर्यादींचे मसुदे लिहून तयार ठेवले होते. फक्त त्यांत आरोपींचीं नांवें लिहिण्याचेंच शिल्लक ठेवलें होतें.

एक दिवसाच्या पोरीपासून तों ऐशीं वर्षाच्या म्हातारीपर्यंत सर्वांना स्वसंरक्षणासाठीं हत्यारें देण्याचें ठरतांच, पोक्त बायकांकरितां तरवारी चाळीस, तरुणींच्याकरितां खाटकी सुरे पाऊणशें, आणि लहान मुली आणि म्हाताऱ्यांसाठीं कट्यारी साडेतीनशें इतकीं हत्यारें एका दिवसांत खपलीं. याशिवाय सव्वाशें गुप्त्या, सात-आठशें काबुली चाकू, इतकीं हत्यारें पुरुष मंडळींत खपलीं. रिंगण्याऐवजीं जंबिया चोखतांना दहा अर्भककुमारिकांचे, कडोसरील लावलेल्या कट्यारी केर काढतांना पोटांत खुपसल्या गेल्यामुळें पंचवीस तरुणींचे, चांचपडत जातांना पडल्यामुळें हत्यारांचे हातापायावर घांव झालेल्या त्रेचाळीस म्हाताऱ्यांचे असे अठ्याहत्तर, अपघात नुसत्या संरक्षणात्मक कवाईतींत पहिल्या दिवशीं झाले. त्यावरून सोनपत-पानपतांत किती खुर्दा उडणार या विचारांनीं आम्ही हवालदील झालों. प्रत्यक्ष कानपूरची कत्तल, यशवंतराव होळकरांनीं पुण्याची केलेली लुटालूट, केट्टयाचा भूकंपच काय, पण सोन्या मारुति हुल्लड डोळ्यांपुढें उभी राहिली आणि हवालदिल गांवकऱ्यांनीं जिल्ह्याधिकाऱ्याकडे संरक्षणासाठीं हत्यारबंद पोलीस पार्टी मागविली. अंतुकाका प्रतिनिधींच्या वाढत्या संख्येच्या फुशारक्या मारीत, तसतसें आमचें काळीज खचत जाई. पोलीस पार्टी आली, प्रतिनिधीहि आले, संमेलन दुसऱ्या दिवशीं सुरू होणार म्हणून मंडपाच्या आसपास शंभर कदमांतील संसारी कुटुंबांनीं घरें खालीं केलीं, ज्यांची परगांवीं जाण्याची सोय होती तीं बहुतेक निघून गेलीं.

## ( ४ ) ऐन घनचक्कर

त्यांनीं घरें खालीं केलीं हें एक प्रकारें बरेंच झालें. विधुरसंमेलनाच्या प्रसिद्धि-पत्रकाच्या झोंकावरून विधुरांच्या पुनर्लग्नाचा ठराव बहुमतानें पास करण्याचा कार्यकर्त्यांचा रोख स्पष्ट दिसूं लागल्यापासून प्रतिनिधीशिवाय इतरहि मंडळींच्या झुंडीच्या झुंडी आमच्या गांवीं लोटल्या. प्रांताप्रांतांतून नर्से व मास्तरणींचे

तांडेच्या तांडे मांडवाच्या समोरच्या व आसपासच्या वाड्यांत तळ देऊन बसले होते. त्यांपैकीं कित्येकींनीं तर कुंकवाच्या डब्या, मणिमंगळसूत्रें, हिरव्या बांगड्या बरोबर आणल्या होत्या. पण वास्तविक कोपऱ्यावरच सर्व लग्नसंचाचे एक हजार जोड जय्यत असलेलें एक दुकान नुकतेंच स्थानिक ब्राह्मण-सभेमार्फत उघडण्यांत आलें होतें. अष्टपुत्र्यांची ऐन वेळीं कमतरता पडूं नये म्हणून, मांडवाला पिवळ्या रंगाच्याच चादरी कच्च्या दोऱ्यांनीं बांधून ठेवलेल्या होत्या. हातांत पळीपंचपात्री, अंतरपाटासाठीं शालजोडी व ती धरण्यासाठीं मंगलाष्टक्यांची एक जोडी अशा इतमामांसह सुमारें अडीचशें भिक्षुक जय्यत तयारीनिशी उभा होता. प्रौढविवाह, मिश्रविवाह, पुनर्विवाह, सजातीय, विजातीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अगर कोणत्याहि तऱ्हेचा विवाह चुटकीसरशी लावण्याबद्दल विक्रमकंकण मिळविणारे यशवंतराव पगडीच्या झिरमिळ्या आणि हातांतील पोथी मानेच्या तालावर डौलानें हालवीत उभे होते. फार काय, पण भिन्नधर्मीयांच्या लग्नास विलंब न व्हावा म्हणून, धर्मांतर करून स्त्री-पुरुषांना सामुदायिक विवाहाचा मार्ग मोकळा करून देण्यासाठीं, एक भगवें वस्त्र परिधान केलेले, कुठलेसे शंकराचार्यहि, एका हातांत दंड धारण करून, दुसऱ्या हातानें डोक्यावरच्या छाटीचे कांठ कानापाठीमागें चोपून बसवीत उभे होते आणि उगीच हसून येणाऱ्याजाणाऱ्याला अनाहूत आशीर्वाद आणि पदव्यांची खैरात वांटीत होते. पुनर्विवाह-साहाय्यक मंडळाचे उत्साही चिटणीस, आपल्या मंडळास आणि आपल्यास वगळून उभयतां स्त्री-पुरुषांनीं परस्पर लग्नें जमविण्याची चालविलेली धिटाई आणि जुन्या-नव्या भटभिक्षुकांनीं लग्नें उरकून घेण्याची आरंभलेली घिसाडघाई पाहून हताश व निरुत्साही झाले होते. त्यांनीं रागानें वार्षिक अहवालांच्या हजार प्रतींच्या उभ्या उभ्या चिंध्या केल्या व खुद्द रजिस्टराचेहि तुकडे तुकडे करून टाकले. त्या चिठोऱ्या वाऱ्यानें उडून चिटणिसांच्या वाढत्या क्रोधाग्नीपासून पळून जात होत्या. अभिनंदनीय विवाह व पुनर्विवाह, यांची लांबच लांब नोंद देण्यासाठीं जादा अंक काढावा लागणार आणि तो तडाखेबंद खपणार या आनंदांत ज्ञानप्रकाशचे संपादक दोन्ही हातांनीं लांब्या कोटाचे रिकामे खिसे नखाग्रांनीं खणीत उभे होते. वाजंत्र्यांचे ताफे तोंडापासून दोन बोटांवर सनई धरून व संबळावर अधांतरी काठ्या धरून भिक्षुकांच्या टाळीच्या

आवाजाकडे कान टवकारून उभे होते. मुंडावळी, माळा, गोटे, फुलें यांचीं शितरें भरून माळी तिष्ठत उभे होते, तर तांबोळ्यांनीं आपल्या धंद्यांत क्रांति घडवून आणण्याचें ठरवून, विडा-पानसुपारी, अत्तर, गुलाबपाणी देण्याचे उक्ते मक्तेच घेण्याचा सपाटा चालविला होता. समारंभ दुपारचाच, म्हणून बत्तीवाले बोहरी निराशेनें आणि त्वेषानें स्वतःच्या दाढीचे केस उपटीत मांडवाच्या भोंवतीं पिंगा घालीत होते. तर शोभेच्या दारूचा कारखानदार पिण्याचा दारूच्या मक्तेदाराचा मनापासून हेवा करीत होता. आचारी, पाणक्ये (अर्थात् जे विधुर नव्हते ते) खांद्यांवर सोधनीं टाकून खपाटी पोटांनीं आणि खोल डोळ्यांनीं काम मिळविण्यासाठीं येरझारा घालीत होते. ही सर्व तिऱ्हाइतांची धांदल ज्या घटनेवर अवलंबून होती ती घटना शक्य असूनहि अनिश्चित होती आणि आपली गरज पडेल कीं नाहीं, आपल्याला भाव मिळेल कीं नाहीं, या फिकिरींत सर्व मग्न झाले होते. त्यांच्या सामुदायिक सुस्काऱ्यांची वावटळ उठली, जिकडे तिकडे धूळच धूळ झाली आणि खुद्द मांडवांतहि त्या वेळेला धुमाकूळ रणें माजल्याचें जाहीर करणारीं आर्तस्वरांचीं आगीचीं बिगुलें दूरवर ऐकूं येऊं लागलीं. आपली सर्व तयारी वायां जाणार या विचारांनीं बाहेरील सर्व माणसांचे चेहरे एकदम खरकन उतरले. मात्र परिचारकांनीं ओचे-पदर खोंचून आपापल्या हातपिशव्या चाचपून पाहिल्या. जो समरप्रसंग, जी सुसंधि, जो योग भांडूनहि मिळावयाचा नाहीं तो आपोआप आपल्या एकट्याच्या वांट्यास चालून येत आहे असें वाटून, त्यांना स्फुरण चढलें. हवालदिल मास्तरणींना कोपरखळ्या मारीत, गर्दींतून वाट काढून, सर्व परिचारिका आघाडीवर येऊन पेंच-प्रसंगानें आतुर होऊन उभ्या ठाकल्या.

आंत मांडवांत एकदम दंगल माजण्याचें कारण क्षुल्लकच होतें. आमचे नियोजित अध्यक्ष तोताराम हे व त्यांचे स्नेही प्यारेभाई हे आमच्या संमेलनांत सामील झाले हीच मुळीं तंट्याला सुरुवात झाली. बाकी संमेलन म्हणजे त्यांत भांडणें, रुसवे, पाहिजेतच; म्हणून तर प्रसिद्ध भांडकुदळ तोतारामांना आम्हीं अध्यक्ष निवडले होते. तोताराम यांनीं अध्यक्षपद स्वीकारावें अशी अंतुकाकांची सूचना चालू असतांच, कोपऱ्यांतून अस्ताव्यस्त पोषाख केलेला एक चवताळलेला विधुर ओरडून म्हणाला, " या तोतारामाची बायको

जिवंत आहे. तो विधुर कसा ?" अंतुकाकांचें धैर्य खचलें. पण तोताराम यांनींच प्यारेभाईंना खूण केली. प्यारेभाई तितक्याच आवेशानें ओरडले, 'अध्यक्षांची बायको जिवंत असली तरी यांना ती मेल्यासारखीच आहे. ज्यानें बायकोला टाकली, अगर ज्याला बायकोनें टाकलें, ते दोघेही विधुर– अगदीं शंभर टक्के विधुर ! मी स्वतः अध्यक्षांप्रमाणेंच आणि तशा थाटाचा विधुर आहें.'

सर्व बाजूंनीं आरडाओरडा सुरू झाला. ज्यांना ओरडण्याची शक्ति नव्हती ते थकलेभागलेले विधुर कुतरें केंकाटल्याचे आवाज काढून एकमेकांच्या गळ्यांत पडून रडूं लागले. सभा उधळून जाण्याचा प्रसंग आला. सर्व शांत झालें. पण पाहतात तों तोताराम आणि प्यारेभाई दिसेनात. 'आतां दोन तासांत मी खरा विधुर होऊन येतों', असें एका स्वयंसेवकाला सांगून दोघांनींहि तेथून पोबारा केला. पैकीं प्यारेभाई बायकोचा तपास लागत नाहीं म्हणून हताश होऊन बिनपाण्याच्या विहिरींत पाय सोडून बसले, आणि बायकोचा जीव घेण्यासाठीं धांवून गेलेले तोताराम गाल चोळीत, फिदीफिदी हसत, आगगाडीचा रूळ उशाला घेऊन गाडी येण्याची वाट पाहत पडले.

ऐन वेळीं दुसरा अध्यक्ष नेमणें भाग पडलें. श्रीमंत सरदार सरनौबत दरकदार पेन्शनरश्रेष्ठ बाबासाहेब ढोंगीवाले यांचें नांव सुचवितांच आमचे स्वागताध्यक्ष अकल्पित धैर्य करून ताडकन् उठून बोलूं लागले, 'या दाढीवर आणि फेट्यावर आणि भगव्या रंगावर जाऊं नका. हा पवित्र निखालस विधुर नाहीं. नुसती बायको मेली म्हणून त्याचा संसार थोडाच थांबला आहे ? 'काय हो बाबासाहेब, तुम्ही ती रंगी ठेवली आहे कीं नाहीं ? बोला.' शेठजींना सभेंतील आचाराचें तंत्र माहीत नव्हतें हें एक अरिष्टच होतें. ते त्यांच्याजवळ जाऊन त्यांचें उपरणें धरून 'बोला बोला' म्हणून ओरडूं लागले. बाबासाहेबांनीं उपरणें तसेंच टाकून धूम ठोकली; मांडवाच्या वाशाला, त्यांची दाढी अडकून निसटली. ढोंगीवाले दाढी टाकून दिसेनासे झाले.

शेवटीं सांखळचंद शेठच अध्यक्ष झाले. सभेचें काम सुरू झालें. इतक्यांत पदर बांधून एक विधवा स्त्री धिटाई करून स्वयंसेवकांच्या दाक्षिण्याचा गैर- फायदा घेऊन बिनतिकिटाची आंत शिरली. ती मधें उभी राहून म्हणाली,

'मला उत्तर पाहिजे. न्याय पाहिजे. सरळ जबाब पाहिजे'. लोकांना अर्थ समजेना. सर्वांचे संशयी डोळे आलटून-पालटून अंतुकाका आणि त्या बाई, यांच्याकडे गरगर फिरत होते. अध्यक्षांनीं आपल्या मोडक्या-तोडक्या मराठी भाषेंत विचारलें 'काय पाहिजे बाई ? तुम्हांला काय वाण ! काय रंगढंग पाहिजे ! काय जात पाहिजे असेल ती सांगा ! आमच्या इथें तुम्हांला पाहिजे तो नग नसला तर मागवून देऊं. बाजारांत किंमत असेल ती द्यावी घ्यावी ! कसं पाहिजे तें तर सांगा !'

'बाईचं म्हणणं ऐका.' असा सर्वांनीं एकच गिल्ला चालविला.

'माझं म्हणणं असं कीं, आम्हांला न्याय पाहिजे. विधुरांनीं लग्नं करावींत कां पुनर्विवाह करावेत ! या विषयावर बायकांचं म्हणणं ऐकून घेतलं पाहिजे तुम्हीं पुरुषांनीं ! आम्हांला उत्तर पाहिजे–न्याय पाहिजे.' असें पुनः पुनः ती म्हणतच होती. शेवटीं त्यांना बसण्यास सांगून सभेचें काम पुढें चाललें.

अध्यक्षच नव्हते, तेव्हां त्यांचें कंटाळवाणें भाषणहि नव्हतें म्हणून एकदम विषय-नियामक कमिटीच्या बैठकीस सुरुवात झाली. विषय-नियामक या शब्दावर एकानें अश्लील कोटी केली. लोकांना वाटलें, तोताराम परत आला. 'शेम शेम, बायकामाणसं बसलीं आहेत' असा शुकशुकाट सुरू झाला. त्या बाई आल्यापासून सभागृह बेहोष झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. निःपक्षपातीपणें विचारविनिमय करण्यास सोईचें जावें म्हणून बाईना थोडा वेळ बाहेर जाण्यास सांगण्यांत आलें. विधुरांचीं लग्नें अवश्यमेव व्हावींत, असा पहिलाच ठराव अंतुकाकांनीं दणकेबाज आवाजांत मांडला. त्यांनीं विधुरांचीं दुःखें अशा स्फूर्तिदायक, परिणामकारक, काव्यमय, भेसूर भाषेंत वर्णन केलीं कीं, शेंकडा पन्नास सभासद दुःख सहन न होऊन बेशुद्ध झाले व बाकीचे शोकसागरांत येवढ्या प्राणांतिक गटांगळ्या खाऊं लागले कीं, 'तुळशीपत्र तोंडांत घाला' म्हणून मृत पत्नींचा धांवा करूं लागले. विधुरांनीं लग्नें न करितां जनसेवा करावी असा आग्रह करणारा एकच्या एक आजन्म वृद्ध ब्रह्मचारी तो भीषण देखावा पाहून मनगटें चावून बळेंच रडूं लागला. आपलें लग्न झालें असतें तर लोकांची या निमित्तानें तरी सहानुभूति मिळाली असती, असें त्या समस्तांशीं भांडणाऱ्या करंट्या बाळ-

ब्रह्मचाऱ्यास वाटलेंहि आणि त्याचा दुःखावेग थांबेनाच! वारकरी-टाळकरी विधुरांनीं आपल्या एकताऱ्या तिथल्या तिथें फोडून टाकल्या आणि अंतुकाकांच्या वाढत्या मुलुखमैदानी वक्तृत्वाला प्रोत्साहन देण्याच्या नादांत त्यांच्या चिपळ्यांचा केव्हांच भुगा झाला. येवढा नाना तालीममास्तर, पण त्यालाहि मृतमातेची व तिच्या अभावीं झालेल्या विधुर पित्याची आठवण होऊन तो ओक्साबोक्शीं रडूं लागला. स्वयंसेवक घाबरले, पाण्याच्या बादल्या ओतून बेशुद्धांना भानावर आणणें जरूर झालें. त्यांनीं प्रवेशद्वारावरची अडवणुकीची जागा सोडतांच समोर रस्त्यावर ठाणें देऊन उभ्या राहिलेल्या स्त्रियांचा तांडा एकदम आंत घुसला. त्यांना पाहतांच एकदम सर्व सभागृह शुद्धीवर आलें. एका लोंचटानें अशी उपसूचना मांडली कीं विधुरांनीं लग्नें अवश्य करावींत, मात्र तीं विधवांशींच केलीं पाहिजेत. या उपसूचनेनें अंतुकाका खडबडून उठले. खालीं मान घालून आतांपर्यंत ते लिहून आणलेलें वाचीत होते, तेव्हां त्यांचें लक्ष सभागृहाकडे, त्यांत आपल्या भाषणानें उडवून दिलेल्या कहराकडे व सभासदांच्या झालेल्या प्राणांतिक अवस्थेकडे गेलें नव्हतें. त्यांनीं घोरत पडलेल्या साखळचंद शेठजींना हालवून जागें केलें. तेवढ्या धांदलींत शेठजींचा रुमाल डोक्यावरून खालीं पडला. अध्यक्ष जागेवरून डोळे चोळीत सैरावरा पळूं लागले आणि त्यांच्या कंबरेला मिठी मारून त्यांना जागेवर बसविण्याचा अंतुकाका कसून प्रयत्न करीत होते. शेवटीं स्वयंसेवकानें रुमाल आणून दिला, तेव्हां शेठजी स्वस्थ झाले. ठरावाच्या निषेधार्थ शेठजी पळून जात आहेत ही अंतुकाकांची भीति खोटी ठरली. थोडें स्थिरस्थावर झाल्यावर, अंतुकाका त्यांना ऐन वेळीं सुचणारे विचार मांडूं लागले—

'पुनर्विवाह, आणि त्यांतून तो विधवा बायकांशीं कधींच करूं नका! जिच्या नशिबांतच मुळीं वैधव्ययोग होता म्हणून पहिला नवरा मरतो तर तिच्याशीं लग्न लावून काय मी स्वतःचा बळी देऊं! मी सर्वांचेच बोलतों आहे. शास्त्रांत पुनर्विवाहाचा निषेध आहे. हा धर्मवीर अंतुकाका मरेतोंवर पुनर्विवाहाविरुद्ध लढणार. नाहीं तर मी धर्मवीर कसला! मला शंकराचार्यांनीं ही पदवी दिली आहे, उगीच नाहीं!'

कोपऱ्यांतून आवाज—'पुनर्विवाह कराल तर धर्मभास्कर पदवी आतां त्या गोसावड्याकडून आणून देतों.'

'मला लुंग्या-सुंग्या पदव्या नकोत. माझी पदवी मी सोडणार नाहीं.'

दुसरा आवाज–'अहो, तुम्हाला पदवी देणारेच पुनर्विवाहाला शास्त्रसंमत मानणारे आहेत.'

'माझा प्राण गेला तरी ही उपसूचना पास होऊं देणार नाहीं. मी मरेन, मांडव जाळीन, सर्वांचे मुडदे पाडीन, गांव जाळूनपोळून उध्वस्त करीन, पण असला अनाचार होऊं देणार नाहीं. नाहीं, नाहीं, साफ नाहीं पास होऊं देणार ! मी मरेन, मारीन, मरेन, मरणार !'

अंतुकाकांच्या बुद्धीचा तोल केव्हांच गेला होता. शरीराचाहि जाऊं लागला. ते अक्रोळविक्राळपणें ओरडूं लागले. हातवारे करतांना त्यांच्या डोळ्यांचा चष्मा उडून मांडवाच्या बाहेर जाऊन पडला. मुठी वळून दांतओठ खातांना त्यांची दातांची कवळी उडून पायापाशीं पडली. ती साखळचंद शेठजींनीं लपवून लांबविण्याच्या उद्देशानें चटकन स्वतःच्या तोंडांतली कवळी काढून खिशांत घातली आणि अंतुकाकांची कवळी तोंडांत कोंबली.

अंतुकाकांचा तोल गेला, ते धाडकन खालीं पडणार, इतक्यांत स्वयंसेवकांनीं त्यांना सावरलें. परिचारिकेनें पुढें होऊन आपल्या देखरेखीखालीं त्यांचें प्रेत बाहेर नेलें.

## ( ५ ) समारोप

अंतुकाका अभिनंदनपर टाळ्यांच्या गजरांनीं जागे झाले व उभे राहून बरळत बेहोष नाचूं लागले.

'पुनर्विवाहाची उपसूचना नामंजूर झाली. आमचा मूळचा ठराव पास झाला.' असें मोठमोठ्यांनीं ते ओरडूं लागले.

"हें काय हें वेडयावेडयासारखं डोक्यानं आतां घेतलं आहे !" सौ. नर्मदाबाई कोम अंतुकाका यांनीं हळूच त्यांच्या हाताला धरून आंवळलें व कानांत हळूच म्हटलें, "आपला आतां पुनर्विवाह लागला ना ! त्याची ही समारंभाची सभा आहे. हे लोक पुनर्विवाहाबद्दल आपलें अभिनंदन करीत आहेत."

"आं ! तुम्ही कोण ! नमर्दाबाई– कोण नर्सबाई ! तुम्ही कुंकू केव्हां लावलंत ! तुमचा पुनर्विवाह झाला काय ?"

" कर्म माझं ! डॉक्टर म्हणत होते, चार दिवस दम खा. लग्नाची घाई करूं नका ! मला वाटलें, कीं यांनीं दिलेल्या आणाशपथा खऱ्या असतील ! माझ्याकडून सेवाचाकरी करून घ्यायची होती म्हणून आतांपर्यंत लाडीगुडी चालविली होती. मला का बाकी तें दिसत नव्हतं ! पण म्हटलं शुभस्य शीघ्रं. शुद्धींत असो, गैरशुद्धींत असो होय म्हणताहेत ना ! आपलं उरकून घ्यावं ! " सौ. नर्मदाबाईनीं सूंसूं नाक वर ओढलें.

" छेः ! तुमचा कांहीं तरी गैरसमज झाला आहे. माझी दांताची कवळी कुठं आहे ! आणखी चष्मा ? मला नीट पाहूं दे. चष्मा देता का तेवढा ? "

" आतां कसे आलांत. हा चष्मा. दांत किनाई पुनः दुसरे करायला टाकले पाहिजेत. कुठं हरवले त्या धांदलींत कुणाला ठाऊक ? "

अंतुकाकांनीं चष्मा लावला.

" छट् ! आजारीपणांत माझ्या गैरशुद्धीचा यांनीं गैरफायदा घेतला वाटतं ! "

" कोणी कोणाचा गैरफायदा घेतला, याचा काथ्याकूट करायला तुम्ही आतां तरुण मंडळी का आहांत ? " जागेवर एकटेच शिल्लक राहिलेले समारंभ-अध्यक्ष आतां जागे होऊन बोलले व उत्तराची वाट न पाहतां निघून गेले.

बाहेर ' धिक्कार, हुर्यो ' अशा आरोळ्या मारीत मोठा जमाव तिकडेच येत होता. विधुर-सम्मेलन अपुरेंच पडल्यामुळें आपलें कांहींच काम झालें नाहीं म्हणून खट्टू झालेले प्रतिनिधि अंतुकाकांच्या पुनर्विवाहाची बातमी ऐकून संतापानें बेहोष झाले होते. 'चालता हो अंतुकाका ! धिक्कार धिक्कार हजार वेळां अंतुकाकाचा, त्याच्या मागच्या सात व पुढच्या तेरा पिढ्यांचा धिक्कार.' अशा आरोळ्या मारीत, मुठी वळून दांतओठ खात दरवाजाबाहेर अंतुकाकांची चटणी उडविण्याच्या तयारीनें सर्व प्रतिनिधी जमले होते. काळीं निशाणें दाखविण्यासाठीं कित्येकजणांनीं पायमोजे काढून हातांत उंच धरले होते आणि तोंडानें 'अंतुकाका परत जा' असें ओरडत होते. त्यांच्या पाठोपाठ सर्व गांवहि लोटला होता. पण थोड्याच वेळांत तिशीच्या आंतल्या विधुर

प्रतिनिधींना, साधारण शिकलेल्या लहान वयाच्या कुमारिकांच्या बापांनीं घेरल्यामुळें ते तेथून गुपचूप निघून गेले. पस्तीस ते पंचेचाळीस वयाच्या विधुरांना पदवीधर कुमारिकांनीं आपण होऊन निरुपायानें पत्करलें व तेहि त्या दाखवतील त्या वाटेला त्यांच्या पाठोपाठ निमूटपणें निघून गेले. पंचेचाळीसा-वरच्या विधुरांनीं तिष्ठत उभ्या राहून थकलेल्या विधवांच्या उताऱ्याचा रस्ता धरला. जागेवर एकटाच एक निवारसी उभा राहिलेला नाना तालीम-मास्तर, चिडून जाऊन मांडववारची आलवानाची सुस्वागतम्ची पाटी फाडूं व तुडवूं लागला.

इतक्यांत हरणाबाई धांवत आल्या. त्यांनीं अंतुकाकांचा दंड धरला व त्या त्यांना ओढूं लागतांच नर्मदाबाईनींहि अंतुकाकांना दुसऱ्या बाजूनें ओढण्यास सुरुवात केली.

" अरे मला सोडा ! का दोघी मिळून मला जिवंत राहूं देतां कीं नाहीं ?" अंतुकाका काकुळतीस येऊन म्हणाले.

" मी बरी सोडीन ! चांगली मी लग्नाची आहें! सगळं जग साक्ष देईल." सौ. नर्मदाबाई आवेशानें म्हणाल्या.

" पण मला यांनीं सहा महिन्यांपूर्वीं मागणी घातली होती, बरं का ! माझा हक्क तुमच्या अगोदरचा आहे." हरणाबाई म्हणाल्या.

" म्हणजे ? तुमची त्यांची एवढी का जुनी ओळख आहे ? मग मेल्यांनो, माझ्याशीं पुनर्विवाह तरी कशाला केलांत ! आणि त्या आणाशपथा सगळ्या खोट्याच तर !" सौ. नर्मदाबाई रडक्या आवाजांत उद्गारल्या.

"ओळख तशी म्हटली तर दोनतीन वर्षांपासून आहे, पण यांची बायको जिवंत होती, अन् त्यांनीं मागणी घातली तेव्हां माझे ते जिवंत होते, म्हणून मीं नाहीं म्हटलं. ते पंधरा दिवसांपूर्वीं इथंच वारले, मला कळल्या-बरोबर मी धांवत आलें." हरणाबाई अंतुकाकास सोडीनात.

" अरे कर्मा ! घात झाला ! अगदीं केसांनीं कीं हो गळा कापलांत ! पदोपदीं खोटेपणा करतां याचा जाब यमलोकांत द्यावा लागेल, नाहीं असं नका समजूं ! जर असले नाद पहिल्यापासून होते तर मला पुनर्विवाहाची मागणी तरी कशाला घातलीत ! देवा, आतां मी काय करूं रे ! परत जाईन म्हटलं तर मीं नोकरीचा राजीनामासुद्धां दिला कीं ! ' हौसेनं केला वर, रात्रीं

खोकला दिवसा ज्वर' अशीच गत देवा केलीस कीं रे!" डोळ्याला पदर, हुंदके, आवंढा गिळणें वगैरे आविर्भावांसह नर्मदाबाई उद्गारल्या.

"अरे हें काय! आहे तरी काय? मी चांगला जिवंत असतांना ही रडारड सुखासुखी कां? हं हरणाबाई, मीं तुम्हांला मागणी घातली ती तुम्हीं नाकारलीत. लग्नहि नंतर केलंत. त्यानंतर तुम्हांला वैधव्य आलं. तरी माझी पूर्वीची मागणी कायम आहे असं समजलांत वाटतं! आणखी (नर्मदाबाईस उद्देशून) तुम्ही तरी पोरीसोरीसारखं काय हें मांडलं आहेत?" अंतुकाका थोडासा तोल सांवरीत म्हणाले.

"मागणी घातली तेव्हां माझे जर यजमान जिवंत होते तर मी मागणी कशी स्वीकारूं?"

"तुमचे यजमान जिवंत होते! तुम्ही कुमारिका नव्हता कीं काय!"

"छेः! मला टाकलेली होती. मामलेदार कचेरींतले ते पट्टेवाले नाहीं का वारले—"

"कोण--हणमंतराव काळे?"

"होय."

"बरं मग?"

"त्यांची मी ही!"

"म्हणजे! तुम्ही मराठा कीं काय! चांगलं! खासं! इकडे आड आणि इकडे विहीर! हा पुनर्विवाह गळ्यांत पडलाच आहे. तुमच्याशीं लग्न करून मिश्रपुनर्विवाहाचें पुण्य लाभेल. माझे सात पूर्वज उद्धरून जातील! चांगलं! वा!" अंतुकाका लटलट कांपत होते "असं बघा! कुणी तरी एकीनं आतां माघार घेतली पाहिजे; नाहीं तर दोघींनीं तरी जमवून सलोख्यानं तरी घेतलं पाहिजे. त्यालाहि माझी ना नाहीं!"

"म्हणजे?" सौ. नर्मदाबाईनीं डोळे वटारून विचारलें.

"म्हणजे कसं?" हरणाबाईनीं पडती खाल्ली.

"दुसरं काय! कुणी तरी एकीनें माझी बायको म्हणून राहावं—पाहिजे तर दोघींनींहि राहावं. आम्हांला कबूल आहे." अंतुकाका म्हणाले.

"कबूल." हरणाबाईनीं पडत्या फळाचा कौल मागितला.

" तर-तर ! कबूल नसायला काय झालं ? पण मी खबरदार आहें ना ? त्यांतून मी दवाखान्यांतल्या नोकरीचा राजीनामा दिला नसता तर गोष्ट निराळी होती."

नाना तालीममास्तर त्या संवादाकडे टक लावून व कान टवकारून लक्ष देऊन उभा होता. अंतुकाका तोंड चुकवून निघून गेले. पाठोपाठ सौ. नर्मदाबाई गेल्या, फार काय पण ओळखीच्या हरणाबाईसुद्धां त्यांच्याकडे ढुंकूनहि न पाहतां निघून गेल्या.

नानाला वाटलें होतें, निदान हरणाबाई तरी 'काय नानामास्तर ठीक आहे ना ?' असा नेहमींचा प्रश्न विचारील, आणि आपल्या मनांत जुळवलेलें चकित करणारें उत्तर तिला ऐकवूं. पण तो सर्वच डाव हुकला.

निराश नाना तालीममास्तर 'जय बजरंग बली की जय' अशी डरकाळी फोडून भकास भासणाऱ्या मंडपांत जोरजोरानें बैठका मारूं लागला.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अखेरचा न्यायनिर्णय : : ७

"बाबांनो, मी तुमच्या पायां पडतों. मला असं कुत्र्यासारखं फरफटीत नेऊं नका. मी हळूहळू तुमच्यामागून येतोंच आहे ना! माझ्याच्या-नं चालवतं तरी आहे का?" अस्थिचर्मच शिल्लक राहिलीं आहेत अशा एका खंगलेल्या इसमानें, ओढीत नेणाऱ्या दूतांना काकुळतीनें म्हटलें.

"न चालायला काय झालं आहे? हरामखोर. ढोंग करतोस का? पाय उचलतोस का हाणूं आसूड?" दूतांनीं दरडावून त्या दीनदुबळ्यास विचारलें. आणि दरडावणीच्या भीतीनें त्यानें अंग चोरून घेतल्यामुळें तो जास्तच क्षीण दिसूं लागला.

"काय सांगूं तुम्हांला! गेलीं दहा वर्षं निरनिराळ्या रोगांनीं मी झिजत पडलों होतों. औषधपाण्यांत पाण्यासारखा पैसा खर्च झाला. माझ्या डोळ्यां-देखत चार मुलं आणखीन् माझी बायको अन्नावांचून तडफडून मेलीं. शरीरा-नं खंगलों, मनानं दुबळा झालों; तेव्हां तुम्हीच सांगा माझ्या अंगांत कुठून त्राण राहणार! आयाई, नका हो असा मला ओढूं. मेलों मेलों. मी चालतों, धांवतों; पण मला नका हो असे फटके मारूं." एकीकडे कळवळून रडत, दुसरीकडे माराच्या भीतीनें दूतांकडे पाहत तो पाठमोरा चालत होता.

"अस्सा! उचल पाय. नाहीं तर हाणलाच फटका म्हणून समज." अशा दरडावण्या दूत दाखवीत असतां जिवाच्या अदावतीवर तो इसम एकदांचा एका भव्य दालनांत येऊन दाखल झाला.

तेथील ऐश्वर्य पाहून तो दचकला, तेथील दरारा पाहून तो दुःख विसरला, आणि तेथील गर्दी पाहून तो वरमला. एका अवाढव्य दालनांत मध्यभागीं रत्नजडित उच्च सिंहासनावर एक धष्टपुष्ट पुरुष विराजमान झालेला दिसत होता. त्या पुरुषाचा चेहरा उग्र, त्रासिक, गंभीर आणि निर्बुद्ध असा पाहून कोणीहि हा न्यायाधीश असावा असेंच म्हटलें असतें. भावनेचा सोज्ज्वळपणा अगर दयेचें मार्दव हीं नुसतीं चेहऱ्यावरहि नव्हतीं तर मग हृदयांत तीं कोठून असणार ? तो कामाला त्रासलेला दिसत होता, पण त्या हुद्द्याच्या लठ्ठ वेतनामुळेंच नाइलाजानें तो न्यायासनाला चिकटून राहिला होता. जवळच उजव्या हाताशीं एक साधारण पोषाख केलेला पण टाप-टिपीनें राहणारा पुरुष लिहिण्याचें सामान घेऊन बसला होता. तेथें शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठीं दूतांची रांग लागलेली होती. त्यांचे अक्राळ-विक्राळ चेहरे, धिप्पाड शरीरें आणि हातांत धारण केलेले तळपणारे त्रिशूळ, हीं पाहून शिस्तीचा उपमर्द करण्याचें कोणाच्या मनांत—स्वप्नांतहि आलें नसतें. दिवाणखान्याचें दालन जेवढें विस्तारानें अफाट तितकेंच तें उंचीला उंच होतें. पण येवढ्या अवाढव्य दालनाच्या मानानें त्यांत उजेड बेताचाच होता. न्यायदान, मग पृथ्वीवर असो, स्वर्गांत असो, कीं पाताळांत असो, हें अंधारांतच गुप्तदानासारखें, न्यायाधीशांनीं आशेस आलेल्या पक्षकारांच्या पदरांत टाकावें असा तर कांहीं संकेत ठरलेला नसेल ना ! नाहीं तर जन्मजन्मांतरीच्या पापपुण्याची जेथें झडती व्हावयाची आणि योग्य तो अखेरचा न्याय मिळावयाचा अशा या दरबारांत उजेडाची कम-तरता असण्याचें कारण नव्हतें. तो क्षीण इसम आंत आला, सभोंवार पाहूं लागला, तर त्याला स्वतःप्रमाणें अनेक कैदी त्या न्यायाच्या दरबारांत उभे असलेले दिसले. न्यायाधीशाचें मन दयाळू आहे कीं नाहीं हें जाणण्याच्या उद्देशानें तो इतरांना होणाऱ्या शिक्षेकडे लक्ष देऊन उभा होता. एका करारी, गंभीर आणि धीरोदात्त पुरुषाला दूतांनीं पुढें लोटलें. त्यासरशीं डाव्या हाताकडचा पुरुष म्हणाला—

“स्वामिन्! याचें खातेंपान तेरालक्ष पंधराहजार दोनशें बेचाळीस आहे. याला हा मनुष्यदेह गेले बेचाळीस जन्म एकसारखा लाभला आहे. गेल्या

जन्मांत यानं लोकसेवेंत सर्व आयुष्य खर्च केलं, लोकांच्या हितार्थ एकंदर तेवीस वर्षं कारागृहांत काढलीं. शेवटीं राजानं त्याला हालहाल करून ठार मारलं. तेव्हां त्याचे पुण्याचे गुण ऱ्याण्णव झाले आहेत."

"पापाचे गुण किती उरले?"

"पाप यानें मुळींच केलें नाहीं. वर्तन अत्यंत शुचिर्भूत होतें."

"काय! यानें पाप केलें नाहीं म्हणतां! राजानें याला जो तुरुंगांत टाकला होता, तो बंडाबद्दलच असेल ना?"

"यानें बंड केलं नाहीं. जुलमी राजाच्या त्रासांतून प्रजेची सुटका करण्यासाठीं यानें चळवळ चालविली होती. यानें हत्यारें जमवून बंड वगैरे कांहींच केलें नव्हतें."

"चित्रगुप्त! तुम्ही कामं बरोबर वाचून येत नाहीं. तुमची कामगिरी काढून घ्यावी लागेल. राजा हा विष्णूचा अंश—नव्हे अवतार आहे. त्याच्याविरुद्ध प्रजेला चिथावणी देणारा हा शतशः अपराधी आहे. याचे पुण्याचे गुण ऱ्याण्णव धरलेत का? पापाचे गुण शहाण्णव नांवें घाला."

"मग याला पापाची रक्कम फेडण्यासाठीं पुनः जन्माला घालावं लागेल?"

"हो! याला राजाच्या खुषमस्कऱ्याच्या जन्मास घाला. गेल्या जन्मीं यानें राजाविरुद्ध कायावाचामनें असंतोष फैलावण्याची खटपट केली तेवढीच राजाची स्तुति त्याच्याकडून झाली तर त्याच्या पापाचें क्षालन होईल. याचें पूर्वीच्या जन्मांतलें पातक शिल्लक आहे का नाहीं?"

"गेल्या जन्माच्या शेवटीं त्याला पुण्याचे गुण पन्नास होते. म्हणून तो लोकनायक व्हावा असा वर येथून दिला होता. आणखी पन्नास जर गुण असते तर तो अवतारच झाला असता."

"यानें जो या जन्माचा दुरुपयोग केला आहे, त्यावरून याला यापेक्षांहि कडक शिक्षा व्हावयास पाहिजे होती. काय रे तुला कांहीं सांगायचं आहे का?"

"दण्डाच्या भीतीनं माझं मन कधींच कचरलं नाहीं. आणि सत्तेपुढं मीं मान कधींच वांकविली नाहीं. मी यांत भाग घेऊं इच्छीत नाहीं." प्रलयकाळीं न डगमगणारा मेरुपर्वतच जणूं त्याच्या ठिकाणीं उभा राहिला

होता. दूतांनीं त्याला खेचून दुसरीकडे नेलें व त्याच्या पाठोपाठ एका दीन विधवेस पुढें आणून उभें केलें. चित्रगुप्त म्हणाला—

"या बाईनं वैधव्यदुःखांत सतत चोवीस वर्षं काढलीं. निरनिराळ्या हालअपेष्टा सोसल्या. पुण्याचे गुण त्रेचाळीस झाले आहेत."

"हिच्या नवऱ्याचं पातक किती होतं?"

"हिचा नवरा हिच्या वयाच्या आठव्या वर्षीं वारला. नवऱ्याच्या पातकाचे गुण त्या वेळीं ऐशीं होते. त्यानंतर त्याचे दोन जन्म झाले त्यांत त्यानें पापच जास्त केलें. आज मितीस त्याचें पातक एकशेंचोवीस गुण आहे."

"मग हिचा त्याच्या पापपुण्यांत अर्धा वांटा नाहीं का? पाप बासष्ट गुण आलें. पुण्य किती आहे म्हणतां?"

"त्रेचाळीस गुण."

"एकोणीस गुण पाप राहिलं. तिला बायकाच्याच जन्माला घाला. भास्कराचार्य, हिचं लग्न होणारच नाहीं अशा योगावर हिला जन्म आला पाहिजे."

"वृद्धकुमारिका राहिली तर तिच्या हातून पाप होण्याचा संभव विशेष राहील." चित्रगुप्त भीतभीत म्हणाला.

"सडकून पातक झालं तर हिला पशूच्या कोटींत तरी लोटायला बरं."

"यमराज, मी पदर पसरतें; नका हो माझ्यावर येवढें रुष्ट होऊं. योग्यांनाहि जी तपश्चर्या करतां यावयाची नाहीं ती तपश्चर्या मीं केली तिचं हेंच का फळ?" त्या स्त्रीनें केविलवाण्या स्वरांत विचारलें.

"चूप. सावित्रीच्या विनवण्यास मी बळी पडलों, फसलों आणि युगान्युगें माझी नाचक्की चालू आहे. तेंव्हां याउपर स्त्रियांच्या विनंतीकडे मीं मुळींच लक्ष न देण्याचं ठरविलं आहे. येवढं जर तुला दुःख झालं होतं तर सती कां गेली नाहींस! खरोखरच सावित्री जर सत्यवानाबरोबर तात्काळ सती गेली असती तर एक ब्याद सुटली असती!"

"सती जाऊं? हंः! मी आनंदानं गेलें असतें पण सती जाऊं देत नाहींत. कायदे बदलले आहेत. सती जाऊं नये असा निर्बंध आहे."

" हे मानव आमचं धर्मशास्त्र कोण बदलणार! बदला म्हणावं धर्मशास्त्र! पण चित्रगुप्तांच्या वह्यांत तर पापपुण्याचा जमाखर्च लिहिण्याचं आमच्याच हातीं आहे ना! खुशाल तुम्ही धर्मशास्त्र बदलत जा, आम्ही शिक्षा ठोठावतोंच आहोंत. हूं: पुढं."

दूतांनीं बाईला बाजूला सारलें. एका खंगलेल्या माणसास पुढें ढकललें. तो हात जोडून दीनपणें उभा राहिला.

" याचं पूर्वीचं पातक ब्याहत्तर गुण होतं; त्या मानानं अर्धांगवायूसारखा रोग, आप्तेष्टांचे मृत्यु, दारिद्र्य हीं दुःखं आपल्या आज्ञेप्रमाणं त्याला भोगावीं लागलीं. आणखी कांहीं वर्षं तो क्लेश भोगतां तर पाप कमी झालं असतं, पण क्लेशांस भिऊन यानं आत्महत्या केली. तेव्हां मूळचं याचं पातक कमी न होतां तिसांनीं वाढलं व आज त्याच्या खात्यांत ब्याण्णव पाप आहे."

" अरे गुलामा, मीं नेमून दिलेलं दुःख टाळतोस का? आत्महत्या करून तुला काय वाटलं? आपण संकटांतून सुटूं का?"

" यमराज, संकटाला भिऊन मीं आत्महत्या नाहीं केली. पण भुकेनं मी तरफडूं लागलों, वेदना असह्य होऊन मीं तळ्यांत उडी घेतली. मीं महान् दुःखं भोगलीं आहेत."

" भुकेनं तडफडून मेला असतास तर काय बिघडलं असतं! कोणाला केव्हां मारावयाचं हा माझा अखत्यार आहे. तो अधिकार तुम्ही आत्महत्येनं माझ्या हातांतून हिसकावून घेणार का! तुम्ही किती ब्याण्णव म्हणाला होतां का? पांच उद्धटपणाकरितां वाढवा. याला महारोग्याच्या जन्माला घाला. हूं, पुढं."

इतक्यांत दाराशीं झोंबाझोंबी सुरू झाली. एक धष्टपुष्ट, राजबिंडा पुरुष दूतांशीं हिसकाहिसकी करूं लागला व त्यांच्या हातास धक्का देऊन तो पुढें आला. त्यास पाहून यमराजांनीं विचारलें, " चित्रगुप्त, हा दांडगाई करणारा कोण आहे?"

"हो! सांपडलं खातं. राजराजेश्वर करुणसिंह, हे अवंतिकेचे सध्यांचे राजे."

" मग यांना असें तुम्ही काय वागवितां? वा:! विष्णूच्या अवताराची अशीच का तुम्ही मानखंडना करणार? या! असं आपण यावं. इथं आसनावर बसावं. आपला अपमान झाला असेल तर माफ करा."

" मला इथं कशाला बोलावलं ! त्याची जाणीव मी तुमच्या जवळून मागतों."

" चित्रगुप्त ! यांचं खातं सांपडलं ना ? वाचा."

" राजराजेश्वर करुणासिंह यांनीं पातकं खालीलप्रमाणें केलीं आहेत. वीस गुण, वारसदार वडील बंधूचा खून केल्याबद्दल. चाळीस, प्रजेला निरनिराळ्या प्रकारें छळल्याबद्दल. पंधरा, प्रजेचा पैसा परद्वीपांत ऐषारामांत उडविल्याबद्दल. दुसऱ्यांच्या बायका पळवून आणून त्यांपैकीं जनानखान्यांत ठेवल्या त्याबद्दल चार गुण व दोघींचे खून केल्याबद्दल सहा मिळून दहा. मद्य पिण्याच्या व्यसनाबद्दल पांच, द्यूत खेळल्याबद्दल दोन, जुगार व शर्यती खेळल्याबद्दल दोन..."

" सपशेल खोटा जमाखर्च वाचतां कीं हो तुम्ही ! लोकांच्या बायका मी पळवून कशाला आणूं ? त्या होऊन आपखुषीनं माझ्या जनानखान्यांत आल्या. पाहिजे तर त्यांना विचारा. प्रजेला छळण्याची हकीगत सपशेल खोटी आहे. प्रजेचा पैसा दौलतीकडे खर्च झाला. परद्वीपांत राजकारणाकरितां जावं लागतं, राहावं लागतं, हें सर्व दौलतीची इभ्रत वाढविण्याकरतांच आहे. तुम्ही सपशेल खोटं लिहितां. समजलांत."

" काय हो ! यांचे जमेकडे पुण्याचे गुण किती आहेत ?"

" यांच्या खात्यांत पुण्याचे गुण एक हजार आहेत."

" होय ना ! मग यांना एकसारखे दहा सार्वभौमाचे जन्म लाभले पाहिजेत. मृत्युलोकीं कलियुगांत आयुर्मर्यादा फक्त शंभरच आहे. नाहीं तर एक हजार वर्षं एकसारखं आपणांस राज्य करतां आलं असतं. कांहीं हरकत नाहीं. सर्वांच्या चुका आम्हांला सुधारावयाच्या आहेत. तुम्हीं यांना इथें उगीच आणलंत. खरं म्हणजे यांना विष्णुलोकांत घेऊन जायचं."

" काय म्हणालांत ! स्वर्गलोकांत ! तेथील अप्सरा तरी मीं पाहल्या असत्या. पॅरिसच्या युवतींशीं ताडून पाहल्या असत्या. यमराज ! माझी एकच प्रार्थना आहे. ऐषआराम आणि सुंदर तरुणींचा सहवास ह्याच गोष्टी मला प्रिय आहेत. राज्यकारभाराची दगदग मला होत नाहीं. लोकहि फार बदमाष झाले आहेत. राजाला तोंडानं बाप म्हणतात आणि कृतीनं नोकर लेखतात कीं !"

" कदाचित् बाप आणि नोकर हे समानार्थी शब्द लोक वापरीत असतील !" चित्रगुप्त म्हणाला.

" मग, काय म्हणतां ! तुम्हाला राज्यकारभाराची दगदग नको ? स्त्रियांची संगती पाहिजे ? तर यांना धर्मपंथांचे गुरुमहाराज करा. चित्रगुप्त, कितीजण राहिले आहेत अजून ? "

" आज बरेच लोक आहेत."

" कां ! रोगाची एखादी सांथ वगैरे तर शंकरांनीं सोडून नाहीं ना दिली ? त्यांना काय ! मी आहेंच हमाली करायला."

" शंकरांना भांग लागली, तेव्हांपासून ते निपचीत पडून आहेत. दहा वर्षे झालीं. पार्वतीकाकू मोठ्याच फिकिरींत पडल्या आहेत."

" पण कोणी तोतया शंकर तर धुमाकूळ घालीत नाहीं ना ! तसं असेल तर त्यालाच उचला म्हणजे इतरांची गर्दी कमी होईल."

" वैद्यांची संख्या अतोनात वाढली आहे. कलियुगांत लोक रोगांपेक्षां वैद्यांचीं औषधं घेऊनच अधिक मरतात."

" खरं ! मग काय हो, आपल्यावरचा दोष बराच कमी झाला असेल नाहीं ? बरं पुढें—"

" हा एक लहान पोर चार वर्षांचा परत आला आहे. या जन्मांत पातक कांहींच केलं नाहीं. मागल्या जन्मांत पातक केलं त्याबद्दल त्याला अल्पायुष्य लाभलं."

" तुम्ही चुकतांहां ! पुण्य कमी केलं असेल तर अल्पायुष्य आपण देतों. पातक केलं होतं, तेव्हां त्याला मरणाच्या वेदना व्हाव्यात यासाठीं याला अल्पायुष्य दिलं असेल नीट पहा."

" होय, आपण म्हणतां तसंच आहे."

" याचं पातक शिल्लक असेल तर याला मरणाच्या क्लेशांचं दुःख अजून भोगूं द्या. तोंडावरून तो कांहीं वरमल्यासारखा दिसत नाहीं. नाहीं तर असं करा. याला कवीच्या जन्मास घाला. प्रेमांत त्याची निराशा भरून ठेवा. दारिद्र्याचं दुःख आहेच, त्यांतच प्रेमनिराशेचं शुष्ककाष्ठ घा लावून म्हणजे मरणाचे क्लेश भोगण्यानं वरच्यावर त्याला माझ्यासमोर तरी आणावयाला नको. हं: पुढं. "

" हा प्रसिद्ध दरोडेखोर, चाळीस खून यानं केले. तीन हजार लोकांना लुबाडलं."

" पुण्य कांहीं ? "

" दर महिन्यास सत्यनारायणाची पूजा बिनचूक करीत आला आहे. त्याचं पुण्य पापाच्या गुणांपेक्षां थोडंसं जास्तच झालं आहे. हिशेबानं पाहतां त्याला विष्णु-लोकांत जाण्याची परवानगी द्यायला पाहिजे. "

" विष्णु-लोकांत जडजवाहीर मोकळं पसरलेलं असतं. अप्सरा अंगाखांद्यावर दागदागिने घालून मोकळ्या हिंडतात. याच्या मनाची सांस्कृतिक उत्क्रांति झाल्याशिवाय देवांच्या मेळ्यांत सोडला तर तो अनर्थ करील. त्याला वकिलाच्या आणि तेंहि पण एका संभावित फौजदारी वकिलाच्या जन्माला घाला. पूर्वीचा धंदा विसरल्यासारखंहि त्याला वाटणार नाहीं. थोडीशी सुसंस्कृतता त्याला येईल. हं पुढं."

थोड्या वेळानें " काय हो, चित्रगुप्त, या मुसलमानाला इथं कशाला आणलंत ?"

" हा मूळचा हिंदु, आपल्या हुकमतींतला, बडा पातकी म्हणून मांगाच्या जन्माला घातला. तिथंहि त्यानें चोऱ्या माऱ्या केल्या. देवांच्या पवित्र मंदिरांत प्रवेश करून तीं बाटविलीं. शेवटीं मुसलमान झाला. मरतांच दूतांनीं त्याला आणलं इकडं. अल्लाचे दूत भांडत होते कीं, आम्ही हा आदमी ताब्यांत देणार नाहीं म्हणून. पण आणला तसाच त्याला उचलून."

" हा पैगंबराचा मोठाच गुन्हा तुम्हीं केलांत. हा मुसलमान झाल्याबरोबर आपली सत्ता संपली. तो परधर्मीय झाला. त्याचं पातक हिंदुत्वाबरोबरच आपल्याआपण गळून पडलं."

" खाविंद, मेरीबी एज फिर्याद है. हम तो पैगंबरके पास जाकर जरूर फिर्याद करनेवाला है. और आपकोबी जबाब पुछायेंगे."

" हां खानसाहेब ऐसा रागाऊं नका ! पैगंबर हमारे बडे दोस्त आहेत, भाईबंद आहेत. त्यांची दिलसफाई करीन. गैरसमजूतके लिये झालं आहे. तुम समजदार गृहस्थ आहांत, तुमकू तसदी दिली माफ करायचं आं ! चित्रगुप्त, पुष्पक विमान बिघडलं होतं तें चालूं झालं असेल तर त्यांत बसवून यांना पोंचवून द्या."

" आपला रेडा नाहीं तर रिकामाच आहे."

" रेडा परत येईल अशी मला खात्री नाहीं. हा भुकेलेला दिसतो. पुष्पक विमान बरं. रेड्यावांचून माझं अडेल. हूं, पुढं."

" हे मानव आमचं धर्मशास्त्र कोण बदलणार! बदला म्हणावं धर्मशास्त्र! पण चित्रगुप्तांच्या वह्यांत तर पापपुण्याचा जमाखर्च लिहिण्याचं आमच्याच हातीं आहे ना! खुशाल तुम्ही धर्मशास्त्र बदलत जा, आम्ही शिक्षा ठोठावतोंच आहोंत. हूं: पुढं."

दूतांनीं बाईला बाजूला सारलें. एका खंगलेल्या माणसास पुढें ढकललें. तो हात जोडून दीनपणें उभा राहिला.

" याचं पूर्वींचं पातक ञ्याहत्तर गुण होतं; त्या मानानं अर्धांगवायूसारखा रोग, आप्तेष्टांचे मृत्यु, दारिद्र्य हीं दुःखं आपल्या आज्ञेप्रमाणं त्याला भोगावीं लागलीं. आणखी कांहीं वर्षं तो क्लेश भोगतां तर पाप कमी झालं असतं, पण क्लेशांस भिऊन यानं आत्महत्या केली. तेव्हां मूळचं याचं पातक कमी न होतां तिसांनीं वाढलं व आज त्याच्या खात्यांत ञ्याण्णव पाप आहे."

" अरे गुलामा, मीं नेमून दिलेलं दुःख टाळतोस का? आत्महत्या करून तुला काय वाटलं? आपण संकटांतून सुटूं का?"

" यमराज, संकटाला भिऊन मीं आत्महत्या नाहीं केली. पण भुकेनं मी तरफडूं लागलों, वेदना असह्य होऊन मीं तळ्यांत उडी घेतली. मीं महान् दुःखं भोगलीं आहेत."

" भुकेनं तडफडून मेला असतास तर काय बिघडलं असतं! कोणाला केव्हां मारावयाचं हा माझा अखत्यार आहे. तो अधिकार तुम्ही आत्महत्येनं माझ्या हातांतून हिसकावून घेणार का! तुम्ही किती ञ्याण्णव म्हणाला होतां का? पांच उद्धटपणाकरितां वाढवा. याला महारोग्याच्या जन्माला घाला. हूं, पुढं."

इतक्यांत दाराशीं झोंबाझोंबी सुरू झाली. एक धष्टपुष्ट, राजबिंडा पुरुष दूतांशीं हिसकाहिसकी करूं लागला व त्यांच्या हातास धक्का देऊन तो पुढें आला. त्यास पाहून यमराजांनीं विचारलें, " चित्रगुप्त, हा दांडगाई करणारा कोण आहे?"

" हो! सांपडलं खातं. राजराजेश्वर करुणासिंह, हे अवंतिकेचे सध्यांचे राजे."

" मग यांना असें तुम्ही काय वागवितां? वाः! विष्णूच्या अवताराची अशीच का तुम्ही मानखंडना करणार? या! असं आपण यावं. इथं आसनावर बसावं. आपला अपमान झाला असेल तर माफ करा."

" मला इथं कशाला बोलावलं ! त्याचा जाब मी तुमच्या जवळून मागतो."

" चित्रगुप्त ! यांचं खातं सांपडलं ना ? वाचा."

" राजराजेश्वर करुणासिंह यांनीं पातकं खालीलप्रमाणं केलीं आहेत. वीस गुण, वारसदार वडील बंधूचा खून केल्याबद्दल. चाळीस, प्रजेला निरनिराळ्या प्रकारें छळल्याबद्दल. पंधरा, प्रजेचा पैसा परद्वीपांत ऐषारामांत उडविल्याबद्दल. दुसऱ्यांच्या बायका पळवून आणून त्यांपैकीं जनानखान्यांत ठेवल्या त्याबद्दल चार गुण व दोघींचे खून केल्याबद्दल सहा मिळून दहा. मद्य पिण्याच्या व्यसना-बद्दल पांच, द्यूत खेळल्याबद्दल दोन, जुगार व शर्यती खेळल्याबद्दल दोन..."

" सपशेल खोटा जमाखर्च वाचतां कीं हो तुम्ही ! लोकांच्या बायका मी पळवून कशाला आणूं ? त्या होऊन आपखुषीनं माझ्या जनानखान्यांत आल्या. पाहिजे तर त्यांना विचारा. प्रजेला छळण्याची हकीगत सपशेल खोटी आहे. प्रजेचा पैसा दौलतीकडे खर्च झाला. परद्वीपांत राजकारणा-करितां जावं लागतं, राहावं लागतं, हें सर्व दौलतीची इभ्रत वाढविण्याकरतांच आहे. तुम्ही सपशेल खोटं लिहितां. समजलांत."

" काय हो ! यांचे जमेकडे पुण्याचे गुण किती आहेत ?"

" यांच्या खात्यांत पुण्याचे गुण एक हजार आहेत."

" होय ना ! मग यांना एकसारखे दहा सार्वभौमाचे जन्म लाभले पाहिजेत. मृत्युलोकीं कलियुगांत आयुर्मर्यादा फक्त शंभरच आहे. नाहीं तर एक हजार वर्षं एकसारखं आपणांस राज्य करतां आलं असतं. कांहीं हरकत नाहीं. सर्वांच्या चुका आम्हांला सुधारावयाच्या आहेत. तुम्हीं यांना इथें उगीच आणलंत. खरं म्हणजे यांना विष्णुलोकांत घेऊन जायचं."

" काय म्हणालांत ! स्वर्गलोकांत ! तेथील अप्सरा तरी मीं पाहिल्या असत्या. पॅरिसच्या युवतींशीं ताडून पाहिल्या असत्या. यमराज ! माझी एकच प्रार्थना आहे. ऐषाआराम आणि सुंदर तरुणींचा सहवास ह्याच गोष्टी मला प्रिय आहेत. राज्यकारभाराची दगदग मला होत नाहीं. लोकहि फार बदमाष झाले आहेत. राजाला तोंडानं बाप म्हणतात आणि कृतीनं नोकर लेखतात कीं !"

" कदाचित् बाप आणि नोकर हे समानार्थी शब्द लोक वापरीत असतील !" चित्रगुप्त म्हणाला.

" मग, काय म्हणतां ! तुम्हाला राज्यकारभाराची दगदग नको ? स्त्रियांची संगती पाहिजे ? तर यांना धर्मपंथांचे गुरुमहाराज करा. चित्रगुप्त, कितीजण राहिले आहेत अजून ?"

" आज बरेच लोक आहेत."

" कां ! रोगाची एखादी सांथ वगैरे तर शंकरांनीं सोडून नाहीं ना दिली ? त्यांना काय ! मी आहेंच हमाली करायला."

" शंकरांना भांग लागली, तेव्हांपासून ते निपचीत पडून आहेत. दहा वर्षे झालीं. पार्वतीकाकू मोठ्याच फिकिरींत पडल्या आहेत."

" पण कोणी तोतया शंकर तर धुमाकूळ घालीत नाहीं ना ! तसं असेल तर त्यालाच उचला म्हणजे इतरांची गर्दी कमी होईल."

" वैद्यांची संख्या अतोनात वाढली आहे. कलियुगांत लोक रोगांपेक्षां वैद्यांचीं औषधं घेऊनच अधिक मरतात."

" खरं ! मग काय हो, आपल्यावरचा दोष बराच कमी झाला असेल नाहीं ? बरं पुढें—"

" हा एक लहान पोर चार वर्षांचा परत आला आहे. या जन्मांत पातक कांहींच केलं नाहीं. मागल्या जन्मांत पातक केलं त्याबद्दल त्याला अल्पायुष्य लाभलं."

" तुम्ही चुकतांहां ! पुण्य कमी केलं असेल तर अल्पायुष्य आपण देतों. पातक केलं होतं, तेव्हां त्याला मरणाच्या वेदना व्हाव्यात यासाठीं याला अल्पायुष्य दिलं असेल नीट पहा."

" होय, आपण म्हणतां तसंच आहे."

" याचं पातक शिल्लक असेल तर याला मरणाच्या क्लेशांचं दुःख अजून भोगूं द्या. तोंडावरून तो कांहीं वरमल्यासारखा दिसत नाहीं. नाहीं तर असं करा. याला कवीच्या जन्मास घाला. प्रेमांत त्याची निराशा भरून ठेवा. दारिद्र्याचं दुःख आहेच, त्यांतच प्रेमनिराशेचं शुक्लकाष्ठ द्या लावून म्हणजे मरणांचे क्लेश भोगण्यानं वरच्यावर त्याला माझ्यासमोर तरी आणावयाला नको. हं: पुढं. "

" हा प्रसिद्ध दरोडेखोर, चाळीस खून यानं केले. तीन हजार लोकांना लुबाडलं."

" पुण्य कांहीं ? "

" दर महिन्यास सत्यनारायणाची पूजा बिनचूक करीत आला आहे. त्याचं पुण्य पापाच्या गुणांपेक्षां थोडंसं जास्तच झालं आहे. हिशेबानं पाहतां त्याला विष्णु-लोकांत जाण्याची परवानगी द्यायला पाहिजे. "

" विष्णु-लोकांत जडजवाहीर मोकळं पसरलेलं असतं. अप्सरा अंगाखांद्यावर दागदागिने घालून मोकळ्या हिंडतात. याच्या मनाची सांस्कृतिक उत्क्रांति झाल्याशिवाय देवांच्या मेळ्यांत सोडला तर तो अनर्थ करील. त्याला वकिलाच्या आणि तेंहि पण एका संभावित फौजदारी वकिलाच्या जन्माला घाला. पूर्वींचा धंदा विसरल्यासारखंहि त्याला वाटणार नाहीं. थोडीशी सुसंस्कृतता त्याला येईल. हं पुढं."

थोड्या वेळानें " काय हो, चित्रगुप्त, या मुसलमानाला इथं कशाला आणलंत ?"

" हा मूळचा हिंदु, आपल्या हुकमतींतला, बडा पातकी म्हणून मांगाच्या जन्माला घातला. तिथंहि त्यानें चोऱ्या माऱ्या केल्या. देवांच्या पवित्र मंदिरांत प्रवेश करून तीं बाटविलीं. शेवटीं मुसलमान झाला. मरतांच दूतांनीं त्याला आणलं इकडं. अल्लाचे दूत भांडत होते कीं, आम्ही हा आदमी ताब्यांत देणार नाहीं म्हणून. पण आणला तसाच त्याला उचलून."

" हा पैगंबराचा मोठाच गुन्हा तुम्हीं केलांत. हा मुसलमान झाल्याबरोबर आपली सत्ता संपली. तो परधर्मीय झाला. त्याचं पातक हिंदुत्वाबरोबरच आपल्याआपण गळून पडलं."

" खाविंद, मेरीबी एज फिर्याद है. हम तो पैगंबरके पास जाकर जरूर फिर्याद करनेवाला है. और आपकोबी जबाब पुछायेंगे."

" हां खानसाहेब ऐसा रागाऊं नका ! पैगंबर हमारे बडे दोस्त आहेत, भाईबंद आहेत. त्यांची दिलसफाई करीन. गैरसमजूतके लिये झालं आहे. तुम समजदार गृहस्थ आहांत, तुमकू तसदी दिली माफ करायचं आं ! चित्रगुप्त, पुष्पक विमान बिघडलं होतं तें चालू झालं असेल तर त्यांत बसवून यांना पोंचवून द्या."

" आपला रेडा नाहीं तर रिकामाच आहे."

" रेडा परत येईल अशी मला खात्री नाहीं. हा भुकेलेला दिसतो. पुष्पक विमान बरं. रेड्यावांचून माझं अडेल. हूं, पुढं."

" हा मूळचा मुसलमान पण हिंदु धर्मांत तो नुकताच आला. हा गोमांस खाणारा तेव्हां त्याचं पातक पुष्कळच चढलं आहे. आपणाला त्याचं पातक सर्वच गणलं पाहिजे."

" काय म्हणतां ! मूळचा मुसलमान पुढं हिंदु झाला ? कोणी याला हिंदु केला ? "

" अलीकडे वाटेल त्या धर्माच्या माणसास हिंदु होतां येतं. शिवाय ह्याचा बाप मूळचा हिंदु होता. "

" **स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः** हें सूत्र असतांना परधर्मीयांना हिंदुधर्मांत ओढून आणणं व दुसऱ्यांनीं त्यांत दाखल होणं हीं सारखींच पातकं नाहींत का ! यानं गोमांस खाल्लं असेल पण तें मुसलमान असतांना खाल्लं असेल ! "

" होय, हिंदु झाल्यावर ह्यानं पातक करावं इतका वेळच नव्हता. त्याच्या बांधवांनीं परधर्म स्वीकारल्याबद्दल याच्यावर हल्ला केला. सुरीनं त्याला भोंसकल्यामुळं तो मृत्यु पावला."

" पण हिंदु-धर्मांत येण्याचं महान् पातक त्यानं केलं त्याचं काय ! "

" महाराज ! धर्मांतर सब चलता है. हिंदुधरम वास्ते मुझे बहोत अभिमान है."

" यावनी भाषा बोलतोस का ! चित्रगुप्त, याची जीभ इथल्या इथं छाटून टाका ! हिंदु म्हणवतो, आणखी यावनी भाषा बोलतोस का ! म्हणजे याची वटवट तरी थांबेल. आम्हांला अक्कल शिकवतो. म्हणे हिंदुधर्माबद्दल अभिमान आहे. मग हिंदूचा जन्म कां नाहीं घेतलास मागून ? आमच्या शास्त्राप्रमाणं धर्मांतर हें महत्पाप आहे. तुला शिक्षा भोगली पाहिजे."

" धर्मांतर हें पाप असेल, पण परधर्मीयांनीं हिंदुधर्मांत येणं हें पातक आहे का याचा एकदा आपल्याला निर्णय लावलाच पाहिजे. मृत्युलोकांत परधर्मीयांना हिंदु करण्याची चळवळ सर्वसंमत अशी मानली गेली आहे. शेंकडों लोक परत हिंदु धर्मांत येत आहेत. आपल्या लोकांची संख्या सारखी वाढत आहे. " चित्रगुप्तानें सांगितलें.

" संख्या वाढली, कीं त्यांच्या पापपुण्याची नोंद ठेवायची, न्यायनिवाडे करायचे हीं कामं आपलीं वाढतात याचा कांहीं विचार तुम्हीं केला आहे

का! मी म्हणतों, माझं काम वाढणार हेंच एक कारण या अशा धर्मांतराला पातकी ठरविण्यास पुरें आहे. ज्याच्या त्याच्या धर्मांत घालून दिलेल्या नियमांप्रमाणं न चालणं पातकच ठरणार. नाहीं तर चातुर्वर्ण्य धर्मांचं उल्लंघन हेंहि क्षम्य ठरेल. मुसलमान धर्माप्रमाणं याचं धर्मांतर हें पातकच असणार. असं पातक परधर्मीयांच्या हातून व्हावं असा प्रयत्न करणं हें आपल्या पवित्र धर्मशास्त्राला कलंकरूप आहे."

"वर्णाश्रम धर्माचं पालन करणं न करणं याबद्दल पुढं एक उदाहरण येतंच आहे." चित्रगुप्त म्हणाला.

"महाराज हमकू ऐसी खबर नही थी के धर्मांतर करना ए पाप है और ऐसी भारी सजा होंगी ऐसी बिलकुल खबर नही थी. स्वरग मिलेंगे, पीनेकू शराब और परी–जिनकू अपसरा केहेते है ए मिलेंगे और मिझांजूं बी बढ जाएंगे ए विश्वाससे हम काफीर हो गया. आपकू पसंत नही हो तो हम पीछे महंमदी धरममें जा सकते है. मेरे भाईबंद मुझेकू लेना चाहते है."

"केलेल्या पातकांबद्दल पांच-दहा जन्म तुला लोळवल्याशिवाय कोण तुझी आतां सुटका करतो! चित्रगुप्त याला डुकराच्या जन्माला घाला."

"हजूर इतनी दरगुजर करना, के मुझेको सुवरका जन्म नही देना. सुवर ए गंधे मे गंधे प्राणी है. और हमारे धरम मे इसका नाम लेना एबी पाप है."

"बोलण्यांत पटाईत दिसतो. डुकराचा जन्म नको का! मग त्याच्यासारखा दुसरा जन्म कोणता बरं" थोडेंसें आठवून "हं–असं करा, याला टीकाकाराचा जन्म घाला. नाहीं तर गुप्त पोलीस करा. हं पुढं."

"ही एक नायकिणीच्या कुळांत जन्माला आलेली बाई आहे. हिनं पिढीजात धंदा टाकून लग्न केलं व संसार करूं लागली. पुण्यहि बरंच केलं आहे. दोन सहस्त्र भोजनं तिनं घातलीं, इतर धर्मकृत्यं व यात्रा वगैरे केल्या आहेत."

"पण पिढीजात धंदा टाकून हिनं लग्न करून संसार केला, याबद्दलचं पातक वजा करून किती पुण्य शिल्लक राहतं?"

"पिढीजात धंदा सोडणं हें पातक धरावयाचं का धंद्याच्या स्वरूपावर पापपुण्य ठरवावयाचं याचा निर्णय केला पाहिजे. मृत्युलोकांत नवीन नीतिशास्त्रं,

शासनशास्त्रं निर्माण होऊं लागलीं आहेत. त्यांच्याशीं आपला मेळ पडला पाहिजे. नाहीं तर हौसेनं पुण्यदायक म्हणून त्यांनीं जें कृत्य करावं तें आपण पापी ठरवावं, असा प्रसंग ओढवेल, नाहीं आजहि ओढवलाच आहे."

"अलबत् ! मानवांनीं आपलं नीतिशास्त्र बदललं म्हणून आम्हीं सनातन-कालापासून चाललेलं धर्मशास्त्र बदलावं कीं काय ! गुन्हेगाराला कायदा बदलण्याचा हक्क दिला म्हणजे न्यायाधीशाचं कामच उरणार नाहीं. पाप करणं हेंच धर्मवचन होऊन बसेल. तेव्हां तत्त्वतः हें हिचं करणं पापच समजावं लागेल. समाजसुधारणेच्या दृष्टीनं ज्यानं त्यानं आपला पिढीजात धंदा चालू ठेवलाच पाहिजे. तेव्हां हें तिचं पाप गणून मग तिचा हिशेब सांगा. चित्रगुप्त, आज तुम्ही बरेच लोक आणलेत कीं ! हें पहा आज काम बंद ठेवूं. आज आलेल्यांच्या तारखा पुढं टाकूं. ख्रिस्ती किंवा मुसलमान धर्मांतल्यांसारखे आपणहि शेवटचा एकच दिवस सर्वांच्या पापपुण्याच्या निकालाचा ठरवून दिला तर रोजची ही कर्मकटकट कमी होईल नाहीं ?"

"आपलं धर्मशास्त्र पुनर्जन्म मानतं. तेव्हां तें कसं आपल्याला करतां येईल ?"

"तुम्ही म्हणतां ती अडचण तर खरीच. बरं, पुनः एखादे वेळेस वाटाघाट करूं." न्यायाधीश जागेवरून उठले व त्या दिवशींचें काम पुरें झालें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ८०१
वि.
ता.

# हीरक महोत्सव : : ८

## ( १ ) मुहूर्तमेढ

वयाला मान मिळतो, हें नीतितत्त्व मला एकदम पटावें अशी अघटित घटना माझ्या आयुष्यांत आणि तीहि आयुष्याच्या शेवटच्या जिकिरीच्या वर्षांत घडून आली.

माझें तिसरें कुटुंब नुकतेंच वारलें होतें. तिच्या विरहदुःखांत मी गटंगळ्या खात होतों. यापूर्वींच दहा वर्षांवर जर ती वारली असती तर मला दुःख कमी वाटलें असतें, निदान दुःखाचा विसर पाडण्याच्या एकच्या एक आशेनें मीं चौथें लग्न केलें असतें. पण वय तर साठीच्या आंतबाहेर घुटमळत होतें, मनहि इच्छा आणि लोकलज्जा यांत हेलकावे खात होतें.

मला मुलगा नव्हता या एकाच सबबीवर माझ्या आयुष्यांतील चौथ्या लग्नाचा शेवटचा पराक्रम अंवलम्बून होता. मी सुधारक विचारांची आजवर जर तोंडावाटे विनाकारण वाफ दवडली नसती तर या उतारवयांतहि अग्निहोत्राच्या सबबीवर मला दहा वर्षांच्या अनाथ चिमीशीं लग्न करतां आलें असतें. फार काय, पण और्ध्वदेहिक श्राद्धादि धर्मकृत्य करण्याच्या सबबीवर मला राजरोस लग्न करतां आलें असतें. माणसाचा वाचाळपणाच शेवटीं त्याला तत्त्वनिष्ठेच्या गरम राखेचे तोबरे देतो. माझ्या चार मुली आपापल्या घरींदारीं मुलाबाळांनीं फुललेले संसार हांकारीत होत्या, त्यांना माझ्या दुःखाकडे पाहण्यास वेळच नव्हता. माझ्या समाचारासाठीं म्हणून एकत्र झालेल्या मुली, माझ्या पश्चात्

मिळणाऱ्या मिळकतीच्या वांटण्या करण्याच्या विचारांतच वर्दळीवर आल्या. त्यांचे नवरे त्यांत सामील झाले, आणि 'म्हाताऱ्यानें आपल्या हातांनीं चार भाग सारखे करून वाटून टाकावेत' असा उलट माझ्यावर दोष ठेवून सर्व मंडळी आदल्या दिवशींच भांडून निघून गेली होती.

भयाण घरांत मी एकटाच भुताप्रमाणें वावरत होतों. निरुपयोगी झालेली माझी धनदौलत ठाणावर बांधून ठेवलेल्या तुफान घोडीप्रमाणें मला खिजवीत होती, चिक्कूपणाबद्दल माझ्या मनाला अनुपभुक्त प्रौढाप्रमाणें फाडफाडून खात होती, मीच शेवटीं तुझा घात करीन असा मला धाक दाखवीत होती. विधवेचें सौंदर्य आणि विधुराचें ऐश्वर्य, हीं केव्हां प्राणांतिक गंडांतरें ओढवून आणतील आणि आप्तस्वकीयांचा केव्हां आणि कसा अचानक छापा त्यांच्यावर येऊन पडेल याचा नेम नसतो. अशा विमनस्क स्थितींत मी ओसरीवर चिंतातुर बसलों होतों, उजाड माजघरांत आणि भयाण स्वयंपाकघरांत डोकावून पाहण्याचें धैर्यहि मला होईना ! एक, दोन, तीन, किती बायकांचा विरह माझें एकटें मन सहन करील ? रामाला एकट्या सीतेचा विरह सहन झाला नाहीं, अजराजाला एकट्या इंदुमतीचा विरह भारी झाला, तर माझ्यावर तीन बायकांचें लागोपाठ विरहदुःख कोसळलें, तेव्हां मी तिप्पट व्याकुळ झालों असलों तर नवल काय ? मीं बसल्या बसल्या समोरच्या आरशांत पाहिलें. माझें शरीर पुष्कळशा तरुणांपेक्षां धष्टपुष्ट आहे असें डोळ्यांनीं मला बजावलें. शरीर जर तरुण असलें तर मीहि अजून तरुणच आहें असें माझें मन बोलून उठलें. मित्रे विचार मात्र जन्मतारीख सांगून माझ्या आनंदावर विरजण घालीत होते. समोरचे सोनोपंत सोनार त्याच संस्मरणीय क्षणीं घरच्या— म्हणजे म्हातारपणच्या तरुण बायकोच्या— त्रासाला वैतागून माझ्या येथें निवाऱ्याला येऊन टेकले. बासष्टाव्या वर्षी बाशिंग बांधणारा आम्हां म्हाताऱ्या बिजवरांचा बालेकिल्ला न बोलून दाखवितां येण्यासारख्या वैवाहिक जीवनानंदाचे हुंदके देऊन खिळखिळा झाला होता. नाहीं तर शेवटचें कुटुंब आजारी पडल्याबरोबर आणि डॉक्टरांचे उपचार सुरू करण्याच्या अगोदरच ज्या स्थितप्रज्ञानें माझ्या पाठीमागें चौथ्या लग्नाचा लकडा लाविला होता, तो माझा मित्र सोनोपंत सोनार तक्यार्शी टेकतांच 'कुठुन झक् मारली, म्हातारपणीं लग्न केलं' असें विसंगत स्वगत

भाषण करतांना! मी स्तब्ध बसलों. विचारच खुंटला. इतक्यांत आमचे कुलोपाध्याय येऊन ठाकले.

कोणाची तरी श्राद्धतिथि नजीक आली असेल म्हणून आगाऊ सूचना देण्यासाठीं ते नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें आले असतील असें वाटलें. हवा-पाण्याच्या, महागाईच्या, वाढत्या बाडगेपणाच्या आणि ओढवणाऱ्या प्रळय-कालाच्या गोष्टींतून बाहेर पडतांच, त्यांनीं पानतंबाखूचा बार भरला. त्यांच्या स्तब्धतेच्या काळाचा फायदा घेऊन मीं त्यांना येण्याचें कारण विचारलें.

"मी सहज कुंडल्यांची वही–" बसल्या ठिकाणावरूनच त्यांनीं चौकांत पिंकी फेंकली. माझ्या पुढून ती गेली, पण मी शाबूत राहिलों याच आनंदांत होतों. तोंडांतला बार कमी केल्यानें ते आतां जास्त स्पष्ट बोलत होते. "मी सहज कुंडल्यांची वही चाळीत होतों, तुम्हांला आज आठा दिवसां साठावं वर्ष लागायचं आहे?"

"बरं मग?" मीं घाबरून विचारलें, "अहो, मला साठावं वर्ष लागणार तर तुमचं त्यांत काय जातं? जिवंतपणीं तर माणसांचीं श्राद्धं करायची नवीन पद्धत काढली नाहींत ना! तुम्हाला पाह्यल ना पाह्यलं कीं, श्राद्धांची आठवण होते. दोन आया, एक वडील, तीन बायका, सहा बंधू, चार पुतणे, सगळ्यांची आठवण होते बरं का सोनोपंत?"

"हूं ऐकतों आहें?" सोनोपंतांचा राग शमला होता. त्यांनीं तोंड फिरविलें होतें. आतां ते तंबाखू चोळतां चोळतां चोरून स्वतःच्या घराकडे पाहूं लागले होते.

"मी काय बरं सांगत होतों? · देव भलें करो. हूं, आठवलं! सोनोपंत, अहो, हे उपाध्ये आले ना आले कीं, मेलेलीं माणसं आणखीन् त्यांचीं श्राद्धं आठवतात. आणि आतां तर जिवंत माणसांचीं श्राद्धं करणार आहेत! म्हणजे तीनशें साठ दिवस माणसाला दुसरा उद्योगच नको."

"ऊंऽहूः" उपाध्येबुवावर आणीबाणीचा प्रसंग गुदरला. त्यांनीं लागोपाठ तीन पिचकाऱ्या दाराच्या फळीआड कोपऱ्यांत मारल्या. "छेः छेः! साठाव्या वर्षी षष्ठयब्दिपूर्ति-विधि असतो, तो एक धार्मिक-विधि असतो. तो करावा."

" हें पहा! माफ करा. श्राद्धपक्षापायीं मी भिकेला लागलों, कृपा करून आतां हे नवीन खर्च नका काढूं!" मीं काकुळतीनें म्हटलें.

" असा मोठासा खर्च येत नाहीं? थोडं होमहवन करायचं असतं." उपाध्यांनीं पड खाल्ली.

" दोन पैसे खर्च केलेत म्हणून काय कमी आहे तुम्हांला! आणखी खाणारं तरी कोण आहे?" सोनोपंत उद्गारले. या वेळीं ते दारांत फेर टाकण्यासाठीं आलेल्या कुटुंबाकडे पाहून निर्लज्जपणें हसले. मला राग येईल अशा मिस्किलपणें तीं दोघें एकमेकांकडे पाहून हसलीं.

" शिवाय! शिवाय अरिष्ट गंडांतर, व्याधी-उपाधी, देहकष्ट, नाहींसे होतात." उपाध्येबुवांनीं वर्मी घाव घातला. मी क्षणैक हतबुद्ध झालों.

" असं?"

" खोटं नाहीं सांगत? अहो, उगीच का मोठमोठ्या लोकांच्या जिबल्या करितात त्या! टिळक घ्या, केळकर घ्या, हेहि जिबल्या करतात, त्या काय गम्मत म्हणून थोड्याच!" उपाध्येबुवांनीं कूच कदम वेगानें माझी पीछेहाट चालविली.

" हं! रावसाहेब, होऊं द्या! आपल्याहि गांवांत जिबली करूं. गंमत उडवून देऊं." सोनोपंत आनंदाच्या भरांत जागेवरून उठले. त्यांच्या कुटुंबानें आठवणीनें दारांत येऊन लहान मुलीहातीं विड्यांची पेटी आणि आगपेटी रवाना केली होती, त्या सर्व दृश्याचा आनंद त्यांच्या पोटांत मावत नव्हता.

" व्याधी-उपाधी नाहींशा होतात म्हणतां?" मीं विचारलें.

" अलबत्; कां नाहीं होणार?" उपाध्येबुवांनीं किल्ला सर केला होता. युद्धांत कैद केलेल्या कैद्यांप्रमाणें मी त्यांच्यापुढें दीन उभा होतों. माझ्या-वर ते वाटेल तसा सूड उगवीत होते. " तुमचा विश्वास नाहीं, आम्हीं काय करावं. कुटुंबाच्या आजारीपणांत म्हटलं, दोन महारुद्र करा, एकादा शतचंडीचा जप वाचवा, ही वेळ मालक! खात्रीनं येती ना! पण आम्हां भटांचं ऐकतो कोण?"

" रावसाहेब करून बघा! बाब थोडी आहे. तब्येत चांगली होईल!" सोनोपंत विडी शिलगावीत होते.

" रावसाहेब ! कांत टाकल्याप्रमाणें होईल ! त्यानंतर आयुष्याला नवीन सुरवातच केली म्हणानात ! अगदीं अस्सं वाटेल ! "

" काय म्हणतां मी पुनः तरुण होईन." मीं विचारलें.

" अहो व्हाल म्हणजे काय ? खात्रीनं."

" लोकांत मी तरुण दिसेन ? " एक शंका मीं विचारली.

" खात्रीनं."

" मला सगळे लोक पुनः तरुण समजूं लागतील ? "

" अलबत्, हं काय सेठजी, तुम्ही कुठें चाललांत ? "

कुलोपाध्यायांनीं सोनोपंतांना उठतांना पाहून विचारलें. " अहो, तुम्ही तर पाहिजेत. त्याचा हव्यकव्यविधि काय काय करायचा तें ठरवूं. जातां कुठें ? "

सोनोपंत कांहींच उत्तर न देतां चालूं लागले.

" घरांतून चहा झाल्याची आतां त्यांच्या बायकोनें खूण केली ना ! आतां कसले ते थांबायला." सोनोपंत ऐकूं येण्याच्या टप्प्याच्या बाहेर जातांच, मीं पुढें म्हटलें,

" अगदीं बाईलवेडा आहे थेरडा ! तुमच्या अगोदरच घरांतूनच भांडून-तंडून आला, आणखी दोन मिनिटांत बघा कसा हुरळून गेला तो ! "

मला सोनोपंताचा ढिला स्वभाव पाहून राग आला. नवराबायकोच्या भांडणाचा इतका आकस्मिक समेट झाल्याचें पाहून माझ्या तळव्याची आग मस्तकाला गेली, आणि मला एकट्याला टाकून तो आपल्या संसारसुखांत गुरफटून गेल्याचें पाहून माझा क्रोध अनावर झाला होता.

पण मीहि आतां दुबळा, म्हातारा, राहणार नव्हतों. षष्ठ्यब्दिपूर्तिविधीनें मी तरुण होणार होतों, सोनोपंताला हिणवून टाकणार होतों.

आमच्या चिमुकल्या गांवांत आमच्या षष्ठीसमारंभाची बातमी हां हां म्हणतां फैलावली. माझ्याबद्दल नसलेली लोकप्रियता एकदम जागृत झाली. त्या समारंभाला सार्वजनिक स्वरूप देण्याविषयीं चर्चा सुरू झाली आणि जाहीर समारंभाची योजनाहि नक्की झाली. आमच्या गांवांत कोणतीच गोष्ट खासगी राहत नसे. दैनिक वर्तमानपत्रांची उणीव भरून काढणारीं मुखपत्रें घरोघर दरेक व्यक्ति चालवीत असे. घडलेल्या व न घडून येणाऱ्या

रोजच्या विश्वसनीय बातम्या प्रसृत करी. समारंभाची बातमी एकदम पसरली. माझ्या मुली आणि त्यांचे नवरे ह्यांच्याशीं माझें झालेलें भांडणच काय पण 'मी इस्टेट धर्मादाय करून टाकीन, वाटेच्या चोराला देईन, पण यांच्या हातीं कपर्दिकहि लागूं देणार नाहीं' असा मीं स्वगत सोडलेला निःश्वास यांची चर्चा घरोघर चालली होती. माझ्या फेसाळ निःश्वासाला निश्चयाचें वज्र बनविण्यासाठीं प्रोत्साहनाचे शतकोटि घण त्यावर सारखे पडत होते. आतांनीं चालविलेल्या छळाचा तीव्र निषेध करण्यासाठीं, माझ्या रक्षणासाठीं, सर्व गांवकरी एकजुटीनें पहिल्यानेंच माझ्याभोंवतीं जमा झाले होते.

दहा-पंधराजणांचें एक शिष्टमंडळ माझी मुलाखत घेण्यासाठीं अचानकपणें आलें. सर्व मिळून आमच्या शहराचे प्रतिनिधि होते खरे, परंतु दरेकजण निदान तीन संस्थांचा प्रतिनिधि होता. लोकवस्तीच्या संख्येबरोबरीनें आमच्या गांवांत तरी सार्वजनिक संस्थाहि असतील अशी माझी तोंवर कल्पनाहि नव्हती. मीं सहज विचारलें—

" ह्या तर चाळीस-पन्नास संस्था भरतील एकंदर ! आणखीन् इतक्या दिवसांत माझ्या कशा नाहीं त्या नजरेस पडल्या ? "

" हंः हंः " चा सर्वांच्या हासऱ्या चेहऱ्यांतून एक आवाज निघाला. मी एकटा पंधराजणांशीं जिभेचा दांडपट्टा खेळत होतों, तेव्हां माझ्या प्रश्नाचा कोणी जाब दिला, आणि मला कुणी नवीन जाब विचारला, हें माझ्या ध्यानांत त्या वेळीं आलें नाहीं. आतांहि ध्यानांत राहिलेलें नाहीं. दरोडेखोरांच्या तावडींत सांपडलेल्या एकट्या जिवाला कोणी कुठें फटका मारला हें समजत नाहीं. आपल्याला एकंदर मार किती पडला, कोठें आणि कशा प्रकारचा तो होता येवढेंच तो सांगूं शकेल. आमच्या संभाषणांतील माझें बोलणें आठवतें, त्यांचे जाब-जबाबहि आठवतात, जाब देणारांचीं नांवें आठवत नाहींत.

" हंः हं, तसें नव्हे, परंतु आपणासारख्या मोठ्या माणसांना कांहीं तसे मोठे प्रसंग आल्याखेरीज संस्था माहीत तरी कशा होणार ? "

" आणखीन् बरेच दिवसांची लोकांची तक्रार होती, आपल्या गांवांत सार्वजनिक संस्था मुळींच नाहींत म्हणून. तेव्हां मंडळींनीं बेत केला." बोलणारा अडखळला म्हणून दुसरा सरसावला.

" आपल्या ज्युबिलीनिमित्त संस्था काढाव्यात असं मंडळींनीं ठरवलं, आणखीन् कालच तर एकूण एक संस्था स्थापल्या."

" पुण्याच्या लोकांची बढाई एकदां कुणी तरी जिरवायलाच पाहिजे होती. काय आम्हालाहि संस्था काढतां येतात कीं नाहीं ! म्हणावं कराल कीं नाहीं कबूल कीं आमचं गांव जागतिक विचारांचं क्रांतिकेंद्र आहे ?"

" सार्वजनिक संस्था म्हणजे खरी मनोवांच्छित संतति ! जेव्हां पाहिजे तेव्हां, जितक्या पाहिजे तितक्या, निर्माण करतां येतात."

" संस्था पोसेनाशी झाली म्हणजे मोडून नाहींशी करतां येते."

" उत्पन्न करण्यासाठीं दोन व्यक्तींची जरूरी लागत नाहीं."

" दोन व्यक्ति एकत्र आल्या म्हणून त्यांना संस्था होण्याची भीति नसते."

" स्नेह दृढ करतांना संततिनियमनाचीं साधनं त्यांना बाळगावीं लागत नाहींत."

" एक व्यक्तिहि तिला जन्माला घालूं शकते."

" आणि अनेक सजातीय व्यक्तीहि सगळ्या मिळून एका वेळेला तिला बिनहरकत जन्माला घालूं शकतात."

" जन्माला घालणं, जन्माला येणं आणि बारसं एका घटकेंत होतं."

" का ? आहे का नाहीं खरी मनोवांच्छित संतति !"

" वाः ! तें काय विचारावं."

सर्वांच्या त्या तुफानी हंसण्यापुढें मीं टाकलेला गंभीर प्रश्न फजीत पावून पोरका दिसूं लागला. मींहि त्याला निवारसी म्हणून सोडून देऊन त्यांच्या हंसण्यांतील उसनवारी घेऊन हंसूं लागलों.

" अश्लील, अश्लील !"

" पावित्र्य-विडंबन !"

" नवमतवाद्यांची टिंगल करतां ?"

रागाच्या निरनिराळ्या निघणाऱ्या फूत्कारांनीं दरेक वेळीं हंसणें थांबे, पण नंतर त्याला दुप्पट जोर चढे.

" पावित्र्य-विडंबनविरोध संस्थेमार्फत मी निषेध करतों."
" सर्व भाईलोकांच्या वतीनं गर्जून मी विरोध करतों."
" अहो, पण संततिनियमन हें पवित्र केव्हां झालं ? "

" अलबत, संततिनियमन हें एका सोडून हजार प्रकारांनीं पवित्र आहे. संततीचं पावित्र्य संभाळायचं असेल तर दरेक विवाहित स्त्रीपुरुषानं संततिनियमनाचीं उपकरणं वापरलीं पाहिजेत. संततिनियमन हें निखालस पवित्र कार्य आहे, पूज्य घटना आहे. त्याची टिंगल करणं हेंच एकच्या एक पावित्र्य-विडंबन होय."

" सदभिरुचि-संरक्षक-सभेच्या वतीनं मी जोराचा प्रतिकार करतों."

" संततिनियमन संघाच्या मार्फत मी जाहीर रीतीनं ठासून सांगतों कीं आमच्या पवित्र कार्याची टिंगल होत आहे."

" भाईलोकांचा याला जबरदस्त विरोध आहे."
" हरिजन-संघाचा याला पाठिंबा आहे."
" अहो, याला म्हणजे कशाला पाठिंबा आहे तुमचा ? "
" हे हे, जिलबीचं काम नाह्यका ! जिलबीचं काम करावं ? "

" जिलबीचं जेवण पाहिजे असेल यांना ! धड शुद्धसुद्धां बोलतां येत नाहीं, आणखीन् निघालीं आहेत हीं महारडीं समान हक्क मागायला अन् देवळांत शिरायला ! ज्युबिलीची कुठं वाटाघाट चालली आहे ? अन् कसले विरोध, आणखीन् कसले पाठिंबे घेऊन बसलां आहांत ? "

आमचें गांव महाराष्ट्राचें अक्षरशः केंद्र झालें होतें, याची मला आतां शंका राहिली नव्हती. ज्युबिली, जिबली, जिलबी असे शब्द कानांवर पडतांच मी भानावर आलों. सर्व मंडळीहि भानावर आली. रागानें अक्राळविक्राळ झालेले चेहरे एकदम सौम्य झाले, स्मितहास्यानें चमकूं लागले, जिव्हांना पाणी सुटलें.

" रावसाहेब, ( मी हें नांव ऐकून थोडा दचकलों, म्हणून ) तुमची ज्युबिली आम्ही उजवणार ? "

" आणि तें कां म्हणून ? " मीं आश्चर्यानें विचारलें " श्राद्धपक्ष तशीच ही ज्युबिली ! केवळ धार्मिक विधि आहे तो तुम्ही कां म्हणून उजवणार ?

आजपर्यंत इतकीं मीं श्राद्धं केलीं, कार्यं केलीं, तीं नाहीं का माझी मींच एकट्यानं केलीं ?"

" इतके दिवस आपलं जीवन खाजगी होतं."

" पण यापुढेंहि तें निखालस खाजगीच राहणार आहे." मी उद्गारलों. " तुम्हा मंडळींना माझ्याबद्दल कुणी तरी भलत्याच कंड्या सांगितलेल्या दिसतात. शपथ सांगतों, मी तसला प्रकार निदान आपल्या गांवांत तरी माझ्या हातून होऊं देणार नाहीं."

" तसं नाहीं हो ! पण आतां आपण राष्ट्रपुरुष झालांत, साठ वर्षं संसार नेटका केलात, आतां परमार्थसुखाला तुम्ही (आपण शब्द वापरल्यामुळें सभासदांची तारांबळ उडे म्हणून त्यांनीं तो टाकून दिला ) लायक झालां आहांत."

"तुमचा देह हा राष्ट्राचा झाला. राष्ट्राचा तो वारापाऊस खाऊन मुरलेला एक आधारस्तंभ आहे."

" तुमचं चित्त, वित्त सर्वस्वीं आतां राष्ट्राच्या कारणीं लागलं पाहिजे."

" राष्ट्राच्या मालकीचं झालं आहे."

" राष्ट्राची मालकी म्हणजे तरी काय ! आपल्या गांवांतील संस्था म्हणजेच राष्ट्र; आणि त्यांची मालकी हीच राष्ट्राची मालकी. काय समजलांत?"

" मग तुम्ही काय, म्हणतां तरी काय ?" मीं गोंधळून विचारलें. " काय म्हणतां मी तुमच्या संघाचा सभासद होऊं होय ?"

" छे:-छे: ! आम्ही तुमची ज्युबिली उजवणार, आम्हांला परवानगी द्या."

" उपाध्येबुवांना विचारा बुवा. आपल्याला हें कांहीं समजत नाहीं." मी काकुळतीनें म्हणालों. " कांहीं न करतां-सवरतां हें नवीनच एक संकट उत्पन्न झालं म्हणायचं ?"

" अहो, फारसं संकट नाहीं. आपल्याला सर्व संकटं निवारण्याचं सामर्थ्य आहे. आणखीन् आम्ही उपाध्येबुवांना भेटतोंच. सर्व धार्मिक विधीचा खर्चवेच हाहि ज्युबिलीमंडळामार्फतच व्हायचा आहे."

" बघा बुवा. खर्च जास्त होणार म्हणून मीहि धार्मिक विधी रहित करणार होतों. तुम्ही सर्वजण मिळून अंगांवर घेतलंत, तर खर्च वाटला

जाईल, एकेकावर थोडी रक्कम येईल." मीं हंसून सांगितलें. खर्चाचा प्रश्न आपोआप सुटला याच आनंदानें मी हुरळून गेलों होतों.

" आमच्या संस्थांतर्फे मानपत्रं आम्ही देणार आहोंत. त्याचा जाहीर कार्यक्रम करूं. जिल्हाधिकारी पुढल्या आठवड्यांत अनायासें येत आहेत, त्यांच्या हस्तेंच तुमचा सन्मान झाला तर कसं ? "

" छट्, आम्ही ज्युबिली गौरवग्रंथ काढणार आहोंत. त्याचा अर्पण-विधि कलेक्टरच्या हस्तें करणार आहोंत. तुम्ही दुसरा कुणी तरी पाहा. "

" एका जिल्हाधिकाऱ्याला हीं दोन्ही कामं करतां येणार नाहींत का ! मग असे उगीच कां भांडतां ? "

" रावसाहेब, तुमच्या कानांवर एक गोष्ट घालायची राहिली. संस्था तुमचा येवढा समारंभ करणार, थोडीफार खर्चाची झीजहि सोसणार, तेव्हां या निमित्तानं सर्व संस्थांचा आपण परामर्श घ्यावा."

" तें क्रमप्राप्तच आहे ! दरेक संस्था आपल्यापुढं स्वतःच्या मागण्या मांडीलच, त्या अनुरोधानं सर्वांच्याच मागण्यांचा साकल्यानं विचार व्हावा."

" अहो, मी तेंच सांगतों आहें. अमुक एक संस्था लहान, अमुक मोठी, असा भेदाभेद ठेवूं नका. मग आतां तर तुमची तक्रार राहिली नाहीं ना?"

त्यांच्या बोलण्याकडे माझें लक्ष नव्हतें, आणि खरें म्हटलें तर मला त्यांच्या त्या बोलण्याचा त्या वेळीं अर्थच समजला नव्हता.

" हो, हो, तुमचं म्हणणं रास्त आहे." असें कांहींसें मी पुटपुटलों.

शिष्टमंडळ परत गेलें, सर्व अशिष्ट प्रकारांतून एकदांची माझी सुटका झाली.

सोनोपंत नित्याप्रमाणें लगेच माझ्या येथील बातमी काढण्यासाठीं आले; पण मी त्यांच्याशीं बोललोंच नाहीं. मी त्यांच्यावर खूप रागावलों होतों, आणि माझा राग, शांत न होतां त्यांचे म्हातारपणाचे हिडीस चाळे पाहून उलट जास्तच वाढत होता. हीरक-महोत्सवानंतरच– म्हातारपणची कांत टाकल्या-नंतरच– मी त्यांच्याशीं बोलणार होतों.

## ( २ ) धार्मिक विधि

आज माझ्या हीरक-महोत्सवाचा दिवस. सकाळपासून दाराशीं चौघडा झडत होता; हातांत एकेक गुडदाणीचा पुडा घेऊन मुलांचा घोळका गोळा

झाला होता, गांवकऱ्यांची ये-जा चालली होती. माझ्या येथेंहि माझे कांहीं स्नेही आणि नातेवाईक पाहुणे आले होते. हीरक-महोत्सव-समिती-कडूनच सर्व पाहुण्याराबवळ्यांचा खर्च होणार होता; तेव्हां आजवर अनेक अडचणी दाखवून ज्या लांबच्या नातेवाइकांना, लहानपणच्या मित्रांना माझ्या गांवीं येण्याचें आमंत्रण देण्याचें टाळीत होतों त्या माझ्या सर्व आप्त-स्नेह्यांना आग्रहाचीं आमंत्रणें पाठवून मीं बोलावून घेतलें. माझें घर थेट लग्नघराप्रमाणें गजबजून गेलें. माझ्याच नव्हे तर माझ्या कनवाळू नातेवाईकांच्याहि मनांत हुरहूर लावणारा विचार घोळूं लागला, आणि माझी आतेमावशी म्हणाली देखील, " भाऊराया, आपलं तूं पुनः लग्न कर. आतां पाहिजे तेवढ्या मोठ्या वयाच्या मुली मिळतात. अनायासं आम्ही सगळे नातेवाईक जमलों आहोंत, म्हणून म्हणतें " मावशीच्या आस्थेवाईक सवालाचा जबाब देण्यासाठीं मीं विनयानें येवढेंच म्हटलें, " मावशी, सध्यां चातुर्मास चालला आहे. तूं म्हणतेस तसं कसं होईल ? "

होम-हवन सुरू झालें, 'शतं जीव', 'जीव शतं' अशा आशीर्वादां-चा उपाध्येबुवांनीं आणि त्यांनीं पाचारण केलेल्या ब्रह्मवृंदांनीं माझ्यावर मुसळधार पाऊस पाडण्यास सुरुवात केली. वेदमंत्रांतील तेज आणि ब्रह्म-वृंदाचें तपःसामर्थ्य थोडेंच वायां जाणार ! वाळून कोळ झालेल्या माझ्या आशेच्या मुसळाला अंकुर फुटूं लागले, त्या फोंफावणाऱ्या धुमाऱ्यांना मुसमुसणा-ऱ्या तारुण्याच्या फांद्या फुटल्या, त्यांचा वृक्ष होऊन भावनांच्या पल्लवांनीं तो डंवरला, त्यावर संसारघटनेचीं मोहक फुलें बहरलीं आणि पुत्रप्राप्तीचीं मधुर फळें पापानीं लटकलीं. माझे निराशेचे विचार गेल्या आठ दिवसां-पासून मी हळूहळू विसरायलाच लागलों होतों. आतां तर ते विचार पार लुप्त झाले आणि त्यांच्याऐवजीं नवीन संसाराची काळजी मला भेवडावूं लागली. शंभर वर्षें माझें आयुष्य, पैकीं फक्त साठ पुरीं झालीं, म्हणजे अजून तब्बल चाळीस वर्षें मला जगावयाचें आहे, तेव्हां त्या मानानें माझ्या कर्तबगार शिल्लक आयुष्याचा आराखडा तयार केला पाहिजे असें वाटूं लागलें. उपाध्येबुवांची वाचा खरी ठरली. एकदम कांत टाकल्यासारखें मला वाटूं लागलें. चाळीस वर्षांपूर्वीं ज्या बालिश हुरूपानें मी स्वतःच्या पहिल्या लग्नांत वावरत होतों, तितक्याच पोरकट आनंदानें मी आज हुरळून गेलों.

मी त्या समारंभांत आतां अगदीं रंगून गेलों होतों. होमहवन होतांच माझी तुला व्हावयाची होती. सोनें, नाहींपेक्षां चांदी, नाहींपेक्षां तांबें, पितळ, निदान धान्य यांची तरी तुला केली पाहिजे असा शास्त्रार्थ निघाला. आनंदानें हुरळून जाऊन वाटेल तें देऊन टाकण्याइतका, मी वयानें पोरकट राहिलों नव्हतोंच, हर्षातिरेकानें अविचारी बनलों नव्हतों. मी तुला करण्याचा विधि रहित करावा म्हणून म्हटलें, परंतु शास्त्रार्थ निघाला, कीं तुलाहि केलीच पाहिजे. मग ती पाहिजे त्या पदार्थांची करावी आणि तो पदार्थ दान करावा. तुला होणार हें अगोदरपासूनच जाहीर झालें होतें. ती घेण्यासाठीं भटभिक्षुक, भिकारी, गोसावी, अनाथविद्यार्थिगृहाचे व्यवस्थापक, गोरक्षणाचे संचालक यांचा सभोंवतालीं गराडा पडला होता. त्या सर्वांना नाखूष करणेंहि जिवावर आलें. माझें वजन एका लांकडें तोलण्याच्या कांट्यावर करण्यांत आलें. एकंदर वजन एकशें त्रेचाळीस शेर साडे तेरा भार भरलें. सर्वांनाच तुलेंतील जिनसा मिळाव्यात या उद्देशानें मीं दोन मण बाभूळबांड, एक मण कडबा, दहा शेर जुनें लोखंड, तीन शेर ज्वारी, दोन शेर तांदूळ, साडे सहा आण्यांचा खुर्दा इतक्या जिनसा टाकल्या. लांकडें अनाथविद्यार्थिगृहास, कडब्याच्या पेंढ्या गोरक्षण संस्थेस, ज्वारी भिकाऱ्यांस, तांदूळ गोसाव्यांस, खुर्दा ब्राह्मणांस, देण्याचें उदक सोडलें आणि जुनें लोखंड कोणीच घेण्यास तयार होईना म्हणून जपानार्पण करावें लागलें. तुलेच्या जिनसांची मीं मुद्दामच अशी योजना केली, कीं धातु, अन्न, (पशु व मानवांचें) द्रव्य, काष्ठ या सर्व जिनसा दिल्याबद्दल मला शंभर टक्के पुण्य लाभावें. परंतु माझे याचक माझेवर एकदम क्रुद्ध झाले. जिनसांकडे पाठ फिरवून उभे राहिले. मी त्यांतला खुर्दा उचलून भांड्यांत टाकला, तांदुळाची पुरचुंडी दुसऱ्या हातानें उचलूं लागतांच सर्वांनीं भराभर ज्या त्या जिनसा हस्तगत केल्या. लोखंड घिसाडी विकत आणि तेंहि पडत्या भावानें मागूं लागला, पण तो याचक म्हणून नव्हे. अर्थात् तें त्याला मिळणें शक्य नव्हतें. पश्चात्ताप वाटला, कीं सर्वच तुला जर मीं धातूची म्हणजे लोखंडाची केली असती तर देखावा उत्कृष्ट होता, कोणाचाहि रोष न होतां माझा व्ययहि होता ना!

मीं येवढ्या मनोभावानें, अपूर्व औदार्यानें आणि सर्व संग्रहात्मक

चातुर्यानें तुला केली, तेव्हां सर्वांच्या तोंडून स्तुतिस्तोत्रांचा माझ्यावर वर्षाव होणार अशी माझी अपेक्षा होती. पण—! पण काय ? संकेतानें एकांतस्थलीं प्रियतमेला चोरून भेटावयाला जावें आणि अचानक चावरें कुत्रें अंगावर तिनें सोडून द्यावें आणि आपली होणारी लांडगेतोड फटफजिती तिनें पाहत हंसत उभें राहावें ! अगदीं तशांतला फसगतीचा हा प्रकार झाला. जिकडे तिकडे असंतोष माजून राहिला. सर्वांचे चेहरे त्वेषानें लालबुंद झाले, वटारलेले डोळे मला सबंधच्या सबंध गिळून टाकण्यासाठीं माझ्याकडे मारक्या म्हशीसारखे फिरूं लागले. मी एकदम घाबरून गेलों. हीरक महोत्सव-समितीचे स्वागताध्यक्ष महाशब्दे यांना मीं एकीकडे नेऊन माफीच्या स्वरांत विचारलें. एकंदर आतांपर्यंतचा समारंभ कसा काय—बरा पार पडला ना ? असा माझा अगदीं साधा प्रश्न ऐकतांच ते जे माझ्यावर उसळून आले, कीं दीर्घायुष्याबद्दल एकदम माझी आशा सुटली. 'थट्टाच चालविली आहेत तुम्हीं ! अहो, ही काय तुला केलीत का थट्टा ?' मीं नमतें घेतलें व म्हटलें, "महाशब्दे, तसं म्हणाल तर माझा या जुन्या प्रकारच्या दानधर्मावर विश्वास बेताचाच; पण शास्त्रार्थ म्हणून तुला केली येवढंच." त्यांच्या क्रुद्ध चेहऱ्यावर एकदम हास्य विलसूं लागलें. ते म्हणाले, "तें तुमचं म्हणणं बरोबर आहे. खरा दानधर्म सार्वजनिक संस्थांना मदत करण्यांत असतो. त्या संस्थांना सोडून या भटाभिक्षुकांना कोण हो धर्म करणार ? मी तर म्हणेन कीं, तुम्ही या तुलेच्या निमित्तानं त्या याचकांची चांगली खोड मोडलीत."

माझ्या उत्तरानें एकदम वातावरण बदललें. माझ्या गजबजलेल्या घरांत पंक्तीवर पंक्ती उठत होत्या, पण मला जेवण्याबद्दल कुणीच कांहीं विचारीत नव्हतें, तेव्हां मीं मनाशीं तर्क केला कीं, शास्त्रार्थांत मला उपोषण करावयाचें असेल. ज्युबिलीच्या निमित्तानें एखाद्याचें सर्वस्व हरण करावयाचेंच असेल तर त्या दिवसापासूनच त्याला तटतटीत उपास घालण्याची सुरुवात केलेली बरीच. असो, पण माझ्या त्या उत्तरानें सर्वांचें पुनः एकदां माझ्याकडे लक्ष गेलें. एका लहान मुलाला अर्ध्या जेवणावरून उठविलें. त्याच्या पाटावर—पण नवीन पत्रावळ मांडून मला जेवणास बसविलें. फार काय, पण अगदीं मीठ, लिंबापासून आग्रह सुरू झाला. महाशब्दे स्वतः तुपाची कासंडी सैल सोडून मला वाढूं लागले. मीं खालीं मान घालून जेवणाचा सपाटा चालविला.

## ( ३ ) मानपत्र-समारंभ

संध्याकाळीं खास उभारलेल्या मंडपांत मानपत्र-अर्पण समारंभ साजरा करण्यांत आला. त्या समारंभाच्या आठवणी अजून माझ्या अंगावर भीतीचे रोमांच उभे करतात. मात्र त्या समारंभापैकीं अर्ध्या समारंभानें मला आनंदाच्या अनिवार गुदगुल्या केल्या. उच्चासनावर आयुष्यांत मी पहिल्यानेंच आणि तेंहि माझ्या गांवांतील वयोवृद्ध आणि श्रीमान् अशा नागरिकांच्या नाकावर टिच्चून बसलों होतों. सर्व मंडप आमच्या गांवकऱ्यांनीं त्रिफुल्ल झाला होता. पहिलें मानपत्र आमच्या गांवच्या नगरपालिकेचें. त्यांत मी ज्या आळींत राहतों त्या आळींतील 'खेटुर खाऊन उसन बरी करणाऱ्या' म्हसोबाविषयीं अत्यंत स्फूर्तिदायक आणि भयानक स्तुतिस्तोत्रांनीं मानपत्राचा पाऊण-अधिक भाग व्यापला होता. खेटऱ्या, उसन्या, म्हसोबानंतर यथाक्रम प्रशंसा होण्याची माझीच पाळी येईल ह्या आशेनें मी कान टवकारून ऐकत होतों, पण म्हसोबाच्या स्तुतीनंतर एकदम मागणीचेंच कलम मला ऐकूं आलें. मागणीचा आंकडाहि मोठ्या संकोचानें आणि माझी गरिबी लक्षांत घेऊन फक्त पंचवीस हजारांचा ठेवण्यांत आला होता. आमच्या गांवाला टाउन हॉलची मोठी गरज होती; पण तो टाउन हॉल बांधावयाला पंचवीस हजारांची रक्कम लागते हें ऐकतांच मी तरी टाउन हॉलची आशा आणि इच्छा तावडतोब सोडून दिली. दुसरें मानपत्र संस्कृति-संरक्षक संस्थेतर्फे वाचण्यांत आलें. त्यांत माझ्या नसलेल्या सनातनी मतांची आणि जुन्या वागणुकीची मोठी तारीफ केली होती. पण जुन्या वागणुकीबद्दलचें श्रेय आमच्या पिढीजात दारिद्र्याला द्यावें लागणारें होतें, हा मुद्दा निराळा. ह्या संस्थेनें माझें राहतें घरच संस्थेला देण्याबद्दल मागणी केली. नंतरचें मानपत्र आमच्या हनुमान संघातर्फे देण्यांत आलें. माझा तोंडावळा थेट हनुमानाप्रमाणें उमदा, सुंदर, रुबाबदार असल्याचें ऐकून मी हुरळून गेलों; पण त्यांनीं मागणी केली कीं, माझ्या घराची जागा जमीनदोस्त करून कवायतीला बखळ म्हणून द्यावी. हें ऐकून मी आंतून हवालदिल झालों. शिक्षण-प्रचारक-मंडळानें मानपत्र दिलें, त्यांत माझ्यासारखा बुद्धिमान् माणूस केवळ इंग्रजी शाळेची सोय नसल्यामुळें हायकोर्ट जज्जाच्या अगर मुख्य प्रधानाच्या जागेस आंचवला आणि गांवाचें नांव मागें

पडलें, असा माझा गौरवपूर्ण उल्लेख करून माझ्या निरक्षतेवर शिताफीनें पांघरूण टाकलें. इंग्रजी शाळा स्थापण्याकरितां त्यांची इमारतीसह मागणी फक्त तीस हजारांची होती. संतति-नियमन-मंडळ, शिशु--संगोपन-मंडळ आणि सेवासदन ह्या तीन संस्थांनीं एकत्रच मानपत्र दिलें. छपाईच्या काटकसरीसाठीं तिघांचीं तिन्हीं मानपत्रें एकत्रित छापावीं लागलीं, ह्यासाठीं तडजोडीनें दरेकांतील तिसरा भाग छापण्याचें ठरून त्याप्रमाणें मानपत्र वाचण्यांत आलें. त्यांतील भाग असे:—

......चाळीस वर्षांपूर्वीं संतति-नियमनाचे उपाय उपलब्ध असते तर तुम्ही ते खात्रीनें अंमलांत आणून एकहि मूल होऊं देतां ना; आणि आज चार पोरींच्या खाईंत न पडतां आमच्या संस्थेला सर्व माल-मिळकत देऊन सुखी झालां असतां. तुमच्या मुलींनीं केलेलीं दुरुत्तरें आणि त्यांच्या यजमानांनीं तुम्हांला केलेली शिवीगाळ दरेक गांवकऱ्याच्या काळजाला घरें पाडीत आहे आणि त्यासाठीं आपण.........

......संततीची जोपासना केली असतीत तर तुमचें घर तुम्हांला राहावयालाहि पुरलें नसतें. कदाचित् सगळा गांवहि पुरला नसता. परिणामीं आपला गांव हा आपल्या एकट्याच्या विस्तारासाठीं खालीं करून आम्हां गांवकऱ्यांना तुम्ही देशोधडीला लावूं शकलां असतां; पण ह्या पराक्रमाला वैद्यकीय ज्ञान व आरोग्यशास्त्राचे नियम, ह्यांची जोड नसल्यामुळें तीन कुटुंबांमिळून झालेल्या सत्तावीस मुलांपैकीं तेवीस मुलें हालअपेष्टांत वारलीं. आपल्याप्रमाणें दुसऱ्या कर्तबगार नागरिकांचे पराक्रम वायां जाऊं नयेत म्हणून.........

......गांवांतील झाडून सर्व विधवांचे पुनर्विवाह लावून टाकले पाहिजेत. निदान त्यांना स्वतःच्या पायांवर उभे राहण्यासाठीं जरूर ती सोय करून दिली पाहिजे.........

माझा अचंबा पोटांत मावेना. मी गाफील होऊन ओरडलों. "दरेक प्राणी स्वतःच्याच पायांवर उभा राहतो ना! विधवांनीं दुसऱ्याच्या पायांवर उभें राहावें असें कोण लेकाचा म्हणतो आहे इथें. समजा तशा चोवीस तास त्या उभ्या राहिल्या म्हणून मीं कोठें हरकत घेतली आहे?"

माझ्या बोलण्याकडे लक्ष न देतां त्यांनीं तसेंच तें वाचण्याचें सुरू ठेवलें. आणि माझ्या घरादारावर, सर्व चीजवस्तूवर एकट्या सेवासदनाची ताबड-

तोंच मालकी उत्पन्न व्हावी अशी सदिच्छा प्रकट केली. त्यासरशीं " संतति-नियमन-मंडळाची मागणी राहली, शिशुसंगोपनाची मागणी प्रथम आहे " अशा दोन क्षीण किंकाळ्या ऐकूं आल्या.

दरेक मानपत्र वाचण्यास पुष्कळ काळ लागूं लागला. वाचणाऱ्यांना माझ्या अक्कलहुशारीबद्दल आतां शंका राहिलीच नव्हती. म्हणूनच कीं काय, शेवटच्या मागणीचा मजकूर दरेक वाक्य तीन तीन वेळ (मुद्दाम वाचून मला ऐकूं येतें आणि समजतें का नाहीं याबद्दल योग्य शंकेमुळें असेल) वाचून माझ्या मनावर बिंबविण्याचा दरेकाचा कसून प्रयत्न चालला होता. अंधार पडूं लागला होता. मांडवांत दिवाबत्तीची सोय केलेली नव्हती. यादीप्रमाणें अजून छत्तीस मानपत्रें वाचावयाचीं राहिलीं होतीं. शेवटीं चारचार जणांनीं आपापलीं मानपत्रें एकदम वाचावींत असें ठरलें. त्याप्रमाणें मानपत्रें वाचण्यांत येऊं लागलीं. माझ्या एकट्या मनाचे चार वांटे करून या मानपत्रांचें आकलन कसें काय होईल ह्याची मला मोठी काळजी पडली होती. पण चौघाजणांच्या चार निरनिराळ्या प्रकारच्या प्रशंसांनीं माझ्या मनाच्या नेमक्या चार चिरफळ्या चालविल्या होत्या म्हणून मी त्या काळजींतून अनपेक्षित रीतीनें मोकळा झालों.

वेश्योद्धारकमंडळ:—'वेश्याव्यवसायाला आपण आपल्या अगदीं लहानपणापासून आजतागायत आश्रय दिलात तो महशूर आहे.'

वारकरीसंप्रदायमंडळ:—'विद्या अगर विद्वत्ता ह्यांचा अंगीं गंधहि नसतां गरिबींत तुम्ही सुखासमाधानानें दिवस काढलेत.'

पुरोगामी संघ:—'आहारविहारांत वरकरणीं सोंवळेपणा दाखवून जी तुम्ही चोरटी यथेच्छ मौज मारलीत तींतूनच आजच्या पुरोगामी धाडसी लोकांचा वंश निर्माण झाला आहे.

आरोग्यमंडळ:—'आपलें सुदृढ दिसणारें शरीर अनंत कुत्सित रोगांनीं पोखरलेलें असण्याचा संभव आहे.'

अशा शेलक्या वाक्यांनीं चौफेर होणाऱ्या ह्या मानपत्राच्या माऱ्यानें मी अगदीं जमीनदोस्त झालों. स्तुति-स्तोत्रें ऐकण्यासाठीं उत्सुक झालेले कान मीं दोन्ही हातांनीं बंद करून घेतले म्हणून ह्याच्यानंतरचीं मानपत्रें कसलीं

होतीं आणि त्यांतून कोणकोणत्या प्रकारच्या आरोपाचा सडा माझ्यावर सारखा पडत होता हें मला समजलें नाहीं.

मानपत्रांचे करंडे, नळकंडीं, पेट्या हीं एका पाठोपाठ माझ्या पदरांत पडत होतीं, म्हणूनच माझा कानकोंडा जीव आसनाला बिलगून राहिला होता. मानपत्रांचें वाचन पुरें होतां होतां जवळजवळ काळोख पडला आणि करकरीत संध्याकाळीं माझ्यावर जिवावरचा प्रसंग गुदरला. बसल्या बसल्या मानपत्रांतील मागण्यांच्या आंकड्यांची मी बेरीज करीत होतों. त्यांची बेरीज फक्त पांच लाख रुपये होत होती. माझी सर्व जंगम मिळकत अदमासें पांच हजार रुपयांची आणि स्थावर मिळकतींत माझ्या चार वेळां मोडलेल्या, तीन वेळीं मांडलेल्या संसारावर पांघरूण घालणारें एकच्या एक कौलारू घर. माझ्या चारी सहधर्मचारिणींनीं एका पाठीमागून एकीनें मला दगा दिला; पण माझ्या संसारावर पांखरण घालणारें माझें चिमकुलें घर हाच माझा आतां निर्वाणीचा आधार राहिला होता. माझ्या पांच हजारांची विल्हेवाट लावावयाची म्हटलें तरी शंभराच्या मागणीला एक रुपयाच वांटणीला येणार! आणि घरावर तर अर्ध्या अधिक संस्थांचा डोळा होताच!! मागणारांनीं त्या घराची जी वाताहत माझ्यादेखत चालविली होती त्यामुळें मी आंतून अगदीं कासावीस होऊन गेलों होतों. घर जमीनदोस्त करून त्याखालची बखळ मोकळी करून देण्याची मागणी व्यायाम-मंडळ, भगिनीसमाज, व्यापारी-संघ, मजूर-मंडळ आणि हरिजन-संघ इतक्यांनीं केली. घर असलेल्या स्थितींतच कृष्णार्पण करण्याची सूचना सेवा-सदन; झारेकर बल्लव-कॉलेज; साहित्य झब्बू-शाही-विदूषक-मंडळ; विवाद संस्था; संस्कृत पाठशाळा; खाकी-सिगारेट-कारखानदार संघ; आणि प्रसूति-गृह इतक्या संस्थांनीं केली होती. घर मोडून तेथें आपल्या खर्चानें बाग करून देण्याची मागणी आरोग्यमंडळ, शिशु-संगोपन-संस्था, टोळ-भैरव समाज, मोकाट-मैना-मंडळ, यांनीं केली तर त्या जागीं माझ्या खर्चानें सार्वजनिक पायखाने बांधून देण्याची मागणी शरीर-स्वास्थ्य-मंडळ, अनाथ-भिकारी-संघ, यांनीं केली. माझ्या मिळकतीची ही चाललेली चिरफाड पाहून मी तर सर्दच झालों. मानपत्राचें मीं उत्तर द्यावयाचें खरें, पण माझी बोबडीच वळली. शिवाय आणखीन् चाळीस वर्षें जगल्याशिवाय

माझी आतां या जगांतून अगोदर सुटका होणार नाहीं हें उपाध्यायांच्या मंत्रसिद्ध आशीर्वादामुळें निश्चित ठरलेलें. त्या एवढ्याशा पुंजीवर, यानंतर माझा चाळीस वर्षें धामधुमीनें चालणारा संसार आणि त्या संसारांतून वाढणारा परिवार, अवलंबून होता. मीं आमच्या गांवकऱ्यांना कांहीं देण्याच्या उलट, गांवकऱ्यांनींच फंड जमा करून माझा योगक्षेम यथास्थित चालेल अशी तरतूद करणें भाग आहे असाच माझा विचार नक्की ठरला. मला मिळालेल्या मानपत्रांचे करंडे उपरण्यांत कसे बसे मीं बांधले व भाषण करावयास मी उठलों मी म्हणालों—

" सर्व नागरिकहो—

या क्षणीं अनेक विचारांनीं माझा कंठ दाटून आला आहे, म्हणून जास्त माझ्याच्यानें बोलवत नाहीं. आपण सर्वांनीं मला शंभर वर्षें आयुष्य चिंतलें याबद्दल मी आपला आभारी आहें. माझ्या हातून आजपर्यंत झालेल्या चुका इतउपर न होऊं देतां, राहिलेलीं माझीं आयुष्याचीं चाळीस वर्षें, मी मोठ्या चातुर्यानें संसार करून दाखवीन आणि आपल्या विश्वासाचें, उत्तेजनाचें, अपेक्षेचें चीज करीन असें आत्तांच्या वाढत्या काळस्वरूपी काळोखाला साक्ष ठेवून आपल्याला आश्वासन देतों. या समारंभानिमित्त माझ्यासारख्या गरीब माणसाची संपत्ति आपल्या गांवांतील या समारंभानिमित्त निर्माण झालेल्या असंख्य संस्थांच्या मोठ्या मागण्यांना पुरी कोठून पडणार ? आणि मीं तरी आपल्या संस्थांना सर्वस्व देऊन राहिलेलीं चाळीस वर्षें कशावर काढणार ? वार्धक्यामुळें मला आतां कामधंदा होणें शक्य नाहीं. तेव्हां सर्वांनीं मिळून माझा उरलेल्या चाळीस वर्षांचा योगक्षेम यथास्थित चालेल ह्यासाठीं एक प्रचंड फंड जमा करावा अशी आपणा सर्वांना माझी हात जोडून प्रार्थना आहे. पुन्हा एकवार सर्वांचे......"

माझें भाषण पुरें होण्याच्या आंतच सर्व सभागृह एकदम खवळून गेलें. श्रोते जागेवरून उठून मुठी वळून त्वेषानें, मोठमोठ्यानें ओरडून हातवारे करूं लागले. त्या गर्दींत माझ्या कानीं आरोळ्या आल्या—'महोत्सव मंडळाच्या खर्चाची काय वाट ?', 'वाजंत्र्यांची बिदागी दादा !', 'फूलमाळांची किंमत कोण देणार ?', 'छपाईचें बील ?', 'वाण्याची उधारी ?', 'मानपत्राचा खर्च कोण सोसणार ?', 'चांदीचे करंडे घ्यावयाला नाहीं लाज वाटली ? त्याचें

बिल कोण तुझा बाप देईल ?', 'थेरडा शंभर वर्षे जगतो काय ?', 'कुठें चाललास ? पकडा त्याला', 'अरे, खरंच कीं, हा तर ऐवज घेऊन पळून जातो आहे; पकडा; धरा; ठार करा.'

जास्त वेळ माझ्याच्यानें तेथें टिकाव धरवेना. उपरण्यांत बांधलेल्या मानपत्रांच्या करंड्यांकडे मी आशेनें पाहत कसाबसा दम धरून उभा होतों. फार काय पण ते खाकोटीला मारून बाहेर पडण्याचाहि मीं प्रयत्न केला, पण जेव्हां जिवावरच येऊन बेतली तेव्हां ते करंडे तसेच टाकून मी बाहेर जाऊं लागलों. एकानें माझा डोकीचा रुमाल पकडतांच त्याच्या हातांत रुमाल देऊन मी तसाच पुढें सटकलों. दुसऱ्यानें मागाहून माझा कोट पकडला, तेव्हां दोन्ही हातांतून कोट तसाच काढून टाकून जीव बचावण्यासाठीं सैरावरा मी धांवत सुटलों. त्या वेळीं चांगलाच अंधार पडला होता. मी घराकडे धांवत आलों तों घराचें दार आंतून अडसर लावून घट्ट लावून घेतलेलें आढळलें, म्हणून समोरच्या सोनोपंत सोनाराकडे भरकन् घुसलों. त्या वेळीं सोनोपंत घरांत नव्हते, त्यांची मंडळीहि नव्हती. मी गुपचूप त्यांच्या माडीवर जाऊन बंद खिडक्यांच्या फटींतून माझ्या घराकडे पाहत उभा राहिलों. गांवकऱ्यांनीं माझ्या घराचा ताबा घेतला याची आतां शंकाच उरली नव्हती. आतां पुढें काय होणार ह्याच फिकिरींत मी होतों. इतक्यांत प्रक्षुब्ध झालेला श्रोतृसमाज मोठमोठ्यानें आरोळ्या मारीत माझ्या घराकडे धांवत आला आणि त्यांतील पांच-पंचवीस लोक दरवाजा मोठमोठ्यानें ठोठावूं लागले. त्यांच्या पाठोपाठ बराचसा समाज थाप देऊन उभा होता. त्या गर्दींतच आपापसांत मारामाऱ्या सुरू झाल्या. अगदीं सोनोपंतांच्या ओसरीपर्यंत भिकूशेठ सोनारानें स्वागताध्यक्ष महाशब्दे यांचें नरडें दाबीत त्यांना रेटीत नेलें. 'कुठें आहेत पैसे ? नाहीं तर माझा करंडा परत दे.' असें बोलून तो त्यांच्या उरावर चढून बसला. दुसऱ्या एका बोहोऱ्याच्या दाढीला दोन लोक लोंबकळून त्याच्या हातांतील चांदीची पेटी हिसकावून घेत होते. इकडे तो अल्लाचा धांवा करून धूम ओरडत होता. 'अरे, ए तो बोकस मने जडली हाय. माझा नळकांडा परत मिळेल नाहीं तर मी बोक्स नहीं छोडणार.' त्यांतील पहिला हिसकाहिसकी करीत म्हणतो 'ही पेटी मला सांपडली आहे. ती माझी आहे.' त्या दोघांच्या झटापटींत

तिसऱ्यानें डाव साधला. 'ही माझी बनविलेली पेटी आहे. माझे पैसे बाकी आहेत' असें म्हणत पेटीसह तो तेथून सटकला. बिचारा बोहरी शत्रूच्या बंडीच्या बंदांना धरून खेचीत होता तर त्याचा प्रतिस्पर्धी त्याच्या दाढीला लोंबकळला होता. त्यांच्या झोंबीकडे मला पाहण्यास फुरसत नव्हती. माझ्या घराच्या पुढल्या दरवाजावर जमावांतील लोक मोठमोठ्यानें ठोठावीत होते, जोरजोरानें धक्के देत होते, आणि दरवाजाचें कुसूं उपटून ओढतांच त्याच्या फळ्या धाडकन् पडल्या; त्याच्या आवाजानें मी दचकून घराकडे पाहूं लागलों. घरांत मिणमिण जळणाऱ्या दिव्याच्या उजेडांत फक्त काठ्यासोटे यांचींच वर-खालीं होणारीं टोकें दिसत. माझ्या घरांत घनघोर कत्तल सुरू झाली. 'आय्–आय्, मेलों–मेलों' अशा हलकल्लोळांनीं एकच गिल्ला उठून गेला. माडीच्या खिडक्या कोणी तरी खाडकन् उघडल्या आणि खालील जमलेल्या जमावावर कौला-विटांचा वर्षाव तो करूं लागला. सोनोपंत घाबऱ्या घाबऱ्या घरांत आले, 'जिबलीच्या पायीं हाकनाक हा मेला' असें कांहींसें आप त्या भार्येजवळ ते कुजबुजले मी अंधारांतच त्यांच्या कानांशीं जाऊन कुजबुजलों. सोनोपंतांनीं मला धीर दिला आणि ते म्हणाले "तुम्ही सुखरूप आहांत ना ! कांहीं हरकत नाहीं; अहो, मी फौजदाराला वर्दी देऊन इकडे आलों आहें, ते शिपायांची टोळी घेऊन पाठोपाठ येतातच आहेत. अग, तो टार्च दे पाहूं. अन् आपण माडीवरून उजेड टाकून बघूं" टार्च लाईट घेऊन आम्ही वर गेलों, आणि त्याच्या प्रकाशक्षेपनाच्या आधारानें महायुद्धाचा घनघोर देखावा पाहत राहिलों.

आणि गर्दींत मला काय दिसलें ! तो भीषण देखावा पाहून मी एकदम ओरडलों "थांबा, थांबा, माझ्या जांवयाला मारूं नका ! हा मी इथं आहे, माझं वाटेल तें करा." आमच्या चिमीच्या नवऱ्याचें नरडें एकानें घट्ट धरलेलें, दुसरा त्याच्या पाठींत गुद्दे मारीत आहे, आणि त्याचे डोळे बाहेर पडून तो बेभान झालेला आहे, असा तो देखावा होता. तसें पाहिलें तर चौघां जांवयांत चिमीच्या नवऱ्याइतका कृतघ्न आणि क्रूर दुसरा कोणीच दिसत नव्हता, परंतु चिमीच्या सौभाग्यावर येऊन बेतलेली वेळ पाहतांच सूडाच्या त्वेषानें जळणारें माझें मायाळु मन एकदम द्रवलें. मी जिन्यावरून खालीं धांवत आलों, त्या धांदलींत दरवाजाची फळी माझ्या कपाळावर

आदळली, मोठी खोक पडून त्यांतून घळघळ वाहणाऱ्या रक्तानें मी न्हालों होतों असें उजेड येतांच दिसून आलें. मी रस्त्यांत उतरलों, आणि माझ्यावर चवताळलेला जमाव धांवून येणार इतक्यांत 'खबरदार, खडे रहो' असें मागच्या बाजूनें फौजदाराचें दरडावणें ऐकूं आलें. आज आमच्या गांवांतल्या यच्चयावत् प्राणिमात्राच्या अंगीं एकाएकी वीरवृत्ति संचारली होती, पराक्रमाची ऊर्मि आली होती, परंतु दरोडेखोर झाले तरी शेवटीं ते पांढरपेशेच होते. फौजदाराच्या नुसत्या दरडावणीनें ते जागच्या जागीं भीतीनें लटलट कांपत उभे राहिले. पोलीस शिपायांनीं चोहों बाजूंनीं नाकेबंदी करून एकदम गराडा दिला; त्यामुळें कोणास पळून जातां आलें नाहीं. फौजदारानें एकेकाचें मनगट धरून, दिव्याच्या प्रकाशांत खेचीत आणलें. जांवयाची सुटका आपोआपच झाली होती. मला पाहतांच ते एकदम चवताळून माझ्या अंगावर धावून आले. "थेरड्या, तुला ठार करतों, नरडीचा घोट घेतों, कशी इस्टेट लोकाला देऊन टाकतोस तें पाहतों." असें ओरडून ते माझ्या अंगाशीं झोंबलेहि. फौजदारानें धांवत येऊन त्यांची मानगूट पकडून माझी मानगूट सोडविली. कंदील माझ्या आणि जांवयांच्या तोंडापुढून ओवाळला. माझ्या डोक्यांतून रक्त टिबकत होतें, नवीन काढलेला परटीचा शर्ट रक्तानें माखलेला होता. "या बदमाषाच्या मुसक्या बांधा, माझ्या डोळ्यांदेखत यानें खुनाचा प्रयत्न केला आहे. याला फांसालाच टांगून ठार मारला पाहिजे." त्या धांदलींत जांवई चतुर्भुज झाले. बाकीच्या लोकांचीं नांवें लिहून त्यांच्या झडत्या घेऊन पोलीसपहाऱ्यांत ओळीनें त्यांना उभें केलें. मी, सोनोपंत आणि फौजदार दोन बत्तीवाले शिपाई घेऊन घरांत शिरलों. घरांत सामानासुमानाची वाताहत झालेली दिसली.माझ्या ठेवरेवीच्या पेटीचें झांकण फोडून जरीचीं चिरगुटें कोणीतरी पसरून टाकलेलीं दिसत होतीं. तेथून पुढें आंत जातों तों दोन इसम विव्हळत पडलेले दिसले. तोंडाजवळ दिवे नेऊन न्याहाळून पाहतों तों माझेच नंबर दोन अन् चारचे जांवई—म्हणजे ठकूचे व चिंगीचे यजमान. त्यांना हालवून जागे केलें. त्यांपैकीं एक थोडा लवकर सावध होऊन उठून बसला. "कुणी तुम्हांला मारलं? बाहेरच्या मंडळींतून गुन्हेगार ओळखून काढतां का?" असें फौजदारानें विचारलें, तेव्हां त्यानें उत्तर केलें, "हा मेल्यासारखं सोंग घेऊन पडला आहे ना आमचा साडू, त्यानंच माझा खून केला आहे."

" अन् तो कां म्हणून ?"

" मी त्याला पैशाच्या फरताळाची किल्ली दिली नाहीं म्हणून."

" सपशेल खोटें " निजलेले जांवई पडल्यापडल्याच एकदम बोलूं लागले. " आम्हीं तिघा जांवयांनीं सारखी इस्टेट वांटून घेण्याचं ठरविलं. हा म्हणाला चौघा मुलींचे सारखे भाग करा. एकेक आपण घेऊं आणि चौथ्याचा भाग मी नेऊन पोंचवीन. मीं नाहीं म्हटलं. आणखी हाच माझ्या अंगावर धावून आला, मला त्यानं ठार मारलं त्यामुळं अजूनहि मी बेशुद्धच आहे. आयाई, आयाई--" फौजदारानें बरगडींत ठोसा मारतांच तो शुद्धीवर आला, आणि दुसऱ्यावर उगारतांच तो मेलेला जिवंत झाला.

" पण तुम्ही तिघेजण इथं आलात केव्हां, कसे ?" मीं भीतभीत विचारलें.

" थांबा यांचे जबाबच घेतों " फौजदार म्हणाले, " काय हो, तुम्ही आला केव्हां, कशाला आलांत, आल्यापासून करीत काय होतां ? "

" आम्ही आज संध्याकाळीं सहा वाजतां आलों. आमचे सासरे ज्युबिली-निमित्तानें सर्व मालमिळकत सार्वजनिक संस्थांना देऊन टाकणार असं आम्हीं आजच्या ज्ञानप्रकाशांत सकाळीं वाचलं, लगेच निघालों तें इथं आलों. हें पाहा फौजदारसाहेब, आम्ही जांवई, मुली, असतांना यांचा मालमिळकतीवर कांहींहि हक्क नाहीं. मी वकिलाच्या कारकुनाची सल्ला घेऊन आलों आहे. आम्ही आपल्या हक्कांसाठीं झगडत आहोंत. आम्हीं कांहीं कोणाचा गुन्हा केला नाहीं." जामात म्हणाले.

" मारामारी केली तरी ती आम्हीं आपापसांत केली आहे." दुसरे जामात उद्गारले.

* * *

## ( ४ ) फलश्रुति

दुसऱ्या दिवशीं सकाळीं एकच गर्दी माझ्या दारापुढें जमली फौजदारानें पकडलेल्या लोकांचे नातेवाईक, बायकामुलें, आप्तस्वकीय ह्यांची तुफान गर्दी जमली आणि ' कसेंहि करून आमच्या ह्यांना सोडवा ' अशा दरेकजण माझ्यापुढें पदर पसरून विनवणी करीत होते. लूटमार करणें, दरोडा घालणें, गृहप्रवेश करणें, चोरी करणें, ठार मारण्याची धमकी देणें, अशा एका-

हून एक वरचढ आरोपांखालीं सर्वांना गिरफदार करण्यांत आलें होतें, आणि त्या सर्व प्रतिष्ठित लोकांनीं सारी रात्र फरासखान्यांत अटकेंत जागून काढली होती. मानपत्राच्या करंड्यांवर, नळकंड्यावर माझें नांव कोरलेलें, तीं मला बक्षीस मिळालेलीं,'अशा स्थितींत तीं घेऊन जाणारे उघड चोरच ठरले. माझ्या घरावर हल्ला करणारे लुटारू, दरोडेखोर ठरले. सर्व बाजारबुणग्या संस्था विरघळून गेल्या आणि त्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार सर्व माझे गुन्हेगार ठरून माझ्या दयेची याचना करूं लागले.

माझे तिन्ही जामात एका रात्रीच्या कच्च्या कैदेनें अगदीं मऊ होऊन गेले होते. पैकीं आपापसांत लढून थकलेल्या दोन जांवयांना खाण्यापिण्यावांचून रात्रभर कच्च्या कैदेंत, केल्या कर्माच्या पश्चात्तापाचा दगड उगाळीत, काल कंठावा लागला, ही शिक्षा पुरे झाली होती. माझ्यावर खून करण्यासाटीं धावून आलेल्याला जास्त शिक्षा होणें जरूर होतें. परंतु 'हा खून करणार होता, याला फांसावर लटकावला पाहिजे' हे फौजदारांचे उद्गार माझ्या कानांत भेसूर स्वरांत घुमत होते. मीं सर्व जांवयांना बिनशर्त माफी दिली. फौजदारांची समजूत घालून प्रथम त्यांना सोडवून मीच त्यांना घरीं आणलें. घरीं येतांच ते पुन्हा वर्दळीवर येतील असें मला वाटलें, परंतु तें आल्यापावलींच निमूटपणें परत गेले. झालेल्या फजितीबद्दलचा राग जो तो आपल्या बायकोवर म्हणजे माझ्या मुलींवर काढील या धास्तीनें त्यांचा राग शांत होईतोंवर राहून घेण्याबद्दल मीं पुष्कळ आग्रह केला, परंतु कांहींच उत्तर न देतां ते निघून गेले.

गांवकऱ्यांचें भिजत घोंगडें तसेंच पडलें होतें. त्यांच्याशींहि मला आतां जमवून घेणें जरूर होतें. त्यांच्यांतच मला अजून तब्बल चाळीस वर्षें काढावयाचीं होतीं. मीं गांवकऱ्यांशीं तडजोड केली कीं, चांदीचे करंडे, नळकंडीं, हीं माझ्या मालकीचीं ठरविण्यांत यावींत व मला मिळावींत. मला अर्पण करण्यांत आलेलीं सर्व मानपत्रें गांवकऱ्यांच्या खर्चानें सुंदर फ्रेमींत मढवून मला मिळावींत. ज्युबिलीमंडळानें मानपत्रांचा एक गौरव-ग्रंथ छापून त्याची घरोघरीं एक प्रत गांवकऱ्यांना किंमत घेऊन सक्तीनें वांटण्यांत यावी. गांवकऱ्यांची सुटका तावडतोब झाली.

तहाच्या अटी नक्की होतांच, त्यांपैकीं करंडे, नळकंडीं माझ्या ताब्यांत येण्याचें आणि मानपत्रांना फ्रेमी मढवून देण्याचें, अशीं हीं तीन कामें त्याच दिवशीं पार पडलीं. माझें कांचेचें फडताळ चांदीच्या जिनसांनीं चकचकूं लागलें. माझे डोळे आनंदानें चमकूं लागले. गोठ्यासुद्धां सर्व घराच्या भिंती मानपत्रांच्या तसबिरींनीं आच्छादून गेल्या. अलौकिक पराक्रमाच्या प्रशंसांनीं माझें मन आनंदांत डोलूं लागलें.

मानपत्रांचा छापील ग्रंथहि प्रसिद्ध झाला. 'रौरवग्रंथ' म्हणून तो जाहीर झाला. मुद्राराक्षसानें गौरवाचा रौरव केला म्हणून मी संतापलों पण काय उपयोग ! मी माझ्या फौजदारी फिर्यादी केव्हांच काढून घेतल्या होत्या, तेव्हां गांवकऱ्यांचें नाक माझ्या मुठींतून सुटलें होतें.

तथापि, हा हीरक महोत्सव आमच्या गांवकऱ्यांच्या सदैव ध्यानांत राहिला खरा. आणि असेच उत्सव दरवर्षी माझे गांवकऱ्यांनीं करावेत, निदान माझ्या ऐंशीयाव्या वर्षीं जरूर करावे अशी मनांतून माझी इच्छा खास आहे.

## आजचा पुणेकर : १

सर्वंध महाराष्ट्रांत, किंबहुना सबंध हिंदुस्थानांत, पुणें हें जसें अजब शहर आहे, तद्वतच महाराष्ट्रीय जनतेंत, किंबहुना अखिल हिंदी लोक-समुदायांत पुणेकर हा, एक अजब इसम असा भासतो. पुणें शहराशीं संलग्न असलेल्या कित्येक ऐतिहासिक आख्यायिकांशीं अर्थाअर्थीं याचा कांहीं संबंध नसतांहि त्या आख्यायिकांतील अनेक पराक्रमांवर तो आपला वारसाई हक्क आज तारखेसहि सांगून इतर प्रांतीयांना दटावण्या दाखवितो. बेफाट पेन्शनरांच्या बुरसलेल्या विचारांनीं आणि निर्बुद्ध सनातन्यांच्या आचरट आचारांनीं होणाऱ्या कोंडमाऱ्यांत निकोप विचार पोसतच नाहींत, म्हणूनच 'पुणें तें जुनें' अशी म्हण पडलेली असावी. एका अर्थानें 'पुणें हें नवें'हि आहे. गतकालीन गोष्टींची जोपासना तेथें नव्या गोष्टींप्रमाणें होत असते. पेशवाईतील भोक्ते ब्राह्मणांचे पराक्रम आजमितीसहि करून दाखविणारा भिक्षुकवर्ग जरी सोडला, तरी नाना फडणविसाच्या हिकमतीच्या, टिळक-आगरकरांच्या वादविवादाच्या, कॉंग्रेसमंडप जाळून टाकण्याची दहशत घालणाऱ्या दातेशाही आडमुठेपणाच्या, गाढवांचीं लग्नें लावणाऱ्या जोशी-छाप विक्षिप्तपणाच्या गोष्टींत जरूर असणारी कल्पकता, धाडसी वृत्ति व विक्षिप्तपणा, आज तारखेसहि तेथील ब्राह्मणवर्गाच्या रोमरोमांतरीं खेळत असावा असा क्षणैक तरी त्यांच्या बोलण्याच्या ऐटीवरून भास होतो. ब्राह्मणेतर मंडळींनींहि या कामीं समांतर अशी स्पर्धा चालविलेली आहे. शिवाजी-शाहिस्तेखानाचें कारस्थान आपला मोठा भाऊच शिवाजी हा

आजच करून दाखवीत आहे अशा डौलानें मराठे मंडळी इतर वर्गाकडे पाहत आहेत; आणि कित्येक जोतिबा फुले यांच्या हातांतल्या बडग्यांनीं ब्राह्मणांची पाठ मऊ करण्याच्या बेतांत आहेत. विद्वत्तेंत पुरुषवर्गास खालीं पाहण्यास लावणाऱ्या मैत्रेयी, गार्गेयी आज तेथील विदुषींच्या देहांतून संचार करीत असाव्याशा भासतात, तर मंडई, बाजार, सभागृहें, नाटकगृहें इत्यादि स्त्री-पुरुष पराक्रमाच्या समानक्षेत्रावर पुरुषवर्गास मागें ढकलण्यांत झांशीच्या लक्ष्मीबाईचें क्षात्रतेज आमच्या पुणेकर भगिनींच्या ठिकाणीं अजून चमकत असतांना दिसेल. थोडक्यांत सांगावयाचें तर कोणतीहि पौराणिक, ऐतिहासिक, अगर काल्पनिक घटना घ्या, ती आत्मसात् करण्याची हातोटी पुणेंकरांना अगदीं बेमालूम साधलेली आहे. यावरून मात्र असें कोणीं समजूं नये कीं, पुणें हें एक गतानुगतिकांचें शहर आहे. ' वाळल्याबरोबर ओलेंहि जळतें. ' जुन्या संस्कृतीच्या बुजबुजाटाबरोबर नवीन व अद्ययावत् सुधारक चाळयांचाहि येथें सुळसुळाट झालेला आहे. स्नानसंध्यादि धार्मिक संस्कारांची व खाद्यपेयांच्या विधिनिषेधांची अटक ओलांडून पुनर्विवाह, मिश्रविवाह, प्रीतिविवाह, स्वैरविहाराच्या प्रांतांत धुमाकूळ घालण्याचा मान प्रथम जर कोणास मिळाला असेल तर तो पुणेकर चित्पावन ब्राह्मणांस होय. आजही तरुण मंडळींच्या ( स्त्री-पुरुष ) स्वैर वर्तनाचा हैदोस, झपूर्झा पाहणें असल्यास तो पुण्यासच सांपडेल. तस्मात् पुणेकर म्हणजे नव्या जुन्या संस्कृतींच्या उघडझापींत वाढलेली एक अजब वल्ली आहे.

पुणेकर निसर्गतः सामान्य असून स्वतःस मात्र तो एक असामान्य प्राणी समजतो. इतकेंच नव्हे, तर प्रांतीय लोक त्याला चांगलेच वचकून असतात. दूर देशांत धंद्याच्या निमित्तानें पुष्कळ पुणेकर तात्पुरते अगर कायमचे राहणारे आहेत. त्या दरेक ठिकाणीं ते आपल्या अंगांतील वैशिष्ट्य दाखवून पुणेकरांची कीर्ति अजरामर करीत असतात. पुणेकर या शब्दप्रयोगांत, पुण्यास जन्मलेल्या, शिक्षण संपादिलेल्या अगर तात्पुरत्या वा कायमच्या राहणाऱ्या उभयलिंगी व्यक्तींचा समावेश होत असतो आणि त्याच अर्थानें येथेंहि पण हा शब्द योजिलेला आहे.

एके काळीं पेशवाईची राजधानी म्हणून गाजलेल्या पुणें शहरांतून सबंध हिंदुस्थानच्या राजकारस्थानाचीं सूत्रें हालत असत. फार काय पण दिल्ली–

पतींना पदभ्रष्ट करून त्या ठिकाणीं दुसऱ्यांची नेमणूक करावयाची, निरनिराळीं राज्यें जिंकून त्या त्या ठिकाणीं मराठेशाहीचीं प्रतिराज्यें स्थापावयाचीं, असा राज्यांचा कारभार तेथील रहिवाश्यांनीं अनेक वर्षें मोठ्या धडाडीनें केला. इंग्रजशाही गाजूं लागली तरीसुद्धां तिच्या भपक्यास अगर भीतीस न जुमानतां हिंदी लोकांच्या हक्कांची चळवळ प्रथम पुण्यानेंच सुरू केली आणि अढळ ध्येयाच्या प्राप्तीकरितां खडतर तुरुंगवासादि हालअपेष्टा सोसणारे लोकनायक पुणेकरांमधूनच निपजले. ही एक तेथील लोकांना त्यांच्या आजच्या पडत्या काळांत अभिमान बाळगण्यासारखी गोष्ट उरली आहे. दुसऱ्या प्रांतांवर राजकारस्थानाची व तदनंतर राजकारणाची सत्ता गाजविण्याचा मान सारखा बरींच वर्षें मिळत गेल्यानें इतर प्रांतीय लोकांना व विचारांना कस्पटासमान लेखण्याचा तेथें प्रघातच पडलेला दिसतो. बायकांपोरांसुद्धां स्वतःस प्रत्येकजण कोणी मोठा दुढ्ढाचार्य समजतो आणि स्वतःच्या पराक्रमाला इतरत्र जोड मिळणें शक्य नाहीं असें मानतो. यासाठीं दुसऱ्या प्रांतांतील पुढारी पुण्यास येऊन आपल्या पक्षास अनुयायी मिळवूं म्हणतील तर पांजरपोळांत पाठविण्यास योग्य झालेल्या पांचदहा कुचकाम्यांशिवाय त्याला कर्तबगार नव्या दमाचा असा एकहि अनुयायी मिळावयाचा नाहीं.

पुणेकर व्यक्तिस्वातंत्र्याचा व मतस्वातंत्र्याचा शंभर टक्के भोक्ता असतो. विरोधींच काय पण असंबद्ध वर्तनांनीं तो व्यक्तिस्वातंत्र्याची पूजा बांधील, तर पूज्य जिव्हाळ्याच्या व गंभीर विचारांच्या ललितांनीं मतस्वातंत्र्याची आरती करील. हें मतस्वातंत्र्य इतक्या थरावर गेलें असेल कीं, प्रत्येक व्यक्तीला मत असून तें प्रचलित कोणत्याहि पक्षापासून अगदीं भिन्न असेल. तेथील लोकांनीं कोणतेहि व कितीहि पंथ काढले तरी त्यांत पुणेकरांपैकीं अनुयायी अगदीं बोटांवर मोजण्याइतकेच असावयाचे. महान् विभूति पुण्यास होऊन गेल्या. परंतु त्यांच्या हयातींतच त्यांच्याबद्दल अनादर व वेळीं तुच्छता दाखविणारे पुण्यास अनंत लोक होते व आजवरहि हयात आहेत. जहाल-मवाळ, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, सुधारक-दुधारक, फेरनाफेर, सनातनी-पुरोगामी, चौंडेकरी-सावरकरी, किर्लोस्करी-इचलकरंजीकरी, या परस्परविरोधी द्वंद्वांना एकाच ठोकरीनें उडवून देणारे लोकहि पुण्यास कांहीं थोडे नसतात. एखाद्या पक्षाचे अनुयायी जर ते कांहीं कारणाकरितां

झालेच तर ते तात्पुरतेच असावयाचे. शिवाय प्रतिपक्षी वैयक्तिक टीका जितकी करणार नाहींत, तितकी टीका आपल्या पुढाऱ्यांची हे अनुयायी करतील. दरेकास प्रत्येक पक्षाचा कार्यक्रम व उद्देश अगदीं नापसंत वाटतो; आणि या भिन्न मतप्रतिपादनाच्या भरीस लागल्यानें त्याला स्वतःचा विशिष्ट पक्ष अगर कार्यक्रम आंखण्याची जरूरीच कधीं भासत नाहीं. तुमचा कार्यक्रम काय आहे ? असला साधा प्रश्नहि भल्याभल्या वाक्पंडितांना गोंधळून सोडील. 'नऊ मध्ये आणि दहा चुली' ही म्हण मतांच्या बाबतींत अपुरी पडते; कारण दहाव्या सार्वजनिक चुलीमधून तरी नऊ जण विस्तव घेतात. पण पुणेकर हा आपलीं मतें बनवितो त्या वेळीं तो कोणाचीं उष्टीं मतें कधींच स्वीकारीत नाहीं. त्याचें राजकारण अगर समाजशासन म्हणजे भोंवतालीं शेजाऱ्यापाजाऱ्यानें चालविलेल्या कार्यक्रमांवर अनाहूत व वावदूक टीकेचा भडिमार उडवावयाचा. त्या पैकीं कांहीं कार्यक्रम कालांतरानें निष्फल निवड-ल्यास आपल्या टीकेचा विषय संपला म्हणून स्वस्थ न बसतां आपण अमुक सालीं केलेलें भविष्य कसें तंतोतंत खरें ठरलें हें इतरांना पटवून देण्याचें त्यास स्फुरण चढेल. त्याच्या कमकुवतपणाबद्दल परप्रांतीय भले त्याची थट्टा करोत, हा भविष्यवादी स्वतःला सर्व अव्वल दर्जाच्या पुढाऱ्यांहून श्रेष्ठ समजेल, स्वतःचा गौरव स्वतःच करून घेईल.

पुणेकर छिद्रान्वेषी तसाच तो कल्पकहि पण असतो. आपापल्या योजना, युक्त्याप्रयुक्त्या, कल्पना, प्रयोग, सिद्धान्त पुणेकरांना दाखवून त्यांनीं पास केल्यावरच त्याचा प्रसार करावा असा आदरभाव महाराष्ट्रीय लोकांत अजूनहि आहे. अशा प्रसंगीं छिद्रान्वेषणाचें कार्य पुणेकर जितकें अचूक आणि परिणाम-कारक करतो, तितकेंच सयुक्तिक सूचना करण्याचें काम त्याच्या हातून होत नाहीं असें प्रत्ययाला आलें, तरी 'बीचमें मेरा चांदभाई' अशा प्रकारची पुणेकराची कांहीं तरी नवीन व क्षणैक का होईना पण इतरांना चकित करणारी एखादी शकल ही असावयाचीच. बाहेरगांवाहून पुणेकरांची सल्ला घेण्याच्या सदिच्छेनें जे लोक येतात त्यापैकीं कितीजणांना त्यापासून फायदा होतो हें सांगणें कठीण आहे. परंतु 'राजी करणें पुणेकराला !' कठीण आहे अशी छाप त्यांच्या मनावर बसते. येथील लोक निर्भीड असतात; ते इतके कीं परप्रांतीय लोक त्या निर्भीडपणास बिनमुरवतखोरपणानें संबोधतील.

तेव्हां त्यांचा अभिप्राय जितका प्रतिकूल तितकाच तो निर्भीड असावयाचा. स्पष्ट बोलण्यांत आपण प्रति रामशास्त्रीच आहोंत ही भावना सदैव जागृत असल्यानें दुसऱ्याच्या मनास न लागेल असा शब्दप्रयोग योजण्याची खबरदारीहि पण त्याला ध्यावीशी वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर ऐकणाराचें मन 'किं शतधा न याति' अशी हळहळण्याची मागाहून वेळ न यावी म्हणून शक्य तितकी प्रखर वाणीच तो उपयोगांत आणतो. त्याच्या कडक भाषेंत सत्यनिष्ठेचा, युक्तीचा व शहाणपणाचा गंधहि नसला तरी आत्मश्लाघेचा अगदीं सुकाळ दिसेल व दुसऱ्यास वाटावें कीं, ही कल्पना पुणेकराला पूर्वींच सुचली असतांही केवळ क्षुद्र म्हणून त्यानें ती टाकून दिली. या स्पष्टवक्तेपणामुळें आणि छिद्रान्वेषणामुळें इतर प्रांतीय लोक पुणेकरांस गुणज्ञ समजतात, आणि पुण्यास जाऊन वाहवा मिळविण्याची हौस जो तो धरतो. विद्यार्थि, हरिदास, पुराणीक, वक्ता, गाणारा, वाजविणारा हेच काय, पण आपली विद्या कसोटीस लावण्याची ईर्षा मनांत बाळगणारा हरेक विद्येंतील निष्णात व कलावंत पुण्यास एकवार येऊन गेला नाहीं तर त्याला जन्मभर चैन पडावयाचें नाहीं. नाटक कंपन्यांचा तर अगदीं सिद्धान्त आहे कीं, नवीन नट आणि नाटक यांची पुण्यास हुर्रेवडी उडाली नाहीं तर त्यांस इतर ठिकाणीं वाहवा मिळेल आणि पुण्यास जर शाबासकी मिळाली तर ती अलम दुनियेंत अजिंक्य म्हणून मिरवितील.

पुणें शहरीं बऱ्याचशा शिक्षण-संस्था असल्यानें तेथें अनेक दर्जाचे विद्यार्थि आणि हरेक प्रकारचे शिक्षक यांचा फार मोठा भरणा असतो. शिक्षणसंस्था, शिक्षक आणि विद्यार्थि यांच्या अफाट संख्येवरून बाहेरगांवचे लोक पुणें हें विद्येचें माहेरघर आहे असें समजतात. अज्ञान अवस्थेंतून तो सुशिक्षित अवस्थेपर्यंत विद्यार्थ्यांना पोंहोचवून, कार्यक्षम होतांच इतर प्रांतांत त्यांच्या खऱ्या उमेदीच्या कर्तबगारीसाठीं त्यांना पाठवून देणारें पुणें शहर, लहानपणापासून संगोपन करून वाढविलेल्या मुलीची, ती वयांत येतांच सासरीं बोळवण करणाऱ्या प्रेमळ मातेप्रमाणें भासते खास; परंतु मुलीची कर्तबगारी व शहाणपण यांची पारख, आणि तिचा उत्कर्ष जसा सासरीं अधिक होतो तद्वतच परप्रांतांत जाऊन राहणारेच पुणेकर शेवटीं विद्येस परिणतावस्था प्राप्त करून देतात, असेंहि म्हटलें तरी वस्तुस्थितीशीं पुष्कळ

अंशीं जुळतें असून उपमेची पूर्तताहि पण साधते. माहेरीं मुलगी जशी अल्लड, बढाईखोर, आळशी, मानी व दुसऱ्यावर कारणावांचून आणि सत्तेवांचून हुकमत चालविणारी दिसते, तद्वतच पुणें शहरांत विद्या ही अपरिपक्व, वाचाळ, उद्योगहीन, उद्धट, उपद्व्यापी व घमेंडखोर अशी भासत असल्यास त्याचें खरें कारण या उपमेचें सादृश्यच समजलें पाहिजे. सर्व जगांत अद्वितीय बुद्धिमत्तेबद्दल अजिंक्यपदास पोंचलेले व ज्यांच्या निवासानें पुण्यपत्तन पुनीत झालें अगर होत आहे, अशा मोजक्या व्यक्ती सोडून दिल्या तर, पुण्यांतील पट्टीचा विद्वान् हा व्यासंगापेक्षां अनभ्यासानें, लीनतेपेक्षां गर्वानें, समंजसपणापेक्षां दुराग्रहानें, उद्योगापेक्षां आळसानेंच पछाडलेला असल्यामुळें अगाध ज्ञानाच्या तर गोष्टीच नकोत पण त्या त्या विषयापुरतें जरूर तें ज्ञानहि कित्येकांना असेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. पुण्यांत राजकीय चळवळीवर घरोघरीं वादविवाद होत असतात, रोज खासगी व जाहीर भाषणें होत असतात, वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून निघत असतात, परंतु ज़ुजबी, बालिश, टाकाऊ लौकिक व व्यवहारिक मुद्द्यांखेरीज तात्त्विक अगर वरच्या दर्जाच्या तार्किक वादाच्या मुद्द्यांचें त्यांत विवेचन होत असेल तर शपथ! कॉंग्रेसला जाणारे पुणेकरप्रतिनिधि इतर प्रांतीयांच्या राजनैतिक तत्त्वाविष्करणानें, ऐतिहासिक समालोचनानें, धडाडीच्या कार्यक्रमानें जितके चकित होतात, तितकेच इतर प्रांतीय पुढारीहि पण यांच्या राजनीतिशास्त्रसिद्धांतरहित अशा अगदीं व्यावहारिक क्षुद्र युक्तिवादानें विस्मय पावतात. विषयनियामक कमिटींत एखाद्या वेळीं धीर करून कोणी चुकून एखादा शब्द बोलला तरी अंगांत चढलेला आवेश खुल्या कॉंग्रेसमध्यें भाषण करून न संपवितां त्याच्या भांडवलावर शिवाजीमंदिरांत व्याख्यानमाला ठोकून देण्याचा ज्याचा त्याचा कावा असतो. वरिष्ठ कौन्सिलें घ्या, कनिष्ठ कायदेमंडळें घ्या, विश्वविद्यालयीन सिनेटें घ्या, अगर पुणें शहराबाहेर भरलेली कसलीहि सभा घ्या, त्यांत पुणेकराचें तोंड उघडलेलें क्वचितच आढळतें. मात्र त्यानें काय भाषण केलें असतें तें प्रत्यक्ष दिल्याचें ठरवून पुणेरी वर्तमानपत्रें त्याची विस्तृत नोंद घेण्याचें मुळींच विसरत नाहींत. आणि बैठक संपण्याचा अवकाश कीं दिल्ली-सिमल्याच्या बैठकीवर शिवाजीमंदिरतांत झोड

उठलीच म्हणून समजा. पुणेकरांचें मोठें वर्म म्हणजे इंग्रजी बोलण्या-लिहिण्यांतील बिनवाकबगारपणा. इंग्रजी न बोलतां आल्यामुळें इतर प्रांतांत ते 'बाळवेंटांत सांपडलेल्या सुसरीप्रमाणें,' हतवीर्य ठरतात. आपला पक्ष खरा असतांहि इंग्रजी बोलण्याच्या कलेच्या अभावीं हकनाक आपली फजिती होत आहे असें पाहून तर ते जास्तच वरमतात. हें वैगुण्य काढून टाकण्यासाठीं सुमारें वीस वर्षांपूर्वीं जुन्यानव्या पुढाऱ्यांनीं इंग्रजी भाषणाची कसरत करण्याच्या उद्देशानें दाणेआळी सार्वजनिक दिवाणखान्यांत व्याख्यानें करण्याचा उपक्रम केला होता. परंतु वक्ते आणि श्रोते उभयतांहि कंटाळून भाषणाच्या तात्पर्याविषयीं कष्ट पावूं लागल्यानें तो कार्यक्रम बंद करावा लागला. पुण्यास कोणी परप्रांतीय भाषण करण्यासाठीं यावा म्हणजे मग इंग्रजींतून प्रास्ताविक व समारोपाचें भाषण करतांना पुणेकर पुढाऱ्यांची कोण तारांबळ उडते!

पुण्यास शाळा, कॉलेजें अगणित आणि अनंत प्रकारचीं आहेत. तसेंच मास्तरवर्गाहि अफाट आहे. पंतोजी वर्गांत उच्चनीच भाव रूढ होऊन प्रोफेसर व शिक्षक असे दोन ठळक वर्ग उत्पन्न झाले असले तरी प्रोफेसरांची संख्या अमर्याद फुगलेली आहे. स्वार्थत्यागी मोठमोठ्या हुद्द्यांच्या सरकारी नोकऱ्यांचा अव्हेर करणारे आणि विद्याव्यासंगास वाहून घेतलेले आमरण विद्यार्थी असा निरनिराळ्या संस्थांतून काम करणाऱ्या प्रोफेसरांचा एकेकाळीं लौकिक होता. पण आजकाल पाहावें तों सरकारी हलकी नोकरीहि न मिळाल्यामुळें योग्यतेपेक्षां जास्त वेतन मिळविणारे स्वार्थत्यागाच्या नांवाखालीं वावरणारे, गरजू, जिकिरीस आलेल्या पोटभरू लोकांचाच भरणा त्यांच्यांत होऊं लागला आहे. तेव्हां रोजच्या प्रपंचाच्या फिकिरींतून सुटका करून घेण्यासाठीं प्रोफेसराचा पेशा पत्करणारे विद्याव्यासंगपराङ्मुख निघाले आणि टिपणीपुस्तकें, खासगी शिकवण्या, युनिव्हर्सिटीचे परीक्षिक्या, याच व्यवसायाच्या पाठीमागें लागत असले तर त्यांत नवल तें काय? येथें वकिलांचा सुळसुळाटहि कांहीं कमी नाहीं. पुण्यास हवा चांगली, धंद्यास कार्यक्षेत्र विस्तृत म्हणून तेथें मुद्दाम वकिली करण्यास कोणी येतात अशांतला फारसा प्रकार होत नाहीं. पण दुसरीकडे जाण्यास जागाच नाहीं असें मानून, आपल्या घरांत राहून घरभाड्याची बचत करणारे, पेन्शनर वडिलांच्या दीर्घायुष्यांत आपल्या सांपत्तिक सुस्थतेचें प्रतिबिंब पाहून त्यांची जोपासना करणारे, अगर वाडवडिलांनीं मिळवून ठेवलेल्यावर ऐत्या रेघा

ओढणारे, असेच त्यांतले बहुतेक असतात, त्यामुळें धंद्यांत पुढें येण्यास लागणारी जरूर ती धडाडी, टापटीप, वक्तशीरपणा, कायद्याचा व्यासंग, व्यवहारचातुर्य यांची त्यांतल्या पुष्कळांना तोंडओळखहि नसते. पुण्यास दर घरांत एक सायकल व एक ग्रॅज्युएट पडलेले सांपडतील, तर दर दोन घरांआड एक वकील व चार घरांआड एक डॉक्टर आणि आठ घरांआड एक पोपट सांपडेल, इतका येथें सुशिक्षितांचा सुकाळ आहे. कावळ्यास मारण्यासाठीं जर कोणी घाईनें रस्त्यांत दगड उचलला तर त्याच्या हातीं प्रोफेसर नाहीं तर वकील, निदान एखादा ग्रॅज्युएट तरी येईलच. परंतु या शिक्षणाच्या सुकाळाबरोबर उच्च प्रकारची बुद्धिमत्ता असून सतत उद्योग करणारांचा तितकाच ठणठणाट भासतो. पुष्कळ पाऊस सारखा पडत राहिला म्हणजे पिकें खुरटतात तसा प्रकार तर नसेल ना होत ?

पुणेकरांत बढाईखोरपणा हा गुण अगदीं उपजत सांपडतो. सार्वजनिक अगर वैयक्तिक स्वरूपांच्या बाबतींत हा गुण सारख्याच प्रमाणांत सांपडतो. तेथील लोक चळवळे आणि कर्तबगार असतात. ह्या गोष्टींमुळें बढाईखोरपणा पुष्कळ वेळीं संपादला जातो. आपण जी राजकीय, सामाजिक, धार्मिक, जागतिक चळवळ आणि उलथापालथ प्रत्यक्ष घडवून आणली आहे त्याची इतर प्रांतीयांना कल्पनाहि करतां येणार नाहीं असा या पुणेकरांचा गैरसमज झाला असल्यामुळें क्षुद्र कृतीचाहि मोठा उठाव ते शब्दानें करून दाखवितात. तेथील निरनिराळ्या संस्था चांगलें कार्य करीत नाहींत असें नाहीं; परंतु त्या दरेक संस्थेपुढें हिंदुस्थानांत इतरत्र काम करणारी कोणतीहि तत्सम संस्था फिकी पडेल असा ज्या वेळीं बडेजाव मारण्यांत येतो त्या वेळीं हंसूं आल्याशिवाय राहत नाहीं. प्रत्येक लहानसहान गोष्टीचाहि येवढ्या मोठ्यानें डांगोरा पिटण्यांत येतो कीं, बाहेरच्या मनुष्यास वाटावें कीं कांहीं तरी भव्य कृति जन्मास आली आहे. शिवाजी-मंदिरांतील शिवाजीचा अर्धपुतळा अगर रेमार्केटमधील कै. चिपळूणकरांचा पुतळा ज्या वेळीं बसविण्यांत आला त्या वेळचीं पुणेरी वर्तमानपत्री भडक वर्णनें वाचणाऱ्यानें समक्ष ते पुतळे पाहतां त्याची पुणेकरांबद्दल, त्यांच्या भव्यतेच्या कल्पनेबद्दल काय कल्पना झाली असेल ? शेतांत पांखरें न बसावीं म्हणून भेवडावणीं उभीं केल्याप्रमाणें ते पुतळे कोणास भासले, त्यांत

दोष असलाच तर तो क्षुद्र कृतींचा आहे, पाहणाऱ्याच्या दृष्टीचा नव्हे. पुणेकर पुढारी बाहेर अशा झोकानें बोलतात कीं, जणूं सर्व पुणें शहर त्यांच्या हुकुमाचे बंदे गुलाम म्हणून उभें आहे. परप्रांतांत गेले तर सबंध महाराष्ट्र आपल्या हुकमतींत आहे असा भास ते क्षणैक उत्पन्न करतात. मात्र वस्तुस्थिति अशी असते कीं बहुतेक विद्यमान पुढाऱ्यांना अगर डांगोरा पिटला गेलेल्या प्रतिष्ठितांना शेजारीपाजारीहि खुद्द पुण्यास हिंग लावून विचारीत नाहींत. स्वराज्याच्या वैभवाचें, पराक्रमाचें व हुकमतीचें सुंभ पेशवाईच्या चितेंत जळलें तथापि कर्तबगारी, हिंमत व हुकमत गाजविणाऱ्या वृत्तीचे पीळ अजूनहि जळून गेले नाहींत, असें म्हणून त्यांच्या या गुणाचें कौतुक करावें लागेल.

बढाईखोरपणा व्यक्तिमात्राच्या अंगांत अगदीं मुरलेला. येथील पुरुष जेवढा स्वतःच्या ज्ञानाविषयीं, कर्तबगारीविषयीं प्रौढी मारणारा तितकाच स्त्रीवर्ग श्रीमंती आणि व्यवहारकुशलता यांबद्दल गर्व वाहणारा सांपडेल. स्वतःची गरीबी विनयानें बोलून दाखविणारीं पूर्वींचीं थोडीं खानदानीचीं जुनीं घराणीं सोडलीं तर, आपण श्रीमंत नाहीं असें कबूल करण्यास कोणीहि तयार होत नाहीं. ब्राह्मणसाम्राज्याची राजधानी म्हणून गाजलेल्या पुणें शहरांत खुद्द राजाचें ऐश्वर्य लयास गेलें तरी घरोघरचा डामडौल व भपका तिळमात्रहि कमी झालेला दिसत नाहीं. खऱ्याखोट्या दागदागिन्यांचा सुळसुळाट मुंबईस फार, असें पुणेकर म्हणतात; पण वास्तविक पाहतां दागदागिन्यांचा ठराविक संच ठेवण्याची कल्पना झुगारून देणाऱ्या मुंबईकरांना कसलीच पर्वा नसते. उलट रावबाजीच्या कारकीर्दींत जसा होता तस्साच्या तस्सा, दारिद्र्याच्या डोहांत गटंगळ्या खात असतांहि तो संच कायम ठेवण्याच्या हट्टास पेटलेला पुणेकरच, त्याचा जास्त उपयोग करीत असेल हें म्हणणें सयुक्तिक दिसतें. पुणें हें ब्राह्मणांचें विवाहक्षेत्रच समजलें जातें. तेथें ब्राह्मणजातीचें केंद्र असल्यामुळें सर्व दर्जाचे आणि वाटेल त्या किंमतीचे वधूवर लग्नाच्या बाजारांत अनायासें मांडलेले–असतात–मिळतात, म्हणून तेथें येणारे परप्रांतीय लोक पुष्कळ असतात. इतकेंच नव्हे तर, वैवाहिक समारंभास जरूर असणाऱ्या जिनसा हरहमेश तेथें मिळत असल्यानें उभयवधूवर परप्रांतीय जवळजवळच्या गांवचे असतांना देखील त्यांचे लग्नसमारंभ पुण्यास साजरे होतात. लग्नसराईंत येथें दरेक मुहूर्तावर शेंकड्यावारी लग्नें लागतात. येवढा दांडगा

देवघेवीचा व्यापार जेथें होतो तेथें अर्थात् सट्टेबाजी न डोकावली तरच नवल! हुंड्याच्या रकमांचे आंकडे एकेकांचे फुटावयाला लागले म्हणजे लिव्हरपूल, अमेरिकन, मँचेस्टर कापसाच्या वायद्याचे भाव बाहेर पडल्याप्रमाणें भासतात. सट्टेबाजारांत ज्याप्रमाणें कांहीं आंतबट्ट्याचा व कांहीं बरोबरीचा आणि कांहीं नफ्याचा व्यापार होतो तसाच मुलींच्या बापांचा होतो. मात्र पुणेकर वराच्या बापाचा व्यापार नेहमीं फायद्याचाच व्हावयाचा. लग्नांतील सपशेल फसवणुकीचे प्रकार पुण्यांत जेवढे हरहमेश पाहण्यास मिळतात तितके इतर ठिकाणीं क्वचितच मिळतील. हुंड्याची वाटेल ती रक्कम सांगण्यास पुणेकराचीच जीभ रेटेल, इतरांची रेटणें शक्य नाहीं. मॅट्रिक झालेला, स्वयंपाकीणबाईचा, वारानें जेवणारा बेकार मुलगा पत्करण्यास तयार झालांत तरी हजार-बाराशेंच्या पुढें उडी! मात्र लग्नसमारंभांतील दुर्मिळ शोभा आणि सौख्य हीं पुण्यासच सांपडतात. मोठाल्या नथा, पेट्या, पेंडीं, कुडीं आणि भरजरतारी भारी शेले या युनिफार्मांत सजलेल्या देखण्या स्त्रियांमुळें मिरवणुकीस शोभा येते. पैशाव्यतिरिक्त दरेक बाबतींत नमतें घेणाऱ्या व स्त्रियांच्या हालचालींवर कदर ठेवणाऱ्या पुणेरी व्याह्यांमुळें लग्नसोहळाहि बिनबोभाट पार पडतो. अस्सल पेशवाईतल्या जेवणाचा थाट आजहि पुण्यासच पाहाण्यास सांपडेल; आणि वक्तशीरपणाहि पण तिथल्या इतका इतरत्र कोठेंहि दिसत नाहीं. 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु' या वचनाप्रमाणें परिस्थितीबरोबर वांकून वागण्याबद्दल कोंकणस्थ लोकांचा लौकिक आहे, व लग्नविधि गरिबांच्या आटोक्यांत येईल अशी डामडौलाची छाटाछाटहि पण प्रथम चित्तपावनीं पुण्यासच होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

पुणेकर धैर्यवान्, कर्तबगार, चळवळ्ये व अनाठायी उद्योग करण्यांत होणाऱ्या कालापव्ययाबद्दल बेफिकीर, असे असल्यानें त्यांच्या हातून दृश्य कृतींचे ढीगच्या ढीग पडलेले पाहण्याची आशा कोणी धरील तर ती सपशेल खोटी ठरेल व मनाचा निश्चय, अखंड श्रम आणि स्वकर्तव्यनिष्ठा यांचा पूर्ण अभाव त्यांच्या ठिकाणीं असावा अशी जबरदस्त शंका येते. कोणतीहि चळवळ पुण्यापुरतीहि पूर्ण यशस्वी झाली नाहीं, ह्याचें उत्तर दुसरें कोणतें असणार? 'नाना पंथ नाना काज' अशी परिस्थिति असल्यामुळें दृश्य कार्य

होत नाहीं असें म्हणावें तर निरनिराळ्या पंथांनीं जरी आपआपलीं कामें केलीं तरी त्यांच्या राशी पडण्यास हरकत काय ? त्यांच्या बोलघेवड्याच्या शेंगांची भाजी चाखून पाहण्याची संधि वरच्यावर येते. मुळशीचा पेटारा फुटलाच, खादीची मोहीम नामोहरम ठरली, स्वदेशी चळवळ थंडावली, सोन्या मारुती झोंपीं गेला, अशा मोठमोठ्या गोष्टी जरी सोडून दिल्या तरी ब्राह्मणब्राह्मणेतर, हिंदुमुसलमान भांडणांचीं कुमांडें काढून अत्याचारापर्यंत मजल येते हें कशाचें द्योतक आहे ? दक्षिण महाराष्ट्रांत ब्राह्मणब्राह्मणेतर वादाचा वणवा जळत राहिला त्याची आंच पुण्यास पोंहोचली नव्हती त्या वेळीं समेटाच्या वा सामना देण्याच्या लांबलचक गप्पा मारून इतरांना वेड्यांत काढणारा पुणेकर, स्वतःवर ज्या ज्या वेळीं जातीय जुलूमजबरदस्तीचा प्रसंग येतो त्या त्या वेळीं शेवटीं सरकारजवळच करुणा भाकत आप्तस्वकीयांच्या अब्रूरक्षणाच्या फिकिरींत पडलेला आहे. पुणेकरांच्या वाचाळ वृत्तीवर सूड उगविण्यासाठींच कीं काय, खुद्द रेल्वे कंपनीनें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना वर्षानुवर्षें येवढ्या विशेष सवलती दिलेल्या आहेत न कळे ? त्या सवलती आणि सुखसोयी निमूटपणें मान्य करणाऱ्या पुणेकरांच्या स्वभावाची परीक्षा परप्रांतीयानें स्टेशनवर उतरतांच करावी अशी तर रेल्वेकंपन्यांची योजना नसेल ना ! पण काय करतील बिचारे ! कुरुक्षेत्र मानलें जाणारें शिवाजी-टिळक-मंदिर स्टेशनपासून तब्बल दोन मैल ! तिथून परत चालत येतांनाच त्वेष जिरून जाऊन पाय भरून येतात ! तर भाषण तरी कसें करवणार ? जर का पेरूच्या गेटाजवळ अगर खुन्या मुरलीधराच्या देवळाजवळ स्टेशन असतें तर दाखविलें असतें सत्याग्रहानें वा जाहीर निषेधानें काय करून दाखवितां आलें असतें तें !

पुण्यास ज्या निरनिराळ्या जातींनीं वसाहत केली त्या त्या जातींचें वैशिष्ट्य ज्या त्या जातीपुरतें संकुचित न राहतां तें इतर जातींच्यांतहि वांटलें गेलें, आणि पुणेकर म्हणजे दरेक जातींतील अशा अलौकिक वैशिष्ट्याची मूर्तिमंत प्रतिमाच होय. कोंकणस्थ ब्राह्मणांचा वितंडवाद व क्षुद्र बुद्धि, देशस्थांचा आळस व कार्यनिष्ठाभाव, कऱ्हाड्यांचा डामडौल आणि बढाई, मराठ्यांचा आडमुठेपणा व शिवराळपणा, आणि मुसलमानांचा तापट स्वभाव व दंडेली वृत्ति हे गुण विशेषेंकरून प्रत्येक पुणेकरांत मिळून-मिसळून वाग-

तांना आढळतात. त्यामुळें महाराष्ट्रीय इतर प्रांतांतील कोणत्याहि जातीच्या व मनोवृत्तीच्या लोकांना पुण्यास शेरास सव्वाशेर असा भेटतो. तेथील लोक बोलण्यांत जेवढे निर्भीड तितकेच लोकांच्या लाजलज्जेची पर्वा न बाळगणारे. त्यामुळें कोणत्याहि विक्षिप्त कार्यक्रमाची रंगीत तालीम तेथें नेहमीं पाहण्यास सांपडते. त्याचबरोबर लोकांच्या उठाठेवी करण्याचा आपणास काय हक्क आहे असें न मानतां व विक्षिप्ताची गय अगर उपेक्षा न करतां त्यांच्या तोंडावर टवाळी करणारेहि पण लोक पुण्यासच असतात. यामुळें सुधारकास म्हणजे विक्षिप्तास आपलें मनोधैर्य चांगलेंच अजमावून पाहतां येतें. वितंडवाद आणि नसत्या उठाठेवी करणें हा त्यांचा जन्मजात चाळाच. तुम्हीं खिरापतीला बत्तासे वाटले तरी यांच्या डोक्यांत विचारचक्र सुरू होईल. खिरापतीला बत्तासे वाटावेत का खडीसाखर, ती कोणत्या प्रमाणांत, याविषयीं जाहीर सभांतून वादविवादहि होतील. तेथील संस्थांतून नेहमीं फंडगुंडवाद उत्पन्न होऊन अधिकारारूढ पक्ष त्या संस्थेवर मुलूखगिरी गाजवितो. ती संस्था चिरस्थायी व सुसंघटित व्हावी म्हणून इंग्रजशाहीचे उपाय योजण्यापेक्षां मराठेशाहीप्रमाणें पुणेकरांस तात्पुरती मुलुखगिरी करावीशी वाटते. हातीं सत्ता येतांच तिचा दुरुपयोग होणार नाहीं अशी पुणेकरांबद्दल ग्वाही देतां येत नाहीं. कार्य करण्याच्या कर्तबगारीचा विचार केल्यास तेथील लोक आरंभशूर असले तरी उच्च ध्येयाच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देणाऱ्या संस्था प्रत्यक्ष अस्तित्वांत आणण्याबद्दल त्यांचा कोणीहि हात धरूं शकणार नाहीं. गुंडगिरीबद्दलहि पुणेकर आतांशा प्रसिद्धि पावूं लागला आहे, मात्र निर्धन अशा महाराष्ट्राच्या खडकावर तो पडल्यामुळें लक्षावधि फंडाचे लाडू या उपाशी नारायणाला गट्ट करतां येत नाहींत ही त्याची मोठीच निराशा होय. अलीकडच्या तरुण पुणेकरांचा विशेष कल व्यापाराकडे झुकत असावा असें वाटलें तरी आपल्या ओळखीपाळखीच्या अगर नात्यागोत्यांच्या मंडळींना गंडवून त्यांच्यावर व्यापार करण्यापलीकडे त्यांच्या हातून जास्त कांहीं होत नाहीं. व्यापारी ज्ञातींतहि पुणेकराबद्दल—विशेषतः ब्राह्मणवर्गाबद्दल—विश्वास बेताचाच असतो, त्यामुळें परप्रांतीय व्यापाराची नाकीं यांना खुलीं होत नाहींत. तेव्हां आपापसांत गंडविण्याचे प्रकार सुरू होतात यांत नवल नाहीं. भागीदारींत म्हैस ठेवून दुधाच्या महागाईचा

प्रश्न सोडविण्याची प्रथम एक शक्कल म्हणून ब्राह्मणवर्गांत निघाली. त्यासच मोठें स्वरूप देऊन ब्राह्मणांनीं गल्लोगल्लीं डेअऱ्या स्थापन करण्याचा सपाटा चालविला आहे. वाण्याउदम्याचीं दुकानें मांडलीं जात आहेत. शिंप्यांचीं, कापडाचीं, स्टेशनरीचीं, पुस्तकांचीं दुकानें पण ब्राह्मणांनीं काढलेलीं आहेत. पण गिऱ्हाइकी मिळविण्यापेक्षां ती तोडण्याकडेच त्यांचा विशेष रोख असल्या-मुळें धंद्यांत यश लाभत नाहीं. व्यापारी प्रामाणिकपणा ही धंद्यांतील उत्कर्षास कांहीं जरूरीची जिन्नस आहे असें त्यांना मुळींच वाटत नाहीं. गुजर, मारवाडी, बोहरी जातींनीं आपलें व्यापारी वैशिष्ट्य कायम ठेविलें असल्यानें त्यांच्या धंद्यांचा जम पुण्यास चांगलाच बसलेला आहे. पुणेकर गिऱ्हाईकहि कांहीं कमी नाठाळ नसतें. जिन्नस घेणें असो वा नसो, उगीच दुकानांत जाऊन माल पाहून भाव नक्की करण्याचा साधारण प्रत्येकास नादच असतो. ही गिऱ्हाईकांची खोड दुकानदार जाणून असतातच व तेहि पण गिऱ्हाइकांना माल दाखविण्याविषयीं फारसे तत्पर नसतात. मालांच्या किंमती नक्की सांगण्याचा तेथें प्रघात फारसा लोकप्रिय अगर यशस्वी होऊं शकत नाहीं. गिऱ्हाइका-गिऱ्हाइकामध्येंहि जिनसेच्या किंमतीबद्दल अहेतुक का होईना पण थापाथापी असावयाचीच. कोणालाहि विचारा अमुक जिन्नस केवढ्याला घेतलांत, तर हटकून सव्वापट दीडपट किंमत तो ठोकून देईल! आणि मागाहून ती आपण म्हणून कमी किंमतींत आणली अशी बढाई मारील.

पुणेकर याच्या ठिकाणीं अनेकविध उत्तमोत्तम गुणहि कांहीं कमी नसतात. परंतु अत्यंत गुणी अगर सात्त्विक म्हणून पुणेकराची बाहेर ख्याति नसून एक इब्लीस अगर बेरकी मनुष्य म्हणून त्याला इतरप्रांतीय ओळख-तात. आणि परप्रांतीयांच्या दृष्टीनें आपण कसें दिसतों हें पुणेकरांना दाख-विण्याचा प्रस्तुत लेखांत प्रयत्न केला आहे. आरसा कोणापुढें ठेविला तर प्रत्येकास त्यापासून आनंद होईलच असें निश्चयेंकरून सांगतां येणें शक्य नाहीं. विशेषतः स्वतःस सुस्वरूप म्हणवून घेणाऱ्या बढाईखोरापुढें आरसा ठेवला व 'त्या आरशांत बघा आणि मग आपल्या रूपाचें वर्णन चालू द्या!. असें कोणीं म्हटलें तर तें बोलणें कडू लागून ऐकणारास विषादहि वाटेल; परंतु तेवढ्यावरून दुसऱ्याचें करणें गैर झालें अगर आरसाच खराब होता असेंहि म्हणतां येत नाहीं. 'ज्याला कर नाहीं, त्याला डरहि नाहीं'

अशा उज्ज्वल चारित्र्याच्या व्यक्तींना त्यांतील कांहींच लागू पडावयाचें नाहीं. म्हणून स्वतःस वगळून टाकल्याबद्दलचा विषाद वाटण्याचें कारण नाहीं व त्यांनीं हा लेख वाचण्याचे श्रमहि घेण्याचें कारण नाहीं. ज्या व्यक्तींना आपणास हा लेख संपूर्ण वा अंशतः लागू पडतो असें वाटत असेल त्यांनीं यांतील विधानांबद्दल राग धरावयाचा असला तर स्वतःचाच धरावा. 'आपला दाम खोटा, परक्यांशीं झगडा' असा वितंडवाद करण्यांत श्रेय काय? ज्याच्या डोक्याला टोपी बसत असेल त्यानें ती खुशाल वापरावी अशी इंग्रजींत म्हण आहे. तिचा हवाला देऊन आम्ही असेंहि नम्रपणें सुचवितों कीं जर कोणास यांत स्वतःचें प्रतिबिंब दिसलें तर तें त्यानें एकांतांत बसून शांत चित्तानें मनसोक्त पाहून घ्यावें.

---

टीपः—लेखकाचा जन्म १८९४ सालीं पुण्यास झाला. सर्व शिक्षण पुण्यासच १९२० पर्यंत झालें असून पुण्यांत ८१२ अ सदाशिव हें त्याच्या मालकीचें घर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ६०१
ता.
ठाणे.

# मयतांबरोबरचा तहनामा : : १०

रंगेल रंगूताईच्या खाणावळींत त्या संध्याकाळच्या जेवणावर जो 'न भूतो न भविष्यति' वादविवाद चालला होता त्याच्याकडे माझें लक्ष नव्हतें. श्री. ऋषी ह्यांचें 'परलोक विद्यासाधन' ह्या विषयावरील व्याख्यान ऐकून मी नुकताच आलों होतों. माझे जवळलांबचे नातेवाईक, स्नेही-सोबती ह्या सर्वांचे आत्मे माझ्याभोंवतालींच घिरट्या घालीत आहेत ही नवीनच माहिती मला मिळाली आणि मला धडकीच भरली. आणि माझा मी त्याच फिकिरींत होतों. वादविवादाचा शेवटचा निर्णय अधिक मोठ्या ओरडण्यानें आणि त्याहिपेक्षां कल्ला करून प्रतिपक्षाला न बोलूं देण्यानें लावावयाचा असा त्या खाणावळींतील शिरस्ता आणि अशाच अखेरीच्या ओरड्यानें मी एकदम जागा झालों.

" रंगूताई, ह्या रविवारीं गोमांसाची मेजवानी इथं झाली पाहिजे. नाहीं तर ही तुमची खाणावळ कुजक्या सडक्या सनातनी जिनसांची बाजारपेठ म्हणून तिच्यावर आम्ही निरोधन ( पिकेटिंग ) करूं."

खुद्द ब्राह्मणाची खाणावळ, गळयांत जानवें आणि चकचकीत डोक्यावर भला मोठा घेरा-शेंडी ठेवलेला ब्राह्मण, गोमांसाची मेजवानी झाली पाहिजे असें ठासून सांगतो आणि यच्चयावत् ब्राह्मण त्याला दुजोरा देतात, हें पाहून मी भलताच भांबावून गेलों. आपण मशिदींत तर नाहीं ना ? बोलणारा अहिंदु बीजाचा तर नसेल ना ? आणि दुजोरा देणारे निशापाणी करून तर आले नसतील ना ? अशा संभ्रमांत मीं सभोंवार न्याहाळून पाहिलें. रंगूताई

कधीं रागवायच्या नाहींत त्याहि संतापानें लाल झाल्या आणि त्या एकदम ओरडल्या—

" करमरकर, ही रंगूताईची खाणावळ आहे. हा कांहीं गुत्ता नाहीं, कीं पिकेटिंग करण्याच्या तुमच्या गोष्टी मी चालूं देईन. "

मी या वेळीं गुत्त्यांत नव्हतों ह्याची मला अजून खात्री पटेना. रंगूताईचें भाषण टाळ्या, आरडाओरड, खूप उच्चैः स्वरानें हसणें, ह्यांच्या कल्ल्यांत विलीन झालें.

" दूध आणि मांस हे दोन खाद्य पदार्थ पुरविणाऱ्या ह्या यःकश्चित् गाय जनावराचें स्तोम माजविणारे बैल आपल्यासारखे आपणच." करमरकर म्हणाले.

" पशूंची पूजा करून आपण पशू झालों आहोंत आणि नादान बनलों आहोंत." भणगे उद्गारले. या विधानांच्या सत्यतेबद्दल शंका राहिली नव्हती. मी वेड्याच्या इस्पितळांतच या वेळेला नव्हतों ना ! विचार मनांत आला.

" थांबा, उद्यां वाटी वाटी पंचगव्य प्यायला लावीन नंतरच पानं वाढीन. चांगले ब्राह्मणांच्या पोटचे तुम्ही, मुसंड्यासारखे बोलतां, तुमच्या जिव्हा कशा नाहीं झडून पडत ?" रंगूताई दुभत्याच्या फडताळाचें दार धाडकन् आपटून खऱ्याखुऱ्या त्वेषानें बोलत होत्या.

" थांबा, थांबा. व्यंक्या, तुझ्या इथला तो मासिकाचा अंक रंगूताईंना आणून दे. आणि रंगूताई, त्यांतला तुम्ही गाईबद्दलचा लेख वाचाच आणि जर तुमची बुद्धि पालटली नाहीं तर एकेक वाटीच काय पण उद्यां आमटी-ऐवजीं पंचगव्यच भुरकून आम्ही पिऊन टाकूं."

" पूर्वींचे राजे गोब्राह्मणप्रतिपालक असत. उगीच नव्हता सोन्याचा धूर निघत ? आतां आचार राह्यला नाहीं, धर्म राह्यला नाहीं. मग नोकऱ्या मिळत नाहींत म्हणून कशाला रडतां ? "आचारभ्रष्टी सदाकष्टी." रंगूताई म्हणाल्या.

" गाईचें रक्षण केलें, राज्य गमविलें, आतां आम्ही गाईचें भक्षण करून राज्य कमावणार आहोंत." करमरकर म्हणाले.

" कोण हिथं घाणेरडं बोलतो आहे ? " भिकोबा वाढपी हातांत धुर्णी ढाळत घालण्याची काठी वाजवीत मोठ्यानें ओरडून बाहेर आला. त्याचा चेहरा कृतांतासारखा लालबुंद झाला होता. तूप वाढण्यांत काटकसर करून अप्रत्यक्षपणें बऱ्याच जेवणारांना यमलोकीं पाठविणाऱ्या भिकोबाला आम्ही यमराज म्हणून संबोधीत असूं. पण आजच्याइतकें शंभर टक्के क्रौर्य त्याच्या अंगांत पूर्वीं कधींच संचरलें नव्हतें. " बोला, कुणाला गोमांस खायचं आहे ? टाळक्यांतून मेंदूच बाहेर चिरून काढतो या काठीनें."

सर्व एकदम चूप झाले; करमरकर आणि भणगे लटलट कांपूं लागले. एका सेकंदांत अर्ध्या जेवणावरून सर्वजण उठून बाहेर पडलों.

वाचाळ पुस्तकी विद्वत्तेच्या धैर्याची चांगलीच कसोटी लागली. पावित्र्य-विडंबनाच्या निषेधपर सभा भरवून जें इष्ट कार्य अनेक वजनदार गृहस्थांना करतां आलें नाहीं, तें आमच्या भिकोबानें सहज लीलेनें करून दाखविलें. आम्ही भयभीत होऊन खाणावळींतून बाहेर पडलों.

एका जिव्हाळ्याच्या प्रश्नाला प्राप्त झालेलें जागतिक आणि क्रान्तिकारक स्वरूप, आणि तेंहि केवळ एका लेखानें प्राप्त झालेलें पाहून माझा थर-कांपच उडाला. ही विचारक्रान्ति एका पाठोपाठ कूच करीत आमचीं सर्व पवित्र ठिकाणें काबीज करीत जाऊं लागली, तर आई-बाप आणि मुलें ह्यांचीं नातीं एका क्षणांत पालटतील आणि कोण कोणाच्या पोटांत अन्न-नलिकेंतून उतरतों, ही धुमश्चक्री धडपड थोड्याच दिवसांत मला पाहावी लागेल ह्याच भीतीनें मी विशेष गांगरून गेलों.

आजचा दिवसच सकाळपासून माझ्या विचारांना एकसारखा धक्के देत होता. कुटुंब प्रसूत होऊन पुत्ररत्न झाल्याचा आनंद चोवीस तास मीं उपभोगला नसेल तोंच आज सौभाग्यवती तापानें फणफणली असल्याचें पत्र पोस्टमननें तितक्याच बेफिकीर वृत्तीनें माझ्या अंगावर भिरकावलें होतें. पाठोपाठ ग्यानू गड्यानें येऊन सलाम केला आणि स्वतःच्या लग्नासाठीं आठ दिवसांची रजा मागितली. ऑफिसांत जातों तों कळलें कीं, काटकसरीच्या कात्रीनें त्रेपन्न कारकुनांची आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या दोनशें-पन्नास कच्च्याबच्च्यांचीं डोकीं कातरून टाकण्याचें काम मुख्य अधिकारी आज उरकणार होते. आमच्या ऑफिसचें त्या दिवशीं वांद्रेंच झालें. सर्व दिवस

प्राणांतिक उत्कंठेनें घालविल्यावर पांच वाजतां पुत्रप्राप्तीपेक्षांहि आनंदाची बातमी कळली आणि ती म्हणजे क्षयानें आजारी असलेला भिकोबा भट्ट परत येईपर्यंत मला चालू ठेविलें होतें. संध्याकाळीं ऋषींच्या व्याख्यानानें तर मृतात्मे वावरत असल्याची खात्री करून माझ्या मनाला आणिक एक प्राणघातक धक्का दिला होता. जेवण होतांच मी कसाबसा बाहेर पडलों. माझ्या पाठोपाठ चंडिदास हेहि निघाले. आमचा आणि त्यांचा रस्ता एकच होता. थोडीशी गर्दी पातळ होतांच मीं त्यांना म्हटलें–

" चंडिदासभाई, मेलेल्या लोकांचे आत्मे जगांत वावरत असतात ही गोष्ट खरी का हो ? "

" खरी का म्हणजे काय विचारतां ? तुम्हांला त्याबद्दल अजून शंका आहे कीं काय ? "

" मला तें कांहीं माहीतच नव्हतें. आज ऋषींचें व्याख्यान पहिल्यांदांच ऐकलें, तेव्हां समजलें. खरंच का हो असा प्रकार होतो ? "

" पण तुम्ही असें हाकनाक घाबरलेले कां दिसता ? मेलेल्या माणसांचे आत्मे आपण जसे भटकतो तसे भटकत असतात."

" आणि आपापल्या नातेवाइकांना ते ओळखीत असतील नाहीं ? "

" होय तर ? अहो, ते तर आपल्या नात्यागोत्याच्या मंडळीभोंवतीं वावरत असतात."

" आणि मग आपली वागणूक त्यांना समजत असेल आणि त्यांना आपल्या वागणुकीबद्दल बरंवाईटहि वाटत असेल ? "

" होय–होय अलबत. त्यांनाहि आपल्यासारखेच सर्व विकार आहेत. "

" पण नुसतं बरंवाईट वाटण्यावरच ते थांबतात, का ते जिवंत माणसांना त्रास देतात ? "

" त्रास हे देणारच. पण त्यांचा तो त्रास अप्रत्यक्षपणें असतो. बायकामुलं ठार मारतील; कांहीं तरी विघ्न उत्पन्न करतील, आणि फारच चिडले तर कांहीं तरी दुखणं आणतील, नाहीं तर सावकारांना अधीर करून तगादा करवतील. नाहीं तर न कमावत्या म्हाताऱ्या आईबापांना उदंड आयुष्य देतील."

" अस्सं ! मग कठीणच आहे ? नाहीं. तसं नसेल ! "

"बिलकूल शंका नको. मी तुमच्यासारखाच नास्तिक होतों. आईबापांना जिवंतपणीं मी कधीं भ्यालों नाहीं. पहिल्यानं बापाच्या सांगण्यावरून आईला बदडीत असे. पुढें आईच्या सांगण्यावरून वेड्या बापाला बाजेला बांधून झोडपीत असे. असं वाटलं होतं कीं, जिवंतपणीं माझ्यासमोर थरथर कापणारीं मातापितरं, तेव्हां मेल्यावर त्यांच्या रागलोभाची पर्वा काय म्हणून करावयाची ? पण माझा अभिमान पार जिरला."

"कां ? आणि काय झालें ?"

"तेंच सांगतो ना ! पण असं बघा, आपण रस्त्यावर किती असे बोलत उभे राहणार ? वर येत असाल तर बसूं घटकाभर. त्यांतून उद्यां रविवार आहे."

"बरं." असें मीं म्हटलें.

चंडिदास समोरच्या बोळांत वळला आणि एका अंधाऱ्या घरांत शिरला. मीहि पण पाठोपाठ गेलों. दोन जिने ठेंचाळत-चांचपडत मी चढून वर गेलों. चंडिदासानें आपल्या खोलीचें दार उघडलें आणि खिशांतून आगपेटी काढून पैशावाली हिरवी मेणबत्ती लावली. आगपेटीवरच ती दोन थेंबांनीं उभी केली. आम्ही खालीं जमिनीवरच बोलत बसलों.

चंडिदासाचें भयाण घर, त्यांतून तिसऱ्या मजल्यावरील एकच्याएक पोटमाळ्याची खोली, तिचा बहुतेक विस्तार कुट्टकाळ्य. अंधारानें गिळून टाकलेला. हा सर्व देखावा पाहून माझें मन जास्तच भेदरलें. चंडिदासानें खालीं बसतांना आपली गोष्ट पुढें चालू केली—

"आमच्या वडिलांनीं मरतांना मला सांगितलं होतं कीं, माझ्या अस्थि काशीला नेऊन टाक. मीं म्हटलं, काशीला नेऊन टाकल्या काय किंवा आपल्या गांवगंगेंत टाकल्या काय, एकच ! म्हणून मीं त्या आमच्या नदींत टाकून दिल्या. त्या आठ दिवसांतच त्यांच्या रागाचा प्रत्यय मला आला. मी बदली लागलों होतों, ती माझी नोकरी सुटली. तेव्हांपासून मीं जंग जंग पछाडले, पण नोकरी कांहीं लागत नाहीं. आणि आतां तर पदवीधरच नोकरीच्या कोंडींत येऊं लागल्यापासून मला कोणी भेटीलाहि बोलवीनासं झालं आहे."

" पण बदली तुम्ही होतां ती नोकरी सुटली हें ठीक झालं. पण आतां पदवीधर गर्दी करूं लागले तर त्यांत वडिलांचा दोष कसा ? "

" अहो, हेंच तें. मी सुद्धां असंच म्हणत होतों."

चंडिदासानें एक फाटकी चंची बाहेर काढली. त्यांत असलेलें एकुलतें एक विड्याचें पान उभें फाडून अर्धें त्यानें मजपुढें ठेविलें आणि दुसऱ्या अर्ध्या पानाला चुना लावून तंबाखू चोळतां चोळतां तो म्हणाला—

" मी सुद्धां असंच म्हणत होतों. तुम्हांला नाहीं कळायचं. अहो, सोमनाथाच्या देवळाच्या गाभाऱ्यांतून भुंगे निघाले आणि त्यांनीं यवनांना त्राहि त्राहि केल्याचं ऐकलं आहे ना ? इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे. माझी तर खात्री झाली आहे कीं, ह्या बेकार पदवीधरांच्या टोळ्या नेमक्या माझ्या मार्गावर माझ्या बापानं सोडून दिल्या आहेत. आणखी काय सांगूं ? माझी बायको आणि मुलं हींहि तडकाफडकी...... "

" त्यांचं बरं-वाईट झालं कीं काय ?" माझा आवाज भीतीनें कांपूं लागला.

" अहो, तडकाफडकी म्हणजे काय ?–खैराच्या गांठीसारखी बायको, पण एकदोन वर्षांत क्षयानं पार पोखरून खाल्ली. आणि तिच्यामागं तिचं लहान पोर नवज्वरानं गेलं."

" असं ना ? माझंहि तसंच कांहीं बिघडलेलं दिसतं आहे. मी तुम्हांला सांगतोंच तर. बघा, त्यावर कांहीं उपाय करणारा कोणी तुम्हांला ठाऊक असेल तर ? मी आज मोठ्या फिकिरींतच आहे."

चंडिदासानें तोंडांत तंबाखूचा तोबरा भरला होता. त्यानें मानेनेंच मला पुढें बोलण्यास खुणावलें. वैद्यापासून शरीर आणि रोग लपवून ठेवण्यांत अर्थ नसतो, तसें माझें मन ह्याच्यापासून चोरून ठेवण्यांत कांहींच अर्थ नव्हता. मीं त्याला म्हटलें—

" माझ्या आईचे दागिने तिच्या मनांतून मुलीला द्यावयाचे होते. मीं ते सर्व माझ्या बहिणीला देईन असं तिच्याजवळ शेवटच्या घटकेला कबूलहि केलं होतं, पण म्हणतात ना, मनुष्याची बुद्धि बायकांच्या संगतीनं चळते म्हणून ! तिनं आग्रह केला आणि मींहि पाहिलं घरांत गुंजभर सोनं नव्हतं. आईचे दागिने मोडतोड करून तिच्याच अंगावर चढविले झालं !

शिवाय कर्मधर्मसंयोगानं आमची बहीण पाठोपाठ वारलीच, तेव्हां प्रश्नच सुटला. वडिलांचं विचाराल तर सपिंडीच्या वेळीं त्यांच्या पिंडाला कावळा शिवेना, नाइलाजानं मीं कबूल केलं कीं, श्राद्धपक्ष नियमानं करीत जाईन. पुढं गांव सोडून पोटापाण्यासाठीं शहरांत आलों. माझंच पोट भरण्याची मारामार, त्यांत श्राद्धपक्ष कुठं करूं ? बघा पण ! वडील-मातोश्री गांवीं मेलीं त्यांचं इथं कांहीं चालायचं नाहीं असं वाटलं होतं पण आज माझी नोकरी डळमळूं लागली आहे. मला मुलगा होऊनहि मी फिकिरींत आहे."

"काय आजारी पडलाय् काय तो ?"

"तो नाहीं आजारी पडला. त्याची आई दहा दिवसांतच एकदम आजारी झाली आहे."

"फार वाईट ! अहो, पोराचं काय ? अशीं किती तरी पोरं होतात, तेव्हां त्यांतलीं एक--दोन जगलीं तर जगतात. पण मुळांत बायको हयात राहिली पाहिजे ना ? अहो म्हणतातच 'शीर सलामत तर पगडी पचास'."

त्यानें माझ्या जिव्हाळ्याचा प्रश्न बोटावरच्या बोटावर इतक्या झपाट्यानें सोडविला; पण त्याच्या त्या उत्तरानें मी काळजीच्या फेऱ्यांत अधिकच गोंवला गेलों व काकुळतीनें म्हणालों—"पहा, जर कोणी जादूटोणा करणारा असेल, तर आपण दोन पैसे खर्च करूं. पण याचा बंदोबस्त कसाहि करून झालाच पाहिजे."

"त्याची काळजी नको. उद्यां तुम्ही या. तुमच्या आईबापांचे आत्मेच मुळीं इथं येऊन आपापलीं गाऱ्हाणीं सांगतील आणि उपाय पण सुचवतील. मग तर झालं ना ?"

"चालेल."

"पण खर्चासाठीं रक्कम जेवढी मिळेल तेवढी जरूर घेऊन या."

रंगीत मेणबत्ती संपत आली होती आणि आम्हां सर्वांना ग्रासून टाकणारा अंधेर चहूंबाजूंनीं घेरीत होता. मी लगबगीनें उठलों आणि लगेच घरीं आलों.

रविवारचा सबंध दिवस वडील-मातुश्रींना काय काय प्रश्न विचारावेत ह्याच चिंतनांत गेला. आमच्या खेडेगांवच्या घरांत अलोट पैसा पुरलेला आहे, तो खणून काढण्याचें काम वडिलांना सांगावें असा मीं विचार

ठरविला. वडिलांनाहि दुसरें काम नव्हतें, आणि मलाहि पैशाची जरूरी होती अन् आईला ग्यानू गडी परत येईतोंवर घरकाम करायला सांगावें असें मीं ठरविलें.

संध्याकाळचीं जेवणें होतांच मी चंडिदासाबरोबर त्याच्या घरीं गेलों. आम्ही खालीं बसलों. चंडिदासानें प्लँचेट बाहेर काढलें आणि तो कागदावर हात ठेवून बसला.

" हें काय ? तुम्हांला प्लँचेट चालवतां येतं वाटतं ? "

" अहो, मी कोण चालविणार ? तुमचा प्रत्यक्ष बाप येईल, आई येईल, तेच स्वतः चालवतील. हें पहा, माझ्या इथं लप्पंछप्पं कांहीं नाहीं....हं बोलवा तुमच्या बापाला आणि विचारा–"

वडील-मातुश्रींच्या पश्चात् त्यांची मनमुराद नालस्ती करून आमच्या कुटुंबास सोसाव्या लागलेल्या सासुरवासाचा सूड आम्हीं उभयतांनीं उगविला होता. आईबापांच्या दुष्ट आणि पक्षपाती वर्तनाबद्दल माझ्या मनांत आतां शंकाच उरली नव्हती. पण प्रत्यक्ष माझे जमदग्नी वडील प्लँचेटवर आल्याचें समजतांच माझी गाळण उडाली. चंडिदासानें काय नांव आहे ? कोण आहेस ? असें दरडावून विचारतांच माझ्या वडिलांचें नांव कागदावर प्लँचेटनें लिहिलें. शंका आतां राहिलीच नव्हती.

" काय तुला पाहिजे आहे ? " चंडिदासानें पुन्हा खडसून माझ्या वडिलांना सवाल टाकला. ह्याच सुमाराला खोलीच्या कोपऱ्यांतून आणि कौलारांतून एकदम धडधड आवाज सारखा ऐकूं येऊं लागला. मीं अधिकच घाबरून चंडिदासाला विचारलें. " आज हे आवाज कसले होतात ? "

" अहो, भुतं उत्तर करायला पुष्कळ आढेवेढे घेतात. धडपड करतात. " असें म्हणून चंडिदासानें जवळ पडलेली छडी जोरजोरानें जमिनीवर आपटली. सर्व सामसूम झालें. चंडिदासाचा हात प्लँचेटवर होताच आणि प्लँचेट झपाझप लिहूं लागलें.

'तूं माझं श्राद्धपक्ष करीत नाहींस. तुला मी नांदूं देणार नाहीं !'

माझी बोबडीच वळून गेली होती. माझ्या वतीचीं प्रश्नोत्तरें चंडिदासच करूं लागला. त्यानें विचारलें—'मग तुला काय पाहिजे ?' प्लँचेटनें लिहिलें 'श्राद्धपक्षाचा पांच वर्षांचा खर्च मिळून पन्नास रुपये ह्यानें भरावेत.'

'भरावेत म्हणजे कुठें आणि कसे ?'

प्लँचेट लिहितें झालें–'तुम्ही ह्या खोलींत पैसे आणून ठेवा. मी घेऊन जाईन.'

चंडिदासानें प्लँचेट थांबविलें आणि मला विचारलें—

" काय पंत, काय विचार आहे ? उद्यां पैसे बऱ्या बोलानें आणून भराल का ?"

पुन्हा एकदां कौलारांतून आणि खोलीच्या कोपऱ्यांतून चीं चीं आवाज आणि मोठमोठ्यानें धडपड ऐकूं आली. मी घाबरलों, मीं एकदम म्हटलें––

" खिशांत दहा बारा रुपयेच आहेत, उद्यां पगार होईलच; एकदम पैसे घेऊन येईन." मी कसाबसा तेथून खालीं उतरलों. घरीं येऊन मी आलोचन जाग्रण करीत बसलों. पन्नास रुपये दंडावरच माझी सुटका होणार, ह्याच समाधानानें मीं आपल्या मनाची समजूत घातली.

दुसरे दिवशीं मी घरवाल्याचें भाडें, वाण्याउदम्यांचीं बिलें न देतां पगाराचे पैसे जसेच्या तसे खिशांत भरून चंडिदासाकडे आलों. चंडिदासानें पुन्हां प्लँचेटवर माझ्या नातेवाइकांना आव्हान केलें. पुन्हा एकवार धडधडूं लागलें; प्लँचेट थडथड उडूं लागलें. चंडिदासानें 'कोण ?' म्हणून विचारतांच माझ्या आईचें नांव त्यानें लिहून दाखविलें. आईचें श्राद्धपक्षहि बाकीच होतें आणि मोठ्या मुष्किलीनें आणलेली रक्कम वडिलांच्या अगोदर आईच लुबाडून घेऊन जाते कीं काय हीच नवी काळजी मला वाटूं लागली. चंडिदासानें ' काय पाहिजे ? ' म्हणून विचारलें.

'तूं माझे दागदागिने घेतले आहेस. ते दागदागिने माझ्या मुलीला मिळाले पाहिजेत.' असें उत्तर आलें. मीं मध्येंच ओरडून म्हटलें "पण ती मुलगी तर आतां मेली. मग आतां दागिने कोणास द्यावयाचे ?"

प्लँचेट चालूं लागलें— 'ती मेली, म्हणून ती आतां माझ्याजवळच रहावयास आली आहे. तेव्हां माझे सर्व दागिने गुंजन्‌गुंज उद्यांच्या आंत माझ्या हातीं पडले पाहिजेत; नाहीं तर तुझं तळपट होईल.'

आईचा क्रूर आणि करडा स्वभाव पिशाचयोनींतहि तसाच कायम राहिला होता. खुद्द आईच माझ्याशीं बोलत होती, याबद्दल आतां शंकाच उरली नव्हती. 'कनक का कान्ता?' असा हॅम्लेटी प्रश्न माझ्या मनाला घुमवूं

लागला. गरिबीमुळें मला पैसा जेवढा महाग तेवढी बायकोहि दुर्मिळ. आणि तिची दागिन्यांची हौस पुरी करणें माझें अवश्य कर्तव्य. काय करावें याचा निर्णय मला देतां येईना!

चंडिदासाच्या लक्षांत माझी विकल स्थिति आली असावी. माझें रक्षण करण्यासाठीं तो जिवापाड मेहनत करीत होता. त्यानें माझ्या आईच्या भुताला दरडावून विचारलें.

'दागिने नाहीं दिले तर काय करशील ?'

'तुझी बायको आणि मूल........' प्लँचेट लिहूं लागलें.

माझ्यानें पुढील शब्द वाचवले नसते. मीं चंडिदासाचा हात धरला. मी म्हटलें, "विषाची परीक्षा पाहण्यांत अर्थ नाहीं. मीं घरून जाऊन येतों पंधरा मिनिटें थांबा. ती बाळंतपणाला माहेरीं खेडेगांवीं गेली आहे. दागिने येथेंच ठेवून घेतले आहेत. तेव्हां मी तें घेऊन येतों."

मी उत्तराची वाट न पाहतां तसाच खालीं उतरलों आणि घरीं जाऊन दागिन्यांचा डबा घाईघाईनें घेऊन आलों. चंडिदास मी येईपर्यंत निश्चिंत बसला होता. मला आलेला पाहतांच त्यानें डोळे किलकिले केले, धडधड आवाज नेहमींप्रमाणें चाललेच होते. मीं घाबऱ्या घाबऱ्या विचारलें—

"एकसारखे आवाज करीत आई राहिली आहे. तुम्ही एकटे होता. तुम्हांला त्रास तर नाहीं ना दिला ? तुम्हांला आपलें विचारतों. अहो, आमची आई फार क्रूर होती. ती आपल्या नणंदेशीं एकदां भांडली तर तिनें तिचा असा कडकडून हात फोडला कीं, शेवटीं आमच्या आत्याबाईचा हात कापून काढावा लागला!"

"काय सांगावं तुम्हाला पंत, तुम्ही गेलांत आणि तुमचे वडील आले. आणि पैशाबद्दल मलाच अद्वातद्वा बोलूं लागले. मलाहि राग आला. मीहि छडीनें जोरजोरानें त्याला झोडपूं लागलों. त्यांचें रडणें ऐकून तुमची आई बहीण तिथें आली. तिघांनीं मिळून माझे हातपाय करकचून बांधून टाकले. आज तर माझ्या जिवावरच बेतली होती. शेवटीं गुरुमाउलीचा मंत्र उपयोगी पडला. नाहीं तर तुमच्या मी आज नजरेस पडतों ना."

धडधड आवाज सारखे चाललेच होते. मीं गुपचूप दागिन्यांचा डब

प्लँचेटपुढें काढून ठेवला. दुसऱ्या खिशांतील पन्नास रुपये त्याच्या जवळच ठेवले. हात जोडून वडील मातोश्रींची क्षमस्व विनवणी करीत बसून राहिलों.

"आणखी कांहीं सांगायचें आहे का; पैसे दागिने आणले आहेत." चंडिदासानें मोठ्यानें विचारलें.

प्लँचेट लिहूं लागलें—

'दागिने पैसे नुसते आणून काय उपयोग? आमच्या स्वाधीन करा; घराच्या वळचणीला आणून ठेवा. आम्ही आज रात्रीं आमचे जिन्नस घेऊन जाऊं.'

धडधड आवाज सुरूच होते. चंडिदास बोलतां बोलतां एकदम उताणा पडला, हातपाय झाडूं लागला. 'आई, आई, नका मारूं. पंत दागिने पैसे नेऊन ठेवाना हो. थांबा, माझा गळा दाबूं नका. मेलों, मेलों.' असें तो विव्हळूं लागला. मीं दागिने आणि पैसे खोलीच्या वळचणीला नेऊन ठेवले. इकडे चंडिदास मोठमोठ्यानें विव्हळत गडबडा लोळतच होता. खोलींत धडधड आवाज चालूच होता. चंडिदास मोठमोठ्यानें श्वासोच्छ्वास करूं लागला. त्याची ती शेवटचीच घटका होती खास. चंडिदासाच्या मरणाचें किटाळ माझ्यावर येईल या भीतीनें मी गुपचूप खालीं उतरलों. झालेल्या प्रकाराबद्दल कोणाजवळ— खुद्द हिच्याजवळहि अवाक्षरसुद्धां बोलावयाचें नाहीं असें मनाशीं ठरवून घरीं येऊन सकाळपर्यंत विचार करीत पडून राहिलों.

दुसरे दिवशीं सकाळीं सौभाग्यवतीची प्रकृति किंचित् बरी असल्याचें पत्र आलें. त्यांतच खर्चासाठीं ताबडतोब रक्कम पाठवून देण्याबद्दल मजकूर होता. मीं सौभाग्यवतीच्या मालकीचें किडुकमिडूक विकून पैसे पाठविण्याचें ठरविलें. ट्रंक उघडली. माझ्या लक्षांत आलें कीं आईचें आणि बायकोचे दोघींचे दागिने एकाच डब्यांत ठेवलेले होते; आणि तो सबंधच्या सबंध डबा मीं घाईघाईंत आईच्या हवालीं केला होता.

माझी आई निष्ठुर खरी; पण ती तशीच सत्यप्रिय होती. आपली काडीहि तिनें दुसऱ्याला पचूं दिली नव्हती आणि दुसऱ्याच्या सुतळीच्या तन्सडीला ती कधीं शिवली नव्हती. माझ्या बायकोचें चुकून आलेले दागिने तिच्याजवळ मागतांच ती परत करील ह्यांत शंका नव्हती.

मीं डोक्यावर टोपी ठेवली आणि चंडिदासाकडे धांवत धांवत आलों. पाहतों तों चंडिदासाचें घर सताड उघडें होतें. त्याचा तो रात्रींचा पसारा अजून तसाच पडला होता; आणि स्वतः तो कोठेंच दिसेना. वळचणीशीं ठेवलेला दागिन्यांचा डबा किंवा रुपये दिसेनात. चंडिदास काल ठार झाला होता. त्याला सदेह येथून मृतात्म्यांनीं नेलें याबद्दल शंकाच नव्हती. मी घाबरलों. खालीं येऊन तपास केला तर त्यांनाहि चंडिदास कुठें गेला तें माहीत नव्हतें. समोरून कोपऱ्यावरचा वाणी चंडिदासाकडेच जिना चढून येत होता. त्यानें मलाच उलट 'चंडिदास कुठें गेले ? तुम्ही व ते काल रात्रीं खाणावळींतून बरोबर आलांत' असें हटकलें. घरमालकाचा भय्या आमची कुजबूज ऐकतांच कान टवकारून वर आला आणि मला बजावूं लागला. 'घरभाड्याचे सहा महिन्यांचे पैसे चुकवा व मग चंडिदासाचें सामानसुमान हलवा.' तावातावानें तो दाराला कुलूप ठोकणार इतक्यांत म्युनिसि-पॅलिटीचा शिपाई उंदराचे पिंजरे गोळा करण्यासाठीं तेथें येऊन धडकला. चंडिदासाच्या आंतल्या खोलींत तीन पिंजरे आणि त्या दरेक पिंजऱ्यांत दहा दहा उंदीर हीच काय ती दुर्दैवी चंडिदासाची शिल्लक मालमत्ता, वाणी आणि घरमालकाचा भय्या ह्यांमध्यें वाटून घेण्यासारखी जागेवर राहिली होती. म्युनिसिपॅलिटीच्या शिपायास पिंजरे नेण्यास त्यांनीं हरकत केली. तो शिपाई आरडाओरडा करूं लागला.

ह्या संधीचा फायदा घेऊन मीं तेथून पाय काढला. चंडिदासाचें काय झालें तें मला एकट्याला माहीत होतें. माझ्या आईबापांनींच त्याला नाहींसा केला होता हें बोलून दाखविण्याचें मला धैर्य होईना. माझ्या बायकोचे दागिने गेले ह्याबद्दल मला थोडें वाईट वाटलें खरें, पण माझा परोपकारी मित्र चंडिदास केवळ मित्रकार्यापायीं हकनाहक ह्या जगांतून सदेह नाहींसा झाला ह्याच जाणिवेनें मी जिवंत असूनहि मेल्यापेक्षां मेला झालों होतों. चंडिदासाच्या खुनाचा आरोप—खरे गुन्हेगार माझे आई, बाप, बहीण, पण त्यांच्या अभावीं माझ्यावरच लादण्यांत येईल कीं काय ही माझ्या मनांतील धास्ती आजपर्यंत कमी झाली. नाहीं दागिन्यांची चोरी झाली, ही मीं जीव तोडून सांगितलेली हकीगत सौभाग्यवतीस पटत नाहीं. तिनें माझ्या-वर अनेक अघोर अपराध लादले आहेत, आणि मला कायमचा शरमिंदा

करून ठेविला आहे. चंडिदासाच्या खुनाचा आरोप पचविण्यासाठीं अनेक अपराधांचें माझ्या माथीं मारलेलें किटाळ मला निमूटपणें सहन करावें लागत आहे.

चंडिदास उत्तर हिंदुस्थानांतला राहणारा; त्याचा पूसतपास करण्यासाठीं जोंवर कोणी आलें नाहीं तोंवर ठीक. खुनाला वाचा फुटते म्हणतात. आणि सौभाग्यवतीनें माझी उभ्या आळींत येवढी बेअब्रू करून ठेविली होती कीं, संशयित गुन्हेगार म्हणून मलाच पहिल्यानें पकडतील याबद्दल शंकाच राहिली नव्हती. समजा, मीं गुन्हा नाकबूल केला तरी ऐन वेळीं खून झालेला चंडिदासच सदेह येऊन उभा राहिला तर खुनाचा आरोप शाबीत होण्याला कसलीच पुराव्याची उणीव उरणार नाहीं. माझ्या आईबापांच्या आत्म्यांशीं मीं तह केला, वायकोमूल वांचविलें; तसाच तहनामा चंडिदासाबरोबर करतां आला असतां तर माझी धास्ती नाहींशी झाली असती.

पण माझा चंडिदास असा तसा कांहीं बदमाश नव्हता ! स्वतःच्या खुनाचा आरोप माझ्यावर लादला जाईल अशी जबानी तो कधींच देणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. नि. नं. ६०९
ता. ५/५/३८
ठाणें.

# चहाचा त्याग : : ११

एकपत्नी-( ना. जाधवरावांच्या सत्यशोधाबद्दल क्षमा मागून ) रामचंद्रानें सीतेचा त्याग केला, तर मला चहा का सोडतां येणार नव्हता ? महात्मा गांधींनीं चहा सोडण्याबद्दल नवजीवनांत लिहिलेला लेख माझ्या वाचण्यांत आला मात्र,आणि हातांतला चहाचा अर्धा कप मी तसाच्या तसाच बाजूला सारला. म्हणे चहाचें व्यसन जडतें ? आणि व्यसन म्हटलें म्हणजे सुटत नाहीं ! रामाला सीतेचें व्यसन काय कमी होतें होय ? आणि बायकोचें व्यसन कोणाला नसतें ? एकदां निर्धार झाला म्हणजे कितीहि निढावलेलें व्यसन असेना, तें तेव्हांच सोडून देईन अशी माझी प्रतिज्ञा मीं किती तरी वेळां खरी करून दाखविली होती. सौभाग्यवतीला माझी टिंगल करण्याची, कधींहि न सुटणारी अशी, खोड लागली होती; व चहा सोडण्याच्या माझ्या जाहीर निश्चयाची तिनें आजहि मनमुराद रेवडी केली. माझ्या माहेरपणाला आलेल्या दोन बहिणी आणि त्यांच्या पाठराखणीस आलेले त्यांचे यजमान व त्यांचा परिवार, अशी आम्ही मंडळी चहा पीत बसलों होतों. मी चहा सोडण्याचा निश्चय अशा समजुतीनें बोलून गेलों कीं, तो कुणी न ऐकावा. पण सौभाग्यवतीला नणंदांवर आज छाप पाडावयाची होती; माझ्या सुशिक्षित मेहुण्यांना स्वतःचा धीटपणा दाखवावयाचा होता.

"पुरे, कुणी उगीच ऐकेल !" सौभाग्यवती म्हणाली. बोलतांना तिरस्कार दाखविण्यासाठीं तिनें मानेला जो हिसका दिला त्याकडे मीं कानाडोळा केला, मिस्किलपणें नाक मुरडून माझी तिनें उघड टिंगल चालविली,

तरी मीं डोकें शांत ठेविलें होतें. पण, सर्वांचे डोळे माझ्याकडे लागले होते, हंसण्यास उत्सुक झालेले त्यांचे ओठ कोपऱ्याकोपऱ्यांतून मुरडी घेऊं लागले होते. अशा वेळीं सौभाग्यवती, निदान पतिव्रताधर्म ओळखून गप्प बसावयाचें सोडून देऊन, उलट, म्हणाली, "ऐकलं का ? इकडे आणावा कप. थोडा चहा उरला आहे, थोडा घालते."

"बस, निश्चय तो निश्चय! खरा असो खोटा असो." मीं विश्वामित्री थाटाच्या करडेपणानें म्हटलें.

"असे निश्चय किती झाले असतील! अन् किती वेळ टिकले असतील हें सगळं माहिती असतांना पोरासारखं असं बोलण्यांत काय अर्थ आहे ?" सौभाग्यवतीनें मला पोरकट समजावें हें वाईट तर खरेंच; पण नेहमींच ती मला पोरकट म्हणून लेखीत होती. तेव्हां त्याबद्दल माझ्या मनाला तितकेंसें लागलें नाहीं. परंतु मला लहान मुलांप्रमाणें ती जेव्हां आज्ञा फरमावूं लागली तेव्हां एकदम माझें डोकें तापलें.

"असें कां म्हणतेस ? मला कादंबऱ्या वाचण्याचा काय कमी नाद होता! तूं म्हणत होतीस, आठवतं का ? कीं तो कधीं सुटावयाचा नाहीं. पण कादंबऱ्याच काय पण कांहींहि मी आतांशा वाचीत नाहीं."

"पण ब्रिज खेळण्याच्या नादापायीं कादंबऱ्या वाचायला वेळ सांपडेल तर ना ?" सौभाग्यवतीनें माझ्या अब्रूच्या ठिकऱ्या ठिकऱ्या केल्या, मेहुण्यांच्या हंसण्याच्या फैरीवर फैरी झडल्या.

"वा ! ब्रिजपायीं तुम्ही कांहींच वाचीत नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे ?" एक मेहुणे उद्गारले. सर्वजण पुन्हा हसलीं.

"सिगारेटचं व्यसन सुटायचं नाहीं असं तूं म्हणतच होतीस; पण तेंहि मीं सोडून दाखवलंच कीं नाहीं ?" मी फुशारकीनें म्हणालें.

"डॉक्टरांनीं सांगितलं कीं, विड्या ओढण्याचं बंद केल्याशिवाय खोकला थांबावयाचा नाहीं तेव्हांच ना !" सौभाग्यवतीनें टोमणा मारला, आणि ती पुढें चहाचा घोट घेतां घेतां म्हणाली सुद्धां, "मी आपली चहा घेणार हो ! उगीच दुसऱ्याच्या कुठं नादीं लागा ! तेरड्याचे रंग तीन दिवस !"

तिनें माझें म्हणणें निमूटपणें ऐकून घ्यावें, अशी माझी अपेक्षा; पण स्वतःची हुशारी दाखविण्याच्या भरीस पडून ती मला आज चारचौघांत विलक्षणच

छेडीत होती; स्त्री-दाक्षिण्याच्या दडपणाखालीं राहून सारखा मार सहन करणें आतां शक्य नव्हतें, " सपशेल खोटें ! " मीं एकदम संतापानें ओरडलों.

" बरं, आतां बेबीला पाह्यला डॉक्टर येणारच आहेत ना ! त्यांनाच विचारावं. " सौभाग्यवती म्हणाली.

" डॉक्टरांनीं काय सांगितलें हा मुद्दा नाहीं. मुद्दा विड्या ओढण्या-बद्दलचा आहे. सिगारेट ओढण्याबद्दलचा नाहीं. " मीं बचावाचें धोरण स्वीकारलें होतें. जपून तर्कशुद्ध तेवढेंच बोलावयाचें ठरविलें होतें.

" विडीन् सिगारेटमध्यें काय फरक काढतां बुवा ? " मेहुण्यांनीं पृच्छा केली. " अन् विडीला तरी खाकी सिगारेट म्हणतातच ! "

" तसं नाहीं. मी सिगारेट ओढीत होतों. डॉक्टरांनीं सिगारेट ओढूं नका म्हणून सांगितलं हें खरं. पण ही जें म्हणाली कीं, डॉक्टरांनीं विड्या ओढूं नका म्हणून सांगितलं, तें सपशेल खोटं. धादांत खोटं आहे. "

सर्व मंडळी, कोणास ठाऊक, पण एकदम बेफाम हंसूं लागली. माझा तर्कशुद्ध, सत्य आणि सरळ बचाव भुरकन उडून गेला. म्हणून मीं नाइलाजानें शेवटचा जालीम मुद्दा पुढें मांडला. " मी विडीला कधीं शिवलों नाहीं. सिगारेट सुद्धां नेव्हीकट, नाहीं तर गोल्डफ्लेक, नाहीं तर अबदुल्लाच ओढीत होतों, आणि मी जणूं हलक्या विड्या ओढीत होतों असं ही सुचविते तें सपशेल खोटं आहे. माझ्या इतमामाला कमीपणा आणणारं आहे. पण कांहीं का असेना सिगारेट्स मी सोडल्याच ना ? "

" सिगारेट्स सुटल्या तर तपकीर लागली पाठीमागें. एकूण एकच ! दुसरं व्यसन लागलं म्हणजे पहिलं सुटतं असा तर स्वभाव. " ती बोलली.

" पुनः मुद्दा फिरविलास तूं ? मुद्दा असा आहे कीं, सिगारेट्स ओढणं वाईट आहे असं समजल्याबरोबर मीं त्या ओढण्याच्या टाकून दिल्या कीं नाहीं ? तपकीर ओढण्यापासून कांहींच तोटा नाहीं म्हणून मी ओढणार. आज चहा सोडण्याचा प्रश्न आहे. मनुष्याचा निर्धार म्हणजे निर्धार. रामानीं नाहीं का सीतेला टाकून दिली ? " मी तिला निरुत्तर केलें होतें.

" तेवढं करून पाह्यचं राह्यलं आहे ? बायकोला टाकून देण्याच्या कामांत पुरुष एकवचनी, निश्चयी असतात खरे. " चहाचें सामान आवरतांना ती म्हणाली.

एकपत्नी, एकवचनी नेभळ्या रामचंद्रापासून तों बहुपत्नी, अनेकवचनी, पुरोगामी नरपुंगव श्रीकृष्णापर्यंत सर्व मर्दजातीचा तिनें केलेला हा उपमर्द, तिनें मनापासून केला असेल असें मी मानणार नाहीं. तसा खरोखरच तिच्या तो मनचा असता तर मीं चालू दिलाहि नसता. हें सर्व किर्लोस्करी भाष्य, विद्वत्तेची छाप पाडण्यासाठीं, पोपटपंचीनें ती बोलून दाखवीत होती म्हणून मीं गय केली. ती तेथून निघूनच गेली. तेव्हां जास्त प्रश्नोत्तरें आपोआपच थांबलीं.

मी आपल्या खोलींत जाऊन बसलों, आज सुट्टीच होती, तेव्हां सर्व नित्य व्यवहार आळसाच्या हवालीं केले होते. आणि मी चहा सोडण्याच्या केलेल्या भीष्मप्रतिज्ञेबद्दलच एकसारखा विचार करात होतों. एखाद्या गोष्टीचा तिटकारा आला कीं तिच्याबद्दलच्या सर्व खऱ्या हकीगती एकदम दिसूं लागतात. समोरच्या कुसुमला मीं तरुणपणीं मागणी घातली होती, ती तिनेंच नाकारली. माझ्या मनाला त्या वेळीं वाईट वाटलें, पण तिच्याशीं आपलें लग्न झालें नाहीं तें बरेंच झालें असें मागाहून वाटूं लागलें. तिचा बाप श्रीमान् वकील होता खरा, पण त्यानें तो पैसा अगदीं अन्यायानें, म्हणजे गरीब पक्षकारांना अडवून, लुबाडून मिळविला होता. कुसुम हुशारीची घमेंड मारी पण ती दुसऱ्या वर्गांतच कॉलेजाच्या सर्व परीक्षा पास झाली होती. सुरेखपणाचा तिला भारी गर्व होता, तशी ती सर्व मुलींत सुरेख होती, गोष्ट खरी, परंतु गर्विष्ठपणा हा दुर्गुणच. तिच्याशीं लग्नाचें ठरवून मी सपशेल फसलों असतों. बरींच वर्षें ती अविवाहित राहिली आणि गेल्या वर्षी एका बिजवराशीं तिनें लग्न केलें होतें. आय्.सी.एस्. झाला म्हणून काय झालें ! तो बिजवर आहे येवढें सुद्धां जिच्या ध्यानांत आलें नाहीं तिला व्यवहारज्ञान तरी कितपत असणार ! आणि निष्ठुर तर ती पहिल्या नंबरची. तिनें माझी प्राणांतिक निराशा केली, आणखी वरती ती माझी टिंगल करी. आपली त्या वेळीं वडिलांनीं आली मुलगी करून घेतली म्हणून मी वांचलों. नाहीं तर माझ्या नांवें दोन तोळे अफू तरी खपली असती, नाहीं तर ठाण्याच्या इस्पितळांत माझ्या नांवावर एक कायमची खोली तरी अडकून राहती. असो. तीच गोष्ट चहाची वाटूं लागली.

चहावरचें ममत्व मीं हातांनीं बाजूस सारलें आणि त्याचें विकृत स्वरूप मला अधिकच भेसूर दिसूं लागलें. रोजच्या रोज टॅनिन हें विषारी द्रव्य खंडोगणती प्रमाणांत, लक्षावधि लोकांच्या पोटांत जातें, ही गोष्ट पटली मात्र: आणि आगामी १९४१ सालची खानेसुमारी लोकसंख्येच्या अभावीं तहकूब करावी लागेल अशी मला भीति पडली. माझे केस अकालीं पांढरे झाले तो ह्या विषाचाच परिणाम होय. फार काय पण माझी उपजत चलाख बुद्धि केवळ चहाच्या विषानें मंद होऊन, अकालींच मला शाळेस रामराम ठोकून हलक्या नोकरीसाठीं दुसऱ्यांची पायधरणी करावी लागली. माझा प्रपंच भागेना. वाडवडिलांचा इतमाम, ऐषआराम कायम ठेवला नाहीं, तर त्यांचें नांव बुडविल्यासारखें होईल. ह्यासाठीं वडिलांनीं ठेवलेली मालमिळकत विकावी लागत होती. सौभाग्यवतीनें माझा जो अगदीं पाणउतारा चालविला होता, तो तरी माझ्या वाढत्या हलाखीमुळेंच होय. ही सर्व दुःखपरंपरा चहाचें विष माझ्या पोटांत लहानपणीं गेलें त्यामुळेंच ओढवली होती, एक मुद्दा शाबित झाला.

मेहुण्यांच्यासाठीं सिगारेटचा डबा कालच मी संध्याकाळीं येतांना विकत आणला होता, तो फोडायचा तसाच राहून गेला होता. मीं तो फोडला आणि तो नवा-जुना पाहण्यासाठीं त्यांतली एक सिगारेट नाइलाजानें शिलगावली. धुराच्या लोटानें मी चहाच्या देवतेस लोटून देत होतों.

चहाच्या मळ्यांत युरोपियन लोक काळ्या मजुरांचा अनन्वित छळ करतात आणि त्यांच्या रक्तानें माखलेला चहा आपण पितों. केवढी नामुष्कीची गोष्ट ही ! मजुरांच्या रक्ताचें पाणी होतें ही गोष्ट तेवढीशी आक्षेपार्ह नाहीं. तसें म्हटलें तर, मी जें रोजचें धान्य किंवा भाजीपाला खातों, त्यासाठीं काबाडकष्ट करणाऱ्या मजुरांचें काय कमी रक्त सांडलेलें असतें ? पण तें रक्त सांडलें तरी तें रक्त पिळून काढणारा हा शंभर टक्के हिंदी पांढरपेशा जातीचा सावकार, जमीनदार, व्यापारी, ह्या वर्गांतलाच असतो. चहाचा प्रश्न हा केवळ मजुरांच्या काबाडकष्टांचा नाहीं. पण हिंदी आणि युरोपियन ह्या दोन संस्कृतींचा प्रश्न आहे. आणि म्हणून तो राष्ट्रीय प्रश्न समजून चहा सोडला पाहिजे. मुद्दा दुसरा शाबित झाला.

मीं दुसरी सिगारेट शिलगावली. मीं गेल्या चार वर्षांत सिगारेटला हात लावला नव्हता. आज मी केवळ सणावारी म्हणून तिचा स्वीकार करीत होतों.

चहानें मनुष्य दुर्बळ होतो ही सपशेल खोटी गोष्ट. उलट चहा पिण्यानें मनुष्य भलताच ताकदवान् व मवाली होतो. गांवांत हॉटेलें ज्या मानानें जास्त, त्या मानानें मवाली लोकांची संख्या जास्त. फार काय, पण मवाली लोकांची वसति, पोळ्याभोंवतीं फिरणाऱ्या मधमाशांप्रमाणें, चहाच्या हॉटेलभोंवतीं घोंगावत असते. चहा पिण्यानें सर्व खालच्या जातींचे लोक वरिष्ठ झाले, पांढरपेशा जातीला डोईजड वाटूं लागले. चहा ही एक पाशवी शक्तीची सोमवल्ली आहे; मवाली वृत्तीची जहरी दवा आहे. लूट, मारझोड, जर दुनियेंतून नाहींशीं करावयाचीं असतील, तर प्रथम चहा बंद झाला पाहिजे. पाहिजे तर असें करावें कीं, फक्त पांढरपेशा गृहस्थांनींच चहा घ्यावा आणि इतरांचा चहा बंद करावा. असें झालें तर स्वराज्य नसतांनाहि सुराज्याची निर्धास्त शांति सर्वांना प्राप्त होईल. तिसरा मुद्दा शाबित झाला.

तपकिरीची डबी ह्या वेळपावेतों खलास झाली म्हणून ती भरण्यासाठीं आंतल्या खोलींत गेलों. सौभाग्यवती माझ्या खोलींत झरकन् आली आणि गेली. माझ्या हातांत जळती सिगारेट आणि बसलेल्या जागीं चार सिगारेटचीं थोटकें, ह्यांकडे पाहून तिनें 'असं का?' हा भाव व्यक्त करणारा एक मानेला हिसका दिला. तिच्या वल्गनांकडेच काय पण आविर्भावाकडे मुळींच पहावयाचें नाहीं असें मीं ठरविलें होतें. तपकिरीचे दोन बार भरून मीं जळती सिगारेट पुरी केली. पण दुसरी सिगारेट पेटविण्यासाठीं आगपेटीची काडी वायां जाऊं नये ह्या उद्देशानें मी नवीन सिगारेट त्या थोटकावरच आतांपर्यंत पेटवीत होतों, तशी नवीन एक सिगारेट पेटविलीहि पण खरी. केवळ फाटकसर आं!

चहानें बुद्धीला तरतरी येते हें म्हणणें साफ चुकीचें आहे. अस्वस्थता असणें हीच जर तरतरीची मुख्य खूण असेल, तर आजच्याइतका अस्वस्थ व आजच्याइतका तरतरीत मी पूर्वीं कधींच झालों नव्हतों. चहानें कल्पना सुचतात म्हणे! पण आज मी चहा घेणार नाहीं हा निश्चय केल्यापासून माझ्या डोक्यांत 'चहा' ह्याच विषयावरील किती असंख्य व रम्य कल्पनांनीं गर्दी उडवून दिली होती? दुर्दैव कीं माझ्या लहानपणीं माझा

चहा तोडण्यांत आला नव्हता. नाहीं तर कल्पनाशक्तीचे अचाट पराक्रम मीं करून दाखविले असते. जगाला थक्क केलें असतें. चहा न घेतल्यानेंच कल्पना काहूर माजवितात. चवथा मुद्दा शाबित झाला.

माझी सकाळीं दुसऱ्यांदा चहा घेण्याची वेळ झाली होती. विचारांच्या तंद्रींतहि मला माझ्या शत्रूचा—म्हणजे चहाचा—विसर पडला नव्हता. उलट चहाबद्दल मी जोरजोरानें पुनः विचार करूं लागलों. सिगारेट्सच्या वरच्या-वर घेतल्या जाणाऱ्या तुटक आणि अपुऱ्या झुरक्यांनीं माझ्या मनाची जणूं चलचित्रलच जाहीर करण्याचें काम चालविलें होतें. तपकिरीच्या, टाळूंत जाऊन पोंहोचणाऱ्या जादा भराच्चिमटीनेंहि मेंदूंत शिरून चहाबद्दलचा विचार खणून फेकून दिला नव्हता. चहाचेच विचार माझ्या डोक्यांत घोळत होते, याचा अर्थ असा नव्हे कीं, चहा घेण्याबद्दल विचार मी करीत होतों; तर उलट चहाचीं पाळेंमुळें खणून काढण्याच्या उद्योगाला मी प्रवृत्त झालों होतों. मी तर चहा सोडलाच होता. सोडण्याची भीष्मप्रतिज्ञा करून बसलोंच होतों. असाच निश्चय जर माझ्या पत्नीनें, मुलांनीं, घरांतील मंडळींनीं, आळींतील लोकांनीं, गांवांतल्या नागरिकांनीं, प्रांतानें, इलाख्यानें, हिंदुस्थानानें, आशिया खंडानें, सर्व जगानें, त्रैलोक्यानें केला तर, मानवजातीचा अभ्युदयकाळ फार लांब नाहीं; अशीं सुखस्वप्नें सिगारेटच्या धुराच्या वर्तुळांसरशीं आसमंतात् घुमूं लागलीं.

इतक्यांत सौभाग्यवती हळूच खोलींत आली आणि तिनें उद्धटपणें विचारलें, "काय, चहा नाहीं ना प्यायचा?" आणि मींहि तितक्यांच कुऱ्यांत उत्तर दिलें, "छट्. निश्चय झाला तो कायमचा. हें बघ, या बाबतींत मला पुनः विचारशील तर खबरदार."

"सिगारेटचा डबा वन्संच्या यजमानांसाठीं आणला होता ना? निम्मा-अधिक तर इथंच संपला! उगीच भलतं कांहीं करूं नये. सिगारेटनीं घसा उगीच पुनः धरेल! त्यापेक्षां चहा घेतलेला काय वाईट? आपल्याला जर चहावांचून होत नाहीं, तर हा त्रागा करण्यांत काय अर्थ आहे? आणूं का चहा? मलाहि चहा घ्यायचा आहे?"

"तूं खुशाल घे; मला आग्रह कांहीं करूं नकोस. आणि चहाची आठवण होते म्हणून मी सिगारेट ओढीत बसलों आहे असं समजूं नकोस."

सौभाग्यवती ओशाळी होऊन निघून गेली.

चहाबद्दलचें वाङ्मय तरी असें काय आहे ? तें पाहण्यासाठीं मी इंग्रजी विश्वकोष हातीं घेतला आणि चहाचें वर्णन वाचूं लागलों. मलेरियाचें उच्चाटण करावयाचें असलें तर डांसांच्या निरपराधी अंड्यांचा संहार करावा लागतो, तसा चहाच्या मळ्यांचा नायनाट उडवून टाकावा या विचारानें चहा कोठ-कोठें होतो, हें मीं बारकाईनें टिपून ठेवलें. चहा चीनमधून प्रथम इतर देशांत कसा गेला ह्याचा इतिहास मोठा मनोरंजक, पण छेः ! दरेक व्यसनाभोंवतीं मनोरंजनाचें आकर्षक साहचर्य असतें, त्यांतलाच हा प्रकार! मी पुन्हा चहाच्या तावडींत सांपडेन ह्यासाठीं पुस्तक बंद करून बाजूस ठेवलें.

आज रविवार होता. माझें घर मंडईच्या वाटेवर. तेव्हां कचेरींतील स्नेहीमंडळी, नातेवाईक, या सर्वांचें तें एक मोफत विश्रांतिभुवन (फुकट चहाचें ठिकाण) असे; आणि बारा वाजेपर्यंत तीसचाळीस कप चहा झाला नाहीं असें कोणत्याच रविवारीं कधींच झालें नव्हतें. आजहि माझी मित्रमंडळी येतील, त्यांना मीं चहा दिला नाहीं तर ती रागावतील. त्यांना मीं चहा दिला तर त्यांच्याबरोबर आपल्यालाहि चहा घ्यावा लागेल आणि आपला निश्चय ढासळेल म्हणून मीच बाहेर पडण्याचें ठरविलें. कपडे चढवून मी बाहेर पडलों. रस्त्यानें मी ओळखीचीं घरें टाळीत चाललों होतों. न जाणो मला कोणी बोलावील, चहाचा आग्रह करील, मला माझ्या निश्चया-बद्दल फजित करील, नाहीं तर निश्चय मोडील, ह्या विचारांनीं ओळखी-पाळखीचीं सर्व घरें आणि आप्तस्नेही चुकवीत वारेमाप मी हिंडत होतों. कोणी मला भेटूं नये अशा बेतानें मी भटकत होतों. मला दुपारच्या जेवणा-पर्यंतचे तब्बल दोन तास कसे तरी घराबाहेर काढणें भाग होतें. गांवाला दोन-तीन फेऱ्या मारून मी थकलों, त्याहिपेक्षां तोंड चुकविण्याच्या फिकिरीनें मी रंजीस आलों होतों. निवांत अशी मला जागाच सांपडेना. जिकडे जावें तिकडे लोक भटकत होते. शेवटीं वैतागलों. नदीच्या कांठाकांठानें मी चालूं लागलों. मी कुठें जात आहे ह्याकडे माझें लक्ष नव्हतें. माझ्या पाठीमागें लाग-लेला चहा; माझ्या घरांत धुमाकूळ माजविणारा चहा; हिंदुस्थानची अवनती करून त्याला पारतंत्र्यांत डांबून ठेवणारा चहा; कसा एकदांचा नाहींसा होईल ह्याबद्दलचे विधायक कार्यक्रम मी रचित होतों. राजतंत्रार्शी ह्या बाब-

तींत प्रतियोगी सहकारिता करावी कीं नाहीं हा प्रश्न सुटेना. मी कसाहि वागूं लागलों तरी सरकारनें आणि राष्ट्रानें मला खरेच्या कारे म्हणावयाचें नाहीं असें आश्वासन दिलें तरच मी हें कार्य शिरावर घेणार, वगैरे विचार करीत मी नेमका स्मशानभूमींत येऊन पोंहोचलों. स्मशानांत मला नेहमीं भीति वाटत असे, पण आज चहाचा ब्रह्मसंबंध मला घरीं बसूं देत नव्हता तेव्हां स्मशान मला आज निवाऱ्याचें स्थान वाटलें.

माझ्या निश्चयापेक्षां तो मोडण्याच्या भीतीनें मी हवालदील झालों होतों. आपण जसा कांहीं कोणाचा अपराध केला आहे अशा भावनेनें मी तोंड चुकवीत फिरत होतों. आतां मला निवांतपणा मिळाला होता. मीं चहाबद्दल आंकडेशास्त्र तयार करण्याचें ठरविलें.

दिवसांतून ६ वेळां असा मीं गेलीं पधरा वर्षें व तत्पूर्वीं पंधरा वर्षें दररोज दोनदां इतका चहा सरासरी घेतला होता. एकंदर माझ्या आठवणींत मी निदान ४३२०० कप चहा प्यालों होतों. आठ हजार पौंड चहा माझ्या पोटांत गेला होता. सरासरी त्रेचाळीस कप टॅनिन विष माझ्या पोटांत गेले होतें. काय भयंकर ही आंकडेबाजी ? मी तर तिनें ठारच झालों. मी प्यालेला चहा एखाद्या हौदांत ओतला असता तर मीच काय पण माझें सर्व कुटुंब त्यांत बुडून गेलें असतें. वायां गेलेल्या चोथ्याचा डोंगर सांठविला असता तर त्याचें एक हवा खाण्याचें ठिकाण झालें असतें. केवढा हा शक्तीचा अपव्यय. या माझ्या विचारांच्या तंद्रींतून पावलांच्या आवाजानें मी जागा झालों. वळून पाहतों तों एक प्रेत माझ्या पाठीमागेंच येऊन उतरलें.

आज दैव कसें हात धुऊनच माझ्या पाठीस लागलें हे तें ! तें प्रेत एका ओळखीच्या माणसाचेंच निघालें आणि चुंबींत मी तेथें अडकून पडलों. बाकीची मंडळी आपापल्या कामांत गर्क होती, विड्या ओढण्यांत कालक्रमणा करीत होती. मी अधेंमधें विडीहि ओढीत असे, पण आज सकाळीं विडी मीं कधींच ओढली नव्हती असें जाहीर केलें होतें. मला चहाच्या कल्पनेशिवाय वेळ जाण्यास दुसरें कांहींच साधन नव्हतें. मेलेला मनुष्य अति चहा पिण्यानें मेला असेल, किंवा मुळींच चहा न प्यावयास मिळाल्यामुळें मेला असेल ! त्याच्या बरोबरच्या मंडळींनीं मरणाचें कारण नवज्वर सांगितलें. पण नवज्वर तरी कां झाला, आणि त्याचीं कारणपरंपरा थेट चहापर्यंत जाऊन

भिडली. स्मशानांत चहाबद्दल मीं तब्बल तीन तास इतका विचार केला कीं, चहाबद्दलची कोणतीहि कल्पना आतां शिल्लक राहिली नव्हती. भर बारावर एक वाजतां उन्हांत तळतळत मी कसा बसा घरीं येऊन पोंहोचलों. आंधोळ करून मी जेवावयास बसलों. स्मशानाची हकीकत ऐकल्याबरोबर मंडळी गंभीर झाली होती. तो गंभीरपणा आतां ती विसरली होती आणि जेवणावर रोजच्या आनंदाच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या.

" आम्हांला वाटलें तुम्ही घरीं चहा घेत नाहीं म्हणून निश्चय करून घरोघरीं यथेच्छ चहा घेत फिरत असाल." मेहुणे नंबर एक उद्गारले.

" स्मशानांत जाण्याच्या अगोदर पांच-दहा ठिकाणीं चहा उकळला असेलच." मेहुणे नंबर दोन बोलले.

" बाहेर कुठं गेले, कीं चारदोन ठिकाणीं चहा होणारच." नंबर दोनच्या बहिणीनें यजमानांच्या बोलण्याची री ओढली.

" तूं जरी चहा सोडलास तरी असं नको समजूंस कीं, आम्ही सोडूं. आम्ही दोन दिवस इथं आहोंत तों आपल्या चहा घेणार रे बुवा." नंबर एकची बहीण म्हणाली.

" दुसऱ्यांनीं चहा घेऊं नये असं मीं कुठें म्हटलंय्." मीं उत्तर केलें. कुटुंबापासून सुरुवात करून जगांतला चहा नाहींसा करण्याचा निश्चय एकदम या माझ्या एका वाक्यानें ढासळला.

" का हो, तुमच्या डोक्यांत हें खूळ कोठून शिरलं ? ह्याचे परिणाम काय होतील त्याचा तुम्हीं विचार केला आहे का?" मेहुणे नंबर एकनीं विचारलें.

सौभाग्यवती वाढतां वाढतां एकदम पवित्र्यांत उभी राहून म्हणाली— " आम्ही कधीं विचारच करीत नाहीं कशाचा. आम्ही जर स्वतंत्र विचार करूं लागलों तर महात्मा गांधींना काय काम शिल्लक उरणार ? "

सौभाग्यवतीच्या शरीरांत स्त्रीस्वातंत्र्याची 'जागती ज्योत' भकभकूं लागली होती. मी, जरा दोन इंच पाटावर मागें सरकून ती स्वयंपाकघरांत गेल्याबरोबर, सुटकेचा निःश्वास सोडला.

" चहाच्या मळ्यांतील हिंदी मजुरांचे हाल कमी होतील चहा सोडला तर." मी उत्तरलों.

"वाहवा ! आज त्यांना कामधंदा तरी मिळत आहे. आणि मार पडत असला तरी पाठीवर पडत आहे." आमटीचा भुरका मारून मेहुणे नंबर दोन पुढें बोलते झाले, "पण चहाच तुम्ही घेईनासे झालांत, म्हणजे मळेवाले व्यापार बंद करतील. हजारों मजूर जें काम करीत आहेत त्यांना घालवून देतील आणि ते मजूर भुकेनं मरतील."

"दुधाचा शरीरांत योग्य पुरवठा झाला पाहिजे. चहापायीं सर्व दूध खर्च होतं म्हणून माणशीं जरूर तेवढं दुधाचं प्रमाण पोटांत जात नाहीं." माझ्याजवळचा रामबाण मुद्दा मीं भिरकावला.

"अहो, हा चहा आहे म्हणून घरोघर दूध तरी घेतात ! चहाच्यापूर्वी मालकापासून गडीमाणसापर्यंत एकेक चमचा तरी दूध नियमानं कुणी देत होतं का ?" मेहुणे नंबर एक यांनीं माझा रामबाण जागच्याजागीं थांबविला.

"चहा सर्वांनीं सोडला तर दुधाला भाव येणार नाहीं. आणि आज जीं लाखों दुभतीं जनावरं पोसलीं जात आहेत, तीं सगळीं थेट वांद्याला पोंचवावीं लागतील ?" नंबर दोनच्या मेहुण्यांनीं दुजोरा दिला.

"तेंच हवं आहे इकडे ? गाय सध्यां इकडे पवित्र वाटेनाशी झाली आहे. पण बोलावं कुणी ?" सौभाग्यवती उद्गारली.

किर्लोस्करी वाङ्मयापासून सौभाग्यवती अलिप्त असल्याचें पाहून तशा त्या पराजित मनोवृत्तींतहि मीं समाधानाचा सुस्कारा सोडला. जेवणें आटोपलीं, आम्ही आपापल्या खोल्यांत जाऊन पडलों.

आज सकाळपासून एका चहा सोडण्यापायीं मला जी जिकीर आणि फजिती सहन करावी लागली होती, तीमुळें मी अगदीं मेटाकुटीस आलों होतों. तशांत स्मशानांत तब्बल तीन तास बसून राहावें लागलें, आणि भर उन्हाचा जो मी घरीं आलों, त्यामुळें माझें डोकें दुखूं लागलें होतें, तें जेवल्यानंतरहि थांबेना. मी आपण होऊन बसकरावर गडबड लोळत होतों. डोकें उतरावें म्हणून मीं लागोपाठ पांच सिगारेट, अर्धा तोळा तपकीर ओढून पाहिली. माझ्या डोक्यांत एकचएक कल्पना धुमाकूळ घालीत होती. ती म्हणजे चहाबद्दलचीच होती. चहा सोडण्याचें तत्त्व मान्य करून तपशिलांत मी ठरवीत होतों कीं, दरेकानें निदान किती वेळां

चहा घ्यावा, दरेक वेळीं किती घ्यावा, तो शास्त्रोक्त पद्धतीनें कसा तयार करावा, भुकटी वापरावी का पत्ती, आणि ती कोणत्या कंपनीची. चहाबरोबर पाव घ्यावा का बिस्किटें घ्यावींत, चहानंतर कुटलेली सुपारी खावी का चिकणी. वेलची खावयाचीच तर ती लवंगेसह का एकटी; वगैरे प्रश्नांचें एकच काहूर माझ्या डोक्यांत माजून राहिलें होतें. त्या सर्व कल्पनांचा ढीग फिरवून त्यांतील धडधडशा कल्पना निराळ्या निवडून मी त्यांचें वर्गीकरण करण्याच्या नादांत होतों. इतक्यांत सौभाग्यवती सुपारी खातखात समाचारासाठीं आली.

"कांहीं होतं आहे का आज?" तिनें विचारलें,

"छेः! स्मशानांत जावं लागलं, ऊन लागलं त्यामुळं डोकं दुखतं आहे."

"आज हे काय एकेक विचार चालले आहेत! उठल्याबरोबर चहाच काय पिणार नाहीं म्हणून अर्धाच चहा टाकून दिला! कध्धीं कध्धीं स्मशानांत गेला नाहींत, तर मुद्दाम होऊन स्मशानांत काय जाऊन बसलांत! जेवणावर तरी बोलत होतात, त्याला ताळतंत्र कांहीं होतं का! मी भाऊला डॉक्टरांना बोलावण्याला सांगितलं आहे."

"तें कां म्हणून? साध्या डोकं दुखण्यासाठीं डॉक्टराला बोलावलंस! अन् त्याची भेटफी चढेल ती?"

"नुसतं डोकं दुखत असेल असं मला वाटत नाहीं. शेजारचा महादेव नाहीं का! असंच डोकं दुखतं म्हणून पहिल्या पहिल्यानं म्हणत असे. आपलं वेळींच औषधपाणी केलेलं बरं."

"म्हणजे मला महादेवाप्रमाणें वेड लागणार आहे असें तूं समजतेस कीं काय?"

"लागणार आहे कशाला! पण नाहीं बोलत. चार वर्षांत सिगारेटला शिवला नाहींत, अन् आज सकाळीं अन् आतां खळ पडून न देतां एकसारख्या ओढीत आहांत! नशीब पोरांचं दुसरं काय?" सौभाग्यवतीचा कंठ दाटून आला.

"हें बघ, भलतंसलतं काय बोलतेस? मला आज त्रास झाला. अन् तुला माहीत नाहीं मी एक मोठा राष्ट्रीय, नव्हे जागतिक प्रश्न सोडविण्याच्या नादांत आहे. तो जर सुटला तर मला आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळेल."

"काय सांगावं! वेड्याला आतां काय निराळीं शिंगं का असतात! ऐकलं का! स्वस्थ पडून रहावं. कुलस्वामीचं, गोमातेचं स्मरण करावं. बरं वाटलं, तर तुळजापुरच्या अंबाबाईची खणानारळांनीं ओटी भरीन. बोडण गोंधळ घालीन."

"माझं म्हणणं ऐक तर खरं?"

"हूं, शंकाच नको! हं ऐकलं, स्वस्थ पडून राहावं."

"आतां काय करावं! मीं चहा कसा सोडावा, किती सोडावा, याचा विचार करीत आहे. समजलं? मला कांहीं वेड लागलं नाहीं, कांहीं नाहीं."

"मी म्हणणारच आहे! डोकं चढलं आहे ना! चहा घेऊन पाहावा! मुळीं सकाळच्या सकाळीं चारदां चहा घेण्याची संवय; तो जर घेतला नाहीं तर नाहीं का डोकं दुखणार!"

"चहा सोडल्यानं कुठं डोकं दुखेल का?"

"खात्रीनं दुखेल! माझंच आज सकाळपासून सारखं डोकं दुखतं आहे, तें माझं मला माहीत."

"तुझंच म्हणणं बघ कसं खोटें पडलं. मी चहा घेतला नाहीं म्हणून माझं डोकं चढलं आणि तुझं जास्त वेळां चहा घेतल्यानं चढलं ना!"

"इकडे चहा नाहीं घेतला, तर मी एकटी घेईन असंच वाटतं ना?"

"वाः! हा तुझा जुलूमच आहे! तुझं डोकं दुखतं म्हणून मी चहा घेऊं कीं काय?"

"आम्ही बोलून चालून बायका! आमचं कुठलं येवढं भाग्य! अगदीं ऋषीपंचमीलासुद्धां मी चहा घेतल्यावांचून राह्यलें नाहीं. पण हीं व्रतंवैकल्यं ज्यांच्यासाठीं करायचीं त्यांना टाकून माझ्या घशाखालीं चहा उतरेल का?"

पाळण्यांतल्या बेबीनं रडण्याची किंकाळी मारली. भावनांच्या अतिरंजित प्रसंगापासून मी बचावलों.

थोड्या वेळानें सौभाग्यवती हळूच खोलींत आली आणि गेली. ती काय करीत होती तें मी पाठमोरा असल्यामुळें मला दिसलें नाहीं.

माझें डोकें कांहीं केल्या राहीना ! टेबलांतल्या ॲस्पिरीनच्या टिकल्या काढल्या. कशाच्याबरोबर घ्याव्यात याचा विचार करीत होतों.

* * *

माझा डोळा लागला. डोकेंहि उतरलें. सौभाग्यवती हातांत दोन चहाचे पेले घेऊन हंसत हंसत खोलींत आली.

" काय डोकं राह्यलं ना ? "

" ॲस्पिरिन घेतलं तेव्हां डोकं उतरलं."

" ॲस्पिरिननीं असेल. पण चहानीं डोकं उतरतं." असें म्हणून तिनें टेबलावरचा थर्मास उघडून पाह्यला. " नाहींच राह्यला कांहीं शिल्लक. विसळून टाकते."

" रात्रीचा चहा आतांपर्यंत कुठला राह्यला ? "

" रात्रीचा कुठला आला आहे ? बेबी उठला, त्याच्यासाठीं दूध ऊन करण्यासाठीं स्टोव्ह पेटवला होता, तेव्हां तर चहा केला. एक तास सुद्धां झाला नसेल. मग आणखीन् चहा पाहिजे का ? का वन्संच्या यजमानां-बरोबर घ्याल ? थर्मासमध्यें दोन अडीच कप मावतो. म्हणून विचारतें."

मुद्देमालानिशी पकडलेल्या चोराला बचावच राहत नाहीं. अंगावर डाव आला असें मी आपण होऊन थोडंच कबूल करणार होतों ! मीं म्हटलें,

" आण. तुझ्यासाठीं घेतों. काय करतां ! तुझं डोकं दुखतं आहे ना ! अन् असं नको तूं समजूस कीं मी एक वेळां चहा घेतला तरी तेवढ्यानं माझ्या निश्चयापासून मी ढळेन. मन ज्याचं खंबीर नसेल त्याचं व्यसन सुटायचं नाहीं. पण ज्याचा निश्चय बळकट त्यानं व्यसनाला काय म्हणून भ्यावं ? सोडायचा म्हटलं तर कायमचा सोडीन चहा."

" पण त्यापेक्षां असले भलतेसलते निश्चयच कशाला करावेत ? "

" मग आतां डॉक्टरला नाहीं ना बोलावीत ? "

" मला मघांपर्यंत मोठी काळजीच पडली होती. त्याचा काय नेम ! सगळीं लक्षणं मला भलतींच दिसत होतीं. अंबाबाई नवसास पावली. वन्सं इथें आहेत तोंच बोडण-गोंधळ करून घेतें, त्यांच्या कुंवारणी बोडणासाठीं आहेतच अनायासें. "

आम्ही चहा प्यालों. चहाचे कप घेऊन जातां जातां मीं सौभाग्यवतीस म्हटलें,

"मी आतां सगळ्यांच्या बरोबर चहा नाहीं घेणार बरं का! उगीच चेष्टेचा विषय व्हायचा सर्वांना."

"मी कुणाला सांगणारसुद्धां नाहीं. थर्मासांत चहा आणून गुपचूप ठेवतें. म्हणजे झालं कीं नाहीं?"

समाप्त

REFBK-0005709